इ. ग्रंथ. १२०४

# गांधी आणि गांधीवाद

राज
१७३

लेखक :
पट्टाभी सितारामय्या

सारांश व अनुवाद :
गं. भा. निरंतर

किंमत चार रुपये

# गांधी आणि गांधीवाद

" डॉ. बी. पट्टाभी सीतारामय्या यांच्या
*Gandhi and Gandhism*
या ग्रंथाचा सारांशात्मक अनुवाद."

सारांश आणि अनुवादः

**गं. भा. निरंतर**

किंमत चार रुपये

प्रकाशक :
रा. ज. देशमुख
देशमुख आणि कंपनी
१९१ शनवार, पुणें २

सर्व हक्क सुरक्षित

मुखपृष्ठावरील चित्र : दीनानाथ दलाल

मुद्रक :
स. रा. सरदेसाई, बी.ए., एलूएल्.बी.
नवीन समर्थ विद्यालयाचा
'समर्थ भारत' छापखाना,
४१ बुधवार, पुणें २

१९४६ डिसेंबर

# अनुक्रमणिका


मुख्य सूत्र

१ गांधीजी : व्यक्ति आणि व्यक्तित्व (पृ. ९–२९)

गांधीजींचें व्यक्तित्व ९
त्यांची शिकवण ११
एक महात्मा १२
परिस्थिति आणि चारित्र्य १३
सामाजिक स्थित्यंतरें १४
गांधी आणि गांधीवाद १६
गांधीवादाचीं अंगोपांगें १८
गांधीवाद-एक समन्वय २१
बहिष्कार आणि स्वदेशी २३
नवयुगाचें नवेपण २४
ऋषिवर्यांचे सहकारी २६
गांधीवादाचें सार २७

२ अहिंसा (पृ. ३०–४७)

एक नवा प्रयोग ३०
अहिंसेंतील शौर्य ३१
अहिंसेची परंपरा ३२
सत्याग्रह : एक व्रत ३४
बीज आणि वृक्ष ३५
शांततेनें मिळविलेला विजय ३६
विशेषण आणि नाम ३७
समर्थांचें शस्त्र-अहिंसा ३८
आक्षेपांचें निराकरण ३९
सत्याग्रहाची भूमिका ४१
अहिंसेचें यशापयश ४४
शांति-दल ४५

३ सत्याग्रह (पृ. ४८–६४)

सत्याग्रहाचें तत्त्वज्ञान ४८
सत्याग्रहाचा उगम आणि विकास ४९
सत्याग्रहाचें तत्त्व आणि तंत्र ५१
पाश्चात्य शांततावादी (Pacifist) ५२
सत्याग्रहाचा अभ्यासक्रम ५४
सत्याग्रहाचा संस्मरणीय प्रसंग ५५
हिंसकाचें मानसशास्त्र ५७
अंतःस्फूर्तीचा प्रभाव ५९
सैनिक आणि सत्याग्रही ६०
सत्याग्रहाचा दुहेरी परिणाम ६२
गांधीजींची सत्याग्रह-पद्धति ६३

४ सत्याग्रह आणि युद्ध (पृ. ६५–७३)

अहिंसामय राष्ट्र ६५
गांधीजींचें ध्येयः नैतिक विजय ६६
जनतेचें युद्धकार्य ६७
सत्याग्रहाचे कांहीं नियम ६९
सत्याग्रहाचे वैयक्तिक नियम ७०
घटक या दृष्टीनें– ७१
जातीय दंगयाच्या वेळीं– ७२

५ सत्याग्रहाचें तंत्र (पृ. ७४–८४)
गांधीजींची सेवावृत्ति ७५
भाग्यवान् ध्येयवादी ७६
सत्याग्रहाचे खुले डावपेच ७८
सत्याग्रह आणि Passive Resistance ८०
संन्यास नव्हे ! परित्याग ८२
मौन ८२

६ उपवास (पृ. ८५–९५)
उपवास हा अंतःस्फूर्ति आहे ८६
कांहीं प्रसिद्ध उपवास ८७
उपवास म्हणजे आत्महत्या नव्हे ९०
एक अविस्मरणीय उपवास ९१
उपवास हा जुलूम आहे काय ? ९३
निरोधन आणि बहिष्कार ९४

७ धर्म (पृ. ९६–१०५)
गांधीजी-एक सनातनी ! ९७
गांधीजी आणि ख्रिश्चन धर्म ९९
गांधीजींचा धर्म १००
त्या धर्माचें सामर्थ्य १०१
धर्म आणि राजकारण १०३
हिंदी राजकारणाची व्याप्ति १०४

८ गांधी–आश्रम (पृ. १०६–१०९)
गांधी–आश्रमाचें स्वरूप १०७
आश्रमांतील जीवन १०८

९ गांधीवाद आणि सोशॅलिझम् (पृ. ११०–१२६)
हिंदुस्थानांतील विकृत प्रगति ११०
गांधीजींचा समाजवाद १११
कालाचें वैशिष्ट्य ११२
दोन पंथांचा संघर्ष ११३
संघर्षांतील सत्य ११४
संपत्ति कीं सेवा ? ११५
समाजवादाचें हिंदीकरण ११६
मनुष्य आणि यंत्र ११८
साम्राज्यवादी विचारपद्धति ११९
यंत्र आणि यंत्रयुग १२१
गांधीवादी समाजरचनेंत यंत्राचें स्थान १२२
बेकारीची मीमांसा १२३
विश्रांति आहे. काम पाहिजे ! १२४
पौर्वात्याचें पुनरुज्जीवन १२४
पुढाऱ्यांना शिकवा ! १२५

१० हिंदी खेडें (पृ. १२७–१३२)
खेड्यांचें स्वयंपूर्णत्व १२७
इंग्रजी राज्याचें देशी स्वरूप १२८
ग्रामपंचायत १२८
शहरें आणि खेडीं १२९
परावलंबनाची मालिका १३०

११ आर्थिक उद्धार (पृ. १३३–१४९)
ब्रिटिश साम्राज्याचा आधार १३३
खादीची व्याख्या १३४
चरखा हेंहि एक यंत्रच १३४
गांधींचें अर्थशास्त्र १३५
गिरणीकापड विरुद्ध खादी १३६

स्वस्ताईची किंमत १३७
खादी स्वस्त आहे का ? १३९
ऑल इंडिया व्हिलेज इंडस्ट्रीज असोसिएशन १४२
विधायक कार्यक्रम आणि अहिंसा १४४
सविनय कायदेभंगाची पूर्वतयारी १४४
एक औद्योगिक पाहणी १४५
टिकाऊपणाचें गैरलागू समर्थन १४६
वस्तु हेंहि चलन आहे १४७
कच्चा माल, उत्पादन आणि नफा १४७

१२ शैक्षणिक पुनर्घटना (पृ. १५०–१५५)

राष्ट्रीय शिक्षण १५१
साक्षरता आणि संस्कृति १५२
शिक्षणाचा नवा संप्रदाय १५३
पदवीधरांचें कर्तव्य १५४

१३ सामाजिक न्याय (पृ. १५६–१६०)

अस्पृश्यता–निवारणाची पार्श्वभूमि १५७
युगप्रसिद्ध उपोषण १५८
हरिजन चळवळ १५९

१४ जातीय ऐक्य (पृ. १६१–१६४)

हिंदु-मुसलमान–ऐक्य १६१
तेढ शहरांत आहे, खेड्यांत नाहीं. १६२
फोडा आणि झोडा १६३

१५ नैतिक उद्धार (पृ. १६५–१६८)

पापाचा पैसा : दारू ! १६५
ज्ञानासाठीं मद्यपान ! १६६
शहराचें हीन सौंदर्य १६७

१६ जेव्हां स्वराज्य येईल ! (पृ. १६९–१७४)

शहरांनीं लुटलेलें खेडें १६९
जेव्हां स्वराज्य येईल ! १७१
नवें युग म्हणजे नवी समाज-पद्धति १७३

१७ समारोप (पृ. १७५–१८०)

गांधीवाद–एक जीवनपंथ १७६
गांधीवाद कशांत आहे ? १७८

प्रार्थना (पृ. १८१–१८३)

# मुख्य सूत्र

गांधीजींच्या चळवळीचें मुख्य सूत्र जवळ जवळ त्यांच्याच शब्दांत पुढें सांगितलें आहे. तेंच या ग्रंथाचेंहि सूत्र आहे.

सत् हाच गांधीजींचा परमेश्वर आहे. त्यांचें सत्य ज्ञानरूप ( चित् ) आहे आणि जेथें 'सत्य ज्ञान' आहे तेथेंच 'आनंद' आहे. अशा रीतीनें 'सत्-चित्-आनंद' हाच गांधीजींचा परमेश्वर आहे. सत्याचें पूर्ण आकलन म्हणजे स्वतःचें आणि स्वतःच्या भवितव्यतेचें पूर्ण ज्ञान. जीवनाचें पूर्णत्व तें हेंच.

अहिंसा हें ठोकळेबाज तत्त्वज्ञान नाहीं. जीवनांतलें तें जिवंत आणि चैतन्य-दायी सामर्थ्य आहे. तो शूराचा गुणधर्म आहे. वस्तुतः अहिंसा हें शूराचें सर्वस्वच आहे. तो आत्म्याचा गुणविशेष आहे. म्हणून सर्वश्रेष्ठ धर्म असें त्याचें वर्णन केलें आहे.

गांधीजींच्या मतें, अहिंसेवांचून सत्याचा मार्ग आणि सत्याची प्राप्ति अशक्य आहे.

ते म्हणतात, "जर मला कोणी हिंदुत्वाची व्याख्या करावयास सांगितली तर मी एवढेंच सांगेन: अहिंसात्मक साधनांनीं सत्याचें संशोधन हेंच हिंदुत्व होय."

सर्व वस्तुजातींवर प्रेम करणें म्हणजेच अहिंसा. अस्पृश्यता कायम ठेवणें हा या अर्थानें हिंसेचाच एक प्रकार आहे.

अस्पृश्यतेचें कायमचें उच्चाटन करण्याचें कार्य कायद्याच्या जोरावर न करतां हिंदूंची विवेकबुद्धि जागृत करूनच झालें पाहिजे. विवेकबुद्धि जागृत झाली म्हणजे ती स्वतःच हा कलंक धुऊन काढील. प्रेम हें अहिंसेचें परमोच्च स्वरूप आहे. भीरुतेपेक्षां हिंसा बरी असली तरी हिंसेपेक्षां अहिंसा निःसंशय श्रेष्ठ आहे. अहिंसेंत आत्मक्लेशाचा समावेश होतो. आत्मक्लेश जितके जास्त तितक्या प्रमाणांत त्याचें पावित्र्य वाढतें आणि क्लेशाच्या तीव्रतेच्या प्रमाणांत त्यांची परिणामक्षमता वृद्धिंगत होत जाते. अशा दृष्टीनें आपला छळ झाला, आपणांस वाळींत टाकण्यांत आलें, कुटुंब, वित्त आणि इभ्रत हीं हिरावून घेण्यांत आलीं तरी आपण त्या आपत्तींचें या प्रेमवृत्तीनेंच स्वागत करावें. अशा परिस्थितींत

अप्रतिकारी राहण्यास ' यम ' आणि ' दम ' यांची आवश्यकता असते. परंतु आत्मसंयमन म्हणजे निष्क्रियता नव्हे. तो क्रियाशून्यतेचा प्रकार नव्हे. असंख्य सेवाकर्मांच्या द्वारां आत्मसंयमन प्रकट झालें पाहिजे आणि सेवा ज्या वेळीं उत्कट, विविध आणि अखंडपणें होत असेल त्या वेळीं तेथें त्याग समाविष्ट होतो. सकाळ-संध्याकाळ लोक भोजनाच्या वेळीं जो मंत्र म्हणतात, त्या मंत्राच्या रूपानें हें त्यागाचें तत्त्व आपल्या डोळ्यांसमोर सतत ठेविलें आहे. हिंदू लोक भोजनापूर्वी पांच चित्रावती घालतात. अन्नाचे ते पांच भाग धर्म, धर्मराज, चित्र, चित्रगुप्त आणि सर्वदेव यांना अर्पण करण्यांत येतात. हें कृत्य पहिल्या परिषेचनानंतर आणि अन्नग्रहणापूर्वी करावयाचें असतें. दानवृत्तीस चालना मिळावी आणि दैनिक कर्तव्यपालनास साहाय्य व्हावें हाच चित्रावती घालण्याच्या कृत्याचा हेतु आहे.

या सर्वांत चरखा हें श्रमाचें अत्यंत साधें आणि पवित्र स्वरूप आहे. म्हणून तें केवळ कर्तव्यच नाहीं तर तें एक धर्मकृत्य आहे. आपलें आद्य कर्तव्य, आपलें गांव आणि त्या गांवांत निर्माण होणाऱ्या वस्तूंविषयींचें आहे. त्यांना आश्रय देणें हेंच खरें स्वदेशीचें व्रतपालन होय. त्या ग्रामोद्योगाच्या वस्तु, कला वा सौंदर्य या बाबतींत कमी दर्जाच्या आहेत हा विचारहि मनांत आणूं नये. कारण सर्वश्रेष्ठ कला ही बाह्य रूपांत नसते तर ती अंतर्गत असते. सत्य हेंच खरें सौंदर्य होय.

गांधीजी म्हणतातः "खऱ्या कलेनें आपल्या अंतरात्म्याची ओळख होण्यास साहाय्य केलें पाहिजे. आपले बांधव जेव्हां सुखासमाधानानें जगूं शकतात आणि त्या कामीं आपण अल्पप्रमाणात कां होईना त्यांना साहाय्य करूं शकतों तेव्हांच ' स्व 'ची आणि अंतरात्म्याची ओळख होते."

हीं मतें आपणांस मान्य झालीं तर या देशांतील सर्व शिक्षणपद्धतीच बदलली पाहिजे. बुद्धि, हात आणि अंतःकरण यांचें सांस्कृतिक सुसंगत संयोजन होईल अशी शिक्षणपद्धति शोधिली पाहिजे.

गांधीजी म्हणतातः "प्रत्यक्ष क्रिया न करतां मिळविलेलें केवळ तात्त्विक ज्ञान हें शृंगारलेल्या प्रेतासारखें आहे. तें कदाचित् दर्शनीय असेल, परंतु त्यापासून कांहीहि चेतना मिळूं शकत नाहीं."

या दृष्टीनें पाहिलें तर गांधीजींच्या मतें, स्वभावेंत स्वधर्मप्रेम व्यक्त होतें आणि इतर धर्महि सत्याचाच आविष्कार असल्यानें सर्व धर्मांविषयीं सारखाच आदर वाटूं लागतो.

हीं सर्व मूलतत्त्वें मान्य केलीं कीं, सत्याग्रह हा सनातन धर्माचेंच एक रूप आहे हें सहज लक्ष्यांत येईल. पाशवी शक्तीस विरोध करण्यासाठीं सत्याचा आग्रह धरणें हाच सत्याग्रहाचा अर्थ आहे. सत्य हा समाजाचा आधार आहे आणि सत्याग्रह हा सत्याचा मूलाधार आहे. त्या मूलाधाराच्या आश्रयानें असत्याचा निरास होतो.

सत्याग्रहास पराभव ठाऊकच नाहीं. कारण त्याचें ध्येय हें आत्मक्लेशानेंच प्राप्त होत असतें. क्लेशांत एखाद्या वेळीं मृत्यूहि आला तरी त्यामुळें त्याची किंमत कमी ठरत नाहीं. सत्याग्रहांत दुसऱ्याचें नेहमीं संरक्षणच होत असतें. क्लेश काय ते स्वतः सत्याग्रहीसच भोगावयाचे असतात. दुसऱ्यावर सत्याग्रह करण्याची बळजबरी करतां येत नाहीं कारण अशी बळजबरी म्हणजे अरेरावीच आहे.

उपवास आणि प्रार्थना हा सत्यसंशोधनाचा एक पंथ आहे. हा पंथ प्राचीन साधुसंतांनीं आपल्यासाठीं प्रस्थापित केला आहे. असहकार, अप्रत्यक्ष प्रतिकार, सविनय कायदेभंग आणि सत्याग्रह या सत्यसंशोधनाच्याच अवस्था आहेत. असहकार शुद्ध प्रेमाचें स्वरूप धारण करूं शकतो. त्या वेळीं राजकारणास धर्माची प्रतिष्ठा प्राप्त होते आणि धर्म हेंच राजकारण होतें. सविनय कायदेभंगानें कोलाहल निर्माण होतो असें समजणें ही चूक आहे. ज्या वेळीं गुन्हेगारीच्या वृत्तीनें आज्ञाभंग होऊं लागतो त्या वेळींच अशी अंदाधुंदी माजते.

आपण हिंदुस्थानांत कलियुगांतून कृतयुगाकडे जात आहोंत. तें कृतयुग हेंच सुवर्णयुग होय. तें अतिशय प्राचीनकाळीं होऊन गेलें आणि तेंच नजीकच्या भविष्यकाळीं अवतीर्ण होणार आहे. हें युगांतर डोळे दिपविण्याइतक्या वेगानें होणार नाहीं. सत्याग्रहाच्या मार्गानेंच आपणास कृत किंवा सत्ययुगांत प्रवेश करतां येतो. सत्याग्रह हाच आपल्या जीवनाच्या सार्थकतेचा मार्ग आहे.

# गांधीजी : व्यक्ति आणि व्यक्तित्व १

## गांधीजींचें व्यक्तित्व

गांधीजींच्या जीवनाचा आरंभ सर्वसाधारण माणसाच्या जीवनासारखाच आहे आणि त्या जीवनाचा विकास आज विभूतिपदापर्यंत, महात्मा या स्थानापर्यंत झाला आहे. हा विकास, हें अतिमानवत्व त्यांनीं संपत्तीच्या जोरावर मिळविलें नाहीं तर संपत्तीचा त्याग करून मिळविलें आहे. त्यांनीं कोणतेंहि नवें तत्त्वज्ञान काढलें नाहीं तर जुन्याच तत्त्वांचें आचरण ते करीत आले आहेत. त्यांना या कामीं कोणत्याहि गुरूकडून मार्गदर्शन झालें नाहीं तर त्यांनीं स्वतःच स्वतःचें गुरुत्व केलें. जीवनाचा स्वीकार करणें हें गांधींच्या जीवनांतलें तत्त्व आहे. साधी राहणी आणि उच्च विचारसरणी असा त्यांचा उदात्त जीवनक्रम आहे. ज्यानें भूतदयेची ज्योत पुन्हां प्रज्वलित केली, मनुष्याच्या स्वातंत्र्याचें पुनरुत्थापन करून आपल्या शिकवणुकीनें माणसाच्या श्रमांना पुन्हां प्रतिष्ठा मिळवून दिली अशी ही विभूति स्वतःस किसान आणि कोष्टी म्हणविते. त्यांच्या जीवनाच्या क्षेत्रांत विषमतेला जागाच नाहीं. राष्ट्रां-राष्ट्रांतील, जाती-जातींतील किंवा व्यक्ती-व्यक्तींतील वैमनस्य तेथें राहूंच शकणार नाहीं. परंतु जेथें अशी कांहीं विषमता वा वैमनस्य अट्टाहासानें वावरतांना दिसेल तेथें, त्या समाजांतील अरेराव व्यक्तींच्या

विभागांत राहून, त्यांच्याबरोबर ऐषआरामांत दंग न होतां, तेथें जे दुर्बल आणि दलित असतील त्यांच्या शेजारीं गांधी उभे असलेले दिसतील, आणि त्यांच्या अश्रूंबरोबर ते अश्रू ढाळतील. प्रो. मॅक मरे यांनीं म्हटल्याप्रमाणें "त्यांच्या व्यक्तित्वाचा असा प्रभाव आहे कीं, त्यांतून दुसऱ्यामध्यें चैतन्य उत्पन्न होतें, त्यांच्या जीविताच्या दृष्टिकोनांत बदल घडवून आणतें आणि त्यांच्या सामर्थ्यांत भर घालतें."

लोक गांधींविषयीं अनेक प्रकारें उल्लेख करीत असतात. कोणी त्यांना साधु म्हणतो, तर कोणी त्यांना राजकारणपटु म्हणतो; कोणी त्यांना अरेराव म्हणतो तर कोणी त्यांना लोकसत्तावादी म्हणतो; सामाजिक क्रांतिकारक असाहि त्यांचा कोणी गौरव करतात! 'प्रतिगामी', 'स्थितिप्रिय', 'बुवा', विकृत, संत, रानवट, पैगंबर, रसूल, वली अशा अनेक प्रकारें लोक त्यांचा उल्लेख करतात. ते यांपैकीं कांहींहि असोत वा नसोत. परंतु ज्या युगांत युद्ध आणि रक्तपात यांनीं जग उध्वस्त झालें आहे, ज्या युगांत जंगलीपणाचा अंमल गाजत आहे, देशांतील कारभार जेथें झोटिंगशाहीवरच उभारलेला आहे, आंतरराष्ट्रीय कलहाच्या बाबतींत अत्याचार आणि अरेरावी यांनाच जेथें लवादाचा मान मिळाला आहे, जेथें लोकमतावर आणि विवेकबुद्धीवर कायद्याचा वरचष्मा आहे, आणि जेथें पाशवी सत्ता हाच सर्व व्यवस्थेचा मूलाधार आहे अशा युगांत गांधींनीं, प्रेम आणि सेवा, आत्मक्लेश आणि त्याग या तत्त्वांच्या द्वारें मनुष्यामध्यें श्रद्धा उत्पन्न केली आणि अंतरात्म्याचें, हृदयस्थ परमेश्वराचें, 'आंतल्या आवाजाचें' सर्वाधिकारत्व पुन्हां प्रस्थापित करण्याच्या बाबतींत त्यांनीं मानवतेस फार मोठें साहाय्य केलें आहे, ही गोष्ट मात्र निर्विवाद आणि स्वयंसिद्ध आहे. मानवतेच्या कल्याणासाठीं त्यांनीं इतके प्रचंड श्रम केले आहेत कीं, त्यांच्या कर्तृत्वाविषयीं अनेकांना आश्चर्य वाटतें आणि ते विचारूं लागतात कीं, इतकें प्रचंड कार्य करणारी ही व्यक्ति आहे तरी कशी? हे गृहस्थ तत्त्वज्ञानी आहेत कीं साधु आहेत? त्यांना समाजसुधारक म्हणावें कीं शास्त्रज्ञ वा संशोधक म्हणावें? ते अर्थशास्त्रज्ञ आहेत कीं राजकारणधुरंधर आहेत? धर्मसंस्थापक आहेत कीं समरधुरंधर आहेत? अशा रीतीनें त्यांच्याविषयीं जे आश्चर्योद्गार निघतात त्याचें कारण मानवी समाजाच्या सेवेचें त्यांचें कार्यक्षेत्र इतकें सर्वव्यापी आणि सर्वस्पर्शी आहे.

वरवर पाहिलें तर त्यांचा मार्ग आणि कार्यपद्धति हीं विस्कळित वाटतात, त्यांत कांहीं एकसूत्रीपणा नाहीं असें वाटतें. परंतु कांहीं काळ गेला, सूक्ष्म निरीक्षण करीत राहिलें कीं, त्यांच्या निरनिराळ्या कार्यक्रमांतील सूत्र उलगडूं लागतें; विविध कार्यांतील अवयव-अवयवी संबंध कळूं लागतो; शास्त्रीयदृष्ट्या तीं कार्यें निगडित आहेत आणि तीं सर्व मिळून होणारी चळवळ स्वयंभू, स्वयंपूर्ण व सचेतन आहे हें लक्ष्यांत येतें. त्यांच्या योजनेचें पूर्ण आकलन झालें तर त्यांतील प्रत्येक भाग हा त्या योजनेचा अपरिहार्य भाग आहे हें विचारांतीं पटतें.

अशा विलक्षण सामर्थ्यानें घडलेलें असें गांधीजींचें व्यक्तित्व आहे.

## त्यांची शिकवण

स्वातंत्र्य गांधींना मान्य आहे. परंतु तें बलिष्ठांनीं दुर्बळांची नागवण करण्यासाठीं नव्हे. कोणत्याहि हक्काला स्वयंसिद्ध अशा मर्यादा असतात आणि त्याचप्रमाणें स्वातंत्र्यालाहि स्वयंप्रेरित अशीं बंधनें आहेत. जेथें आपल्या शेजाऱ्याच्या स्वातंत्र्यास आरंभ होतो तेथें स्वतःच्या स्वातंत्र्याची मर्यादा संपते. आपल्या शेजाऱ्याच्या हक्कास मान्यता देणें, किंवा आपलें स्वतःचें त्याच्यासंबंधींचें जें कर्तव्य आहे, जो शेजार-धर्म आहे, तो मानणें हाच अहिंसेचा पाया आहे; हेंच अहिंसेचें सामर्थ्य आहे. अहिंसा हा निष्क्रियतेचा मार्ग नाहीं. वरील जाणीवेंतच गांधीजींची कार्यक्षमता, त्यांची ‘ऐश्वर्यात्मक निर्माणक्षमता’ आहे.

या स्वरूपाच्या अहिंसेचा स्वीकार केल्यामुळेंच कायद्याच्या रूढीविरुद्ध गांधींची न्यायबुद्धि बंड पुकारते. त्यांची न्यायाची कल्पना ही सामाजिक संबंधांतील नैतिकतेवर उभारलेली आहे. त्यांना भारताच्या प्राचीन संस्कृती-विषयीं आदर आहे, परंतु त्या संस्कृतीच्या रूढींच्या शृंखलांनीं ते बद्ध झाले नाहींत. त्या शृंखला ते जुमानीत नाहींत. त्यांचें सांस्कृतिक बल, हें अगाध ज्ञानामुळें किंवा अफाट बुद्धिमत्तेनें संपादिलेलें नाहीं तर अनुवंशानें आणि परिस्थितीनें त्यांच्या आत्म्याचें जें शुद्धीकरण होत आलें आहे तेंच त्यांचें सांस्कृतिक बल आहे. भोंवतालच्या जगांतील कोलाहलापासून ते पळून जात नाहींत, उलट त्या कोलाहलांत सांपडलेले दीनांत दीन असे जे कोणी आहेत

त्यांची उन्नति करण्यासाठीं ते त्या कोलाहलांत शिरून त्या दीनांशीं एकरूप होतात आणि भोंवतालच्या जीवितयुद्धांतून वाट काढण्यासाठीं ते त्या दलितांच्या हातांत हात घालून झगडूं लागतात. याचाच अर्थ असा कीं, गांधींचें तत्त्वज्ञान जगाचा तिरस्कार करणारें नाहीं. तें जगाचा स्वीकार करीत असतें.

## एक महात्मा

गांधी हे एक महात्मा आहेत. त्यांना महात्मा हें उपपद केवळ योगायोगानें प्राप्त झालेलें नाहीं. तें त्यांचें सार्थ उपपद आहे.

प्रत्येक माणसामध्यें दोन प्रवृत्ति असतात. आपल्या मनाचेच असे दोन भाग आहेत हें आपण दररोजच्या जीवनांत स्पष्टपणें अनुभवतों. एक भाग उच्च कोटींतला आहे आणि एक अधम कोटींतला आहे. आपण त्यांनाच दोन प्रकारच्या प्रवृत्ति म्हणतों. एक सत्प्रवृत्ति आणि दुसरी असत्प्रवृत्ति. या दोन प्रवृत्तींचे व्यवहार ' जेकिल ' आणि ' हाइड ' यांच्यासारखे होत असतात.

याखेरीज आपल्या मनाच्या दोन अवस्था आहेत: एक जागृतावस्था आणि दुसरी सुप्तावस्था. किंवा त्यांनाच कोणी प्रगट मन आणि अप्रगट मन म्हणतात. मनाच्या निरनिराळ्या अवस्थांचीं वर्णनें ग्रंथांतून आढळतात आणि अनुभवासहि येतात. आपण स्वप्नांत असतों त्या वेळीं आपण केवळ भावनांच्या जगांत वावरत असतों. ही भावनामयता जागृतावस्थेंतहि आपणांस कांहीं वेळां अनुभवास येते. जागृतावस्थेंत मनाची भावनामय स्थिति असली कीं, आपलें मन सुप्तावस्थेंतच असतें. म्हणजे जागे असूनहि भोंवतालच्या जगाचें अस्तित्व आपणांस भासत नाहीं. सामान्य जीवनांतील मनाची ही अवस्था आपणांस माहीत आहे. त्यावरून कांहीं माणसांच्या मनाच्या आणखी एका अवस्थेची आपणांस सहज कल्पना येईल. ज्यांना आपण महात्मा हें उपपद लावतों, ज्यांना जीवन्मुक्त म्हणतात त्यांच्या मनाची जी अवस्था असते तिला सुप्रबुद्ध-अवस्था ( Super-conscious ) म्हणतात. पावित्र्यसंपन्न, निस्वार्थी, निरिच्छ आणि विश्वबंधुत्ववादी अशा महात्म्यांचीं मनें सुप्रबुद्धावस्थेंतच नेहमीं असतात. ही अवस्था हें महात्म्यांचें वैशिष्ट्य आहे. जीवन्मुक्तांचें तें लक्षण आहे. त्यांच्या प्रत्येक शब्दाला लक्षावधी लोक सिद्धांतासारखा मान देतात. त्यांच्या तोंडांतून निघालेलें वाक्य हें आज्ञेप्रमाणें,

कायद्याप्रमाणें मानलें जातें. त्यांच्या मौनालाहि त्यांच्या लेखणीइतका किंवा वाणीइतका अधिकार प्राप्त होतो. आपल्या तीक्ष्ण कटाक्षांनीं ते दुसऱ्याच्या अंतःकरणाचा भेद करतात आणि तेथें असलेल्या गुणांचा आणि अवगुणांचा ते बरोबर छडा लावतात. नुसत्या तर्जनीनिर्देशानें ते भोंवतालचा कोलाहल थांबवून तेथें निःशब्द शांतता प्रस्थापित करतात. आपल्या दंतविहीन मुखा-वरील हास्यानें ते भोंवतालच्या वातावरणांत आनंद आणि प्रकाश यांचा वर्षाव करतात आणि आसमंतांत प्रसन्नतेचें वैभव आणून देतात. त्यांच्या तेजःपुंज मुद्रेची छाया भोंवतालच्या वातावरणावर पसरते. गांधीजी हे अशा कोटींतील सुप्रबुद्ध अतिमानव आहेत.

जगाची शुद्धि करण्यासाठीं अवतीर्ण होणाऱ्या महात्म्यांपैकीं ते एक आहेत. अशा महात्म्यांच्या जीवनकार्यानें जीवनांतील मालिन्य नाहींसें होतें. ‘ भलतीकडे ’ कललेलें विश्वचक्र मार्गावर आणणें आणि त्याच्या ठिकाणच्या चैतन्याचें रक्षण करणें हें त्यांचें कार्य असतें. आपल्या भोंवतालच्या वाता-वरणाशीं ते एकरूप झालेले असतात आणि इतरांबरोबर जगतांना ते सर्वांचे सहकारी होतात. दुर्गुणांचें निर्मूलन आणि सद्‌गुणांचें संवर्धन करणें यासाठींच ते अनंतत्वांतून भूतलावर अवतीर्ण होतात. आपलें जीवित-कार्य पूर्ण करून, ते ज्या अनंतत्वांतून येतात त्या अनंतत्वांत शेवटीं विलीन होतात.

## परिस्थिति आणि चारित्र्य

महान् व्यक्ति ही तत्कालीन परिस्थितींतूनच निर्माण होते असें आपण मानतों. पूर्व आणि पश्चिम यांच्या संबंधांतून राममोहन रॉय निर्माण झाले; त्यांच्यानंतर ५० वर्षांत दुसरी एक विभूति निर्माण झाली. तिनें हिंदी राष्ट्रवादाचा संदेश सांगितला आणि जगाला संस्कृतीचा मार्ग दाखविला. पहिल्या महायुद्धाच्या कोलाहलांतून आणि दक्षिण आफ्रिकेंतील संग्रामांतून त्या व्यक्तीची वैचारिक घडण झाली. ती व्यक्ति म्हणजे गांधीजी. प्रेसिडेंट विल्सनला ज्या नव्या जगाचीं स्वप्नें पडूं लागलीं, त्या नव्या जगाविषयीं टॉल्स्टाय आणि क्रॉपट्किन यांनीं आधींच कितीतरी लिहून ठेवलें होतें. परंतु मनुष्यस्वभाव असा विचित्र आहे कीं, डोळ्यांसमोर घडणाऱ्या भेसूर परिस्थितींतून क्रांतीचे विचार जन्मास येतात परंतु कांहीं काळानें ते विचार

मावळतात आणि प्रतिकूल परिस्थितीशींच माणूस समरस होऊन जातो. परंतु गांधीजींच्या ठिकाणीं हा गाफीलपणा नव्हता. अत्यंत तीव्र अनुभवांनीं मिळालेलें ज्ञान जगाला प्रत्यक्ष कृतिरूपानें देण्यासाठींच त्यांनीं आपल्या जीवनाची योजना केली आहे. प्रत्यक्ष वस्तुस्थितीवरची त्यांची नजर कधींहि विचलित झाली नाहीं. त्या वस्तुस्थितींतील भेसूरपणाचा त्यांना कधींहि विसर पडला नाहीं.

मनुष्याचें चारित्र्य म्हणजे भोंवतालच्या परिस्थितीची प्रतिक्रिया आहे. समजा, रस्त्यांत एखाद्यास हिरा सांपडला तर त्या परिस्थितीची त्याच्यावर जी प्रतिक्रिया होईल त्यांतच त्याचें चारित्र्य प्रगट होतें. तो हिरा तो लगेच पोलीसचौकीवर हजर करतो कीं नाहीं ? एखाद्याला विंचू दिसला तर त्याला न मारतां तो बाजूनें जातो का ? एखादा प्राणि किंवा मनुष्य संकटांत पडलेला दिसल्याबरोबर तो स्वयंस्फूर्तीनें त्याच्या मदतीसाठीं धांव घेतो कीं नाहीं ? या प्रश्नांच्या उत्तरांतून त्याच्या चारित्र्याचा बोध होतो. चारित्र्य ही अखंड गतिमान् अशी स्थिति आहे. तिला मर्यादा नाहीं. तिची वाढ कधीं थांबत नाहीं. चारित्र्य वयाबरोबर वृद्धि पावतें. आपल्या प्रत्येक कृत्याचा चारित्र्याशीं संबंध असतो. अशुद्धाच्या संगतीनें चारित्र्यावर गंज चढतो. यासाठीं चारित्र्यानें अशुद्धापासून अलिप्त राहिलें पाहिजे किंवा अशुद्धाशीं संबंध अपरिहार्यच झाला तर दुसऱ्यास हीनत्वास नेण्याचें त्या संबंधाचें जें सामर्थ्य असतें तें चारित्र्याच्या प्रभावानें नामोहरम केलें पाहिजे. स्वतःचें अशा रीतीनें अशुद्धापासून संरक्षण करून अशुद्धाचा पराभव करणें हें चारित्र्याचें मुख्य लक्षण आहे. अहोरात्र आपल्या भोंवतालच्या वातावरणाशीं यशस्वीपणें झगडत राहणें म्हणजेच चारित्र्य ! चारित्र्यास हा लढा टाळतां येत नाहीं.

## सामाजिक स्थित्यंतरें

आपल्या जीवनावर संस्कार करणाऱ्या विविध गोष्टी भोंवतालीं घडत असतात. त्या घडामोडींशीं क्रियाप्रतिक्रिया या नात्यानें संबंध येऊन त्यांतून जीवनास जें वळण लागतें त्यालाच आपण स्वभाव म्हणतों. मानवी स्वभावाची अशी घडण होत असते. व्यक्तींच्या स्वभावांच्या संकलनांतून विशिष्ट प्रकारची

समाजव्यवस्था निर्माण होते. जेव्हां एखादा नवा सांप्रदाय सुरू होतो त्या वेळीं खरें म्हणजे समाज-जीवनाच्या केंद्रबिंदूचें स्थलांतर होत असतें. विशिष्ट ध्येयासाठीं सुरू झालेल्या चळवळींतूनच नवे सांप्रदाय जन्मास येतात. असत्या-कडून सत्याकडे, मृत्यूकडून जीवनाकडे, अंधाराकडून प्रकाशाकडे अशीं जीं जीवनाचीं स्थित्यंतरें होतात तीं आगगाडीच्या रुळासारखीं सरळपणें होत नाहींत. त्या स्थित्यंतराच्या मार्गावर कोठेंहि मार्गदर्शक फलक नसतात किंवा सांधा बदलण्यासाठीं कांहीं निश्चित योजनाहि केलेल्या नसतात. रस्त्यानें नागमोडी वळणें घेत जाणाऱ्या मोटारीसारखी या स्थित्यंतराची पद्धति असते. या परिस्थितीमुळेंच तात्त्विकदृष्ट्या एकसूत्री आणि एकजिनसी अशा प्रत्येक नव्या सांप्रदायास पुढें पुढें फाटे फुटत जातात आणि त्यांतून अनेक पंथ निघतात. कांहीं पंथ मूल तत्त्वास चिकटून राहतात तर कांहीं पंथ मूल तत्त्वापासून कोठेंतरी बदलत जातात. लेनिन, ट्रॉट्स्की आणि स्टॅलिन यांचे मार्ग पहा किंवा कॉंग्रेसच्या कार्यक्रमांचीं, कौन्सिल आणि शाळा–कॉलेजांवर बहिष्कार, पुन्हां कौन्सिल प्रवेश आणि अधिकार–स्वीकार आणि अधिकार–त्याग हीं स्थित्यंतरें पहा.

कौंट हर्मन कायसरलिंग यांचें या संबंधींचें विवेचन येथें सांगण्यासारखें आहे. कायसरलिंग म्हणतात :

" विशिष्ट चळवळीच्या नांवांत सूचित होणाऱ्या अशा ज्या विशिष्ट भावना असतात त्या भावनांना फारसें महत्त्व नसतें. त्या भावना नेहमीं दिशाभूल करतात. कारण एक तर त्या भावनांच्या नांवांवरून जो बोध होतो त्यापेक्षां त्या भावनांत आणखी अनेक घटकांचा समावेश झालेला असतो. दुसरें असें कीं, नाम आणि रूप यांच्यामागें जी शक्ति असते, तिच्यांत पुढें पुढें तफावत पडत जाते आणि शेवटीं नामांतील आणि रूपांतील सामर्थ्यें अलग होतात. इतिहासांत याचे दाखले वारंवार दिसतात. एका विशिष्ट नांवानें चळवळ सुरू होते. तिचा विकास कांहीं निराळ्या रूपांत होतो. जीवाचा आरंभ आणि विकास यांत जशी तफावत पडते, तशीच चळवळीचा आरंभ आणि पर्यवसान यांत पडते. यामुळें कोणत्याहि जागतिक चळवळीला कांहीं अचूक नांव देतां येईल असें मला मुळींच वाटत नाहीं. लोकसत्ता, समाजसत्ता, स्वातंत्र्य, निरीश्वरवाद अशा नांवांच्या चळवळी राष्ट्रांत चालू असतात. त्या नांवांतील

अर्थ आणि त्या चळवळींचें प्रत्यक्ष ' रूप ' यांचा कांहीं संबंध राहत नाहीं. त्या राष्ट्रांच्या मनांतलें ध्येय चळवळींच्या नांवांतील अर्थाबरहुकूम कधींच नसतें. वस्तुतः त्या चळवळी करणारे अंधारांतच चांचपडत असतात. आपण कोणत्या ठिकाणीं–ध्येयाजवळ–जाऊन पोहोंचणार आहोंत हें त्यांचें त्यांनाहि माहीत नसतें. कारण तें ध्येय अज्ञात असतें. आज ज्या अनेक कारणांसाठीं आपण झगडत आहोंत त्यांपैकीं कदाचित् एकहि हेतु सफल होणार नाहीं. कारण मनुष्यसृष्टींत विविध शक्तींचीं कार्यें चालू आहेत. त्या शक्तींपैकीं जी शक्ति शेवटीं सर्वांत प्रभावी ठरेल, या झगड्यांत ज्या गोष्टी टिकून राहतील त्यांचें सुसंगत संकलन झाल्यावरच जीवनांत कांहीं स्थैर्य उत्पन्न होईल."

## गांधी आणि गांधीवाद

गांधीजी ज्ञेयवादी ( Gnostic ) आहेत कीं अज्ञेयवादी ( Agnostic ) आहेत, ते मूर्तिपूजक आहेत कीं तत्त्वपूजक आहेत, त्यांचा व्यक्तिप्रधान प्रार्थनेवर विश्वास आहे कीं सामुदायिक प्रार्थनेवर विश्वास आहे, ते भक्तियोगी आहेत कीं कर्मयोगी आहेत कीं ज्ञानयोगी आहेत याविषयीं कोणालाहि चर्चा करीत बसण्याचें कारण नाहीं. कारण त्यांची भूमिका या बाबतींत स्पष्ट आहे. त्यांनीं ज्ञानाचें भक्तीमध्यें उदात्तीकरण केलें आणि त्यांच्या भक्तियोगाचा कर्मयोगांत विकास झाला आहे. या समन्वयामुळेंच गांधीजींचें चारित्र्य हें एकजिनसी झालें आहे आणि त्यामुळेंच त्या चारित्र्याला फार मोठी प्रतिष्ठा प्राप्त झाली आहे.

जॉन मोर्लेनें म्हटल्याप्रमाणें "गांधीजींच्या चारित्र्यांत जीवनांतील बुद्धि, नीति आणि व्यवहार हीं तिन्ही व्यक्त होत आहेत. विवेक, भावना आणि इच्छा ( शक्ति ) यांचें अविभाज्य सहकार्य त्या चारित्र्यांत दिसतें. भावनेस विरोधी अशा कोणत्याहि गोष्टीची विवेकाकडून शिफारस होत नाहीं. भावनेची उत्कटता जेथें व्यक्त होते त्या कोणत्याहि गोष्टीस विवेकाकडून बंदी होत नाहीं आणि भावना आणि विवेक यांच्या सामुदायिक निर्णयानुसार इच्छा-शक्तीचें कार्य चालू असतें. अशी गांधीजींच्या चारित्र्याची घडण आहे."

ज्यानें इच्छेवर ताबा मिळवला आहे त्याला कशाचीहि आकांक्षा नसते आणि म्हणूनच तो सर्वदा सर्वथैव निर्भय असतो. वासना आणि इच्छा हीं परस्परविरोधी आहेत आणि भय हें वासनेचें विकृत रूप आहे.

गांधीजींचें जीवन इतरांसाठीं वाहिलेलें आहे. समाज हेंच त्यांचें मंदिर. सेवा हीच त्यांची प्रार्थना आणि मानव्य (Humanity) हींच एकमेव वासना त्यांच्या ठिकाणीं आहे. सत्य हाच त्यांचा परमेश्वर आणि त्या परमेश्वराकडे जाण्याचा एकच मार्ग ते ओळखतात, तो म्हणजे अहिंसा. स्थलकालानें मर्यादित असें जें कांहीं आहे तें स्थलकालातीत अशा शाश्वताचा केवळ एक भाग आहे. गांधीजींचें सर्व लक्ष त्या शाश्वताकडे रोखलेलें आहे.

"गांधी-वाद" हा कांहीं मोजक्या तत्त्वांनीं, सिद्धांतांनीं किंवा सूत्रांनीं मर्यादित असा पंथ नाहीं. तो जीवनाचा एक मार्ग आहे. त्या जीवनपंथांत जीविताचा एक नवा दृष्टिकोन आहे किंबहुना जुन्याच दृष्टिकोनाचें तें पुनरुज्जीवन आहे. प्राचीन पद्धतीनें अर्वाचीन प्रश्न सोडविण्याचा तो मार्ग आहे.

सर राधाकृष्ण म्हणतातः "जीवनाचा नवा पंथ हा राष्ट्रीय जीवनाचा पाया झाला पाहिजे, त्याचप्रमाणें सर्वराष्ट्रीय-जागतिक-जीवनाचीहि उभारणी त्या पंथांतून झाली पाहिजे. त्या नव्या जीवनपंथांत सर्व वर्ग, जाति, वंश आणि राष्ट्रें यांच्या हितसंबंधाचें संरक्षण आणि संवर्धन झालें पाहिजे. अविद्येच्या मोहपाशांतून जे मुक्त झाले आहेत अशा जीवन्मुक्त व्यक्तींकडूनच जागतिक शांततेचें कार्य पार पडेल. जीवनाचा प्रत्यक्ष आविष्कार आणि शाश्वत अशा तत्त्वांचें प्रत्यक्ष आचरण यालाच शांति म्हणतात. ज्या शस्त्रांनीं नैतिक मूल्यांचें अधःपतन होत नाहीं किंवा जीविताचा संहार होत नाहीं अशा शस्त्रांनींच शाश्वत तत्त्वासाठीं झगडत राहिलें पाहिजे. या कामीं आपल्या वाटेला जीं काय दुःखें येतील, ज्या कांहीं यातना भोगाव्या लागतील त्या सहन करण्याची आपली तयारी पाहिजे."

मग गांधीवादाचा अभ्यास आपण कसा करावा? गांधीजींचें जीवन आणि कर्तृत्व यांचा अभ्यास करणें, त्यांचे संदेह आणि अडचणी यांचें आकलन होणें आणि त्यांचा दृष्टिकोन पटणें हाच गांधीवादाच्या अभ्यासाचा मार्ग आहे. गांधीवादाचा अभ्यास पूर्ण झाला कीं, तुम्हांला "शाठ्येन शठं जयेत्" असें म्हणतां येणार नाहीं. "पर्वतावरील प्रवचनांत" येशूनें सांगितलें कीं, "मंगलानें अमंगलाचा निरास करा. अपकाराची फेड उपकारानें करा. दुसऱ्याची लायकी ठरविण्याच्या खटाटोपांत पडूं नका. नाहींतर स्वतःच्याच लायकीच्या तपासणीसाठीं तुम्हांस सिद्ध व्हावें लागेल! तुम्हांला

जे दुखावतात त्यांना क्षमा करा.'' आपल्या प्राचीन ग्रंथांतून या गोष्टींविषयीं इतक्याच आग्रहानें आणि आवेशानें उपदेश केला आहे.

हीं मूलभूत तत्त्वें हिंदु व ख्रिश्चन या दोन्ही धर्मांत आहेत आणि तीं सर्व काळीं, सर्व देशांत, कोणत्याहि परिस्थितींत, जीविताच्या कोणत्याहि कार्यक्षेत्रांत आणि समाजाच्या सर्व विभागांस लागू पडतात.

गांधीवादाच्या अभ्यासकांसहि असेंच दिसेल कीं, त्यांचा प्रत्येक शब्द नि वाक्य, प्रत्येक कृति, इतरांच्या कृतींविषयींचा व मताविषयींचा प्रत्येक होकार, नकार व तिरस्कार या सर्व गोष्टींमध्यें एकच ध्येय आहे, एकच दृष्टिकोन आहे.

बाबू भगवानदास म्हणतातः "सर्व पंथांतील अतिरेकी भाग बाजूस केला आणि अध्यात्ममूलक धर्म आणि मानसशास्त्रांतील कांहीं मोजकीं तत्त्वें यांचा सर्व अनुयायांनीं स्वीकार केला तर त्यांच्यांतील कलह क्षणार्धांत मिटतील, ते हातांत हात घालून कार्य करूं लागतील आणि धांवत जाऊन एकमेकांस स्नेहभरानें मिठी मारतील. सर्व पंथांनीं मोठमोठ्या कृत्यांचें पुण्य संपादिलें आहे आणि प्रत्येक पंथानें कांहीं भयंकर प्रमादांचेंहि पातक केलें आहे!''

## गांधीवादाचीं अंगोपांगें

गांधीवादाची रूपरेखा आपण पाहिली. आतां त्याचा सूक्ष्म अभ्यास करावयास लागूं या. 'इझम्' याचा अर्थ 'नांव' असा आहे. गांधीवाद (गांधीझम्) म्हणजे गांधीजींचें नांव आणि गांधीजी आणि त्यांचें नांव, हीं कांहीं निश्चित तत्त्वें व धोरण यांचीं सांकेतिक चिन्हें आहेत. तसा कांहीं संकेत नसला तर मग गांधीजी व त्यांचें नांव निरर्थक ठरतील. हीं तत्त्वें व धोरण यांतच गांधीजींचें तत्त्वज्ञान समाविष्ट झालें आहे. ते स्वतः त्या तत्त्वज्ञानाचाच पुरस्कार करतात आणि ज्या योगानें गांधीजींचें जीवन आणि चारित्र्य, त्यांचें कार्य आणि यश, त्यांचा संदेश आणि उपदेश यांची घडण झाली तेंच गांधीजींचें तत्त्वज्ञान होय.

मार्च १९३६ मध्यें गांधीजींनीं स्वतःच गांधीसेवासंघांत आपल्या तत्त्वज्ञानाविषयीं खालील खुलासा केलाः—

"'गांधीवाद' अशी वस्तु मुळीं अस्तित्वांतच नाहीं आणि माझ्यामागें

कोणताहि असा वाद वा पंथ राहावा अशी माझी इच्छा नाहीं. कोणत्याहि नव्या तत्त्वांचा वा सिद्धांतांचा शोध मीं लावला नाहीं. आपल्या दैनंदिन जीवनांत आणि आपले प्रश्न सोडविण्याच्या कामीं शाश्वत तत्त्वांचे प्रयोग माझ्या पद्धतीनें मीं केले एवढेंच माझें कर्तृत्व. त्या प्रयोगांवरून मीं बनविलेलीं मतें व काढलेलीं अनुमानें हीं सिद्धांताच्या योग्यतेचीं नाहीत. ते अंतिम निर्णय नव्हत. मी उद्यांसुद्धां त्यांचा त्याग करीन. मला जगाला नवीन असें कांहींहि शिकवावयाचें नाहीं. सत्य आणि अहिंसा हीं पर्वता-इतकींच प्राचीन आहेत. मीं त्या बाबतींत जें केलें तें एवढेंच कीं, मीं दोन्हीं-संबंधीं शक्य तितके जास्त व्यापक प्रयोग केले. त्या प्रयोगांत माझ्या हातून कांहीं वेळां चुका झाल्या आणि त्या चुकांपासूनच मीं शहाणपणहि मिळविलें. म्हणून जीवन आणि जीवितविषयक प्रश्न यांकडे सत्य आणि अहिंसा यांच्या आचरणासंबंधींचे प्रयोग, याच दृष्टीनें मी पाहतों. मी प्रवृत्तीनेंच ' सत्यवान् ' आहें, परंतु अहिंसानुसारी मात्र नाहीं. खरें सांगायचें म्हणजे सत्याच्या मार्गानें प्रवास करीत असतांनाच मला अहिंसा तत्त्वाची ओळख झाली. सारांश, ' तत्त्वज्ञान ' या बड्या शब्दाचा उपयोग करावयाचा झाला तर मी असें म्हणेन कीं, माझें तत्त्वज्ञान माझ्या उद्गारांत समाविष्ट झालें आहे. त्याला ' गांधीवाद ' असें म्हणतां येणार नाहीं. तसा कोणताच ' वाद ' वा पंथ माझ्या तत्त्वज्ञानांत नाहीं."

गांधी सेवासंघाचे अध्यक्ष किशोरलाल मश्रूवाला यांनीं गांधींच्या तत्त्व-ज्ञानाचीं कांहीं मूलतत्त्वें विस्तारशः सांगितलीं आहेत. ज्यांना गांधी-तत्त्व-ज्ञानाचें अध्ययन करावयाचें आहे त्यांनीं तीं लक्ष्यांत घेतलीं पाहिजेत. देशाचें स्वातंत्र्यसंपादन हीं ज्यांच्या अंतःकरणांत एकमेव तळमळ आहे त्यांना तीं तत्त्वें अत्यावश्यक आहेत. तीं मूलतत्त्वें अशीं—

१ सेवाधर्मप्रधान अशा जीवनक्रमावर श्रद्धा.

२ चारित्र्य व ध्येय यांचें कर्तव्यनिष्ठुरपणें संपादन.

३ आत्मसंयमन आणि नियमन; सुखवादी आणि उथळ जीवनाविषयीं तिरस्कार.

४ कमालीचें साधेपण, निर्धनत्व आणि परिश्रम; शारीरिक श्रमाची नेहमीं तयारी.

गांधीजी ज्याप्रमाणें आपल्या तत्त्वज्ञानाचें नावीन्य वा स्वातंत्र्य याविषयीं अट्टाहास करीत नाहींत त्याचप्रमाणें त्यांनीं कधींहि स्वतःकडे गुरूचीहि भूमिका घेतली नाहीं आणि 'आपले अनुयायी' असेंहि ते कोणास संबोधीत नाहींत. ते म्हणतात, "मी स्वतःच शिष्यत्वाची आकांक्षा धरली आहे आणि गुरूचा शोध करीत आहें. माझे शिष्य असे कोणी नाहींत."

परंतु या उद्गारांचा अर्थ एवढाच कीं, कोणताहि सद्गुरु अशा अधिकाराची आकांक्षा धरीत नाहीं.

गांधीजींनीं स्वतःकडे कांहीं अधिकार घेतले असोत वा नसोत, एका नव्या संस्कृतीचे संस्थापक हें त्यांचें स्थान निर्विवाद आहे. गांधीजी आणि गांधीवाद यांत मानवी समाजाच्या प्रगतीचें अमर्याद सामर्थ्य आहे हें कोणीं नाकारणें शक्यच नाहीं.

गांधीजींच्या उपदेशाचा रोख सत्य आणि अहिंसा यांकडे आहे.

ते म्हणतातः "हिंसेला अत्यंत प्रवर्तक असे प्रसंग येतील त्या वेळींहि विचार, उच्चार आणि आचार यांत अहिंसावृत्तीच टिकविणें हीच अहिंसावादाची खरी कसोटी आहे. जे सज्जन आणि निरुपद्रवी आहेत त्यांच्यासंबंधीं अहिंसावृत्तीनें वागणें यांत कांहींच विशेष नाहीं. जास्तींत जास्त प्रबल असे जे मोह असूं शकतील त्यांच्याशीं झगडून त्यांवर विजय मिळविण्याचें अत्यंत प्रभावी हत्यार म्हणजे अहिंसावाद...... मी स्वतःस मिशनऱ्यांचा मित्र म्हणवतों. त्यांच्यांतील पुष्कळांशीं माझे स्नेहसंबंध आहेत. परंतु त्यांच्यांतील किंवा ते ज्या पंथाचा वा पद्धतीचा प्रचार करतात त्यांतील संकुचितपणाकडे मी मित्रत्वासाठीं कानाडोळा करीत नाहीं. युक्तायुक्ततेच्या खोट्या कल्पनांनीं किंवा दुसऱ्याच्या भावना दुखविण्याच्या अवास्तव भीतीनें वागणारा मनुष्य शेवटीं भोंदू होत जातो. परंतु जर व्यक्ति, समाज किंवा राष्ट्र यांच्या ठिकाणीं अहिंसावादाचा आविष्कार करावयाचा असेल तर सत्य, कांहीं वेळां अतिशय कटु किंवा अप्रिय ठरलें तरीसुद्धां, तें प्रगट केलेंच पाहिजे. मनांत कांहीं निश्चय न करतां केवळ वरवर आचरलेल्या अहिंसेला कांहींहि किंमत नाहीं.

"कार्यामागें किंवा शब्दामध्यें असलेल्या भावनेस किती सामर्थ्य असतें याची आपणास क्वचितच जाणीव होते. विचार, उच्चार आणि आचार यांचा जेव्हां समन्वय होतो तेव्हां एकाची मर्यादा दुसऱ्यावर अवलंबून असते.

ता.

अर्थात् या ठिकाणीं, मी विचार या शब्दानें असेच विचार लक्ष्यांत घेत आहें कीं, ज्यांच्यांत शब्द आणि कृति यांच्या द्वारें प्रगट होण्याचें सामर्थ्य आहे. बांझोटे विचार केवळ पोकळ बुडबुडे होत आणि ते हवेंतच विरून जातात."

## गांधीवाद : एक समन्वय

जगांत आजपर्यंत झालेले अनेक पंथ परस्परांस विरोधक असे असून त्यांनीं माणसामाणसांत आणि राष्ट्राराष्ट्रांत भेद मात्र माजविले. परंतु त्या पंथांतून उत्पन्न होणाऱ्या भेदांचें सुसंगत एकीकरण करण्याचें कार्य गांधीवादानें केलें आहे. सोशालिझम, कम्युनिझम, फॅसिझम आणि युनिव्हर्सलिझम यांतील तात्कालिक विरोधांचें निराकरण करून त्यांचें सुसंगत संकलन करण्याचें कार्य गांधीवादानें केलें आहे. या समन्वयाचें कार्य गांधीजींनीं गेल्या २०।२५ वर्षे अव्याहत केलें आहे आणि या दीर्घ कालांत त्यांनीं प्रशंसनीय यश संपादन केलें आहे. आपल्या हयातींत आपल्या डोळ्यांदेखत इतका प्रचंड अनुयायी-वर्ग लाभण्याचें भाग्य पूर्वी होऊन गेलेल्या कोणत्याहि तत्त्वज्ञास किंवा धर्म-संस्थापकांस लाभलें नाहीं. या तत्त्वज्ञांचे आणि धर्मसंस्थापकांचे आपण स्थूल मानानें पौर्वात्य आणि पाश्चात्य असे दोन वर्ग करतों किंवा कधीं प्राचीन आणि अर्वाचीन असाहि भेद त्यांच्याबाबतींत आपण मानतों.

तथापि प्रत्येक तत्त्वज्ञानाच्या ठिकाणीं बहुधा दोहोंचेंहि मीलन झालेलें दिसतें. त्यांत निश्चितपणें भेद करतां येत नाहींत. कारण कोणत्याहि नव्या तत्त्वज्ञाना-भोंवतीं त्यापूर्वीच्या तत्त्वज्ञानाचें प्रभावळ असतेच आणि त्यामुळेंच त्याचें सामर्थ्य वाढून त्यास लोकप्रियता प्राप्त होते. दुसऱ्या शब्दांत असें म्हणतां येईल कीं, गांधीजींच्या तत्त्वज्ञानाप्रमाणें प्रत्येक तत्त्वज्ञानांत एक मध्यबिंदु असतो आणि त्याभोंवतीं एक परीघहि असतो. गांधीजींच्या तत्त्वज्ञानाचा मध्यबिंदु केवळ पौर्वात्य दृष्टिकोन हा आहे आणि त्याच्या परीघाचें स्वरूप पाश्चिमात्य किंबहुना सर्वव्यापी आहे असेंहि म्हणतां येईल. गांधीवाद हा नवा पंथ नाहीं. जें प्राचीन तत्त्वज्ञान कित्येक शतकांपूर्वी सिद्ध झालें आहे, तेंच हें तत्त्वज्ञान आहे. ज्यांसाठीं हिंदु धर्माची उभारणी झाली तीं धार्मिक आणि नैतिक तत्त्वें यांत आहेत. समाजोन्मुख अर्थशास्त्राच्या ( Socio-economic ) तत्त्वांबरहुकूम हिंदी जीवनाची जी घडण शेंकडों वर्षांपूर्वी सिद्ध झाली

तीच गांधीवादांत आहे. त्या प्राचीन समाजरचनेची पूर्ण योजना आणि ती योजना आधुनिक परिस्थितींत पुन्हां अंमलांत आणण्याचा मार्ग त्यांनीं शोधून काढला. या दृष्टीनें गांधीवादांत नवीन असें कांहीं नसलें तरी तो मौलिक आहे. कारण संशोधन किंवा पुनरावबोधन हेंच मौलिकतेचें मुख्य लक्षण आहे. किंबहुना असेंहि म्हणतां येईल कीं, नव्या विचाराचा किंवा जुन्या विचाराच्या नव्या स्वरूपाचा आविष्कार याचेंच नांव मौलिकता.

मद्यपानाचा निषेध यापूर्वींहि अनेकांनीं केला; स्वदेशी आणि बहिष्कार यांची घोषणाहि अनेक वेळां झाली; 'शेतीकडे चला! खेड्यांकडे परत जा' असे आदेशहि कित्येक वेळां देण्यांत आले. जातिभेद आणि जातीजातींतील वैमनस्य आणि समाजांत खोलपर्यंत रुजलेली अस्पृश्यता यांच्याविषयीं तीव्र निषेध करणारे प्रचारकहि पुष्कळ होऊन गेले. परंतु एका किमान मर्यादेपर्यंत सृष्टींतील सर्व प्राणिमात्रांस समान हक्क आणि संधि मिळेल, समान दर्जा आणि अधिकार प्राप्त होतील अशा प्रकारचें हिंदी राष्ट्रीयत्व ज्याच्या अंतश्चक्षूंपुढें प्रगट झालें आणि ज्यानें त्या राष्ट्रीयत्वाचें आपलें स्वप्न प्रत्यक्षांत आणण्याची एकाद्या शिल्पकारासारखी ध्येय आणि मार्ग यांची योजना ठरविली अशी व्यक्ति या प्रवर्तकांत नि प्रचारकांत गांधीजींखेरीज कोण आहे ?

स्वत्वाची जाणीव असलेलें, स्वयंपूर्ण, स्वयंसिद्ध आणि स्वावलंबी असें आणि ज्यांतील रहिवासी सदिच्छा, शांतता आणि सहकार्य यांनीं एकत्र जोडले आहेत असें हिंदी खेडें हाच वरील हिंदी राष्ट्रीयत्वांतील जीवनाचा पाया आहे. अशा हिंदी राष्ट्रीय जीवनाचें चित्र यापूर्वींच्या कोणाहि प्रचारकाच्या वा संस्थापकांच्या मनांत प्रगट झालें नाहीं. बायबलांत सांगितलेलें पर्वतावरील प्रवचन आठवड्याच्या आठवडे ख्रिस्ती राष्ट्रांच्या प्रार्थनामंदिरांतून वाचलें जातें आणि तींच ख्रिस्ती राष्ट्रें जमिनीच्या तुकड्यासाठीं आणि मनुष्य-जातीला गुलाम करण्यासाठीं एकमेकांच्या नरडीचा घोट घेण्यासाठीं आधुनिक शस्त्रसंभारांनीं सिद्ध होत आहेत. गांधीजींनीं अंगीकारलेलें तत्त्व हें असें 'रविवार' साजरा करण्यासारखें नाहीं, तर जें प्रत्येकाच्या जीवनावर परिणाम घडवून आणतें आणि जें अंतःसंवेदनेनें जीवितास मार्गदर्शन करतें; असें तें तत्त्व आहे. अशा तत्त्वाच्या प्रचाराचें कार्य गांधीजींनीं अंगिकारलें आहे.

## बहिष्कार आणि स्वदेशी

ज्या वेळीं बंगालच्या फाळणीचा निषेध म्हणून स्वदेशीचा पुरस्कार होत होता त्या वेळीं त्या चळवळीचा मुख्य भर विदेशीयांविषयींचा द्वेष आणि त्याच प्रमाणांत स्वदेशाविषयींचें प्रेम यांवर होता. परंतु तेव्हां स्वदेश ही एक अस्पष्ट, अनाकलनीय अशी कल्पना होती. आंग्लविद्याविभूषितांचा बहुजनसमाजाशीं प्रत्यक्ष संबंध आणावा; खेड्यांतील लोक आणि व्यवसाय, हें समाजाभिमुख अशा आर्थिक नियोजनाचें कार्यक्षेत्र होण्याच्या दृष्टीनें शहरांचीं उत्क्रांतीची दिशा असावी, असा हेतु त्या वेळच्या स्वदेशींत नव्हता. त्या चळवळीनें विणकराचें कल्याण झालें, परंतु सूत काढणारा बाजूस पडला. घरगुती उद्योगधंद्यांस उत्तेजन मिळालें परंतु तें देतां देतां कारागिराचीं हत्यारें आणि कौशल्य यांच्यावर वरवंटा फिरवणाऱ्या यंत्रांच्या राक्षसी बळाचा स्वैर संचार सुरू झाला, इतकेंच नव्हेतर त्या यंत्रापायीं खेडुतांच्या गरजांवरहि वरवंटा फिरला! आमचा ब्रिटिश-द्रोह तर स्पष्टपणें प्रगट होत होता. घराच्या छपरावर उभे राहून आवाज चढवून आम्ही ब्रिटिश मालावर बहिष्कार घालण्याची घोषणा करीत होतों. ब्रिटिशांचें नुकसान हाच आम्हांस फायदा वाटत होता, परंतु राष्ट्रीयत्वाची विधायक बाजू फारच अस्पष्टपणें आम्हांस दिसूं लागली होती. विध्वंसनासारखा भडक असा त्या चळवळीचा भागच सार्वजनिक चळवळीस चेतवीत होता. परंपरेनें पवित्र झालेलीं आणि दीर्घकालावधीनें प्रगल्भत्व पावलेलीं अशीं जीं तत्त्वें आहेत त्या तत्त्वांनीं पुनरुज्जीवित केलेल्या ध्येयाकडे जाणारें राष्ट्र उभारावयाचें आहे अशी जनतेची दृष्टि त्या चळवळींत नव्हती. आमच्यांतील श्रेष्ठ व्यक्तींना सुद्धां बंगाल-फाळणीविषयीं त्वेष वाटत होता, परंतु त्यांच्या मनावर अद्याप पाश्चिमात्य ज्ञानाची भुरळ कायम होती. त्या शिक्षणाविषयींची आपली श्रद्धा जरी त्यांनीं जाहीरपणें व्यक्त केली नाहीं तरी विदेशी अंमलांतील मानमरातब आणि अधिकाराच्या जागा यांविषयींची ओढ त्यांच्या मनांत गुप्तपणें होतीच.

गांधीजी जेव्हां १९१५ सालीं हिंदुस्थानांत आले तेव्हां त्यांना असें आढळलें कीं, देशप्रेम आणि कॉंग्रेसनिष्ठा या बाबतींत दोन पंथ झाले आहेत. एका पंथानें गोखल्यांच्या नेतृत्वाखालीं ब्रिटिशांशीं राजनिष्ठ राहण्याचें

पत्करलें होतें आणि दुसरा पंथ टिळकांच्या नेतृत्वाखालीं जशास तसें या मार्गानें जात होता. या पंथास बेझंट यांनीं तिसऱ्या पंथाची जोड दिली. ब्रिटिशांच्या सार्वभौमत्वाचा इन्कार न करतां देशाचें दास्यविमोचन मात्र करावयाचेंच असा त्या प्रचार करीत होत्या. ब्रिटिशांच्या आधारावर उभारलेलें हें जुनें घर जमीनदोस्त करणें आणि केवळ पौर्वात्य ध्येयानें नव्या पद्धतीचें, नव्या योजनांचें असें मंदिर येथें उभारणें जरूर आहे असें कोणास वाटत नव्हतें. ज्या मंदिरांत सर्वांची सोय होईल, प्रत्येक व्यक्तीसाठीं भरपूर अन्न, पुरेसें वस्त्र आणि सुरक्षित घर यांची योजना होईल अशा राष्ट्रमंदिराची कल्पना, अशा पुनरुज्जीवनाची पद्धति कोणाच्याहि मनांत त्या काळीं नव्हती. परीक्षा व पदवी यांवरच आपल्या योग्यतेची ऐट मिरविणारे आणि विश्वविद्यालयाच्या परीक्षांचा दर्जा, सरकारी नोकरी, भरपूर कमाईचे व्यवसाय, संस्थानांतील मानमरातब आणि राजनिष्ठेच्या गुणांचें प्रतीक म्हणून बहाल केलेले किताब यांवरच आपल्या संस्कृतीचें मोठेपण मानणारे अशा सुशिक्षित लोकांना वरील ध्येय अगदींच अपरिचित होतें.

## नवयुगाचें नवेंपण

मानवी जीवनाच्या या आधुनिक स्वरूपाचा अर्थ गांधीजींनीं लावला आहे. ते म्हणतात, " 'ध्येयवादी युग संपून गेलें आणि आतां नैतिक मूल्यांविषयीं बेताबाताचीच, आस्था राहिली आहे; आपल्या वैयक्तिक स्वार्थांच्या निरनिराळ्या धोरणांकडेच यापुढें लक्ष देण्याचा हा काळ आहे.' असें कांहींचें मत असेल. कांहीं असें मानीत असतील कीं, मानवाचे हक्क ही एक केवळ काव्यकल्पना आहे आणि जर लोकशाहीनें आपलें वैयक्तिक स्वास्थ्य आणि वैभव यांची वाढ होत नसेल तर त्या लोकशाहींतहि कांहीं अर्थ नाहीं. आतां प्रत्येक नागरिकाचें कर्तव्य म्हणजे आपल्या पक्षास मत देणें आणि स्वतःसाठीं किंवा आपल्या हितचिंतकांसाठीं एखादें अधिकारपद मिळविणें. कांहीं लोक आपल्याला असें सांगत आहेत कीं, यश मिळविणें म्हणजे पैसा मिळविणें; कारण जें काय कल्याण आहे तें केवळ पैशानेंच प्राप्त होतें. लोकमताचा वारा असा वाहत आहे कीं, एखाद्या विशिष्ट मालाचा व्यापार वाढविणें किंवा एखादा विशिष्ट उद्योगधंदा भरभराटीस आणणें किंवा आपला ज्यांत कांहीं भाग आहे असा

नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत



एखादा व्यवसाय-संघ पुढें आणणें, एवढी एकच चळवळ केली पाहिजे. या चढाओढींत ' जो बळी तो कान पिळी ' हाच एक नियम असणार, आणि जो शेवटीं टिकेल तोच जगण्यास लायक आहे असें सिद्ध होणार. याखेरीज जीं कांहीं ध्येयें असतील तीं सर्व केवळ मनोराज्यें, कल्पनाविहार किंवा स्वप्नतरंग आहेत. तें सर्व शिळोप्याच्या गप्पांचें राजकारण आहे. जगांत पुढें पुढें जात राहणें याखेरीज जीवन जगण्यासारखें किंवा आयुष्य पणास लावण्याच्या योग्यतेचें दुसरें कांहीं नाहीं. कारण ध्येयवादाचें युग आतां संपुष्टांत आलें आहे !

" या युगाचा असा अर्थ कांहींनीं लावला असेल. तो खराहि आहे. ध्येयवादाचें युग संपलें हें खरें आहे. पण हें कोणाच्या बाबतींत ? ज्यांच्या मनांत वर सांगितलेल्या तमोगुणांचा प्रादुर्भाव झाला आहे, ज्यांचा त्या वृत्तीवर फार लोभ आहे आणि जे त्या वृत्तीची आज्ञा शिरसावंद्य मानतात त्यांनीं खुशाल असें समजावें नि सांगत सुटावें कीं, ' ध्येयवादाचें युग आतां संपलें आहे.' ध्येयवादानंतर आतां कोणचें युग आलें आहे ? तर जातीजातींत आणि पक्षोपपक्षांत तीव्र वैमनस्य आणि क्रौर्य माजण्याचें आणि धनवान् आणि बेकार यांच्यांतील द्वेष आणि झगडा होण्याचें ! ज्यांनीं मोठमोठीं भव्य नांवें आपल्या पक्षास दिलीं आणि त्यांतील तत्त्वांचा गोंधळ केला, आणि ज्यांचें अंतरंग आणि बहिरंग यांचें स्वरूप निश्चितपणें कोणासच कळत नाहीं अशा पक्षांची व्यर्थ चुरस चालण्याचें युग आतां आलें आहे काय ? आर्थिक व्यवहारांच्या सूत्रधारांना राक्षसी लोकशाहीकडून संरक्षणाचा सौदा करतां येतो. गरीबांचीं जीवितें रक्षण करणाऱ्या गंगाजळींतून श्रीमंतांच्या चैनीसाठीं, जादा नफा म्हणून वांटणी करण्यांत येते ! आपल्या अनुयायांच्या अग्रस्थानीं विराजमान होणारे पुढारी लोकनिंदेच्या एखाद्या तडाख्यानें आणि वृत्तपत्रकाराच्या लेखणीच्या फटकाऱ्यानें उच्च पदावरून खालीं गडगडतात ! हेंच का नव्या युगाचें लक्षण आहे ? वैभवशाली शहरांच्याभोंवतीं आणि राजविलासी संस्थानांभोंवतीं अत्यंत हीन वृत्तीच्या राजकारणाचे फांस आवळले जावेत आणि प्रामाणिकपणा आणि स्वातंत्र्य यांची गळचेपी व्हावी असेंच या युगाचें स्वरूप आहे का ? असें हें येणारें, आलेलें, नवें युग आहे ! 'एखाद्या मंदिरांत, नुकतीच पूजा आटोपली असते परंतु नीरांजनें तेवतच राहतात आणि मग

गां...२

८८८२३ ता. १६३

पुजारी निघून जातो. अशा मंदिराप्रमाणें अद्यापहि जेथें भक्ति आणि श्रद्धा यांचा नंदादीप तेवत आहे अशीं जीवितांत स्थानें आहेत. संशयवादी आणि उपहासप्रिय माणसांनीं त्या स्थानांचा त्याग केला आहे. त्यांना आतां या नव्या युगांत तमोगुणी, भ्रमिष्ट आणि लाजिरवाण्या गोष्टींना तोंड देणें भाग पडत आहे।

## ऋषिवर्यांचे सहकारी

"परंतु प्राचीन ऋषींचें रक्त आणि वृत्ती ज्यांच्या जीवनांत संक्रमित झाली आहे आणि त्यांस जे वडिलोपार्जित संपत्ति मानतात त्यांना या युगाशीं कांहीं कर्तव्य नाहीं. जे त्या ऋषिवर्यांच्या शेजारीं उभे आहेत, ज्यांनीं स्वातंत्र्याच्या छत्राखालीं बसून मनुष्यत्वाचा अर्थ समजून घेतला आहे त्यांचा या युगाशीं कांहीं संबंध नाहीं. आमच्या राष्ट्राचाहि त्या कृष्णयुगाशीं आणि त्या तामसी दृष्टिकोणाशीं कांहीं कांहीं संबंध नाहीं. या विद्यमान संग्रामांत आमच्या डोळ्यांसमोर जे वीराग्रणी आहेत त्यांची निष्ठा कोणत्याहि विशिष्ट पक्षाशीं नाहीं. ती सर्व जनतेशीं जोडलेली आहे. प्राचीन वीरांनीं आत्मबलिदानानें जें स्वातंत्र्य संपादन केलें त्या स्वातंत्र्यावर आमची श्रद्धा आहे. तें स्वातंत्र्य, सेवा आणि स्वार्थत्याग यांच्या बलावर टिकविणें हें आमचें ध्येय आहे. जे हक या स्वातंत्र्यावर आक्रमण करतात त्यांची मिरासदारी चालणार नाहीं. तें स्वातंत्र्य धोक्यांत आणणारी बेबंद समाजव्यवस्था आम्ही मानणार नाहीं. त्या स्वातंत्र्याचा अनादर करणारा किंवा त्यावर हल्ला करणारा कोणताहि वर्ग आम्ही जुमानणार नाहीं. पूर्वीं जें जीवन सार्थ होतें तेंच आजहि सार्थ आहे. तें जीवन म्हणजेच प्रामाणिक जीवन होय. त्या जीवनांत अन्न आणि वस्त्र यांच्या प्राप्तीसाठीं, लढण्याच्या लायकीचें असें युद्ध करावयाचें आहे. जनतेच्या प्राथमिक हक्कांसाठीं हा लढा लढावयाचा आहे. आमचे लोक अक्षरशः स्वतंत्र करावयाचे आहेत. स्वातंत्र्य नुसतें नांवापुरतें नसून प्रत्यक्षांत अवतीर्ण झालें पाहिजे. खऱ्या स्वातंत्र्याभोंवतीं पडलेलीं बंधनें तोडावयाचीं आहेत. आमचें राष्ट्रीय जीवन राजकीय, व्यापारी आणि सामाजिक अवनती-पासून अलिप्त ठेवण्याचा पराकाष्ठेचा प्रयत्न करावयाचा आहे. हिंदभूमी-सारख्या राष्ट्राची सेवा करण्यांतील मोठेपण उपदेशानें आणि आचरणानें

आमच्या मुलाबाळांस शिकवावयाचें आहे. ही राष्ट्रसेवा हीच पौरुषाचें आणि स्त्रीत्वाचें सर्वश्रेष्ठ भूषण आहे. ही गोष्ट तरुणांच्या मनावर ठसवावयाची आहे. या कार्याचा अर्थ आणि आवश्यकता ज्यांना समजते तेच खरे सुशिक्षित आहेत. त्यांचे श्रम व्यर्थ ठरणार नाहींत; त्यांचा त्याग निष्फल होणार नाहीं. कारण मानवजातीच्या दैवनभावर मानवजातीविषयीं विश्वास, निस्वार्थी वृत्तींतलें धैर्य, ध्येयनिष्ठा हे तेजोगोल तळपळत आहेत. त्या तेजोगोलांचा प्रकाश झळकळत आहे तोंपर्यंत प्राचीन ऋषींची वृत्ति आणि ध्येय ज्यांच्या ठिकाणीं आहे आणि जे त्यांचे सहकारी आहेत ते कधींहि कधींहि नाश पावणार नाहींत !"

## गांधीवादाचें सार

गांधीवादाचीं तत्त्वें अशीं कोठेंहि एकत्र नोंदलेलीं नाहींत. परंतु तीं तत्त्वें गांधीजींच्या वाणींतून किंवा लेखणींतून बाहेर पडलेल्या शब्दांतच स्टीफन हॉब्हाउस यांनीं संकलित केलीं आहेत. तीं अशीं:—

( १ ) अहिंसा म्हणजे अमर्याद प्रेम. तो दिव्य सिद्धांत आहे. मानव-जातीच्या उद्धाराचा तो एकमेव मार्ग आहे.

( २ ) अहिंसेवर श्रद्धा ठेवणें म्हणजे मूर्तिमंत परमेश्वरावर श्रद्धा ठेवणें होय.

( ३ ) अहिंसा, शब्दांनीं शिकवितां येणें शक्य नाहीं. मनापासून केलेल्या प्रार्थनेचें अंतस्थ परमेश्वरानें दिलेलें उत्तर म्हणजे अहिंसा.

( ४ ) अहिंसा हें बलिष्ठांचें आणि धैर्यमेरूचें हत्यार आहे. परमेश्वराच्या खऱ्या भक्ताच्या ठिकाणीं, तलवार चालविण्याचेंहि सामर्थ्य असतें, परंतु तो तलवार चालविणार नाहीं, कारण प्रत्येक व्यक्ति परमेश्वराचेंच रूप आहे हें त्यास माहीत आहे.

( ५ ) जर रक्तपात व्हावयाचाच असेल तर तो आपल्या रक्ताचा व्हावा. हिंसा न करतांना शांतपणें मरण स्वीकारण्याचें धैर्य आपण संपादिलें पाहिजे.

( ६ ) प्रेम दुसऱ्यास जाळीत नाहीं. तें स्वतःच जळत असतें. स्वतःचा

अंत होईपर्यंत आनंदानें यातना सहन करणें हेंच प्रेमाचें लक्षण आहे. प्रेम एकाहि इंग्रजास विचारानें, शब्दानें किंवा कृतीनें हेतुपुरस्सर दुखविणार नाहीं.

( ७ ) हिंदुस्tानने आपल्या तथाकथित विजयी सत्ताधीशांना प्रेमानेंच जिंकलें पाहिजे. आपल्या बाबतींत भूतदया आणि देशभक्ति हीं एकरूपच असलीं पाहिजेत. हिंदुस्तानची सेवा करण्यासाठीं मी इंग्लंड किंवा जर्मनीस दुखविणार नाहीं.

( ८ ) अहिंसा आणि सत्य हीं अविभाज्य आहेत आणि एकांतच दुसरें गृहीत धरलेलें आहे.

( ९ ) सत्यापेक्षां श्रेष्ठ असा परमेश्वर नाहीं. सत्य हीच प्रथम संपादण्यासारखी गोष्ट आहे.

( १० ) परमेश्वरानें योजिलेलें असें हें आपलें धर्मयुद्ध आहे. त्यांत गुप्त ठेवण्यासारखीं अशीं कांहींहि गुपितें नाहींत. तेथें डावपेंच किंवा असत्य यांस स्थानच नाहीं.

( ११ ) सत्याग्रहास नियमनाची आवश्यकता आहे. सर्व शारीरिक वासना आणि वैयक्तिक इच्छा यांचें शुद्धीकरण करण्याची उपासना करूनच सत्याग्रहाचें आचरण करतां येतें.

( १२ ) आपलें प्रत्येक पाऊल टाकण्यापूर्वीं आपल्या विरोधकाच्या गरजा सत्याग्रही व्यक्तीनें लक्ष्यांत घेतल्याच पाहिजेत. खरा सत्याग्रही विरोधकाच्या अनैतिक नियमांना किंवा आज्ञांना जुमानीत नाहीं. तरी तो आपल्या विरोधकासंबंधीं नेहमीं सभ्यपणाचें आणि उदारबुद्धीचेंच आचरण ठेवतो.

( १३ ) सत्याग्रही न्यायपथापासून विचलित होणार नाहीं. परंतु सलोख्यासाठीं त्याला नेहमीच तळमळ वाटत असते. दुसऱ्याविषयीं त्याला अमर्याद विश्वास वाटतो; त्याच्या ठिकाणीं अथांग धीर आणि अमोघ आशा असते.

( १४ ) माणसाचा स्वभाव मूलतः एकरूपच आहे आणि म्हणून विरोधक शेवटीं प्रेमापुढें मान वांकविणारच यांत मुळींच शंका नाहीं.

( १५ ) शांततामय, निश्चयाधिष्ठित आणि आस्तिक अशा लोकांच्या आक्रमणास जगांतील कोणतीहि शक्ति रोधूं शकत नाहीं. जगांतील सर्व शस्त्रसंभारापेक्षांहि अहिंसा जास्त बलसंपन्न आहे.

( १६ ) परमेश्वरापुढें नम्र असणाऱ्या माणसास मृत्यूचें भय वाटत नाहीं.

( १७ ) रणांगणावर शौर्य दाखविणें आम्हांला अशक्य आहे. परंतु शारीरिक दुखापत, रोग, मृत्यु, यांसारखे प्रसंग आणि मालमत्ता किंवा कीर्ति यांचा नाश यांविषयीं पूर्णपणें निर्भय असणें हें अतिशय अवश्य आहे. या जगांत आपलें असें कांहींहि नाहीं.

( १८ ) अहिंसा म्हणजे आत्मविश्वास. अहिंसा म्हणजे केवळ परमेश्वरावर विश्वास. अशी अहिंसा अंगीं बाणण्यास आपल्या ठिकाणीं नम्रता असणें जरूर आहे.

# अहिंसा २

## एक नवा प्रयोग

कोणताहि नवा शोध एकदां प्रगट झाला कीं, तो फारच सुलभ वाटूं लागतो. घाणीनें घाण दूर होणार नाहीं हें म्हणणें किती सोपें आहे ! किंवा 'सैतान सैतानाचा बंदोबस्त कसा करील ? हिंसेनें हिंसेचे परिणाम दूर कसे होतील ?' असें विचारणें आपल्या किती अंगवळणीं पडलें आहे ! आपणांस हें आतां पटलें आहे कीं, हिंसेनें केलेल्या विध्वंसाचें निराकरण अहिंसाच करूं शकेल. कारण जर हिंसेनें हें साधणें शक्य असेल तर सामाजिक दोषांचें निराकरण करण्याच्या कामांतील आपली प्रगति म्हणजे हिंसेची चढती कमान झाली पाहिजे आणि लहान हिंसेच्या निराकरणासाठीं मोठ्या प्रमाणावर हिंसा करणें जरूर झालें पाहिजे. हिंसाप्रधान अशा अरेरावीचें निर्मूलन करणारे गांधीजी हे पहिलेच गृहस्थ नाहींत. यापूर्वी येशू ख्रिस्ताच्या समाजांत इम्रेशस लायलासारखे पुरुष होऊन गेले. त्यांनींहि ब्रह्मचर्य आणि सर्वसंगपरित्याग हीं व्रतें घेतलीं होतीं. जगाचें कल्याण आणि सत्य यांच्यासाठीं झटणाऱ्यांची आणि त्यासाठीं प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणें अहिंसा मार्गाचा अवलंब करणाऱ्यांची लांबलचक नामावली जगाच्या इतिहासांत आहे. त्या नामावलींत आम्हीं महात्माजींच्या नांवाची भर घालींत आहोंत.

हिंदुस्तानांतील परतंत्रतेमुळें गांधीजींच्या प्रयोगास अतिशय व्यापक क्षेत्र लाभलें आहे. गतकालांतील कोणत्याहि एका धर्मपंथास अशी संधि लाभली नव्हती. चालू युगांत अहिंसावादाच्या मार्गानें वैचारिक उन्नती होत असलेली दिसते. गुन्हेगारांस केवळ शासन करण्याऐवजीं गुन्हेगारीची प्रवृत्तिच नाहींशी करण्याचे प्रयत्न चालू आहेत. गुन्हेगार जातींना सुधारण्याचे प्रयत्न होत आहेत आणि नव्या लोकवस्तींत त्यांचें पालनपोषण होऊं लागलें आहे. गुन्हेगारीस सुसंस्कृत करण्याचे हे प्रयत्न स्वतंत्रपणें चालू आहेत. त्या प्रयत्नांत, गुन्हेगार हे फक्त शिक्षेसच पात्र आहेत ही रूढ समजूत दूर होऊन, प्रेमानें आणि विधायक मार्गानें त्यांची जास्त चांगली व्यवस्था केली पाहिजे असें मत प्रगट होऊं लागलें आहे. आपण ज्याप्रमाणें एखाद्या वेश्यास किंवा गुन्हेगारास सुधारण्याचे प्रयत्न करूं लागलों आहोंत, त्याचप्रमाणें युद्धप्रिय अरेराव, लोभी राजे, सूडबुद्धीचे सत्ताधीश, तसेच संतापलेला भाऊ, खुनशी पति आणि एखादें व्रात्य बालक यांनाहि पुन्हां एकदां शिकवून सुसंस्कृत केलें पाहिजे. या सर्वांना गांधींनीं एकाच सदरांत समाविष्ट केलें आहे, आणि त्यांच्या बाबतींत एका नव्या शास्त्राचा, नव्या सिद्धांताचा प्रयोग सुरू केला आहे. तो सिद्धांत म्हणजे प्रेमसिद्धांत. तें नवें तत्त्वज्ञान म्हणजे अहिंसावाद.

## अहिंसेंतील शौर्य

खरा धर्म डोक्यांत नसून हृदयांत असतो हें जर खरें असेल तर तो धर्म कोणासहि पारखा असणार नाहीं. तो धर्म प्रत्येकाच्या जीवनांतून—आपापल्या अंतःकरणांतून—उदय पावला पाहिजे. गांधीजींच्या प्रत्येक अनुयायानें सत्य, अहिंसा आणि संयम या तीन तत्त्वांचें पालन केलेंच पाहिजे. जशास तसें नि ठोशास ठोसा या तत्त्वापासून नुसतें अलिप्त राहून अहिंसा पूर्ण होत नाहीं. अपकाराची फेड उपकारानें करणें आणि आपल्यावर आक्रमण करणाऱ्यांना क्षमा करणें अशा आचरणासच अहिंसा म्हणतात. याचा अर्थ असा कीं, प्रतिकार, डावपेंच, सूड, उघड युद्ध वा गुप्तपणें खून यांना अहिंसेंत स्थान नाहीं. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे मन, वाणी किंवा कृति यांत कोठेंहि हिंसा असतां कामा नये आणि मनाचा तोल सुटून तें बेभान होतां कामा नये. या सर्व गोष्टी अतिमानुष वाटतात खऱ्या. परंतु एखाद्या गोष्टीची संवय करीत

राहिल्यानेंच ती करण्याचा आत्मविश्वास येतो, आनंदांत भर पडते आणि आत्मबलाची वाढ होते. प्रयत्न करीत असतां ज्या ज्या वेळीं चुका होतील त्या त्या वेळीं त्याबद्दल मनास लाज वाटते आणि दुःखहि होतें आणि प्रयत्नांत यशस्वी होण्याच्या प्रत्येक प्रसंगानें आत्मविश्वास आणि उत्साह वाढत जातो. यशासारखा आनंद नाहीं आणि अपयशासारखें दुःख नाहीं हें तत्त्व या बावतींत सार्थ आहे.

कृति, हेतु, योजना, वृत्ति अशा कोणत्याहि मार्गानें व्यक्त होणारी हिंसा ही आत्मैक्यास विसंगत आहे. हिंसेंत बौद्धिक आणि नैतिक हिंसेचाहि समावेश होतो. गर्व, तिरस्कार, क्रोध, उतावळेपणा, अधिक्षेप, कुरकुर, या भावनां-प्रमाणेंच हत्या करणें, जखम करणें, धाक दाखविणें, लुबाडणें, फसविणें, विषप्रयोग, भुलविणें, खुषमस्करी, एखाद्याचें चारित्र्य हेतुपुरस्सर कलंकित करणें इत्यादि कृत्यांचाहि हिंसेंत समावेश होतो. अहिंसात्मक पद्धतीनें प्रतिकार करणारा आपल्या कृतीनें सुखद आणि मंगल वातारण उत्पन्न करीत असतो. हेंच जीवनाचें शुद्धीकरण होय.

अहिंसा ही केवळ स्वप्नवत् भावना नाहीं. तर मनुष्याच्या अंतःकरणांत आणि नैतिक प्रवृत्तींत असलेला तो एक कार्यप्रवण असा गुण आहे. त्या गुणानें उत्साहशून्य व्यक्तीच्या ठिकाणींसुद्धां उदात्त ध्येयाची स्फूर्ति होते. त्याच्या आवांक्याबाहेर असलेल्या कार्याचें चैतन्य त्याच्या ठिकाणीं जागृत होतें. स्वतःपेक्षां श्रेष्ठ अशा गोष्टींविषयीं त्याला आकांक्षा वाटूं लागल्यानें अहिंसेनें त्या व्यक्तीची बौद्धिक उन्नति होत असते. त्या गुणामुळें क्षुद्र आणि वैयक्तिक जीवनाच्या मर्यादा मागें पडतात आणि आपलें जीवन, जीवनास भव्यता आणणाऱ्या व्यापक सामाजिक जीवनाशीं समरस होऊं लागतें. समष्टि-जीव-नाशीं अंतःकरण एकरूप होऊं लागलें आणि त्या जीवनांतून मनास स्फूर्ति मिळूं लागली कीं, जीवनास एक गहन अर्थ प्राप्त होत जातो.

## अहिंसेची परंपरा

हिंसा आणि अहिंसा यांतील भेद हा सनातन आहे. तो वेदकालाइतका प्राचीन आहे. यज्ञ-संस्था ही प्राचीन कालापासून प्रचलित असली तरी यज्ञांत होणाऱ्या हिंसेचा अनेक ऋषींनीं वारंवार निषेध केला आहे आणि त्या-

बरोबरच अहिंसा आणि सत्य यांचाहि आवेशानें पुरस्कार केला आहे. जगांत सत्याचें अधिष्ठान निर्माण करणारे जे गुण आणि आचार असतात त्यांनाच धर्म अशी संज्ञा देण्यांत आली आहे. असा धर्म हेंच सर्व व्यवहाराचें केंद्र मानण्यांत आलें आहे. विश्वामित्र आणि वासिष्ठ यांचा वृत्तांत आणि जैनांच्या तीर्थकरांचे वृत्तांत अहिंसाव्रताचाच पुरस्कार करणारे आहेत. गौतम-बुद्धानें तें व्रत पुढें चालविलें आणि गांधीजींनीं त्याची व्याप्ति वाढवून स्वतः स्थितप्रज्ञाची स्थिति संपादन केली. वेद, इतिहास, स्मृति, या-प्रमाणेंच महाभारत, जैन आणि बौद्ध धर्मग्रंथ यांतहि अहिंसेचें श्रेष्ठत्व जागोजाग वर्णन केलें आहे. महाभारतांतील गोव्याघ्र-संवाद या दृष्टीनें उल्लेखनीय आहे.

वाघाच्या तडाख्यांत सांपडलेल्या एका गाईनें वाघास एकच विनंति केली, " माझें वासरूं ८ दिवसांचें तान्हें बालक आहे. त्याला एकदां शेवटचा पान्हा देऊन येतें. मग तूं मला खा." वाघाचा गाईच्या बोलण्यावर विश्वास बसेना. परंतु शेवटीं त्यानें गाईस परवानगी दिली. गाय परत येईल याविषयीं त्याची खात्री पटली होती, तरी ती खरोखरच परत आलेली पाहून मात्र तो थक्क झाला. गाय म्हणाली, " आतां खुशाल मला खा." त्या वेळीं वाघ म्हणालाः " मीं असा प्राणीच अद्याप पाहिला नाहीं. तुला मी कशी इजा करूं ? सत्य आणि धर्म ह्यांनीं तुला संरक्षण दिलें आहे. मला हें पाप पचणार नाहीं." गाईनें वाघाच्या उपकाराबद्दल वारंवार आनंद व्यक्त केला आणि आपलें भक्षण करण्याबद्दलहि त्यास वारंवार विनंति केली. याचा परिणाम असा झाला कीं, वाघाचा हृदयपालट झाला !

ही गोष्ट फर्ग्युसन कॉलेजांत मीं सांगितली त्या वेळीं श्रोतृवृंदांतल्या एका विद्यार्थ्यानें विचारलें, " ब्रिटिश-वाघाचें अंतःकरण इतकें मृदु होईल का ?" मीं त्यास उत्तर दिलें: " वाघाच्या कृपाळुपणानें गाय वांचली नाहीं. तर गाईच्या सर्वथैव अहिंसात्मक वृत्तीनें आणि आचरणानें वाघाच्या अंतःकरणांत माया उत्पन्न झाली. तें गाईच्या तपश्चर्येचें फळ आहे. वाघाची कृपा नव्हे ! आपला स्वार्थत्याग, आपलें आत्मसमर्पण जर अंतःकरणपूर्वक झालें तर ब्रिटि-शांचेंसुद्धां पाषाण-हृदय वितळल्याखेरीज राहणार नाहीं."

## सत्याग्रह : एक व्रत

कोणत्याहि बाबतींत प्रगति होण्यासाठीं श्रद्धेची जरूरी आहे. संशयग्रस्त मनानें कार्यारंभ करणें म्हणजे अपयशाला आमंत्रण देण्यासारखेंच होय. श्रद्धायुक्त मनानें अव्याहत अभ्यास केल्याखेरीज कोणतीहि विद्या हस्तगत होत नाहीं. घर ही या अभ्यासाचें शालागृह आहे. आपण स्वतः हाच अभ्यास-विषय आहे. जें तुम्हांला स्वतः आचरतां येत नाहीं तें दुसऱ्यास शिकवितां येणार नाहीं. सत्याग्रहपंथांत तुम्हांला स्वतःच आदर्श निर्माण करावा लागतो. स्वतःचेंच उदाहरण पुढें ठेवणें सत्याग्रहपंथांत आवश्यक होतें. स्वतःच क्रोधवश झाल्यावर दुसऱ्याला शांत राहण्यास कसें सांगतां येईल ? स्वतःचें पुनरुज्जीवन करण्यासाठीं, वारंवार आत्मनिरीक्षण, वेळेवर मिळालेली प्रेमळ सूचना, उद्धाराची खरी तळमळ या गोष्टी आवश्यक असतात.

आपण क्रोधाच्या आहारीं जात आहोंत हें आपणांसच प्रथम कळलें पाहिजे. आपली चूक कबूल करणें हें आत्मोद्धाराच्या बाबतींत अपरिहार्य आहे. आपल्या चुकांची कबूली आपण देऊं शकलों कीं, त्यांतून ती चूक दुरुस्त करण्याची तीव्र इच्छा आणि निश्चय हीं उत्पन्न होतात. रागावलेला माणुस कुरूपच म्हटला पाहिजे. रागाच्या ऐन भरांत असतांना आपली मुद्रा आरशांत पहा. आपलें तें रानटी आणि राक्षसी रूप पाहून स्वतःसच स्वतःची लाजच वाटेल. म्हातार-पण झालें तरी केवळ वयामुळें, मन मोकाट सोडण्याचा अधिकार येतो असें नाहीं. मन आवरण्याच्या कामीं म्हातारपण आड येत नाहीं. सर्वसामान्य नीतितत्त्वें म्हातारपणींहि जितकीं बंधनकारक असतात तितकाच मनःसंयम करणेंहि बंधनकारक आहे.

सत्याग्रहीनें आपल्या व्रतास आपण आणि आपलें कुटुंब यांपासून आरंभ करावा. कौटुंबिक जीवनांत तें व्रत पाळतां आल्यावर मग सामाजिक जीवनांत त्या व्रताचें पालन करणें म्हणजे केवळ एकच पाऊल पुढें टाकणें होय. परंतु तें पाऊलभर अंतर सुद्धां अगम्य स्थित्यंतर घडविणारें आहे. या आचरणानें मनाला एक निराळें वळण लागतें; चारित्र्याचें नवें स्वरूप प्रकट होतें; कौटुंबिक आणि सामाजिक जीवनांत नीतीचे नवे संकेत उत्पन्न होतात आणि देशांत नीतीचीं नवीं मूल्यें प्रस्थापित होतात.

" इतरांनीं वैयक्तिक जीवनाच्या संयमनाचा म्हणून जो मार्ग दाखविला

तोच जगाच्या उद्धारासाठीं गांधींनीं सामाजिक कार्यक्रम म्हणून पुरस्कृत केला. " ( जे. एच्. होम्स ).

**बीज आणि वृक्ष**

कोणत्याहि नव्या चळवळींचीं बीजें त्या चळवळीपूर्वींच पेरलेलीं असतात. आंब्याच्या बांडगुळावर आलेलीं फळें ताबडतोब तोडावीं लागतात; नाहींतर मूळ झाडच मरून जातें. झाडाला आपलें जीवन मिळविण्याइतका अवकाश मिळावा लागतो. यामुळें झाडाचो पूर्ण वाढ होईपर्यंत बीजारोपणानंतर मध्यें बराच काळ जावा लागतो. या दृष्टीनें अहिंसेसारखी नीतिप्रधान चळवळ नांवारूपास येण्यास आणि मानवी जीवनावर संस्कार करण्याइतकी ती प्रभावी होण्यास दोन तपें लागलीं तर त्यांत काय आश्चर्य आहे ? इतकेंच नव्हे तर एखाद्या चळवळीचीं मूळचीं योजनारूपी बीजें आणि तिचीं फळें यांतहि तफावत पडते. बाप आणि मुलगा यांच्यांत तफावत असते त्याच-प्रमाणेंच वरील तफावत होय. प्रत्येक नवी चळवळ ही प्रस्थापित कल्पनांना जोराचा धक्का मारूनच सुरू होते. प्रगतीचा लंबक एकदम दुसऱ्या टोकास जाणें ही नैसर्गिक प्रवृत्तीच आहे. अशीच प्रतिक्रिया गांधीजींच्या उद्गारांत, सविनय कायदेभंग आणि सत्याग्रह या चळवळीच्या वेळीं दिसली. पोलीस आणि सैन्य रद्द करणें आणि एक प्रकारची तात्त्विक 'बेबंदशाही' स्थापन करणें असें जेव्हां गांधीजी सांगतात, त्या वेळीं त्याचा अर्थ एवढाच असतो कीं, ते एका तडाख्यांत कलियुगाचें कृतयुग करूं पाहत आहेत. यांत भारतीय माणसास अगम्य असें कांहींच नाहीं. सामाजिक आणि नैतिक उत्क्रांति अशी झपाट्यानें होणें शक्य नसेल. परंतु सर राधाकृष्णन् यांचे उद्गार असे आहेत कीं, "सावकाश चाललेल्या उत्क्रांतीनेंच क्रांति घडून येते आणि जर आपणास क्रांति टाळावयाची असेल तर उत्क्रांतीचा वेग वाढविला पाहिजे."

अहिंसा हा एक समुदायवाचक शब्द आहे. अहिंसा म्हणजे एखाद दुसरें सत्कृत्य नव्हे. अहिंसा हा प्रेमाचा प्रतिशब्द आहे आणि प्रेमांत ज्या गुणांचा समावेश होतो ते सर्व गुण अहिंसेंत समाविष्ट असतात. 'प्रेम म्हणजे दीर्घ कालपर्यंत होणारे आत्मक्लेश' असें येशूनें म्हटलें आहे. या आत्मक्लेशांतच क्षमा-वृत्ति, सहनशीलता, चिकाटी या गोष्टी येतात. त्याचाच अर्थ असा कीं, आपण

दुसऱ्याचें वाईट चिंतितां कामा नये. कारण दुसऱ्याच्या अहिताच्या इच्छेंतूनच क्रोध आणि सूड या भावना उत्पन्न होतात.

एखाद्या अनुयायाकडून वचनभंग होवो, आश्रमवासीयांकडून प्रतिज्ञाभंग होवो, गांधीवादावर विश्वास नसलेला एखादा नामदार असो, पारतंत्र्यशृंखलांतून मुक्त होण्यासाठीं तळमळणारा राष्ट्राचा आत्मा ज्या आकांक्षा बाळगतो त्या आकांक्षांचा चक्काचूर करण्याचा निर्धार केलेलें सरकार असो, या आणि अशा हजारों बाबतींत गांधीजींनीं टिकविलेली चित्तशांति अवर्णनीय आहे. या प्रसंगीं त्यांचा चित्तक्षोभ होत नाहीं असें नाहीं; परंतु आपल्या क्रोधाचें ते रूपांतर करतात आणि क्रोध प्रगट होण्याऐवजीं त्यांच्या ठिकाणीं मानसिक यातना उत्पन्न होतात. आपल्या विरोधकाविषयीं आपण जें प्रेम बाळगतों तें निष्फळ ठरलें आणि विरोधकावर त्याचा कांहींहि परिणाम होत नाहीं याबद्दल त्यांना यातना होत असतात. चित्तक्षोभ म्हणजे हिंसेचें प्रकट स्वरूप होय. गांधीजी स्वतः शांत वृत्तीचे असल्यानें ते कोणतीहि गोष्ट अधीरपणें करीत नाहींत. परंतु चित्तक्षोभाची शरीरावर मात्र प्रतिक्रिया होते. प्रक्षुब्ध भावना कितीहि दाबून ठेविल्या तरी त्यांची प्रतिक्रिया गांधीजींच्या हृदयावर व्हावी आणि वारंवार त्यांचा रक्तदाब वाढून अतिशय चिंताजनक प्रसंग यावेत यांत काय आश्चर्य आहे?

## शांततेनें मिळविलेला विजय

शांततेनें मिळविलेला विजय हा युद्धानें मिळविलेल्या विजयापेक्षां वैभवशाली असतो असें म्हणण्याचा प्रघात आहे. परंतु युद्धावर उभारलेली शांतता, भावीं युद्धें थांबवूं शकत नाहीं हें आपणांपैकीं फार थोड्यांना कळतें. व्हर्सेलिसच्या तहांतून पूर्वीपेक्षांहि जास्त व्यापक आणि भयंकर युद्धाचें बीज पेरलें गेलें; परंतु ज्या शांततेंत भूतलावर बंधुत्व आणि सदिच्छा प्रस्थापित व्हावी अशी भावना असते त्या शांततेवर गांधीजींची श्रद्धा आहे. त्या श्रद्धेवर उभारलेल्या शांततेनें मिळविलेला विजय वायव्यसरहद्द प्रांतांत गांधीजींनीं संपादन केला. तेथील युद्धप्रवण जमातींत अहिंसावृत्तीची झालेली वाढ हा तो विजय आहे. त्याविषयीं गांधीजी म्हणाले:—

"मला तेथें जें दृश्य दिसलें त्याची मला कल्पनाहि नव्हती. ते लोक आज

अहिंसेबद्दल अतिशय उत्कट आहेत. त्यांच्या अंतःकरणांत दृढमूल श्रद्धा उत्पन्न झाली आहे. अहिंसापंथाविषयीं त्यांच्या ठिकाणीं अतिशय जागृति आणि आशा उत्पन्न झाली आहे. ती स्वयंस्फूर्त आहे. पूर्वी तेथें सर्वत्र तमोयुगच होतें. खून आणि मारामाऱ्या झाल्या नाहीत असें कुटुंबच तेथें नव्हतें. ते गुहेंतील वाघासारखे जगत असत. पठाण नेहमीं चाकू, सुऱ्या नि बंदुक जवळ बाळगीत, परंतु नोकरी जाण्याच्या भीतीनें आपल्या वरिष्ठापुढें मात्र गोगलगाय बनत. आतां तें वातावरण पूर्ण बदललें आहे. खानसाहेबांच्या शिकवणुकीचा लाभ झालेल्या आणि अहिंसेच्या चळवळींत आलेल्या लोकांत खून नि मारामाऱ्या हीं कधींच थांबलीं आहेत. पोटासाठीं क्षुद्र कामावर विसंबून राहण्याऐवजीं त्यांनीं शेतीला सुरुवात केली आहे आणि जर त्यांनीं आपली प्रतिज्ञा पाळली तर लवकरच ते उद्योगधंद्याकडे वळतील."

गांधीजींच्या अहिंसावादांत निष्क्रियता किंवा भेकडपणा यांचा लवलेशहि नाहीं. यासंबंधीं त्यांचेच उद्गार पहाः

"आपल्या डोळ्यांदेखत स्वतःची अवहेलना होत असतां हिंदुस्थानला ती उघड्या डोळ्यांनीं पाहत भेकडासारखें वागावें लागणार असेल तर त्यापेक्षां आपल्या अब्रूच्या रक्षणासाठीं हिंदुस्ताननें हातीं शस्त्र घेतलें तरी चालेल !"

### विशेषण आणि नाम

असहकारितेची चळवळ सुरू झाल्यापासून अहिंसात्मकता हा तिचा धर्मच ठरला आहे. लोकांनीं 'अहिंसात्मक' या गुणवाचक विशेषणापेक्षां 'असहकारिता' या विशेष्यावर-नामावरच-जास्त भर दिला असला तरी तेवढ्यानें असहकारितेचें वैशिष्ट्य बदलूं शकलें नाहीं. कॉंग्रेसच्या अनुयायांनीं ती परिस्थिति पत्करली तरी त्यांनीं अहिंसेचा तत्त्व म्हणून मनापासून आधीं स्वीकार केला नाहीं. नंतर अहिंसा हें 'धोरण' ठरलें आणि कधीं तत्त्व आणि कधीं धोरण अशा स्वरूपांत अहिंसेचा उल्लेख होऊं लागला. कॉंग्रेसनें अधिकारग्रहण केल्यानंतर हा फरक जास्त स्पष्ट दिसूं लागला. संयुक्त प्रांतांत अडीच वर्षांत ४७ वेळां लष्कर बोलवावें लागलें. मध्यवर्ति सरकारांत सत्ता घेण्याचा प्रश्नहि युद्धाबरोबर डोकावूं लागला. त्या सत्तेनें लष्करहि ताब्यांत घ्यावयाचें होतें. तेव्हां कॉंग्रेस-

प्रधान-मंडळांनीं, जगांतील इतर देशांप्रमाणें पोलीस आणि लष्कर यांचा उपयोग करावा कीं काय असा प्रश्न उपस्थित झाला. गांधीजींनीं 'शांति-दल' उभारण्याचा निश्चित आदेश दिला आणि हळूहळू पोलीसांना रजा देण्याचा मार्ग सुचविला. त्यांच्या अनुयायांत मतभेद उत्पन्न झाले. अहिंसा हें धोरण कीं तत्त्व? गांधीजींनीं उत्तर दिलें "धोरण म्हटलें तर त्या दृष्टीनेंहि आपले विचार आणि कृति हीं धोरणाशीं एकनिष्ठ असलीं पाहिजेत."

या वेळीं गांधीजींनीं दुबळ्यांची अहिंसा आणि समर्थांची अहिंसा असे दोन पर्याय सांगितले. धोरणापुरती अहिंसा ती दुबळ्यांची अहिंसा आणि तत्त्व म्हणून स्वीकारलेली अहिंसा ती समर्थांची अहिंसा. पहिल्या बाबतींत हिंसेचा उपयोग करण्याची ताकद नसल्यामुळें आपण अहिंसेचा आश्रय घेतों. दुसऱ्या प्रकरांत आपण हिंसेस समर्थ असलों तरी कोणत्याहि स्थितींत आपण अहिंसावादीच राहतों. पहिली ती लादलेली अहिंसा. दुसरी ती स्वयंनिर्णित अहिंसा होय.

## समर्थांचें शस्त्र : अहिंसा

अहिंसा हें दुर्बलाप्रमाणेंच समर्थांचेंहि शस्त्र आहे. आपल्या जीवितप्रयोगांत गांधीजींनीं आतांपर्यंत सत्याग्रह आणि अहिंसा यांचा प्रयोग फक्त परतंत्र राष्ट्रांतच केला. परंतु आपल्या प्रयोगाचें क्षेत्र वाढवून राजसत्ता उपभोगणाऱ्या स्वतंत्र देशांतहि अहिंसेचा प्रयोग व्हावा हा विचार त्यांच्या मनांत नाहीं असें नाहीं. ज्या देशास ब्रिटिशसाम्राज्यासारख्या सत्तेशीं झगडून आपलें स्वातंत्र्य प्रस्थापित करतां येतें, त्या देशास त्याच मार्गानें तें स्वातंत्र्य टिकवितांहि आलें पाहिजे असें गांधीजींनीं वारंवार सांगितलें आहे. जर अहिंसेनें स्वातंत्र्य मिळवितां येतें, तर अहिंसेनेंच स्वातंत्र्य टिकवितांहि आलें पाहिजे. त्यांचा साधा सिद्धांत असा आहे कीं, हिंसा आणि रक्तपात यांच्यासाठीं उभारलेल्या युद्ध-पथकांऐवजीं शांति-दलें उभारावींत. त्या दलांनीं आपला देश आणि त्या देशावर आक्रमण करणारें सैन्य यांच्यामध्यें स्वतः उभें राहण्यास आणि आत्मबलिदानास सिद्ध असलें पाहिजे.

झेकोस्लोव्हाकियांतील झेक लोक ऑक्टो. १९३८ मध्यें जर्मनीस शरण गेले. त्या वेळीं गांधीजींनीं झेकांस उद्देशून हेंच सांगितलें. ते म्हणाले,

"मी जर झेक असतों तर इंग्लंड व फ्रान्स या राष्ट्रांना माझ्या देशाचें रक्षण करण्याच्या जबाबदारींतून मीं मुक्त केलें असतें. मी पूर्ण स्वतंत्र असलों पाहिजे किंवा मरण पत्करलें पाहिजे. शस्त्रांच्या खणखणाटांत विजय मिळविण्याची धडपड हा शौर्याचा केवळ फार्स आहे. परंतु माझें स्वातंत्र्य हिरावून घेणाऱ्याच्या इच्छेपुढें मान न वांकवितां मी निःशस्त्रप्रतिकारांत मरण पावलों तरी त्याला शौर्याचा फार्स म्हणतां येणार नाहीं. त्या प्रयत्नांत माझें शरीर नाश पावलें तरी माझा आत्मा, माझें स्वत्व हीं जिवंतच राहतील."

हिटलरजवळ दया-माया नाहीं असा एकानें आक्षेप घेतला. त्यावर गांधीजी म्हणाले, "अहिंसात्मक प्रतिकार करणारें राष्ट्र अद्याप झालेंच नाहीं. हिटलरवर माझ्या आत्मक्लेशाचा परिणाम झाला नाहीं तरी हरकत नाहीं. त्यांत माझें कांहींच नुकसान नाहीं. माझें स्वत्व ही एकच गोष्ट रक्षणीय आहे. तें स्वत्व हिटलरच्या दयेवर अवलंबून नाहीं. अहिंसेविषयीं मी श्रद्धा बाळगतों. म्हणून अहिंसेच्या शक्यतेला मी कोणतीहि मर्यादा घालीत नाहीं. आजपर्यंत हिटलर आणि त्याच्यासारखे इतर अरेराव यांना एकच खात्री वाटत आली आहे कीं, माणूस अरेरावीपुढें नमतो. निःशस्त्र पुरुष, स्त्रिया आणि मुलें अहिंसात्मक प्रतिकार करतांना त्यांना दिसलीं तर तो त्यांना अननुभूत प्रकार वाटेल. उच्चतर आणि जास्त सुसंस्कृत अशा सामर्थ्याचा परिणाम त्यांच्यावर होण्याजोगी त्यांची वृत्तीच नाहीं असें कोण म्हणूं शकेल? माझ्या देहांत जो आत्मा आहे तोच त्यांच्याहि देहांत आहे. कितीहि मोठी भौतिक शक्ति असो, तिच्यापुढें मान न वांकविण्याचा निर्धार हें सर्वांत मोठें शौर्य आहे."

### आक्षेपांचें निराकरण

अहिंसावादाचा व्यापक अर्थ आणि व्यापक प्रयोग यांसंबंधीं वारंवार आक्षेप घेण्यांत आले आहेत. गांधीवाद आणि अहिंसा या विषयांचा परामर्ष घेतांना त्या आक्षेपांचाहि विचार केलाच पाहिजे.

कांहीं आक्षेपक म्हणतात, जर अहिंसा हा एक धर्म आहे आणि आपण धैर्यवान् असावें, आपलें मन उच्च भूमिकेवर असावें आणि आपण सर्वांवर प्रेम करावें असें हा धर्म सांगत आहे तर अहिंसा म्हणजे विश्वबंधुत्व असा

अर्थ होतो आणि जीविताच्या वस्तुस्थितीशीं विश्वबंधुत्व तर विसंगत ठरतें. यावर उत्तर असें कीं, अहिंसावादी सैनिक आपला छळ करणाऱ्याविषयीं कांहींहि सूडबुद्धि न बाळगतां मरण्यास सिद्ध असावा अशी गांधीजींची अट आहे. गांधी कोणासहि शत्रु मानीत नाहींत. सत्याग्रही सैनिकानें आपल्या तथाकथित शत्रूवर मित्रासारखें प्रेम करावें असें ते सांगतात.

यावर टीकाकारांचा आक्षेप असा कीं, अहिंसा हा वैयक्तिक गुण या दृष्टीनें कितीहि प्रभावी असला तरी नेहमीं अंमलांत आणावयाचें राजकीय धोरण म्हणून अहिंसेचा एक क्षणभरहि निभाव लागणार नाहीं. हिंसेच्या उपयोगाच्या समर्थनासाठीं भगवद्गीतेचा दाखला देण्यांत येतो. त्या दाखल्याप्रमाणें हिंसेचा विचार, ती करणाऱ्याच्या हेतूवरून करावयाचा असतो. केवळ हिंसेच्या कृत्यावरून तिची इष्टानिष्टता ठरवावयाची नसते. टीकाकारांचें म्हणणें असें कीं, प्राचीन हिंदु तत्त्वोपदेशक आणि ऋषि हे अहिंसा हा वैराग्य-प्रधान गुण मानतात; परंतु गांधी असा फरक करीत नाहींत. ते अहिंसेच्या बाबतींत फक्त भेकड माणूस आणि भेकडपणा यांचा अपवाद मानतात. भेकडांना हिंसा माफ आहे! कारण भेकडपणापेक्षां हिंसा बरी!! हत्या केल्या-वांचून मरण्याचें ज्याला धैर्य नाहीं त्यानें संकटापासून लज्जास्पदपणें पळून जाण्यापेक्षां दुसऱ्यास मारतां मारतां स्वतः मरून जावें. या अपवादाखेरीज गांधीजी आपल्या तत्त्वांत कांहींहि तडजोड करावयास तयार नाहींत.

टीकाकारांचा आणखी एक पक्ष आहे. तो म्हणतो कीं अहिंसा, फक्त सभ्य माणसांच्या बाबतींतच लागू पडेल आणि ज्या वेळीं त्या तत्त्वाचा अतिरेक होईल त्या वेळीं अतिशय तत्त्वनिष्ठ अहिंसावादीसुद्धां पराभूत होतील आणि एखाद्या निर्दयी अरेरावापुढें त्यांना हात टेकायची वेळ येईल.

आक्षेपकांच्या या म्हणण्यांतच विरोधाभास आहे. जर अहिंसा आणि सत्याग्रह हीं यशस्वी होण्यासारखीं असतील तर तीं फक्त सत्योपासक आणि अहिंसावादी विरोधकाच्या बाबतींत यशस्वी होऊन चालणार नाहीं. तर तीं असत्याचारी हिंसावादी बाबतींतहि, नव्हे त्या बाबतींतच, यशस्वी झालीं पाहिजेत. कारण सभ्य माणूस हा खरा सभ्य असला तर तो अहिंसा-वादीच असला पाहिजे. तेव्हां अहिंसेनें अहिंसावाद्यास जिंकतां येतें हें म्हणणें विरोधाभासाचें आहे. जर दोन माणसें अहिंसाचारी असलीं तर त्यांच्यांत

[stamp]

कधीं तेढ यावयाचीच नाहीं; ज्याप्रमाणें प्रकाशानें काळोखास जिंकावयाचें असतें, सत्य आणि असत्य यांत जशी तेढ आहे, मृत्यु आणि जीवन यांत जसा विग्रह आहे तसेंच हिंसेशींच अहिंसेचें भांडण आहे.

गांधी स्वतः संन्याशाचे गुण आणि संसारी माणसाचे गुण यांत भेद करीत नाहींत. सर्वसंग परित्याग केलेला संन्यासी आणि संसाराचा एक घटक असलेला सामाजिक व नागरिक कर्तव्यांनीं बद्ध असा संसारी यांत ते गुणांच्या बाबतींत भेद करीत नाहींत. सामाजिक, आर्थिक राजकीय, भौतिक आणि आध्यात्मिक इत्यादि भेद नाहींसे करण्याकरितांच गांधीजींनीं नवा पंथ काढला आहे. त्या पंथांत जीविताचा संघटित स्वरूपानेंच विचार होतो. तेथें विचार आणि आचार यांचीं निरनिराळीं दालनें नाहींत. यामुळें त्यांची न्यायनिर्णयपद्धति जीवितांतील सर्व क्षेत्रांस सारखीच लागू आहे. त्यांचा हा जो उदात्त दृष्टिकोण आणि ध्येय आहे त्यांत सर्वांनीं सहभागी व्हावें अशी त्यांची इच्छा आहे.

हिंदु समाजांत हिंसेचा मार्ग सामाजिक जीवनापासून अलग केलेला आहे आणि राज्यांत कायदा आणि व्यवस्था राखणाऱ्या क्षत्रिय वर्गासच युद्ध-कार्य सांगितलें आहे. शस्त्रें तयार करणें, विष आणि मादक पदार्थ तयार करणें, शिपाईगिरी करणें किंवा पशुहत्या करणें यांची बुद्धधर्मानें सर्वसामान्य नागरिकास बंदी केली आहे. हिंदु धर्माची आणि बुद्ध धर्माची संस्कृति जगभर पसरली ती धर्मयुद्धांनीं ( क्रुसेड किंवा जिहाद ) पसरली नाहीं तर शांततामय मार्गांनींच! लोकांचीं मनें वळवूनच त्यांचा प्रसार झाला. जगांत सर्वत्र हिंसा हीच आक्षेपार्ह ठरली आहे.

## सत्याग्रहाची भूमिका

अहिंसेलाच भेकडपणा समजणारे कांहीं लोक असतात. माणसाचें पौरुष, अभिमान आणि इभ्रत, या गोष्टी, आपलें जीवित, वित्त आणि अधिकार हीं टिकविण्याची त्याच्या मनगटांत किती ताकद आहे त्यावर अवलंबून असतात. अहिंसावादी सत्याग्रही माणसासहि या गोष्टी तितक्याच प्रिय असतात. स्वतःची इभ्रत, आपल्या देशाची इभ्रत, आपल्या धर्माचे सर्वश्रेष्ठ हक्क, स्वतःचें धार्मिक स्वातंत्र्य, आपल्या मालमत्तेचें स्वामित्व, आपल्या कुटुंबाची अब्रू,

आपल्या स्त्रीसमाजाचें शील, आपल्या समाजाचें सामुदायिक जीवन आणि आपल्या मायभूमीचें स्वातंत्र्य या सर्वांविषयीं सत्याग्रहींला उत्कट प्रेम असतें. गांधीजींच्या उपदेशामुळें सत्याग्रहींनीं किती अमर्याद त्याग केला आहे हें हिंदुस्तानांत आपण पाहिलें आहे. या थोर सत्याग्रहप्रवर्तकानें नेहमीं स्वतः आघाडीवर पहिलें पाऊल टाकलें आहे. तो कधीं मागें राहिला नाहीं. स्वतः अनन्वित यातना त्यानें सहन केल्या आणि इतरांना उदाहरण घालून दिलें. सत्याग्रही स्वतः कधीं मोघम सिद्धांत सांगत नाहीं. हवेंतले मनोरे बांधण्याचें त्याला वेड नसतें.

दलित आणि असहाय यांचें संरक्षण करण्याचें कार्य हें एकदम सामुदायिक चळवळीनें होत नाहीं. तर त्या कार्यासाठीं लहान लहान कार्यांची संघटना करावी लागते. तें काम यांत्रिक कारखानदारीसारखें नसून तें घरगुती व्यवसायासारखें आहे. तें व्यक्तिशः अत्यंत निष्ठापूर्वक निश्चयानें करावयास पाहिजे आणि वरवर पाहणारांस जीं कार्यें किरकोळ वाटतात त्या वैयक्तिक कार्यांनींच मूलगामी मानवी कार्यें सिद्धीस जातात.

कांहीं आक्षेपकांचें म्हणणें असें कीं, हिंसा हें मूलतः पाप नाहीं. हिंसेचा उपयोग कोणत्या हेतूनें होतो तें पाहिलें पाहिजे. एखाद्या व्यक्तीला किंवा राष्ट्राला चुकीच्या मार्गापासून परावृत्त करण्यासाठीं त्याच्यावर सक्ति करण्याचा हिंसा हाहि मार्ग असूं शकेल. आई मुलाच्या कल्याणासाठीं रागावते, मनानें हिंसा करते, परंतु त्यांत मुलाच्या कल्याणाचाच हेतु असतो. परंतु आपला हेतु आणि कृति यांत सत्याग्रही असा भेद करीत नाहीं. त्याचा हेतु–त्याचें मन–तो गुप्त ठेवीत नाहीं. आपलें ध्येय आणि साधनें याप्रमाणेंच आपले हेतु आणि कार्य हीं सुसंगत आणि प्रगट असावींत असा त्याचा निर्धार असतो.

फॅसिस्ट पंथानें युद्धांचा गौरव केलेला आढळतो. त्यांचें म्हणणें असें कीं, युद्धप्रसंगीं माणसांतील धैर्य आणि पौरुष प्रगट होतें. देशप्रीति प्रगट करण्याची युद्ध ही मोठी पर्वणी आहे. शस्त्रें वापरतां ठेविलीं नाहींत कीं, तीं म्हणे गंजून जातात! परंतु दुसऱ्या शिपायाचा बळी घेऊन कोणत्याहि सैनिकास आपल्या शौर्याची धार शाबूत ठेवतां येणार नाहीं. सैनिकानें आपलें शौर्य जिवंत ठेवण्यासाठीं स्वतःचें बलिदान करण्यास सत्याग्रहाची हरकत नाहीं.

नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत


परंतु दुसऱ्याचा बळी घेऊन आपल्या जीविताचा कधींहि उद्धार होणार नाहीं. आत्मसमर्पण हाच जीविताच्या उद्धाराचा मार्ग आहे. ज्यांचे पाय दुसऱ्याच्या रक्तानें माखलेले नाहींत तेच जगांत शांतता आणि सदिच्छा प्रस्थापित करूं शकतील.

आणखी एक शंका कांहीं लोक विचारतात. यांमध्यें कांहीं प्रामाणिक असतात; कांहीं उपहासानें बोलणारे असतात. त्यांचें म्हणणें असें कीं, हिंसा आणि प्रचंड स्पर्धा यांनीं व्यापलेल्या आधुनिक जगांत सहकार्य, बंधुत्व, दया, आत्मबलिदान, या तत्त्वांचा कसा निभाव लागणार? या आक्षेपकांची मनुष्याच्या ठिकाणीं असलेल्या मूलभूत पावित्र्यावर श्रद्धा असते. सर्वत्र दिसणाऱ्या अंदाधुंदीचा आणि नैतिक अधःपाताचा त्यांना उबग आलेला असतो. परंतु त्यांना अशी शंका येते कीं, मूठभर सुसंस्कृतांची जर ही स्थिति आहे तर मग असंख्य असंस्कृतांचें विचारावयासच नको! परंतु त्यांना हें माहित नाहीं कीं, त्या असंख्य असंस्कृतांचीं अंतःकरणें अद्याप आपल्या जन्मसिद्ध पावित्र्याच्या बाबतींत धड आहेत. त्यांच्या मनांतील नैसर्गिक प्रवृत्ति बोथट झाल्या नाहींत.

अहिंसेचा तात्त्विक आणि व्यावहारिक दृष्टीनें मानसशास्त्रीय अभ्यास करीत बसण्याची गरज नाहीं. किंवा या नव्या तत्त्वज्ञानांतील सामर्थ्याचा कांटतोल अंदाज करीत बसण्याचीहि गरज नाहीं. जर कशाची गरज असेल तर ती फक्त श्रद्धेची आहे. श्रद्धा असली कीं, मग परंपरा आपोआप तयार होते आणि श्रद्धा आणि परंपरा हीं तत्त्वाचरणास अनुकूल परिस्थिति निर्माण करतात. आपल्या मुलांचेंच पहा. वनस्पत्याहारी कुटुंबांत वाढलेल्या मुलांना मांसाहाराबद्दल स्वभावतःच तिटकारा उत्पन्न होतो. मांसाहाराच्या नामोच्चारानेंसुद्धां त्यांना शिसारी येते. त्याचप्रमाणें जर आपल्याला युद्ध आणि हिंसा यांनीं उध्वस्त झालेलें जग सुधारावयाचें असेल तर त्यासाठीं क्षमा, परोपकार, बंधुत्व यांचीं बीजें आपणांस सर्वत्र पेरलीं पाहिजेत, आणि आत्मबलाच्या केंद्रावर आधारलेलें नवें जग निर्माण करण्याचा मार्ग तयार केला पाहिजे.

अहिंसा हा असा एक अदृश्य आणि प्रभावी चमत्कार आहे.

**अहिंसेचें यशापयश**

गांधीजी म्हणतातः "अहिंसा शिकवून येत नाहीं. आचरणानें येते. हिंसा मात्र शिकवितां येते. नेमबाजीचें शिक्षण देतांना समोर कांहीं तरी लक्ष्य ठेवतात. आधीं नुसता फळा पुढें ठेवतात. नंतर दुसरें कांहीं लक्ष्य ठेवतात. मग पशूवर नेम धरून मारण्यास शिकवितात. मग माणूस पटाईत 'हिंसक' होतो. अहिंसावादी माणसाला अशीं साधनें नसतात. त्यामुळें त्याचें भाषण किंवा त्याची कृति हीं पुष्कळ वेळां इतरांना निष्फळ वाटतात. मनांत कांहींहि वाटत नसतां मी तुमच्याशीं वाटेल तितकें गोड बोलूं शकेन; उलट मनांत तुमच्याविषयीं प्रेम असूनहि मी शब्दानें तुमचा 'निषेध' करीन. दोन्ही बाबतींत माझी बाह्य कृति सारखीच असली तरी त्यांचा परिणाम इतरांवर निरनिराळा होईल. अप्रगट भावनांचा परिणाम आपल्या कृत्यांवर झाल्यावांचून राहत नाहीं. जाणूनबुजून केलेल्या गोष्टींपेक्षांहि न कळत केलेल्या गोष्टींचा परिणाम मोठा होतो. हिंसापंथांत अप्रगट असें कांहीं नसतें. अहिंसा ही तीन-चतुर्थांश अप्रगट असते आणि तिचा परिणाम तिच्या दृश्य स्वरूपाच्या उलट प्रमाणांत होतो.

"अहिंसा ज्या वेळीं कार्यप्रवण होते त्या वेळीं ती अपूर्व गतीनें जग पादाक्रांत करूं लागते आणि तो एक अद्भुत चमत्कार वाटूं लागतो. अशा रीतीनें बहुजन समाजावर प्रथम न कळत परिणाम झाला तरी नंतर लोक जाणीवेनें चळवळ करूं लागतात. डोळसपणें अहिंसेची चळवळ चालू झाली कीं, मग त्या चळवळीचें यश प्रगट होतें. माझा अनुभव असा आहे कीं, लोक ज्या वेळीं कच खातांना आढळतात त्या वेळीं मला पराभवासारखें कांहीं वाटत नाहीं. १९२२ सालच्या सविनय कायदेभंगाची चळवळ स्थगित केल्यावरहि अहिंसेच्या सामर्थ्याविषयींची माझी श्रद्धा कायमच होती आणि आजतागायत अशा आशावादी मनानेंच मी वावरत आहें. अहिंसा ही केवळ भावनात्मक घटना नाहीं. ती प्रत्यक्षांत होणारी घटना आहे. प्रत्येक गोष्टीचा काळ-वेळ ठरलेला असतो. मला प्रभातकालचा अरुणोदय दिसला नाहीं तरी मी सूर्योदयाविषयीं श्रद्धा सोडूं नये."

अहिंसावादी देशभक्त सैनिक आत्मबलिदान करतो आणि आपल्या आत्मबलिदानांत तो मोठ्या गोष्टीसाठीं लहान गोष्टींचें हवन करीत असतो.

अशा रीतीनें अहिंसा ही पूर्णपणें आत्मबलिदानावर उभारलेली असते. ती दुसऱ्याचें सहकार्य मिळविते आणि दुसऱ्यास सहकार्य देते. आई आपल्या मुलासाठीं जें कांहीं करते तेंच सत्याग्रही आपल्या देशासाठीं करीत असतो. राष्ट्राच्या ठिकाणीं इतर सर्व मायापाश विलीन होतात. तेथें सर्व मर्यादा एकरूप होतात.

जें प्रेम मोबदल्याची अपेक्षाच करीत नाहीं किंवा जें प्रतिपक्षानें तटस्थपणा राखला म्हणून उत्पन्न होत नाहीं, तर जें प्रेम दुसऱ्याच्या शत्रुत्वाचा आणि द्वेषाचा बदला म्हणून पुढें करण्यांत येतें तें प्रेम अत्यंत पवित्र आणि प्रभावी असतें. तें प्रेम अंतःकरणाच्या अथांग समृद्धींतून जन्मास येतें. असें प्रेम शुद्ध आणि निष्कलंक असतें इतकेंच नव्हे तर तें आपला हेतु सिद्ध करण्यांत अतिशय यशस्वी ठरतें. कारण त्या प्रेमानें त्या हेतूविषयीं एक नवा भाव जागृत होतो, नवें सामर्थ्य निर्माण होतें. प्रतिपक्ष्याच्या ठिकाणीं त्या प्रेमाचा पुनर्जन्म होत असतो. प्रेम प्रेमास जन्म देतें तें असें.

नम्रता हें प्रेमाचेंच एक स्वरूप आहे. प्रेमानें नेहमीं सेवेस सिद्ध असणें म्हणजेच नम्रता. ज्याप्रमाणें सत्याग्रही हा सेवेचें फळ म्हणून दुःखाचा स्वीकार करण्यास नेहमीं सिद्ध असतो तसेंच नम्र माणसाचें असतें. आपली विवेकबुद्धि चळूं लागते आणि दृष्टि दूषित होते त्या वेळीं आपल्या मेंदूस बाहेरून कांहीं दोष होत नाहीं; आपल्या स्वतःच्याच ठिकाणीं कांहीं अंतर्गत विकृति उत्पन्न होत असते. ती विकृति म्हणजे आपली बुद्धिमत्ता आणि नीतिमत्ता यांच्या श्रेष्ठतेविषयींचा खोटा गर्व आणि आपणच आपणांस अतिशय शुद्ध मानण्याची वृत्ति. ही वृत्ति आणि गर्व नेहमीं खऱ्या ज्ञानाच्या आड येतात, आणि अचूक निर्णय घेण्याच्या शक्तीस त्यामुळें प्रतिबंध होतो. अहंकाराच्या वाहनास नम्रता हें गतिरोधक यंत्र (ब्रेक) आहे. आपल्या स्वतःविषयीं फाजील कल्पनांना नियंत्रित करणारा नम्रता हा गुण आहे.

## शांति-दल

१९३८ सालीं १८ जून रोजीं गांधीजींनीं शांति-दलाची योजना आंखली आणि देशाला अहिंसेचें शिक्षण देण्याचा उपक्रम जाहीर केला. शांति-दलाची मुख्य कल्पना अशी आहे कीं, त्या दलाचा प्रत्येक सभासद दंग्यांत, विशेषतः

जातीय दंग्यांत, कार्य करतांना आपल्या प्राणावर उदार होऊन झटत राहील. जगांतील पोलीस आणि लष्करसुद्धां बाजूस करून तेथें या शांति-दलाची स्थापना करावयास पाहिजे.

गांधीजींनी त्या दलाविषयीं खालील योजना सांगितली आहे.

( १ ) प्रत्येक सैनिकाची अहिंसेवर जातिवंत श्रद्धा पाहिजे.

( २ ) या शांतिदूतास सर्व धर्मीयांबद्दल सारखाच आदर वाटला पाहिजे.

( ३ ) स्थानिक माणसांनी आपापल्या स्थानापुरतें कार्य करावें.

( ४ ) हें काम व्यक्तिशः किंवा सामुदायिक रीत्या करावें.

( ५ ) निवडक विभागांत किंवा परिसरांत प्रत्यक्ष सेवेनें लोकांशीं स्नेहसंबंध जोडावा म्हणजे आणीबाणीच्या वेळीं त्या शांतिदूताचें सर्व स्वागत करतील आणि त्याच्याविषयीं कोणासहि संशय येणार नाहीं.

( ६ ) संशयातीत चारित्र्य आणि अत्यंत काटेखोर निःपक्षपातीपणा या गोष्टी शांति-दल सैनिकास अत्यावश्यक आहेत.

( ७ ) आगामी वादळाचीं पूर्वचिन्हें दिसूं लागलीं कीं, दंग्याचा प्रत्यक्ष स्फोट होईपर्यंत शांतिदलानें स्तब्ध बसूं नये.

( ८ ) शांतिदल सभासदांना भरपूर स्वास्थ असलें पाहिजे म्हणजे त्यांना आपल्या लोकवस्तींतील रहिवाशांशीं स्नेहसंबंध जोडण्यास पुरेसा वेळ मिळेल.

( ९ ) शांतिदूत सहज ओळखतां यावेत यासाठीं त्यांनीं विशिष्ट पोशाख घालावा.

ही योजना प्रसिद्ध झाल्यावर तिच्या ध्येयाविषयीं कोठें कोठें टीका झाली. हें ध्येय तात्बडतोब साध्य होण्याजोगें नाहीं आणि हा मार्ग म्हणजे 'पर्वता-वरच्या प्रवचना'नें एखाद्या खंडाचा राज्यकारभार करण्यासारखा प्रयत्न आहे असें टीकाकार म्हणाले. परंतु गांधीजींनीं उत्तर दिलें कीं, या योजनेंतील साध्या आणि-शांतताप्रधान हेतूबद्दल मला मुळींच शंका नाहीं. शांतिदला-कडून सर्व प्रकारचे गुन्हे निवारण करावयाचे नाहींत. पोलिसांचें नेहमींचें काम करण्यासाठीं शांतिदल उभारावयाचें नाहीं. जातीय दंग्याची परिस्थिति निराळी असते. मनें प्रक्षुब्ध करण्याचा आणि परिस्थितींत खळबळ माज-विण्याचा प्रसंग मुद्दाम निर्माण करण्यांत येतो. असा प्रयत्न चालू होईल त्या वेळीं शांतिदलानें पुढें सरसावलें पाहिजे. त्यांनीं जनतेचे हितचिंतक मित्र म्हणून

पुढें होऊन त्यांच्या सेवेसाठीं धांव घेतली पाहिजे. आपलें चारित्र्य, आपली कीर्ति आणि वजन हीं पणास लावून त्यांनीं समाजांतील प्रक्षोभक्षम ठिकाणीं सद्धेतूंचें वातावरण उत्पन्न केलें पाहिजे.

जागतिक युद्धानें अहिंसावादाचें भवितव्य जास्त उज्ज्वल केलें आहे. गांधीजी किंवा पोप यांच्या उपदेशाचा युरोपियन राष्ट्रांवर सध्यां जरी फारसा परिणाम झालेला दिसत नाहीं तरी अहिंसावादाची भूमिका पक्की झाली आहे यांत शंका नाहीं.

सर्व समाजास एकचित्त करणारा बंध म्हणजे अहिंसा. गुरुत्वाकर्षणाचा सिद्धान्त कळेपर्यंत सर्व खगोलांना एका सूत्रांत ठेवणारी शक्ति आपणांस माहीत नव्हती. त्याचप्रमाणें अहिंसावादाविषयींहि आपण आजपर्यंत अज्ञानांतच होतों. परंतु गुरुत्वाकर्षणाचा सिद्धान्त प्रकट झाला किंवा अहिंसेचें तत्त्वज्ञान जगापुढें आलें तरी तो सिद्धांत किंवा हें तत्त्वज्ञान यांची आपल्या दैनंदिन जीवनांत किती लोकांना जाणीव होते? अहिंसावाद हा लोकसत्तेचा दृश्य वा अदृश्य पाया आहे. त्याची लोकांत जाणीव जों जों वाढत जाईल तों तों युद्धप्रवृत्तीस ओहोटी लागेल.

गांधीजी अहिंसा हें साधन आणि पूर्ण स्वराज्य हें ध्येय मानतात. प्रेमाचें सर्व व्याकरण अहिंसा आणि सत्य या दोन शब्दांत सामावलें आहे. व्याकरणकारांनीं संकलन आणि पृथक्करण यांचे नियम सिद्ध करण्यापूर्वींच भाषेचा जन्म झालेला असतो. त्याचप्रमाणें सत्य आणि अहिंसा हीं सत्याग्रहीनें त्यांचा सामाजिक प्रयोग करण्यापूर्वींच जन्मलीं आहेत.

# सत्याग्रह ३

## सत्याग्रहाचें तत्त्वज्ञान

जीवितांतील प्रश्न सोडविण्याच्या बाबतींत सत्याग्रह हा एक मार्ग आहे हें निदान तात्त्विकदृष्ट्या आतां मान्य झालें आहे. तें एक निर्दोष तत्त्वज्ञान आहे, यांत शंका नाहीं. प्रत्यक्ष व्यवहारांत तें तत्त्वज्ञान हळू हळू लोकप्रिय होत आहे. त्याची लोकप्रियता फारशा वेगानें वाढत नसली किंवा त्याप्रमाणें वागणारांची संख्या फारशी मोठी नसली तर त्याचें कारण सर्वसाधारण माणसास तें तत्त्वज्ञान समजण्यास वेळ लागतो आणि तें आचरणांत आणतांना येणाऱ्या अडचणी ओलांडणें फारसें सोपें नसतें.

सत्य हें भावनात्मक आहे. अहिंसा ही प्रत्यक्षांत येणारी गोष्ट आहे. जगाच्या घटनेचें नियंत्रण करणारें सत्य हें एक अमर तत्त्व आहे आणि हें नियंत्रण करण्याचें सत्याचें माध्यम किंवा साधन म्हणजे अहिंसा होय. सत्य हें मूल चैतन्य असून तें निरनिराळ्या रूपांत अवतीर्ण होत असतें. सत्याचें दर्शन निरनिराळ्या रूपांत होत असलें तरी कोणाच्याहि बिकट प्रश्नांतून वाट दाखविण्याचें कार्य प्राचीन काळीं किंवा अर्वाचीन काळीं सत्याकडूनच होत असतें. आणि हें कार्य करण्यास सत्य, अहिंसेचें साहाय्य घेतें. जीवितांतील अत्यंत

गुतागुंतीचे प्रश्न सोडविण्याच्या कामीं जे मार्ग उपयोगी ठरतात त्यांत सत्य आणि अहिंसा यांची फारकत करतां येत नाहीं.

सत्य आणि अहिंसा यांविषयीं गांधीजींच्या सर्व कल्पना फार थोड्यांना माहीत आहेत. गांधीजींच्या कल्पनेंत विविधता आहे. सत्य आणि अहिंसा या दोन्ही गोष्टींचीं प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष अशीं रूपें गांधीजींच्या मनांत असतात. उदाहरणार्थ पुढील प्रसंग पहावा. चंपारण्याच्या कलेक्टरनें गांधींना एक उर्मट पत्र पाठविलें होतें आणि नंतर तें परत घेण्याचें ठरविलें. त्याप्रमाणें तें पत्र कलेक्टरला परत पाठवितांना कांहीं गांधीवादी तरुण त्याची नक्कल करून घेऊं लागले. त्याबरोबर गांधींनीं सांगितलें कीं, पत्राची नक्कल आपण ठेविली तर तें पत्र मागें घेतल्यासारखें होणार नाहीं. सत्याची ती एक नवी व्याख्या होती. त्या व्याख्येचा गांधी-अर्विन कराराच्या वेळीं पुन्हां प्रत्यय आला. गृहमंत्री मि. एमर्सन यांनीं पाठविलेलें उपमर्दकारक पत्र हिंदुस्तान-सरकारनें मागें घेतलें. त्या पत्राची कॉंग्रेस-दप्तरांत नक्कल नाहीं. कारण पत्र-लेखकानें रद्द केलेलें, परत घेतलेलें पत्र त्यास परत करण्यापूर्वी त्याची नक्कल करून ठेवणें हें असत्याचरण आहे. तसेंच तें अहिंसेस विसंगत असें कृत्य आहे.

## सत्याग्रहाचा उगम आणि विकास

मोठ्या माणसांच्या स्फूर्तीचा उगम शोधणें हें संशोधन करणाऱ्या विद्वानांचें काम आहे. परंतु गांधीजींच्या बाबतींत तशा संशोधनाची जरुर नाहीं. कारण त्यांनीं सत्याचे प्रथम प्रयोग केले त्या वेळीं त्याची हकीगत स्वतः गांधीजींनीं व त्या प्रयोगांच्या वेळीं असलेल्या निकटवर्ती लोकांनीं आपल्याच हातानें नमूद करून ठेविली आहे.

गांधीजी सांगतातः—

" मी गेलीं तीस वर्षे सत्याग्रहाचें प्रवचन आणि आचरण करीत आहें. माझी सत्याग्रहाची आजची कल्पना ही हळू हळू उत्क्रांत होत आली आहे. सत्याग्रह हा शब्द मीं दक्षिण आफ्रिकेंत असतांना तयार केला. तेथील हिंदी लोकांनीं ज्या सामर्थ्याचा सतत आठ वर्षे आविष्कार केला त्या सामर्थ्यास मीं सत्याग्रह असें नांव दिलें. साम्राज्यांत ( United Kingdom ), आफ्रिके-तील संयुक्त वसाहतींत आणि दक्षिण आफ्रिकेंत त्या वेळीं जी चळवळ चालली

होती त्या चळवळीस Passive Resistance असें नांव मिळालें होतें. त्या चळवळीपेक्षां माझ्या चळवळीचें स्वरूप निराळें होतें. तें निराळेंपण व्यक्त करण्यासाठीं मीं सत्याग्रह हा शब्द निर्माण केला. सत्याग्रह या शब्दाचा धात्वर्थ सत्याचा आग्रह धरणें, सत्याची कांस धरणें असा आहे. सत्यमय सामर्थ्य असा त्यापासून अर्थबोध होतो. त्यालाच मीं प्रेम-शक्ति किंवा आत्म-बल असेंहि नांव दिलें आहे. सत्याग्रहाच्या प्रयोगाच्या अगदीं आरंभ-कालांतच मला असें आढळून आलें कीं, सत्याग्रहांत प्रतिपक्षावर हिंसेचा उपयोग करतां येत नाहीं. उलट प्रतिपक्षास प्रमादापासून परावृत्त करणें हें सत्याग्रहाचें कार्य आहे. या कामीं धीरानें काम करणें जरूर आहे. अर्थात् तेथें आत्मक्लेश अपरिहार्य आहेत. आत्मक्लेशावांचून सहनशीलता कशी येणार ? म्हणून शेवटीं या तत्त्वाचा अर्थ असा झाला कीं, सत्याग्रह म्हणजे सत्याचें संरक्षण आणि तें संरक्षण दुसऱ्यास यातना देऊन नव्हे तर स्वतः यातना भोगून करावयाचें. अशा मार्गानें सत्याचा आग्रह टिकविणें म्हणजे सत्याग्रह. सत्याग्रह आणि Passive Resistance यांत दोन ध्रुवांइतकें अंतर आहे. Passive Resistance हें दुर्बलांचें हत्यार आहे. आणि इष्ट हेतु साधण्यासाठीं शरीरबलाचा किंवा हिंसेचा उपयोग करण्यास त्यांत हरकत नसते. परंतु सत्याग्रह हें समर्थांचें शस्त्र आहे. त्यांत कोणत्याहि स्वरूपाच्या हिंसेस मनाई आहे.

"आपल्याला जें सत्य वाटलें तें अथेन्सच्या तरुणांना सांगण्याचा 'आग्रह' सॉक्रेटिसानें सोडला नाहीं. त्यापायीं त्यानें देहान्ताचीहि शिक्षा स्वीकारली. या बाबतींत सॉक्रेटिस हा सत्याग्रही ठरला. प्रल्हाद, मिराबाई यांनीं सत्याग्रहाचें आचरण केलें. यांपैकीं कोणींहि आपल्या विरोधकाचें अशुभ चिंतिलें नाहीं हें लक्ष्यांत ठेविलें पाहिजे. सॉक्रेटिस हा आदर्श नागरिक ठरला आणि प्रल्हाद हा आदर्श पुत्र आणि मिराबाई ही आदर्श पत्नी मानली जाते.

"सत्याग्रहाचें तत्त्व नवें नाहीं. त्याचा प्रयोग पूर्वी कौटुंबिक मर्यादेंत होत असे. तो राजकीय जीवनांत आतां होत आहे. एवढाच फरक झाला आहे. कौटुंबिक कलह आणि मतभेद हीं प्रेमाच्या कायद्यानेंच मिटतात. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय व्यवहारांत, म्हणजेच राजकीय क्षेत्रांत हा कौटुंबिक सिद्धांत प्रस्थापित झाल्याखेरीज राष्ट्राराष्ट्रांत ऐक्य होणार नाहीं

किंवा त्यांच्या कृत्यांनीं मानवजातीच्या कल्याणाची प्राप्ती होणार नाहीं असें मला वाटतें. ज्या प्रमाणांत या प्रेमसिद्धांताचें आचरण राष्ट्राकडून होत असेल त्यावरच त्या राष्ट्राचा सांस्कृतिक दर्जा ठरत असतो.

" प्रेमसिद्धांत हाच सत्यसिद्धांत आहे. सत्यावांचून प्रेम संभवत नाहीं. ज्या भावनेंत सत्य नाहीं तिला माया म्हणतां येईल. त्या मायेनें आपल्या देशासाठीं दुसऱ्यांचा छळ होतो. परंतु माया म्हणजे प्रेम नव्हे. ( सत्यविरहित अशा आकर्षणास ) मोहहि म्हणतां येईल. एखाद्या तरुणास तरुणीबद्दल वाटतें तो मोह होय. तें प्रेम नव्हे. जें प्रेम विवेकशून्य आणि अंध असतें तें खरें प्रेम नव्हे. अडाणी मातापितरांना आपल्या मुलांविषयीं वाटतें तें प्रेम या प्रकारचें असतें. प्रेम हें माणसास पशुत्वाच्या पलीकडे नेतें आणि तें कधींहि पक्षपाती नसतें. सत्याग्रह हें एक असें नाणें आहे, कीं ज्याच्या एका बाजूस प्रेम आणि दुसऱ्या बाजूस सत्य हीं अक्षरें कोरलेलीं आहेत. तें नाणें सर्वकाल प्रचारांत असतें आणि त्याचें मूल्य कधींहि मोजतां येणार नाहीं.

"सत्याग्रह स्वयंसिद्ध असतो. त्याचा ' प्रयोग ' करण्यास विरोधकाच्या पूर्वसंमतीची जरूरी नसते. म्हणून सत्याग्रह हा दुर्दमनीय आहे. सत्याग्रही पराभव जाणत नाहीं. कारण सत्यासाठीं झगडत असतां तो कधींहि हतबल होत नाहीं. सत्याग्रहाच्या युद्धांत येणारा मृत्यु ही मुक्ति होय. आणि कारागृह हें स्वातंत्र्यमंदिराचें प्रवेशद्वार होय."

## सत्याग्रहाचें तत्त्व आणि तंत्र

ज्ञानानें एखाद्याच्या मेंदूवर परिणाम करतां येतो. परंतु दुसऱ्याच्या हृदयांत प्रवेश करण्यास आत्मक्लेश हाच मार्ग आहे, अशी सत्याग्रहाविषयीं गांधीजींची श्रद्धा आहे. सत्याग्रहाच्या तंत्राचा एक भाग म्हणून ते ज्या वेळीं एखादी चळवळ आंखतात त्यांतहि त्यांची हीच श्रद्धा असते. त्या श्रद्धेनें माणसांतील अंतःसंवेदना जागृत होतात आणि कोणतीहि दुष्ट वासना त्या श्रद्धेंत उत्पन्न होत नाहीं. सत्याग्रहाच्या प्रयोगांत माणसांच्या संख्याबलास महत्त्व नसतें आणि यशाची प्राप्ति बहुसंख्याकांस होत नसून अल्पसंख्याकांस होते. शरीरबलानें बलिष्ठ असतात ते विजयी होत नाहींत तर नैतिक सामर्थ्यानें संपन्न असतील त्यांनाच विजय प्राप्त होतो.

गांधीजी पुष्कळ वर्षांपूर्वी म्हणाले आहेत कीं, सविनय कायदेभंगाखेरीज भीषण अन्याय दुरुस्त होणार नाहींत आणि हें सांगितल्यावर ८ वर्षांनीं त्यांनीं याच हेतूनें मिठाचा सत्याग्रह सुरू केला. भौतिक साधनांनीं केलेल्या युद्धांत शत्रूला होणाऱ्या यातनांनीं समाजांतील भौतिक सामर्थ्य जागृत होतें. परंतु अहिंसायुद्धांत आपल्या क्लेशांनीं सामाजिक आणि आध्यात्मिक जागृति होते आणि त्या जागृतींतून सामाजिक आणि आध्यात्मिक सामर्थ्य निर्माण होतें. जो स्वेच्छेनें दुःखास आमंत्रण देतो त्याला कोण दुखवूं शकेल? यापूर्वी मोठ्या माणसांनीं युद्धाचीं स्तुतिस्तोत्रें गायिलीं, परंतु त्यांना फक्त एकच युद्ध माहीत होतें. अहिंसात्मक युद्धाचा प्रभाव त्यांना ठाऊक नव्हता. आपल्या हयातींत तो प्रभाव जगास दाखवितां आला याबद्दल गांधींना अतिशय आनंद वाटतो. खान अबदुल गफारखानसारखा साधुवृत्तीचा कार्यकर्ता युद्धप्रिय आणि लढाऊ अशा पठाण जातींतल्या एक लक्ष पठाणांना अहिंसायुद्धाचे सैनिक करूं शकला. हें वैभव आपणांस पाहण्यास मिळाल्याबद्दल गांधीजींना आनंद कां वाटणार नाहीं?

## पाश्चात्य शांततावादी (Pacifist)

अहिंसेचा विचार करतांना पाश्चात्य राष्ट्रांतील शांततावादाचा विचार करणें अपरिहार्य आहे. या दोहोंतील फरक कळल्याखेरीज अहिंसेचें वैशिष्ट्य कळणार नाहीं.

युद्धविरोधी चळवळी या प्राचीन कालापासून होत आहेत. शांततावादी युद्धास विरोधच करतो यांत शंका नाहीं. परंतु एकदां युद्ध जाहीर झालें म्हणजे मात्र तो युद्धास पाठिंबा देतो. सी. इ. एम्. जोड यांच्यासारख्या प्रख्यात शांततावादी (Pacifist) गृहस्थानें १९४० सालीं नभोवाणीवरून युद्धास पाठिंबा दिला. सर्वच शांततावादी असें करीत नसतील कदाचित्. युद्धाच्या भयंकर संकटांपासून आपल्या राष्ट्राचा बचाव करण्यासाठीं वाटेल तो प्रयत्न करणें हें आपलें कर्तव्य आहे असें शांततावादी मानतो. परंतु इतकेंहि करून युद्धाचा भडका झालाच तर तो आपल्या सरकारला युद्धकार्यांत साहाय्य करण्यास सिद्ध होतो. बायरन्‌नेंहि हेंच केलें आणि बायरन् आणि जोडसारखीं माणसें युद्धप्रयत्नास साहाय्य करूं लागलेलीं पाहिलीं कीं,

साहजिकच लोकांना वाटतें कीं, तें युद्ध अपरिहार्य आहे आणि पवित्र हेतू-साठीं चाललें आहे. शांततावादी एखाद्या वेळीं युद्धाचें खापर सरकारच्या डोक्यावर फोडतात आणि निःशस्त्रीकरणाचे पुरस्कर्ते इतर देशांतील सरकारला दोष देतात.

अहिंसावादाचा विचार स्वतःच्या ठिकाणीं सुरू होतो. सत्याग्रह युद्ध कोणत्याहि बाह्य घटनेनें सुरू होत नाहीं. त्या युद्धाची स्फूर्ति सैनिकाच्या अंतःकरणांतच होते. भावी समाजघटनेची अहिंसा ही गुरुकिल्ली आहे. या दृष्टीनें अहिंसात्मक युद्धकार्याचा आरंभ स्वतःपासूनच होतो. नंतर त्या कार्याचें लोण कुटुंब व समाज यांच्यापर्यंत पोहोंचतें आणि शेवटीं आपल्या राष्ट्राच्या अंतगत आणि आंतरराष्ट्रीय जीवनापर्यंत तें कार्य पसरत जातें. वरिष्ठ आणि बलिष्ठ यांना शांतताभिमुख करण्याचें कार्य वस्तुतः सामान्य व्यक्तीच करूं शकतात. कारण ' बडीं ' माणसें, सरकारी कामें आणि राज्य-कारभाराच्या अनंत भानगडी यांत इतकीं अडकलेलीं असतात कीं, जीविताकडे आणि समाजाकडे नव्या दृष्टिकोनानें पाहण्याइतकी त्यांना उसंतच नसते. पुष्कळ वेळां असें सांगण्यांत येतें कीं, जी गोष्ट कुटुंब आणि समाज यांना हितावह असते तीच आंतरराष्ट्रीय दृष्ट्या समर्थनीय ठरेलच असें नाहीं. उलट असेंहि म्हणतां येईल कीं, जर प्रत्येक राष्ट्रांतील पुढाऱ्यांनीं स्वतः नव्या तत्त्वांचा स्वीकार करून राष्ट्रास तें वळण लावण्याचा प्रयत्न केला तर त्या तत्त्वाचा जास्त व्यापक प्रमाणांत प्रसार होणें सुलभ होईल.

नवें तत्त्वज्ञान, केवळ सिद्धांत म्हणून तात्त्विक दृष्ट्या पुढें मांडण्याचा उपयोग होत नाहीं. त्याचा प्रत्यक्ष प्रयोग करूनच त्याची यशस्विता दिसली पाहिजे. ज्या तत्त्वज्ञानाचा जो अनुभव येईल त्या अनुभवानें त्या तत्त्वज्ञानाचें प्रत्यक्ष मूल्यमापन करतां आलें पाहिजे. जेव्हां अशा प्रयोगाचीं पुष्कळ वैयक्तिक उदाहरणें पुढें करतां येतील त्या वेळीं त्या तत्त्वज्ञानास सामाजिक संभाव्यता प्राप्त होते.

पाश्चिमात्यांतील शांततावाद आणि गांधीजींची सत्याग्रह-योजना यांत आणखी अंतर असें आहे कीं, सत्याग्रहयोजना आक्रमणापासून पूर्णपणें अलिप्त असते. सत्याग्रहयोजना हिंसेपासून अलिप्त असण्यावरच थांबत नाहीं. तर त्या योजनेंत विरोधकांविषयीं अशुभ इच्छा आणि दुष्ट विचार

यांनाहि थारा नसतो. ती योजना प्रेम आणि आत्मक्लेशाच्या मार्गानें विरोधकांस जिंकीत असते. हेंच सत्याग्रहाचें सार आहे.

## सत्याग्रहाचा अभ्यासक्रम

सत्याग्रह ही अमंगलास मंगलानें जिंकण्याचें शास्त्र आणि कला आहे. सत्याग्रहाच्या तत्त्वाप्रमाणें आपल्या निंदकास क्षमा केली पाहिजे आणि आपल्यावरील आघात आपण सोसले पाहिजेत. म्हणून सर्व दुःखांचा भार आपण आपल्यावरच घेतों. विरोधकास ताळ्यावर आणून त्याच्या विरोधाचें मैत्रींत रूपांतर घडवून आणतां येतें. आपली सदिच्छा आचरणांत आणीत असतां त्यासाठीं जें मोल द्यावें लागेल त्याची मोजदाद आपण करीत बसूं नये. शुद्ध मनानें भोगलेल्या, जाणूनबुजून स्वीकारलेल्या यातनाच एखाद्या जादूप्रमाणें विरोधकाच्या मनांतील विकृति दूर करतात. सत्याग्रह हा विषय पूर्णपणें नवा आणि अपरिचित आहे. वरीलप्रमाणें यश मिळवितां येईपर्यंत तो विषय मनुष्यजातीस शिकवीत राहिलें पाहिजे.

आधुनिक कालांत धार्मिक ( ख्रिश्चन ) आणि धर्महीन, शास्त्रज्ञ आणि तत्त्वज्ञ, अडाणी आणि धर्मप्रसारक, योद्धा आणि मुत्सद्दी हे सर्वच हिंसापंथानें पछाडलेले आहेत ही मोठ्या दुःखाची गोष्ट आहे. ब्रिटन आणि जर्मनींतले आर्चबिशप दोघेहि एकाच येशूस हात जोडीत आहेत आणि आपल्या साम्राज्यवादास किंवा फॅसिझमला ( हुकूमशाहीस ) विजय मिळावा म्हणून प्रार्थना करीत आहेत ! ! नैतिक बल फक्त प्रार्थनामंदिरांतच राहिलें आहे आणि नीतीला फक्त वाङ्मयीन अर्थ उरला आहे. ज्याला आपण नीतिबल म्हणतों तें केवळ निःसंगत्वानेंच प्राप्त होतें याची या उपासकांना जाणीवहि नाहीं. सात्त्विक अन्नाचा पुरवठा शरीरास करावा लागतो. त्याप्रमाणें कांहीं सत्य सिद्धांत आणि तत्त्वें यांची अव्याहत जोपासना करून आत्म्याचें सामर्थ्य वाढवावें लागतें. असे सिद्धांत आणि तत्त्वें सर्व नैतिक संप्रदायांत असतातच, परंतु सुधारलेल्या जगांतील माणसाच्या जीवितांत तीं योग्य प्रमाणांत क्वचितच प्रवेश करतात. त्यासाठीं बाल्यापासून तों यौवनावस्थेपर्यंत नैतिक बलाची सारखी जोपासना ज्या शिक्षणपद्धतींत होईल अशी अगदीं नवी शिक्षणपद्धति शोधिली पाहिजे. म्हणजे ज्या वेळीं माणूस पूर्णपणें प्रौढ होईल,

त्या वेळीं त्याच्या मनास रक्ताची हांव न वाटतां, न्याय, स्वातंत्र्य आणि समाधान यांची तळमळ वाटूं लागेल. जो न्याय, जें स्वातंत्र्य, जें समाधान आपणांस मिळावें म्हणून आपण स्वतःपुरतें तळमळत असतों तें ज्यांना तें मिळालें नाहीं त्यांना मिळवून देण्यासाठीं माणूस झटूं लागेल. हें घडवून आणण्यासाठीं अगदीं नवी शिक्षणपद्धति आपण शोधिली पाहिजे.

## सत्याग्रहाचे संस्मरणीय प्रसंग

सत्याग्रहाच्या तत्त्वाचे प्रत्यक्ष प्रयोग केल्याचीं अनेक उदाहरणें आधुनिक लेखकांनीं लिहिलेल्या तत्त्वज्ञानाच्या ग्रंथांत उल्लेखिली आहेत. त्यांपैकीं कांहीं प्रसंग खालीं दिले आहेत.

हंगेरींत एक प्रसिद्ध प्रयोग झाला. ऑस्ट्रियाच्या आक्रमणास प्रतिकार करण्यासाठीं फ्रॅन्सिस डीक यांच्या नेतृत्वाखालीं हंगेरींत असहकाराची चळवळ सुरू झाली. शिक्षण आणि उद्योगधंदे यांचें राष्ट्रीयकरण सुरू झालें. हिंदुस्थान-प्रमाणेंच तुरुंगवासाचा चळवळीच्या कार्यक्रमांत समावेश करण्यांत आला. बहिष्काराची चळवळ येथल्याप्रमाणेंच बेकायदेशीर ठरण्यापर्यंत मजल गेली. कायदेमंडळावर बहिष्कार पुकारण्यांत आला, परंतु शेवटीं १८६७ सालच्या अखेरीस ऑस्ट्रियाला माघार घ्यावी लागली आणि हंगेरीस घटनादान करावें लागलें.

आफ्रिकेंतील प्रयोग प्रसिद्धच आहे. हिंदी लोकांकडून आंगठ्याचे ठसे घेणें आणि कोणाहि अधिकाऱ्यानें मागितल्यावर आपलें नोंदणीपत्रक दाखविणें असे अमानुष कायदे आफ्रिकेंत होते. त्या कायद्यास विरोध करण्यासाठीं गांधीजींनीं १९०६ सालीं १३००० लोकांसह सत्याग्रह केला आणि नाताळची सरहद्द ओलांडून ट्रान्सव्हालमध्यें मुक्काम केला. १९१३ सालीं पोलटॅक्स-विरुद्धहि असाच सत्याग्रह ट्रान्सव्हालमध्यें करण्यांत आला. लॉर्ड हार्डिंज यांच्या कारकीर्दींत दक्षिण आफ्रिकेंतील हिंदी लोकांवरील जुलमी कायदे शेवटीं रद्द झाले. इतकेंच नव्हे तर सुशिक्षित हिंदी लोकांना दक्षिण आफ्रिकेंतील निरनिराळ्या भागांत प्रवेशहि मिळाला.

चंपारण्यांतील युरोपियन वसाहतवाले हिंदी लोकांकडून निरनिराळ्या

प्रकारचे ६४ कर घेत असत. तेथेंहि सत्याग्रहाचे यशस्वी प्रयोग गांधीजींनीं केले.

कोणत्याहि मोठ्या चळवळीचा आरंभ अगदीं लहान असतो. तसेंच सत्याग्रहाचें आहे. गांधीजी जेव्हां मनामध्यें भव्य चळवळीची योजना करतात त्या वेळींहि त्या चळवळीचा प्रत्यक्ष आरंभ अगदीं लहान असतो. हिंदुस्थानांत त्यांनीं सामुदायिक सत्याग्रहाचा प्रयोग प्रथम केला. त्या वेळीं त्यांना एक गोष्ट कळून चुकली. ती ही कीं, सामुदायिक सत्याग्रह लोकांना अतिशय कडक शिस्तीचें शिक्षण दिल्याखेरीज करितां येत नाहीं. सत्याग्रहाचीं तत्त्वें लोकांच्या अंगीं पूर्णपणें मुरल्याखेरीज सामुदायिक सत्याग्रहाची चळवळ सहज हातीं घेतां येत नाहीं, हें त्या प्रसंगीं त्यांनीं ओळखलें. पहिली चळवळ यशस्वी झाली नाहीं, कारण त्या वेळीं आवश्यक तितका त्याग करण्याइतकी लोकांची तयारी नव्हती. त्यामुळें त्या प्रसंगानंतर, लोकांना राजकीय दृष्ट्या जागृत करण्याच्या योजनेचें बीजारोपण त्या अपयशानेंच झालें. त्या चळवळीचा तावडतोब फायदा एवढाच झाला कीं, कर देण्यास असमर्थ असलेल्यांना तहकुबी मिळाली आणि समर्थ होते त्यांनीं कर भरावा असें ठरलें.

सत्याग्रहाच्या या पहिल्या प्रयोगानंतर गांधीजींनीं राजकारणांत प्रवेश करण्याचा निश्चय केला आणि १९१६ सालीं लखनौ अधिवेशनांत त्यांनीं हिंदी राजकारणांत प्रवेश केला. १९१८ सालीं अहमदाबादच्या गिरणी मजुरांच्या पगारवाढीसाठीं केलेल्या सत्याग्रहास फार मोठें यश आलें. लोकांनीं सत्याग्रह तत्त्वाचें अत्यंत कसोशीनें पालन केलें. त्यामुळेंच १९१९ सालीं रौलॅट ॲक्ट विरुद्ध, नंतर जालीयनवालाबाग-प्रकरणाविरुद्ध, खिलाफत प्रश्नाच्या बाबतींत आणि स्वराज्यप्राप्तीसाठीं असे सत्याग्रहाचे एकापेक्षां एक भव्य प्रयोग गांधीजींनीं केले.

आर्थिक आणि सामाजिक अन्यायाच्या निराकरणासाठींहि गांधीजींनीं सत्याग्रहाच्या चळवळी केल्या आणि त्या त्या प्रसंगीं जें भव्य यश मिळत गेलें त्यामुळें हिंदुस्तानांतील अहिंसावादाच्या प्रसाराच्या बाबतींत मोठी प्रगति झाली. या सर्व चळवळींचा वृत्तांत्त विस्तृतपणें कॉंग्रेसच्या इतिहासांत सांगितला आहे. त्यांतल्या त्यांत उल्लेखनीय अशी चळवळ त्रावणकोरमधील होय. अस्पृश्यांना ब्राह्मणवस्तीच्या जवळचे रस्ते आणि देवालयें बंद झालीं होतीं.

१६ महिन्यांच्या सत्याग्रहसंग्रामानंतर ते रस्ते खुले झाले. मलबार-प्रांतांत अस्पृश्यतेचें बंड किती आहे, हें ज्यांना माहीत आहे, त्यांनाच या यशाचें महत्त्व आणि व्यापकता कळेल. सिमला जिल्ह्यांतील डोंगराळ भागांत सरकारी अधिकारी आणि इतर युरोपियन, माणसांकडून ओझीं वाहण्याचें काम करून घेत असत आणि त्याबद्दल त्यांना जवळ जवळ कांहींच मोबदला मिळत नसे. या अरेरावीविरुद्ध कित्येक महिने झगडून ती पद्धति शेवटीं बंद करण्यांत आली. बारडोली आणि छेरसद तालुक्यांत १९२८ सालीं वल्लभभाईंच्या नेतृत्वाखालीं झालेली चळवळ ही सत्याग्रहाच्या पुढील मार्गावर उज्ज्वल प्रकाश पाडणारी ठरली. साऱ्याची हंगामी आकारणी शें. २५ नें वाढविण्यांत आली होती ती शेवटीं समेटसमितीच्या निर्णया-प्रमाणें शें. ६।० पर्यंत उतरविण्यांत आली. १९१७ सालीं अहमदाबाद गिरण्यांतील संपाचा यशस्वी शेवट झाला. १९२३ सालीं नागपूर शहरीं सिव्हिल लाइन्स विभागांतून राष्ट्रीय निशाण नेण्यासाठीं झालेल्या सत्याग्रहानें सर्व देशाचें लक्ष वेधलें होतें. याहिपेक्षां सत्याग्रहाचें विशेष यश शीखांच्या बाबतींत आलें. नेहमीं किरपाण पाळणारे आणि थोडासा धक्का लागला तरी एकदम किरपाण उपसणारे शीख आपली ही आक्रमक वृत्ति काबूंत ठेवून सत्याग्रहाचें शब्दशः तत्त्वपालन करूं लागले आणि शारीरिक यातना आणि छळ कित्येक दिवसपर्यंत होत असतांहि त्यांनीं सत्याग्रहाचें व्रत सोडलें नाहीं. १९३० सालीं झालेला मिठाचा सत्याग्रह हें ताजें उदाहरण आहे. प्राचीन पुराणांतील प्रसंगांनीं ज्याप्रमाणें माणसांतील उदात्त भावना जागृत होतात त्याप्रमाणें त्या सत्याग्रह-समर-कथेनें हिंदी स्त्रीपुरुषांच्या अंतःकरणांतील भावना सत्य आणि अहिंसा या उच्च तत्त्वांपर्यंत उन्नत होतात. अशी ती समरकथा आहे.

### हिंसकाचें मानसशास्त्र

सामाजिक अन्यायनिराकरणासाठीं आणि नैतिक उन्नतीसाठीं सत्याग्रहाच्या ज्या चळवळी वारंवार झाल्या त्यांतील पद्धति आणि त्या साधनांच्या योजनेंतील मानसशास्त्र यांचा आपणांस विशेष विचार करावयाचा आहे. या चळवळींचा हेतु मनुष्यांतील श्रेष्ठ वृत्ती जागृत करणें हा असतो. प्रतिपक्षानें

केलेल्या अन्यायाबद्दल त्याच्या मनांत लाज उत्पन्न व्हावी आणि नैतिक उन्नतीची आणि जागृतीची तळमळ त्याच्या ठिकाणीं उत्पन्न व्हावी हा सत्याग्रहाचा हेतु असतो. अत्याचार झाला तरी प्रतिकार न करणें, इतकेंच नव्हे तर त्या प्रसंगीं दुखावलेल्या व्यक्तीनें मनाचें उमदेपण आणि खेळाडू वृत्ति दाखविणें या गोष्टींमुळें विरोधकास आश्चर्य वाटतें आणि हिंसेपेक्षां इतर मार्गांनीं आपला हेतु साध्य करण्याचें भव्य कार्यक्षेत्र त्याला प्रथमच दिसूं लागतें. हिंसामार्गानें हिंसक आणि हिंसेला जो बळी पडतो तो, असे दोघेहि दुखावले जातात. लहान मुलास आपण शिक्षा करतों त्या वेळीं आपणांस स्वतःविषयींहि उद्वेग वाटतो, याचा आपणांस अनुभव आहेच. आपल्या हातून झालेल्या अत्याचारानें आपलें मन अहोरात्र अस्वस्थ होतें. ज्यावर अत्याचार होतो त्यानें जुल्म सहन करतांना जी सहनशीलता आणि शांत मनोवृत्ति दाखविली असते त्यामुळें हिंसकास आपल्या अत्याचारीपणाची जाणीव तीव्रपणें होऊं लागते. इतकेंच नव्हे, तर त्या प्रसंगीं तेथें असलेले लोक जो तिरस्कार व्यक्त करतात तो तिरस्कार हिंसकाच्या पशुत्वाचा उपहास करीत असतो आणि त्याच्या मनापुढें अहिंसेचें जग उभें राहूं लागतें.

हिंसा करणारा आणि हिंसेचें स्वागत करणारा या दोहोंत पहिला हळू हळू दुर्बळ होत जातो आणि ज्या शारीरिक बलाच्या जोरावर त्यानें हिंसेस आरंभ केलेला असतो तें शारीरिक बल हळू हळू ओसरत जातें. त्याबरोबर त्याची भावनात्मकता आणि संस्कारक्षमता, हीं जास्त तीव्र होत जातात. तो जितकी जास्त हिंसा करीत राहील तितक्या प्रमाणांत त्याच्या मनावर हिंसेची प्रतिक्रिया होते. अहिंसकाचें श्रेष्ठ नैतिक बल, त्याची क्षमाशीलता, त्याची सहनशीलता यांचा हिंसकावर परिणाम झाल्याखेरीज कधींहि राहत नाहीं. हिंसकास या परिणामाची कल्पनाहि नसते. आपल्या हिंसापंथाची योजना आखीत असतां या प्रतिक्रियेचा विचार त्याच्या मनांत कधींच येत नाहीं. त्याच्या तत्त्वज्ञानांत या विचारास जागाच नसते. दुःख भोगणाऱ्याविषयीं आपल्या मनांत कधीं आदर उत्पन्न होईल याची त्यास कधीं कल्पनाहि करतां येत नाहीं. आपला पक्ष सत्य आहे आणि आपला सद्धेतु, विवेक आणि चिकित्सा यांच्याबरोबर झगडतांना नक्की विजयी ठरेल अशी ज्याला खात्री वाटत

नाहीं तोच हिंसेचा आश्रय घेतो. विवेकाशीं झगडण्याचें ज्याच्यांत धैर्य नसतें तो भेकडच हिंसेचें हत्यार उपसतो. प्रतिपक्षी कदाचित् आपल्यावर मात करील या धास्तानें तो बेभान होतो. अशा स्थितींत भीति आणि संताप यांच्या घेऱ्यांत सांपडल्यावर मनांत व त्याच्या भोंवतीं दूषित वातावरण निर्माण होतें. कार्य आणि कारण हीं तेथें एकमेकांना दुजोरा देऊं लागतात. न्याय आणि औदार्य हीं तेथून बाजूस होतात. डावपेंच आणि दुष्ट वासना हीं तेथें फोफावूं लागतात आणि त्यांच्या वाढीस अनुकूल असें वातावरण तयार होतें. मन स्वच्छ असलें आणि अंतःकरण शुद्ध असलें, तरच सद्वृत्तींची जोपासना होऊं शकते. ज्याचें मन अतिशय संस्कारक्षम आहे आणि ज्याच्या भावना अतिशय उदार आहेत त्याचें मन सहजच सुसंस्कृत होत असतें. परंतु जो विकारांच्या तडाख्यांत सांपडलेला आहे, त्याला आपल्या मनाची संस्कृति वाढविण्याचा मुद्दाम प्रयत्न करावा लागतो. आपल्या नैतिक सामर्थ्याची त्याला जेव्हां जाणीव होते, विवेकाच्या भूमिकेपर्यंत आपण जाऊं शकतों असा त्यास आत्मविश्वास वाटूं लागतो आणि आपल्या न्याय्य कृत्याचें समर्थन करण्यास आपण स्वतः समर्थ आहोंत असें त्यास आढळून येतें त्या वेळीं त्याच्या अंतःकरणांतील सुप्त शक्ति जागृत होतात, सद्गुणांचे अंकुर फोफावूं लागतात आणि आत्मसंयमनाचें बळ उत्पन्न होतें.

## अंतःस्फूर्तीचा प्रभाव

आपण सद्गुणी, सत्यप्रिय आणि सदाचारी असावें अशी प्रत्येकाच्या मनांत नैसर्गिक इच्छा असतेच. आपण धैर्यवान् असावें, उदार आणि क्षमाशील असावें, आपला इतरांस उपयोग व्हावा, आपण दुसऱ्याच्या सुखासाठीं स्वार्थत्याग करावा असें वाटणें ही माणसाची नैसर्गिक वृत्ति आहे. ही नैसर्गिक वृत्ति हाच सत्याग्रहाचा पाया आहे. हिंसक आणि त्याच्या हिंसेला तोंड देणारा यांच्यांत एक प्रकारचें नैतिक संमोहन चालू असतें. दोन सामर्थ्यांचा झगडा असा चालू असतां आपल्या सामर्थ्याची धार बोथट होईल असें कोणतेंहि कृत्य सत्याग्रही माणसाच्या हातून होतां कामा नये.

प्रेमभावनेच्या स्फूर्तीमुळें माणसाच्या ठिकाणच्या सर्व उदात्त वृत्तींचा आविष्कार होत असतो. उलट क्रोध-भावना ही त्या वृत्तींचा कोंडमारा करते.

या प्रेम-भावनेचा अंमल जसजसा वाढूं लागतो तसतसें, ' वास्तव ' हें ध्येयाच्या जवळ जाऊं लागतें आणि इच्छा-भावनेच्या अंकित होतें. अशा वेळीं माणूस जें आचरण करतो तें व्यवहारी मार्गानें जाणाऱ्या तर्कबुद्धीवर अवलंबून नसतें किंवा सारासार विचारानेंहि त्याच्या आचरणाचा मार्ग ठरत नाहीं. तर त्यास विशिष्ट कृत्य करण्याची अंतःस्फूर्ति होते. ही स्फूर्ति मनांत एकदम प्रगट होते. तर्कबुद्धि आणि निर्णयबुद्धि यांपेक्षां अंतःस्फूर्तीचा प्रकाश जास्त स्पष्ट असतो. यासाठीं गांधीजी एकदम आपले निर्णयच आपल्या अनुयायां-पुढें ठेवतात आणि त्या निर्णयास तर्कशास्त्राची जोड देण्याचें कार्य ते अनुयायी करीत असतात. सत्याग्रहीची ही सर्वश्रेष्ठ प्रगति होय. ज्यानें भीति आणि अभिलाषा यांचा त्याग केला आहे, क्रोध आणि द्वेष हीं मनांतून काढून टाकिलीं आहेत, स्वार्थ आणि डावपेंच ज्याच्या ठिकाणीं राहिलीं नाहींत अशा सत्याग्रहीची सर्वश्रेष्ठ प्रगति म्हणजे त्याच्या तर्कशक्तीपेक्षां त्याची अंतःस्फूर्ति आणि ' राजकारणा'पेक्षां नैतिकता ही प्रभावी ठरणें ही होय.

## सैनिक आणि सत्याग्रही

रणांगणासाठीं सिद्ध असलेल्या सैनिकांमध्यें साहस असतें. त्या साहसी वृत्तीमुळें माणसाच्या हातून अद्भुत पराक्रम घडतात. परंतु सैनिकांच्या हातून जे पराक्रम होतात त्यांमागें साहसाशिवाय, संकटाची अनिश्चिति हेंहि एक कारण असतें. एकावर किंवा सर्वांवर मृत्यूची गदा केव्हां कोसळेल याचा नियम नसतो. या अनिश्चितपणामुळेंच संकटाशीं झगडण्याचें बळ येतें किंवा या अनिश्चितपणामुळेंच सुरक्षिततहि वाटत असते. सत्याग्रहीचें असें नाहीं. तो स्वतःच संकटाकडे चालून जातो आणि आपणास यातना भोगाव्या लाग-णार याविषयीं त्याची बालंबाल खात्री असते. त्याला यातना समोर दिसतच असतात. त्यांत अनिश्चित असें कांहींहि नसतें. सत्याग्रही वीराच्या बाबतींत हें एक उणेंपण आहे असें एकाद्यास वाटेल. परंतु उणेंपण वाटणाऱ्या या गोष्टींतच धैर्य आहे आणि धैर्य ही एक निर्माणक्षम भावना आहे. ती भावना सत्याच्या ठिकाणींच रुजत जाते. तें धैर्य आपल्या शेजाऱ्यावरहि आपला अंमल बसवितें. तेंच सैनिकाचें पहा. अनपेक्षितपणें कां होईना, परंतु संकट कोसळलें कीं, त्यांत सांपडलेला शिपाई हतबल होतो आणि त्याच्यामुळें

[stamp]

सर्व सैन्यांतील कडवेपणास धक्का बसतो. परंतु सत्याग्रही जाणूनबुजून संकटें स्वीकारतो. त्यामुळें इतरांमध्येंहि आत्मत्यागाची स्फूर्ति उत्पन्न होते.

सत्याग्रही वीरांच्या धैर्याचा हा संचार १९३०-३२ आणि १९३३ सालीं मुंबईस आझाद मैदानावर स्पष्ट दिसला आहे. त्या मैदानावर आपापली जागा घेण्यासाठीं एकामागून एक तुकड्या येत होत्या. त्यांच्या ठिकाणीं अशा धैर्याचाच संचार दिसत होता. रक्ताचे सडे पाहून ते घाबरले नाहींत. जखमांच्या धास्तानें त्यांचीं पावलें मागें फिरलीं नाहींत. एका नव्या पोलीस कमिशनरनें शहराचा ताबा घेतला आणि आझाद मैदानावरील चळवळ दडपून टाकण्याच्या निश्चयानें त्यानें लोकांच्या डोक्यांवरहि लाठांचे तडाखे मारावयास सुरुवात केली. शरीराच्या इतर भागांपेक्षां डोक्यांत जास्त रक्त असल्यामुळें, आणि कातडें आणि मांस यांवर मारलेला तडाखा आंतील हाडापर्यंत पोहोंचला कीं, रक्ताचीं कारंजीं उडूं लागत असल्यामुळें मैदानावर भेसूर दृश्य दिसूं लागलें. त्या वेळीं तेथें हजारों लोकांच्या झुंडी जास्त वेगानें जमूं लागल्या. धैर्यवान् माणसास असें रक्त पाहून स्फूर्ति येते. परंतु भेकडाचीं पावलें तेथें लटपटूं लागतात. नव्या पोलीस अधिकाऱ्याच्या त्या प्रतिकारपद्धतीनें दररोज सत्याग्रहींच्या तुकड्या वाढूं लागल्या आणि प्रेक्षकांची संख्या पांच हजारांवरून पंचवीस हजारांवर गेली. मैदानांत उतरणाऱ्या प्रत्येक पथकानें शिपायांच्या हिंसेला तोंड देतांना मागाहून येणाऱ्या पथकांना केवळ अनुकरणाचीच चेतना दिली नाहीं तर त्यांच्या ठिकाणीं सत्याग्रह युद्ध चालू ठेवण्याचा निश्चय दुर्दम्य ठरला.

सत्याग्रहाशीं ज्याची गांठ पडते त्या सैनिकाच्या दृष्टीनेंहि या विषयाचा विचार करतां यईल. रणांगणांत पुष्कळ वेळां हुकूम करणारा 'फील्ड मार्शल' कित्येक मैल मागें असतो. जेथें गोळी जाऊन पडणार तें ठिकाण शिपायास दिसतहि नाहीं. त्यांना विद्युत्संदेशानें हुकूम होतो आणि ते 'शून्य' दृष्टीनें ३०।४० अंशांच्या कोनांतून गोळ्या झाडूं लागतात. हें हिंसाकृत्य कितपत परिणामकारक होतें हें पाहणारीं माणसें दुरून निरीक्षण करीत असतात. परंतु तेच शिपाई जेव्हां शत्रूच्या समोर येतात आणि समोरासमोर लढूं लागतात त्या वेळीं त्याना खरें 'युद्ध-कारण' कोठें दिसतच नाहीं. कारण दोघेहि आपापल्यापरी केवळ हुकुमाचे बंदे असतात. परंतु ज्या वेळीं एखादा

सोल्जर किंवा पोलीस सत्याग्रहीवर हल्ला करतो त्या वेळीं असें होत नाहीं. सर्व नियमांचें पालन करणारा, सर्व हल्ले शांतपणें स्वीकारणारा, आनंदी वृत्ति टिकविणारा, आणि अत्याचार चालू असतांना शेवटपर्यंत आपलें मन अविचलित ठेवणारा असा सत्याग्रही पोलिसासमोर असतो. त्यावर हल्ला करतांना त्या पोलिसास खरोखरच आपल्या कृत्याबद्दल लाज वाटूं लागते. त्याच्या मनास यातना होतात आणि निःशस्त्र, अप्रतिकारी, निर्विकारी अशा लोकांवर हल्ला करण्याचें काम आपल्याकडे कां आलें याचें त्यास पदोपदीं आश्चर्य वाटत असतें !

या मनःस्थितींतच १९३०-३२ सालच्या चळवळींत शिपायांनीं शेवटीं गोळीबार करण्याचें नाकारलें आणि त्याबद्दल त्यांना १४ वर्षांची शिक्षा झाली !

## सत्याग्रहाचा दुहेरी परिणाम

यावरून असें लक्ष्यांत येतें कीं, सत्याग्रह हें एक युद्धच आहे. युद्धाप्रमाणेंच, प्रतिपक्षाचा कडवेपणा आणि धैर्य हीं विचलित करण्याची ही एक पद्धति आहे. ज्या क्षणीं शिपायांस आपल्या कृत्याच्या न्यायीपणाबद्दल शंका येऊं लागते त्याच क्षणीं त्यांच्यांतील शौर्य संपुष्टांत येतें. त्याची इच्छाशक्ति लटपटूं लागली कीं, त्याचें कार्यहि कोलमडतें. उलटपक्षीं, सत्याग्रही सैनिकावर याच्या उलट परिणाम होतो. तो हल्ले सहन करतो, मूर्च्छित होतो, पुन्हां जागृत होतो; पुन्हां हल्ल्यास तोंड देतो आणि पुन्हां मूर्च्छित होतो ! परंतु प्रत्येक वेळीं मूर्च्छेतून जागृत होतांना त्यास आपल्या धैर्याची जास्त जास्त जाणीव होत जाते. आपण दाखवीत असलेल्या सहनशक्तीचें स्वरूप त्यास स्पष्ट कळत जातें. आपल्या शेजारच्या माणसास आपल्यामुळें धैर्य येत आहे हें त्यास कळूं लागतें आणि यश हळूहळू जवळ येत असल्याचेंहि त्याला दिसूं लागतें. यातनांचा स्वेच्छेनें स्वीकार करणारे सत्याग्रही त्या यातनांतच अतिशय उच्च दर्जाचें समाधान अनुभवतात. उलट त्यांना यातना देणाऱ्यांना त्या यातनांचें ‘ दृश्य ’ असह्य होत जातें. अशा रीतीनें त्या शिपायांचें धैर्य खचे कीं, त्यांची विवेकबुद्धि जागृत होते आणि इतका वेळ फील्ड मार्शलचा हुकूम मानण्याची संवय झालेला तो सैनिक त्या हुकुमाविषयींच फेर विचार करूं

लागतो. हें काम करणें बरोबर आहे कीं नाहीं अशी शंका त्याच्या मनांत येऊं लागते. आपल्या अधिकाऱ्यासंबंधींच्या कर्तव्याऐवजीं, त्याच्यासमोर असलेल्या माणसाविषयीं, त्या सत्याग्रहीसंबंधीं आपलें कर्तव्य कोणतें या विचारानें त्याचें मन भारून जातें. सत्य आणि न्याय यांविषयीं त्याचे विचार प्रभावी ठरतात. सत्याग्रही सैनिकाच्या विजयाची तेथें सुरुवात होते. अंतिम विजय मिळविण्यासाठीं सत्याग्रही वीरानें कमालीची शिस्त राखली कीं झालें! मग विजय तेथें ठेवलेलाच आहे!!

सामुदायिक कायदेभंग आणि सत्याग्रह यांच्या पूर्वतयारीचा एक भाग म्हणून अतिशय कडक शिस्त आणि मानसिक व नैतिक शिक्षण यांची अतिशय आवश्यकता आहे. वैयक्तिक विवेकबुद्धि व लोकमत यांना चेतना देणें हें मुख्य कार्य आहे आणि ती एकदां जागृत झाली कीं, जे गुन्हेगारी थांबवूं शकत नाहींत, फक्त शिक्षा ठोठावण्यापुरतेंच ज्यांचें सामर्थ्य आहे, असे सर्व सरकारी कायदेसुद्धां या जागृत चैतन्यापुढें दुबळे ठरतात. लोकांना असें शिक्षण मिळालें, त्यांच्या अंगीं शिस्त बाणली, त्यांचे विचार आणि हेतु हीं नियंत्रित झालीं, चळवळीच्या प्रत्येक वळणावर त्यांना मार्गदर्शन आणि नेतृत्व मिळालें, त्यांचें ध्येय आणि साधनें हीं एकरूप आणि अविभाज्य मानलीं जाऊं लागलीं आणि त्यांचें ध्येय आणि हेतु हीं अत्यंत शुद्ध ठेवण्यांत आलीं कीं, या सर्व घटनांतून कार्याचा एक संघटित घटक आधीं तयार होतो आणि त्या घटकांतून सामर्थ्य, प्रेम आणि सेवा यांचा उगम होतो.

## गांधीजींची सत्याग्रह-पद्धति

सत्याग्रहाचें यंत्र वापरण्याची गांधीजींची पद्धति चपळाईची आणि आकस्मिक अशी आहे. ते अंतःस्फूर्तीनें चळवळ सुरू करतात आणि त्याच स्फूर्तीनें बंदहि करतात. १९३९ च्या एप्रिलमध्यें त्यांनीं राजकोट, त्रावणकोर, हैदराबाद आणि जयपूर येथील सत्याग्रह लढा एकदम स्थगित केला. त्या वेळीं १ एप्रिल १९३९ रोजीं त्यांनीं त्याचा खुलासा केला :

"सत्याग्रहांत अपेक्षाभंग होण्यासारखें किंवा मनाला बोंचण्यासारखें कांहीं नसतें. ध्येय गांठीपर्यंत तो लढा कोणत्या ना कोणत्या तरी स्वरूपांत चालूच राहतो. आपणांस सविनय कायदेभंगांत भाग घ्यावयाचा आहे किंवा या

लढ्याच्या दुसऱ्या एखाद्या स्वरूपांत सामील होण्याची आपणास आज्ञा झाली याची सत्याग्रही कधीं फिकीर करीत नाहीं. किंवा सविनय कायदेभंगांतून त्यास मध्येंच परत येण्याचा हुकूम झाला आणि दुसरें कांहीं कार्य करण्याची आज्ञा झाली तरी त्याची तो खंत बाळगीत नाहीं. माझा अनुभव असा आहे कीं, चळवळ अशी स्थगित करण्याचाहि फायदा होतो. लोक जास्त तयार होतात आणि हिंसेच्या सामर्थ्यावर जास्त यशस्वीपणें ते नियंत्रण गाजवूं शकतात. म्हणून चळवळ स्थगित करतांना, त्यामुळें कांहीं परागति होईल आणि अश्रद्धा माजेल अशी शंकाहि मला कधीं येत नाहीं आणि जर तसें कांहीं झालेंच तर मला त्याचें वाईटहि वाटणार नाहीं. कारण मी त्याचा अर्थ असा करीन कीं, पराभूत झालेल्यांना सत्याग्रह म्हणजे काय हें अद्याप कळलें नाहीं आणि आपण काय करीत आहों हेंच ज्यांना माहीत नाहीं, असे लोक चळवळींतून बाजूस होणेंच चांगलें होतें."

सत्याग्रह स्थगित झाला कीं, लोक एकदम निष्क्रिय होण्याचें कारण नाहीं. कारण लढ्याच्या वेळीं जे लोक विधायक कार्यक्रम पार पाडीत होते त्या विधायक कार्यक्रमांत सत्याग्रही लगेच सामील होतात.

गांधीजी ज्या आत्मबलाच्या जोरावर कार्य करतात तें आत्मबल हवेसारखें सर्वव्यापी आणि विविध प्रकारें आपलें सामर्थ्य प्रकट करणारें आहे. तें सामर्थ्य प्रत्येकास मिळवितां येण्यासारखें आहे. प्रत्येकास फक्त त्याची जाणीव पाहिजे आणि त्याचा उपयोग करण्याचें ज्ञान त्यानें संपादिलें पाहिजे. तें सामर्थ्य एखाद्या कार्यासाठीं नियंत्रित कसें करावें आणि स्वतःवरहि त्याचें नियंत्रण कसें प्रस्थापित करावें हें प्रत्येकानें शिकलें पाहिजे.

या आत्मबलाचा आपण अभ्यास करूं या. त्याच्या घटकांचें आणि मूलतत्त्वांचें ज्ञान करून घेऊं या, म्हणजे आपण लवकरच त्या बलाच्या योजनेंत वाकबगार होऊं. साधा पण परिणामकारक, दिव्य पण व्यवहार्य, उदात्त पण सार्वत्रिक, असा सत्याग्रह पंथ तो हाच. ती एखादी गुप्त शक्ति नाहीं. तें उघड गुपित आहे. ती जादू नाहीं, तें आश्चर्य आहे. तें गूढ नाहीं, तें अद्‌भुत आहे. तो तंत्र नाहीं, मंत्र आहे. तो शोध नाहीं, तें संस्मरण आहे.

# सत्याग्रह आणि युद्ध ४

### अहिंसामय राष्ट्र

गांधीजींच्या अनुयायांना त्यांचे मार्ग चांगले परिचित आहेत. परंतु अहिंसात्मक पद्धतीसंबंधीं त्यांचा युद्धविषयक दृष्टिकोण हा अव्यवहार्य वाटल्यामुळें त्यांच्या अनुयायांना त्यांच्या मार्गानें जाणें कांहींसें कठीण होतें. परंतु गांधीजींच्या या दृष्टिकोणांत अनपेक्षित असा भाग बराच असला तरी त्यांत विसंगत असें कांहीं नाहीं. त्यांनीं युद्धाच्या आरंभीं स्वतःच्या वर्तानें ब्रिटिशांना नैतिक पाठिंब्याचें आश्वासन दिलें आणि काँग्रेसच्या वतीनें बोलण्याचें नाकारलें. काँग्रेसनें स्वतःच पुढें निश्चित भूमिका ठरविली आणि १९४० जुलैंत झालेल्या वर्किंग कमिटीच्या बैठकींत असें ठरलें कीं, सरकारनें राष्ट्रीय सरकार स्थापन केलें आणि स्वातंत्र्याची घोषणा केली तर काँग्रेस युद्धकार्यांत सहकार्य करण्यास तयार आहे. त्या वेळीं गांधीजींना आपलें नेतृत्व स्थगित करणें आवश्यक वाटलें. वर्किंग कमिटीनें त्यांना त्याप्रमाणें त्यांच्या अपेक्षेपेक्षांहि लवकर मोकळें केलें. स्वराज्यप्राप्तीपुरती अहिंसेची प्रतिज्ञा काँग्रेसनें कायम ठेविली खरी, परंतु अहिंसात्मक राष्ट्राची कल्पना मात्र वर्किंग कमिटीस उमगेना.

गांधीजी अहिंसात्मक राष्ट्राचें आपलें ध्येय सोडावयास तयार नव्हते.

त्यांना तो प्रश्न केवळ तात्त्विक वाटत नव्हता. १८७७ सालपासून म्हणजे एक पिढीइतका काळ शस्त्रहीन राहिलेले हिंदी लोक जर पुन्हां शस्त्रधारण करूं लागले, तर त्यांचीं मनें यापुढें आपल्या आणि शत्रूच्या रक्तानें माखलेल्या मार्गाकडेच धांव घेतील. अशा स्थितींत हिंदी लोकांनीं रक्तमय मार्ग स्वीकारावा कीं रक्तशून्य मार्ग स्वीकारावा? असा प्रश्न उत्पन्न झाला होता. हिंदी स्वातंत्र्य ही गांधीजींना वादग्रस्त गोष्ट वाटत नव्हती. मध्यवर्ति राष्ट्रीय सरकार तर डोळ्यांसमोर दिसूं लागलें होतें. गांधीजी सत्तेचा विचारहि करीत नव्हते. सत्तेची संधि गांधीजी घालवीत होते किंवा त्यांनीं घालविली अशी कोणाची कल्पना झाली असेल. परंतु गांधीजींची स्वतःची अशी खात्री होती कीं, जर अहिंसापंथानें सत्ता संपादन करतां आली तर ती हिंसापंथानें टिकवितां येणार नाहीं. ती अहिंसा मार्गा-नेंच टिकवितां आली पाहिजे. एकदां लष्कराचा प्रस्ताव पत्करला कीं, मग लष्कराचीच भाषा प्रभावी ठरते आणि लष्करी तंत्र आणि लष्करी उपाय यांचेंच प्रस्थ माजूं लागतें. याशिवाय आणखी एक बाब आहे. लष्कर तयार करण्याचें काम आणखी २० वर्षे तरी करीत बसावें लागेल. सध्याच ६ हजार लष्करी अधिकारी तयार होत आहेत. आपण त्या अधिकाऱ्यांचें काय करणार आहोंत? परंतु गांधीजींना त्याचीहि चिंता फारशी नव्हती. लष्करी अंमल-दारांचा सामान्य जनतेवर काय परिणाम होईल हाच त्यांच्या मनांतला मुख्य विचार होता!

## गांधीजींचें ध्येय–नैतिक विजय

गांधीजी नेहमीं नैतिक प्रश्नावर आपलें लक्ष केंद्रित करतात आणि नैतिक विजयावरच त्यांची दृष्टि असते. उदाहरणार्थ, जालीयनवाला-बाग प्रकरणांत त्यांनीं जनरल डायरला फांशी देण्याचा आग्रह धरला नाहीं. दंग्यांत जे दुखावले किंवा मरण पावले त्यांच्याबद्दल नुकसानभरपाईचीहि मागणी केली नाहीं. त्यांनीं हिंदुस्थानसरकारकडून फक्त अपराधाची कबूली मागितली. ड्यूक ऑफ कॅनॉटनें ती दिली खरी, परंतु तींत सभ्यतेचा लवलेशहि नव्हता!

गांधी-अर्विन वाटाघाटीच्या वेळींसुद्धां पोलिसांच्या अत्याचाराच्या चौकशीचा आग्रह त्यांनीं सोडून दिला; कारण अशा चौकशीचें लाजिरवाणेपण अर्विन

साहेबांस नको होतें. नैतिक प्रश्नच गांधीजींना जिव्हाळ्याचे वाटतात. व्हाइसरॉयशीं ते नैतिक प्रश्नांसंबंधीं चर्चा करतात आणि नैतिक प्रश्नांसाठींच ते जरूर पडल्यास लढा करण्याचा आदेश जनतेस देतात. अशा नैतिक प्रश्नांच्या विजयांतच, स्वराज्याच्या लढ्याच्या विजयाचा समावेश होतो. कारण मूळचा नैतिक प्रश्न, स्वराज्याच्या मुख्य प्रश्नाचा समावेश करण्याइतका व्यापक असतो.

अहिंसा हें अभावात्मक सामर्थ्य नाहीं. तें एक प्रत्यक्ष बल आहे. ऐक्य-प्रसारासाठीं तें एक प्रभावी हत्यार आहे. प्रेमभावनेच्या प्रसाराचें व पाशवी बलावर आत्मबलाचा विजय संपादण्याचें तें एक हत्यार आहे. त्यामुळें सत्याग्रह-पथकांत सशक्त सैनिकांपेक्षां जे आत्मिक बलानें श्रेष्ठ आहेत अशा सैनिकांचीं नांवें दाखल करावयाचीं असतात. सत्याग्रहास शत्रूच्या रक्ताची तहान नाहीं. उलट स्वतःचें रक्त सांडून शत्रूच्या रक्ताची तहान शमविणें हा सत्याग्रहाचा मार्ग आहे! प्रतिपक्षानें स्वीकृत पक्षाविषयीं बाळगिलेली श्रद्धा सत्याग्रहानें डळमळूं लागते व त्याला आश्चर्याचे धक्के बसूं लागतात. जीविताचीं त्याचीं ऐहिक मूल्यें खोटीं ठरतात आणि त्याच्या ठिकाणीं निर्माणक्षम नैतिक सामर्थ्याचा उद्भव होतो. सत्याग्रह ही भीरुता नव्हे, तें धैर्य आहे. तें आळशीपण नव्हे तर व्यापक सहानुभूति संपादन करणारें तें कर्तृत्व आहे. सत्याग्रह म्हणजे मूठभर सुसंस्कृतांचें संरक्षण नव्हे तर बहुजनसमाजाची ती वंशपरंपरागत संपत्ति आहे. तो कांहीं नवा शोध नाहीं. जुन्या तत्त्वज्ञानाचें तें संशोधन आहे. त्याला राजकारण हें एक भोंगळ नांव आहे. नव्या कार्यक्षेत्रांत जुन्या तत्त्वज्ञानाचा उपयोग करण्याचें तें एक नवें शास्त्र आणि अभिनव कला आहे.

## जनतेचें युद्धकार्य

सैनिक रणक्षेत्रांत ज्या वेळीं विजयावर नजर ठेवून लढत असतो त्या वेळीं लढाऊ पथकाचें अन्नवस्त्र आणि शस्त्रसामग्री यांचा पुरवठा करण्याचें का जनताच करीत असते. त्याचप्रमाणें आपण सामान्य लोक जे आहोंत त्यांनीं आपल्या सत्याग्रहयुद्धांत युद्धोपयोगी साहित्याचा पुरवठा करण्याचें काम करीत राहिलें पाहिजे. आपण जातिभेद आणि वंशभेद विसरून फक्त राष्ट्र या एकाच भावनेची जाणीव ठेवूं या. अस्पृश्यता नाहींशी करून मद्यपानाचें

निर्मूलन करूं या. ब्रिटिशांत कितीहि व्यंगें असलीं तरी आपण त्यांच्यावर प्रेम करावयास शिकूं या. कारण किती केलें तरी, शेवटीं ते आपले अतिथीच आहेत. आपल्या औदार्याचा त्यांनीं गैरफायदा घेतला असला तरी यजमान या नात्यानें त्यांचें रक्षण करण्याची आपल्यावर जबाबदारी आहे.

प्रत्येक युद्धांत आपले युद्धहेतु ठरलेले असतात. युद्धाचा सर्वसाधारण हेतु विजय हाच. आपले युद्धहेतु निराळे आहेत. ते तत्त्वावर उभारलेले आहेत. ज्या तत्त्वावर शांततेची पुनर्रचना करावयाची अशीं तीं तत्त्वें आहेत. इतर युद्धांत हेतूंमुळें युद्धाविषयीं चेतना मिळते. या युद्धांत हेतूंनींच युद्धाचें पर्यवसान ठरविलें जातें. आपल्या युद्धांत सत्याग्रह आणि विधायक कार्यक्रम हीं मुख्य तत्त्वें आहेत. या तत्त्वांसाठीं चाललेल्या युद्धांत प्रत्यक्ष सैनिक थोडे आहेत, विधायक कार्यकर्ते पुष्कळ आहेत. म्हणून गांधीजींनीं सत्याग्रह प्रथम सामुदायिक न करतां वैयक्तिक स्वरूपाची त्याला आधीं मर्यादा घातली आणि ती मर्यादासुद्धां दोनच व्यक्तींचा समावेश करणारी होती. परंतु बहुसंख्य जनतेनें शांततेची पूर्व तयारी करावी असा गांधीजींचा आदेश आहे. त्यासाठीं त्यांनीं सूत कातावें, विणावें, तांदुळ भरडावेत, पीठ दळावें, तेल गाळावें आणि अशींच इतर कामें करावींत. हातसडींचा तांदूळ, हातानें दळलेलें दळण हीं दोन कोटी लोकांच्या पोटाची सोय करतील. हातमागानें १२ कोटींना काम मिळेल. ग्रामोद्योगानें बेकारीचें निवारण होईल. ब्रिटिश राज्य संपुष्टांत आलें तरी मँचेस्टर, लिव्हरपूल आणि नॉटिंगहॅम यांची पकड नाहींशी होणार नाहीं. ती दूर करण्यासाठीं स्वतंत्र हिंदुस्थान, स्वयंपूर्ण, स्वयंसिद्ध आणि स्वाभिमानी असला पाहिजे. गांधीपद्धतीच्या सत्याग्रहानें आत्मा बंधमुक्त होतो. त्या विमुक्त आत्म्यास आच्छादन पुरविणें, त्यास ‘ शरीराची ’ जोड मिळवून देणें हाच विधायक कार्यक्रम. सत्याग्रहाचेंच तें एक उपांग आहे.

सत्याग्रहाचा प्रयोग गेल्या वीस वर्षें आपण करीत आहोंत. आतां हा शेवटचा प्रयोग चालू आहे. या वेळीं आपण थोडी जास्त श्रद्धा ठेवूं या, म्हणजे हें एक तत्त्वज्ञान जगांत प्रस्थापित होण्यासाठीं उदय पावलें आहे असें सिद्ध होईल आणि हिंसा आणि क्रौर्य यांपासून मानवजातीची मुक्तता करणारें एक शास्त्र आणि कला हीं अवतीर्ण झाल्याचें जगास कळेल.

सत्याग्रह हें एक धर्मयुद्ध आहे. धर्मयुद्धांत दोन्ही पक्षांचे सेनापति

युद्धापूर्वी एकमेकांच्या भेटी घेतात आणि आपापल्या योजना सांगतात. तसेंच सत्याग्रहयुद्धांतहि होतें. आपण तर आपल्या बाजूनें त्याच्याहि पलीकडे मजल मारली आहे. आपल्या विरोधकांस आपण केवळ आपलें सामर्थ्यच दाखविलें नाहीं तर आपलें दुबळेपणहि त्यास दाखवून ठेविलें आहे! भीष्मानें अशाच रीतीनें अर्जुनास आपलीं रहस्यें सांगितलीं होतीं. आपले डावपेंच अगदीं खुले आहेत. आपल्या मागण्या अगदीं साध्या आहेत.

या सत्याग्रहाचा आणखी एक विशेष असा कीं, त्याची आकांक्षा फार भव्य आणि आरंभ मात्र अगदीं क्षुल्लक आहे. तरी महात्माजींना आशा आहे कीं, या सत्याग्रहास चांगलीं फळें येतील. 'लहान बीजापासून ते मोठ्या फळाची अपेक्षा कशी करतात'? असें कांहीं विचारतील. पण हा प्रश्नच अगदीं विचित्र नाहीं का? बीज हें केव्हांहि लहानच असणार आणि फळ हें मोठेंच असावयाचें. त्यासाठीं रोपट्याला पाणी घातलें पाहिजे. शेताची मशागत केली पाहिजे. मुळाशीं खत टाकलें पाहिजे. यासाठींच गांधीजींना विधायक कार्यक्रम पाहिजे. तो कार्यक्रम सर्व राष्ट्रानें खऱ्या जिव्हाळ्यानें आणि दुर्दम्य उत्साहानें हातीं घेतला पाहिजे. खडकाळ जमिनीवर पडलेलें बी जीव धरीत नाहीं. खताचा पुरवठा नसलेलें रोपटें खुरटतें. परंतु मशागतीचीं हीं सगळीं संधानें आपण संभाळूं तेव्हां आपल्या श्रमाचें सार्थक होईल आणि आपल्या आशा फलद्रूप होतील.

## सत्याग्रहाचे कांहीं नियम

१९३० च्या मीठसत्याग्रहाच्या मोहिमेच्या वेळीं गांधीजींनीं कांहीं नियम तयार केले त्या नियमांवरून सत्याग्रहाच्या शिस्तीचें स्वरूप चांगलें कळेल. त्यांतील कांहीं नियम असे होतेः—

"सत्याग्रहाचा शब्दशः अर्थ सत्याचा आग्रह असा आहे. या आग्रहानें सत्याग्रहीस अतुल सामर्थ्य प्राप्त होतें. सत्याग्रह या शब्दानें सामर्थ्य सूचित होतें. सत्याग्रह हा आईबाप, पत्नी किंवा आपलीं मुलें यांच्याप्रमाणेंच अधिकारी, नागरिकबंधु, इतकेंच काय पण सर्व जगाविरुद्ध करतां येईल.

असें विश्वव्यापक सामर्थ्य आप्त आणि परका, तरुण आणि वृद्ध, स्त्री आणि पुरुष, मित्र आणि शत्रु यांत भेद करीत नाहीं. सत्याग्रहाच्या प्रयोगांतील

शक्ति ही कधींहि शारीरिक असूं शकत नाहीं. त्यांत हिंसेस मुळींच जागा नाहीं. विश्वव्यापकरीत्या उपयोगांत आणावयाच्या या सामर्थ्याचें एकच लक्षण असतें. तें म्हणजे अहिंसा किंवा प्रेम. दुसऱ्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे तें आत्मबल आहे.

प्रेम दुसऱ्यास भस्मसात् करीत नाहीं. तें स्वतःच भस्मसात् होतें. म्हणून सत्याग्रही–सविनय कायदेभंग करणारा–वेळ पडल्यास मृत्यु येईपर्यंतहि क्लेश सहन करीत राहील.

यावरून असें अनुमान निघतें कीं, प्रचलित सत्तेचें सर्व क्षेत्र व्यापण्याचा सत्याग्रही पराकाष्टेचा प्रयत्न करीत असेल तरी एकाहि इंग्लिश माणसास तो विचार, उच्चार किंवा आचार या बाबतींत कधींहि दुखविणार नाहीं. या अवाश्यक तेवढ्या त्रुटित स्पष्टीकरणावरून पुढील नियमांचें रहस्य वाचकांच्या लक्ष्यांत येईल.

## १ वैयक्तिक नियम

१ सत्याग्रही क्रोधास मुळींच थारा देणार नाहीं.

२ तो विरोधकाचा राग सहन करील.

३ असें करीत असतां तो प्रतिपक्षाचे हल्ले सहन करील. त्याचा कधींहि प्रतिकार करणार नाहीं. परंतु शिक्षा किंवा तत्सम भीतीनें तो प्रतिपक्षानें रागाच्या भरांत दिलेली कोणतीहि आज्ञा, मानणार नाहीं.

४ जेव्हां एखादा अधिकारी सविनय कायदेभंग करणारास अटक करूं लागेल त्या वेळीं सत्याग्रही स्वतःच कैदेस तयार होईल. त्या वेळीं तो आपली मालमत्ता जप्त होत असतां आणि दूर नेली जात असतां तिचा बचाव करण्याचा प्रयत्न करणार नाहीं.

५ जर सत्याग्रहीच्या ताब्यांत विश्वस्त या नात्यानें कांहीं मालमत्ता असेल तर ती विरोधकापुढें हजर करण्याचें तो साफ नाकारील. मग या प्रयत्नांत त्यास प्राणाची किंमत द्यावी लागली तरी चालेल. तो प्रतिकार मात्र कधींहि करणार नाहीं.

६ प्रतिकारांत शपथ घेणें आणि शाप देणें यांचा समावेश होतो. सत्याग्रही या गोष्टी कधीं करणार नाहीं.

७ सत्याग्रही विरोधकाचा कधींहि अपमान करणार नाहीं आणि अहिंसा-वृत्तीस विसंगत अशा घोषणा त्यांच्या तोंडून निघणार नाहींत; तशा स्वरूपाच्या निदर्शनांतहि तो भाग घेणार नाही.

८ सत्याग्रही 'युनियन जॅकला' प्रणाम करणार नाहीं. तसेंच तो त्या ध्वजाचा किंवा ध्वजरक्षकाचा–मग तो हिंदी असा वा इंग्रज असो–अपमानहि करणार नाहीं.

९ सत्याग्रहाचा झगडा चालू असतां, जर एखाद्यानें एखाद्या अधिकाऱ्याचा अपमान केला किंवा कोणीं त्याच्यावर हल्ला केला तर सत्याग्रही अशा अपमानापासून किंवा हल्ल्यापासून त्या अधिकाऱ्याचें रक्षण करण्यासाठीं पुढें होईल. या कामीं तो आपला जीवहि धोक्यांत घालील.

१० प्रत्येक सत्याग्रही तुरुंगाधिकाऱ्याशीं योग्य अशीच वागणूक ठेवील आणि स्वाभिमानास विरोधी नसतील तेवढेच तुरुंगांतील शिस्तीचे सर्व नियम पाळील. तो अधिकाऱ्यास शिस्तीप्रमाणें प्रणाम करील. परंतु तो मानहानि-कारक अशी कोणतीहि कृति करणार नाहीं आणि सरकारच्या नांवानें जयघोष करण्याचें साफ नाकारील.

११ शरीर योग्य स्थितींत ठेवण्यास ज्या सोई आवश्यक नसतील अशा सोईची तो मागणी करणार नाहीं. आपल्या शारीरिक वा आत्मिक धारणेस आवश्यक अशाच सोई मागण्याचा त्यास हक्क आहे.

१२ ज्या सोई न मिळाल्यानें स्वाभिमानास धक्का पोहोंचत नाहीं अशा सोईसाठीं सत्याग्रही अन्नत्याग करणार नाहीं.

घटक या दृष्टीनें—

१३ सत्याग्रही आपल्या पथकाच्या पुढाऱ्याच्या सर्व आज्ञा आनंदानें पाळील. मग त्या त्यास आवडोत वा न आवडोत.

१४ केलेल्या आज्ञा अपमानास्पद, वैरनिदर्शक किंवा मूर्खपणाच्या वाटल्या तरी सत्याग्रही आधीं त्या पार पाडील आणि नंतर त्याविषयीं वरिष्ठाकडे दाद मागेल. पथकांत दाखल होण्यापूर्वी तें आपणास पसंत आहे कीं नाहीं

नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत

हें ठरविण्याचें त्यास स्वातंत्र्य आहे. परंतु एकदां पथकांत दाखल झाल्यावर त्या पथकाची शिस्त सुखद वा दुःखद असली तरी ती पाळणें हें त्याचें कर्तव्य आहे. पथकाची सामुदायिक शक्ति अयोग्य किंवा अनैतिक हेतूनें खर्च होत आहे असें सत्याग्रहीस वाटत असलें तर त्या पथकाशीं आपला संबंध सोडून देण्याचा सत्याग्रहीस अधिकार आहे. परंतु पथकांत असे तोंपर्यंत शिस्तभंग करण्याचा त्यास अधिकार नाहीं.

१५ आपल्या आश्रितांचें पोषण पथकाकडून व्हावें अशी सत्याग्रहीस अपेक्षा करतां येणार नाहीं. अशी कांहीं सोय झाली तर तो केवळ अपवाद होय. सत्याग्रही आपल्या आश्रितांचा भार परमेश्वरावर सोंपवितो. साध्या युद्धांतसुद्धां जेथें हजारों लोक दाखल होतात, तेथेंहि अशी सोय होऊं शकत नाहीं. सत्याग्रहांत तर तें त्या मानानें फारच अशक्य आहे. पण सर्वसाधारण अनुभव असा आहे कीं, अशा प्रसंगीं कोणीहि उपाशी मरत नाहीं.

### जातीय दंग्याच्या वेळीं—

१६ कोणताहि सत्याग्रही जाणूनबुजून जातीय दंग्यास कारण होणार नाहीं.

१७ अशा दंग्याचा स्फोट झाला असतां, सत्याग्रही पक्षातीत राहील. परंतु जो पक्ष प्रकटपणें सत्याच्या बाजूला असेल त्यास तो साहाय्य करील. हिंदु या नात्यानें तो मुसलमान व इतर लोक यांच्याविषयीं उदार बुद्धि बाळगील आणि हिंदूंच्या हल्ल्यापासून अहिंदूंचें रक्षण करण्यासाठीं तो स्वतःचें बलिदान करण्यास सिद्ध होईल. जर विरुद्ध बाजूनें हल्ला झाला तर, तर तो परतावण्याच्या कृत्यांत सत्याग्रही भाग घेणार नाहीं. पण हिंदूंचें रक्षण करतांना तो आपले प्राण अर्पण करील.

१८ जातीय भांडणास कारण होणारे प्रसंग टाळण्याचा तो आटोकाट प्रयत्न करील.

१९ सत्याग्रहींची मिरवणूक निघाली तर कोणत्याहि जातीच्या भावना दुखविणारें कृत्य सत्याग्रही करणार नाहीं आणि अशा भावना दुखावण्याचा संभव ज्या मिरवणुकींत आहे त्या मिरवणुकींत सत्याग्रही भाग घेणार नाहीं.

विधायक कार्यक्रमांत भाग घेणारे हे सविनय कायदेभंग करणारांइतकेच उपयोगी आहेत. ते आपल्या सश्रद्ध आणि निष्ठापूर्ण कार्यानें सविनय कायदेभंगाच्या कार्यास साहाय्य करतात. साशंक मनोवृत्तीनें सविनय कायदेभंग करणाऱ्या सैनिकांपेक्षां विधायक कार्यकर्त्यांचें कार्यास जास्त साहाय्य होतें. गांधीजींनीं आणखी असें निक्षून सांगितलें आहे कीं, विधायक कार्यक्रम सर्व राष्ट्रांत मोठ्या प्रमाणावर सुरू झाला आणि त्याचा सविनय कायदेभंगाच्या चळवळीस आधार मिळाला तर आपलें ध्येय आपणांस गांठतां येईल.

पाने १८३
८/८/२३
शान्त १५३
३६, भवानी पेठ

# सत्याग्रहाचें तंत्र ५

गांधीजी वारंवार म्हणतात कीं, मला अनुयायांचें ओझें झालें आहे. कारागृहवास पत्करणारे किंवा संघाचे सभासद होणारे लोक संख्येनें कमीच असावेत असें त्यांना वाटतें. निवडक आणि मोजक्या लोकांविषयीं गांधीजींचा कटाक्ष असतो. ते निवडक मूठभर लोक पूर्ण ब्रह्मचर्यपालन करणारे, दरिद्र्याशीं जमवून घेणारे, सत्याच्या मार्गानेंच जाणारे आणि निर्भय वृत्तीची वाढ करणारे असे असावेत.

आत्मसंशोधनाच्या नादांत गांधीजी शारीरिक जीवनास विसरत नाहींत. शरीरमाद्यं खलु धर्मसाधनम् हें जुनें सूत्र गांधीजी आजहि मानतात. यासाठीं गरीबांचें अन्न आणि वस्त्र हीं त्यांनीं आपल्या उद्दिष्टांत सामील केलीं. त्यांच्या अर्थशास्त्राची ती गुरुकिल्ली आहे. गरीबांच्या दर्जापर्यंत गांधीजींना मध्यम वर्गीयांची राहणी आणावयाची आहे. कारण कांहीं लोकांचें राहणीचें मान वाढवावें आणि असंख्यांचें खालीं आणावें किंवा अगदीं शून्यवत् करावें हें त्यांना संमत नाहीं. शरीरासाठीं अगदीं मामुली, पोटापुरती तरतूद करावी आणि आत्म्यास परमोच्च आनंदाचा लाभ मिळवून द्यावा यासाठींच गांधीजींचे अविश्रांत श्रम आहेत.

विवेकशून्य माणसांनीं आक्रमण केलें किंवा आपल्यावर सत्ता स्थापन केली

तर त्या प्रसंगीं सत्याग्रहीचा मार्ग म्हणजे त्या स्थलाचा तात्पुरता किंवा कायमचा त्याग करणें. नालायक राजाच्या राज्यांतून बाहेर पडलेल्या लोकांचीं उदाहरणें प्राचीन काळींहि आढळतात. गांधीजींनीं दलितांना हाच उपदेश केला आहे. १९२८ सालच्या करबंदीच्या चळवळीच्या वेळीं बारडोली आणि आनंद तालुक्यांतील लोकांनीं आपला प्रांत सोडून बडोद्याच्या चतुःसीमेंत असाच मुक्काम ठोकला होता.

## गांधीजींची सेवावृत्ति

गांधीजींच्या सेवावृत्तींत अधोगतीची कोणतीहि भावना नसते; मानवी जीवनाच्या व्यापक भूमिकेशीं स्वतः समरस होणें आणि आपलें जीवित मानवतेशीं एकरूप करणें, ही त्यांत वृत्ति असते. अखिल मानव्याचा आपण केवळ एक भाग आहोंत अशी त्यांची भावना आहे; आणि त्यामुळें समाजांत उद्भवणाऱ्या विविध संकटप्रसंगीं ते सेवेसाठीं उपस्थित होतात. कधीं एकादा महापुराचा प्रसंग असेल, किंवा कधीं धरणीकंपाचें संकट उत्पन्न झालें असेल; कधीं एकादी पतित भगिनी त्यांचें लक्ष वेधून घेईल. कधीं एकादा हिंदु विणकरी किंवा एकादा मुसलमान कोष्टी त्यांचें अंतःकरण खेंचून घेतो. एकाद्या वेळीं सुशिक्षित माणसाकडेहि त्यांचें लक्ष जाईल किंवा दुसऱ्या क्षणीं मागासलेल्या लोकांना दऱ्याखोऱ्यांमध्यें पिटाळणाऱ्या एकाद्या संस्थानाकडे ते लक्ष पुरवितील. पददलित अस्पृश्य आणि सवर्ण हिंदु हे दोघेहि सारखेच भुकेनें गांजलेले आणि संकटांनीं ग्रस्त झालेले आहेत. म्हणून त्या दोघांविषयींहि गांधीजींच्या मनांत दया उत्पन्न होते. या विविध व्यक्तींपैकीं प्रत्येकास त्यांनीं आपली सेवा पोंचविली आहे. कोणत्याहि दुःखिताचा जणूं काय सेवेचा हक्कच गांधीजींवरती आहे. यासंबंधीं त्यांनीं नुकताच एक प्रसंग सांगितला. तो अतिशय उद्बोधक आहे. एक महारोगी सेवाग्रामच्या आश्रमांत आश्रयासाठीं आला होता; गांधीजींनीं त्याची तेथें राहण्याची सोय तर केलीच, परंतु त्याला अहिंसेच्या योजनेंत स्वराज्याचें कार्य करण्यासाठीं कांहीं कामहि पुरवावें अशीहि त्यांना तळमळ आहे. कारण स्वराज्याच्या चळवळींत लष्कर आणि लष्करी साहित्य हीं पूर्णपणें नाहींशीं करावयाचीं आहेत; तेथें महारोग्यासहि काम मिळणार आहे. शांतिदलामध्यें तो स्वतः सामील होईल, आणि वेळ

पडल्यास, बंदुकीची गोळी स्वीकारूनहि आपल्या मातृभूमीची सेवा करण्यास तो सिद्ध होईल.

ज्या वेळीं शक्ति सत्यावर अधिकार गाजविते, त्या वेळीं त्याचा अर्थ असा होतो कीं, वरिष्ठ प्रकारचें आधिभौतिक सामर्थ्य भांडवलवाल्यांच्या हित-संबंधाचें संरक्षण करण्यासाठीं पुढें येत आहे. अशा स्थितींत सत्य ज्या वेळीं सत्तेला आह्वान देतें, त्या वेळीं तें आह्वान वस्तुतः या भांडवलवाल्यांनाच उद्देशून असतें. गांधीजींचें सर्व जीवन अशा तऱ्हेच्या आह्वानांनींच भरलें आहे. दक्षिण आफ्रिकेंतील श्वेतवर्णीय, चंपारण्यांतील मळेवाले, खैरा प्रांतांतील नोकरशाही, बोरसद येथील पोलीस, अहमदाबादचे गिरणीवाले, हिंदूंमधील सवर्णीय आणि हिंदुस्थानांतील ब्रिटिश साम्राज्यशाही या सर्वांना महात्माजींनीं वेळोवेळीं आह्वानें दिलीं आहेत. ह्यामुळें त्यांच्या कार्यक्रमांत कोणी ना कोणी तरी, चळवळीच्या कोणत्या तरी क्षणीं दुखावला जातो. विद्यार्थी, प्रोफेसर, वकील, डॉक्टर, सार्वजनिक अधिकारी, दारूचा मक्तेदार, भांडवलवाला, सनातनी, व्यापारी आणि एकादा अरेरावहि त्यांच्या तडाख्यांत सांपडतो. या सर्वांना त्यांनीं दिलेलीं आह्वानें आज पूर्णपणें समर्थनीय ठरलीं आहेत; इतकेंच नव्हे, तर तीं यशस्वीहि झालीं आहेत. कारण त्या सर्व प्रसंगीं दुःखितांचीं दुःखें हीं थोड्याबहुत प्रमाणांत दूर झालीं आहेत.

### भाग्यवान् ध्येयवादी

जवळ जवळ सर्व ध्येयवादी लोकांना समाज आरंभीं वेडसर आणि विचित्र असेंच ठरवीत असतो. ते आपल्या काळाच्या पुढें असतात. आणि त्यामुळें त्यांना नेहमीं बंडखोर म्हणून समाजाकडून देहांताचें शासन होतें, व ते हुतात्मे ठरतात. सर्व लोक त्यांच्याकडे उपहासानें पाहत असतात, परंतु लवकरच त्यांच्या पुढारीपणाला समाजाकडून मान्यता मिळते. गांधीजींच्या बाबतींत निराळाच प्रकार झाला आहे. सॉक्रेटिसाप्रमाणें त्यांना विषाचा पेला घ्यावा लागला नाहीं; त्यांना फांसावरतीं चढावें लागलें नाहीं; किंवा ब्रूनो किंवा ॲरिस्टॉटल् या तत्त्वज्ञांप्रमाणें त्यांच्या नशीबीं अनन्वित छळ आले नाहींत. त्यांचें हें विशेष भाग्य आहे कीं, जगांतील श्रेष्ठ उपदेशक अशी मान्यता त्यांना मिळाली; आणि आपल्या योजना यशस्वी करून आपण

दिलेलीं आश्वसनें आपल्या हयातींतच पूर्ण करण्याची कर्तबगारी त्यांनीं करून दाखविली. ध्येयवादी माणसाच्या दूरगामी, सूक्ष्म दृष्टीखेरीज कोणतींहि मोठीं कार्यें सिद्ध होत नाहींत. ध्येयवादी आणि प्रवक्ते यांचा पंथ हा नवे विचार, नवीं ध्येयें, आचरणाचे नवे संकेत या दिशेनें चालू असतो. रूढि आणि स्थितिप्रियता यांनीं बद्ध झालेल्या जगांतून ते आपला मार्ग आक्रमण करीत असतात. आजचे नैतिक संग्राम हे उद्यांचे इतिहास होतात; आणि भविष्यकाळांतील नीतीचे आणि आचरणाचे संकेत त्या संग्रामांतूनच सिद्ध होतात.

प्रत्येक युग हें एक प्रकारचें स्थित्यंतरच असतें. परंतु आपल्या युगाचा हा विशेष आहे कीं, आपली श्रद्धा आणि आचरण यांच्या मूलभूत कल्पनाच स्थित्यंतर पावत आहेत. माणसाचें अंतःकरण हें शून्यवत् झालें आहे, आणि त्याच्या भकास मनामध्यें षड्रिपूंनीं आपला विजय स्थापन केला आहे. गांधीजींचा अहिंसावाद हा निःसंशय एक प्रयोगच आहे. आपल्या आत्मचरित्रास त्यांनीं सत्याचे प्रयोग असेंच म्हटलें आहे; परंतु आपण हें लक्ष्यांत ठेवलें पाहिजे कीं, ज्या वेळेला नीतितत्त्वें सत्य असतात, त्या वेळीं तीं मूलतः अनुभवावरूनच निघालेलीं अशीं सर्वसाधारण अनुमानें असतात.

आपलें आजचें जीवित हें अनेक बाबतींत विस्कळित झालें आहे. आपल्या न्यायमंदिरांत असत्यानें अधिष्ठान मिळविलें आहे. राजकारण हें, आजपर्यंत धर्मानें ज्या वृत्तीचा निषेध केला, त्या वृत्तीचेंच समर्थन करीत आहे. ती वृत्ति म्हणजे प्रेम आणि युद्ध या बाबतींत जें जें कांहीं होतें, तें तें शुभच मानावें. नीतितत्त्वांतील शाश्वत असा भाग फक्त कांहीं बाबतींत आणि कांहीं प्रसंगीं लक्ष्यांत घेतला जातो. इतर वेळीं त्याचा कोठें उल्लेखहि होत नाहीं. हें असत्य गांधीजींनीं चव्हाट्यावर आणलें आहे. जीवित हें एकरूप आणि अविभाज्य आहे असें ते मानतात. नीतितत्त्वें हीं लवचीक असूंच शकत नाहींत; तीं निश्चित ठरलेलीं असतात. सद्गुण आणि दुर्गुण हीं परस्परावलंबी नाहींत, तीं स्वयंसिद्ध आहेत. सत्य हें जीविताच्या अनेक प्रसंगांतून डोकावत असतें. तें कधींहि एकदम सूर्योदय व्हावा, त्यासारखें प्रकट होत नाहीं. या दृष्टीनें एक नवी श्रद्धा आणि नवें तत्त्वज्ञान गांधीजींनीं प्रस्थापित केलें आहे. तें तत्त्वज्ञान, राजकारण आणि धर्म, धर्म आणि नीति, नीति आणि सामाजिक

ऋण, सामाजिक ऋण आणि सदसद्विवेक बुद्धि यांच्यांतील भेद नाहींसे करणारें आहे. गांधीजींचा सर्व लढा तावडतोब मिळणारें सुख आणि चिरकाल टिकणारें परंतु दीर्घ कालानंतर प्राप्त होणारें कल्याण ह्या दोहोंमधील द्वंद्वावर उभारला आहे.

ज्याला समतोल जीवन असें आपणांस म्हणतां येईल त्या प्रकारच्या जीवनाचे महात्माजी हे प्रवर्तक आहेत. त्या जीवनांत विवेकाचें बल, भावनेचें सामर्थ्य आणि इच्छाशक्ति यांचें एक संवादी स्वरूप तयार झालेलें असतें. अशा जीवनांत भावना ज्याचा तिरस्कार करतात त्यास विवेक मंजुरी देत नाहीं आणि भावनांना ज्याची तीव्र ओढ लागते, त्यास विवेकाकडून प्रतिकार होत नाहीं. विवेक आणि भावना यांच्या संयुक्त आदेशाप्रमाणें इच्छाशक्ति कार्य करीत असते.

नैतिक अत्याचाराचा परिणाम त्या त्या स्थलापुरताच मर्यादित असतो असा भ्रम गांधीजींच्या मनांत कधींच नसतो. तसेंच राष्ट्राच्या प्रवृत्तीस विसंगत असें कोणतेंहि तत्त्व त्या राष्ट्राच्या वैभवास वा शांततेस सुसंगत असूं शकत नाहीं अशी गांधीजींची खात्री आहे.

## सत्याग्रहाचे खुले डावपेच

वीस वर्षांपूर्वी प्रो. गिल्बर्ट मरे यांनीं असें लिहिलें कीं,

" जो मनुष्य वासनात्मक सुखांची पर्वाच करीत नाहीं; सुख, कीर्ति, वा वैभव यांचा ज्यास फिकीर नाहीं; स्वतःस जें सत्य वाटतें त्या सत्याप्रमाणें आचरण करण्याचा ज्यानें निश्चय केला आहे, अशा माणसाशीं जपूनच वागा. तो मोठा भयंकर शत्रु आहे. कारण जें तुम्ही केव्हांहि जिंकूं शकाल असें काय तें त्याचें शरीर आहे. त्याच्या शरीरापेक्षां त्याचा आत्मा कितीतरी श्रेष्ठ आहे. "

यासाठींच गांधीजी आपले बेत कधींच गुप्त ठेवीत नाहींत. सत्य आणि अहिंसा यांवर उभारलेली योजना नेहमीं प्रगटच असणार. गुप्ततेशीं त्या योजनेचें हाडवैर असतें. गांधीजींच्या विरोधकांना त्यांचे बेत आणि हेतु हीं पदोपदीं कळलींच पाहिजेत. यासाठींच त्यांनीं क्रांतिकारक चळवळींचा निषेध केला. त्या चळवळींतील हिंसा आणि गौप्य यांविषयीं त्यांना जितका तीव्र

तिरस्कार वाटतो तितक्याच तीव्र कळकळीनें ते क्रांतिकारकांशीं चर्चा करून आपल्या पंथाकडे त्यांना वळवितात. १९३२ सालच्या सत्याग्रह चळवळींत ज्या वेळीं गुप्तता सुरू झाली, त्या वेळीं त्यांनीं त्या सत्याग्रहाचाहि निषेध केला.

सत्याग्रहाचें मुख्य लक्षण म्हणजे पुरस्कर्त्यावर असलेली सत्याची जबरदस्त पकड हें होय. सत्याग्रही आपले कार्यक्रम नेहमीं पोलीसांना आगाऊच कळवीत आले आहेत. स्वातंत्र्याच्या वातावरणांत ते पोलीसांबरोबर समदुःखितांप्रमाणें मनमोकळेपणानें मिसळत. परंतु १९३४ सालीं गांधीजी ज्या वेळीं सत्याग्रहाची चळवळ परत घेत होते त्या वेळीं, त्यांनीं त्या चळवळींत १९३२-३३ मध्यें गुप्ततेचें जें किल्मिष माजलें होतें त्याचा अगदीं उघड निषेध केला. त्या सुमारास सत्याग्रहाची चळवळ बरीच प्रगत झाली होती आणि सरकारला त्या चळवळीचें अंतर्बाह्य स्वरूप पूर्णपणें कळून चुकलें होतें. त्यामुळें ती चळवळ थंडावत चालली. विरोधकांस सर्व डावपेंच कळल्यानें चळवळीचें पाऊल पुढें पडेनासें झालें. ही लाजिरवाणी वस्तुस्थिति आपण कबूल केलीच पाहिजे. अशा परिस्थितींत मागाहून दाखल झालेल्या सत्याग्रहींना आणि पूर्वीच्या पथकांतील जे सत्याग्रही बंधमुक्त झाले होते त्यांना साहजिकच असें वाटूं लागलें कीं, लढा तर चालू ठेवलाच पाहिजे. विरोधकाच्या जागरूकतेमुळें नामोहरम होण्यापेक्षां, लढा चालू ठेवण्यासाठीं गुप्त मार्गाचा अवलंब करावा लागला तरी हरकत नाहीं असे विचार सुरू झाले.

गुप्ततेचा अवलंब करावयाचें ठरल्यावर बेकायदेशीर ठरलेल्या कलकत्ता किंवा दिल्ली येथील काँग्रेसच्या अधिवेशनास विलायती कपडे घालून लोक उपस्थित राहिले आणि अशा रीतीनें त्यांनीं सरकारची नजर चुकविली ! टाइपरायटर्स आणि सायक्लोस्टाइल यंत्रें दडून दडून कामें करूं लागलीं. बनावट कार्यकारी मंडळें आणि नामधारी डिक्टेटर्स वावरूं लागले. या रीतीनें मूळची नैतिक चळवळ, भूमिगत संघटना झाली. गांधीजींना हें कळलें आणि त्यांनीं १९३४ च्या एप्रिलमध्यें चळवळ थांबविली. कारण सत्याग्रहांत आपलें शरीर व स्वातंत्र्य हीं शत्रूपुढें अर्पण करावयाचीं असतात. या ना त्या मार्गानें कांहींहि बचावण्याचा प्रयत्न सत्याग्रहास मान्य नसतो.

अंतर्गत पावित्र्य आणि अव्याहत सिंहावलोकन हीं अहिंसापंथांत

अपरिहार्य आहेत. कॉंग्रेसच्या सभासद-नोंदणीत आणि निवडणुकींत ज्या प्रकारांनीं कॉंग्रेसला कमीपणा आणला आहे त्यांचा गांधीजी वेळोवेळीं निषेध करीत आले आहेत. अशा निषेधाचा त्यांना कधीं कंटाळा आला नाहीं किंवा तें करण्याचा त्यांना कसला संकोचहि वाटला नाहीं. अशा अंतःसमालोचनानें आपल्या शत्रूस आपल्यावर हल्ले करण्यास उत्तेजन मिळतें खरें; परंतु त्यासाठीं आपण आपल्या पापांचें आणि प्रमादांचें क्षालन करण्याचें कार्य सोडून द्यावें असें नाहीं. ज्या संघटनेचा पुढारीच तिच्यांतील अधःपात चव्हाट्यावर आणतो आणि ज्या संघटनेंतील वरिष्ठ कार्यकर्तेच आपल्या 'प्रधानां'ची उघड चौकशी करतात अशी संघटना जगांत पूर्वी कोणीं कधीं पाहिली आहे काय ?

हें सर्व सांगितल्यावर एक गोष्ट आपणांस मान्य करणें भाग आहे. ती म्हणजे सत्याग्रहाचें तत्त्व आणि तंत्र यांची केवळ प्राथमिक पायरीच आपण गांठली आहे. एखाद्या चळवळीचें अपूर्णावस्थेंतच निरीक्षण करणें ही गोष्ट अतिशय अवघड आणि नाजूक आहे. त्या चळवळीच्या अप्रगट अंतस्थ सामर्थ्याविषयीं दृढ श्रद्धा बाळगणारे तिचे एकनिष्ठ प्रवर्तक विरोधकांच्या हेटाळणीचे आणि शत्रूंच्या द्वेषाचे विषय होऊन बसले आहेत. अशा स्थितींत त्या चळवळीचा अभ्यास करणें तर फारच अवघड आहे. सर्व मोठ्या चळवळी या अवस्थांतून गेलेल्या आहेत.

## सत्याग्रह आणि Passive Resistance

सत्याग्रह हा कांहीं वेळां Passive Resistance सारखाच मानण्यांत येतो. परंतु या दोन चळवळी एकमेकींपासून मूलतःच भिन्न आहेत. इतकेंच नव्हे त्या अगदीं परस्परविरोधी आहेत. सत्याग्रहाच्या प्रवर्तकानें P. R. म्हणून त्याचा कधींहि पुरस्कार केला नसला तरी गांधीजींनीं सत्याग्रह चळवळीचा पुरस्कार करण्यापूर्वीच P. R. च्या स्वरूपांत त्याचा आरंभ झाला. १९१७ सालीं बेझंटबाईंना अटक झाली, त्या वेळीं P. R. च्या स्वरूपांत सत्याग्रहाचा प्रारंभ झाला. परंतु गांधीजी जेव्हां कॉंग्रेसच्या व्यासपीठावर प्रगट झाले तेव्हांपासून सत्याग्रहाचें खरें स्वरूप प्रगट होऊं लागलें. पूर्वीचे गैरसमज दूर झाले. याचा अर्थ एवढाच कीं, सत्याग्रहांत P. R. चें पुनरुज्जीवन झालें.

ता.

P. R. या स्वरूपांत चाललेल्या चळवळींत द्वेष आणि गर्व हीं प्रगट होत होतीं आणि त्यांत द्वेष आणि हिंसा यांचाहि छटा होती. असहकार या भूमिकेंत ती चळवळ खिन्न आणि कष्टी लोकांची मनोवृत्ति व्यक्त करीत होती. त्या वृत्तींत राज्यकर्त्यांविषयींचा संताप दिसत होता आणि शत्रूस जायबंदी करण्याची तीव्र इच्छा, परंतु टोला हाणण्याचें सामर्थ्य नसल्यानें जागच्या जागीं चरफड अशी मनःस्थिति चळवळींतल्या लोकांची होती. 'सविनय कायदेभंग' या दोन शब्दांपैकीं लोकांनीं फक्त नामाचें (कायदेभंगाचें) अनुकरण केलें. आणि त्या नामाच्या विशेषणाचा ( सविनय ) त्यांना विसर पडला. परंतु हळूहळू 'सविनयास' मान्यता मिळत गेली आणि सत्याग्रहास अनुकूल भूमिका त्या चळवळींतून निर्माण झाली. सत्याग्रह ही सविनय कायदेभंगाची पुढील पायरी ठरली. अशा रीतीनें आपणांस हें कळलें कीं, सत्याग्रह हें केवळ शारीरिक बल नसून तें वास्तविक नैतिक आणि आत्मिक बल आहे. तें बल आपल्या उद्दिष्टाच्या बाबतींत अत्यंत कडवें आहे. तें बल मूलतः क्रियाप्रवण, आक्रमक आणि चैतन्यदायक आहे. हें कळूं लागल्यावर सत्याग्रहाचें नव्या जगांत मूल्य कळून आलें. त्या मूल्यानें प्रेम, पावित्र्य, धैर्य, आत्मक्लेश, सहनशीलता आणि क्षमा यांना द्वेष, भीति, क्रोध आणि सूड यांनीं वाट मोकळी करून दिली. त्या नव्या जगांत संपत्तीची जागा सेवेनें घेतलेली असते आणि तेथें शत्रूस जिंकावयाचें नसून त्याचें परावर्तन करावयाचें असतें.

प्रत्येक सत्याग्रहीनें स्वतःस घेरणारीं सर्व भयें टाकून मृत्यूचें स्वागत करण्यास सिद्ध असलें पाहिजे. व्यक्ति, सरकार, समाज, दारिद्र्य आणि मृत्यु यांविषयीं वाटणारें भय सत्याग्रहीच्या ठिकाणीं असूं नये. असहकार ही एक शिस्त आहे. तें एक साधन आहे. खऱ्या नम्र वृत्तीनें आत्मत्याग करण्याचें शिक्षण घेण्याचें तें एक साधन आहे. त्या आत्मत्यागानें धैर्य प्राप्त होतें. उलट भीतीस जन्म देणारा गर्व माणसास कधींहि धैर्यसंपन्न करीत नाहीं. अशा रीतीनें सत्याग्रहाच्या या प्रवर्तकानें एका पदक्षेपानेंच सविनय कायदेभंगाच्या चळवळीचें उदात्तीकरण केलें आणि दैनंदिन राजकारणास आध्यात्माच्या वातावरणांत नेऊन पोहोंचविलें.

## संन्यास नव्हे, परित्याग

समाधान हें सत्याग्रहवृक्षाचें बीज आहे; संन्यास हें नव्हे. संन्यास समाजाचा त्याग करतो, परंतु परित्यागानें इच्छा परिमित होतात आणि वासनांचें नियंत्रण होतें. सत्याग्रह हा असा परित्याग आहे. त्यांत जगाला सोडण्याची पाळी येत नाहीं. मनुष्यजातीच्या सेवेसाठीं त्याग करण्याची वृत्ति हें सत्याग्रहाचें लक्षण आहे.

या नव्या तत्त्वज्ञानानें मोठा सामर्थ्यप्रवाह प्रगट होतो. आपल्या शत्रूंशीं सहकार थांबविला तरी त्याचा सहवास ठेवणें हें आपलें कर्तव्य होऊन बसतें. हें नवें सामर्थ्य दीनांच्या सेवेकडे वळविलें पाहिजे आणि त्या ध्येयानें सत्याग्रही व्यक्तीनें दररोज कांहीं श्रम केलेच पाहिजेत. दररोजचा श्रमविभाग म्हणून त्यानें सूत कातणें, हा एक पवित्र विधि मानला पाहिजे. सूतकताई हें दीनांसाठीं करावयाच्या कार्याविषयींच्या भक्तीचें प्रतीक आहे. यासाठीं मनाचें शरीरावर नियंत्रण पाहिजे. बुद्धीला जें निषेधार्ह वाटतें अशा गोष्टींसाठीं शरीराची तळमळ होणार नाहीं आणि भावनेनें जें मना केलें आहे त्यावर मन रेंगाळत बसणार नाहीं. या गोष्टी साधण्याचें उत्तम साधन किंवा मार्ग म्हणजे मितोपभोग होय. विचार आणि वाणी यांचा मितोपभोग म्हणजे मौन, अन्नाचा मितोपभोग म्हणजे उपवास; आणि वासना आणि भावना यांचा मितोपभोग म्हणजे ब्रह्मचर्य. या सत्याग्रहाच्या तंत्राचा आपण विचार करूं या.

## मौन

मौनाच्या काळांत गांधीजी जास्त सौकर्यानें आणि परिणामकारकपणें कार्य करूं शकतात. कॉंग्रेसमध्यें असण्यापेक्षां बाहेर राहून, आणि मोकळें असण्यापेक्षां कारागृहांत राहून त्यांचें कर्तृत्व जास्त प्रभावीपणें प्रगट झाल्याचें आढळून आलें आहे. कानपूर अधिवेशनानंतर ( डिसें. १९२५ ) एक वर्षभर त्यांनीं राजकीय मौन धारण केलें होतें. परंतु त्या मौनकालांतच त्यांनीं प्रचंड योजना मनांत उभारल्या आणि योग्य वेळ येतांच त्या योजना अत्यंत व्यापक व सर्वांगीण कार्यक्रमाच्या रूपानें प्रगट झाल्या. लोक मौनाची थट्टा करतात, उपवासांत शरीराचे जे हाल होतात त्यांचीहि ते थट्टा करतात; त्यांना

अगम्य वाटणाऱ्या ब्रह्मचर्याचा ते उपहास करतात. परंतु याचा अर्थ एवढाच कीं, ते स्वतः विविध प्रकारच्या अधोगतींच्या चिखलांत लोळत आहेत. त्यांच्या जीवितांत 'पुरोगामी' नांवाखालीं ज्या चळवळी त्यांनीं पूर्ववयांत केल्या त्या चळवळींचें तें अपरिहार्य भवितव्य आहे! त्या चळवळींतूनच फक्त हीन अभिरुची आतां शिल्लक उरली आहे आणि त्या अभिरुचीप्रमाणें नव्या पिढीचीं ध्येयें तयार होत आहेत!

शिस्त, स्फूर्ति आणि सामर्थ्य या दृष्टीनें मौनाचें महत्त्व गांधीजींनीं स्वतःच सांगितलें आहे. ते म्हणतातः

"मी असें म्हणूं शकतों कीं, मी आतां एक कायमचा निःशब्द झालेला माणूस आहें. मी नुकतेंच दोन महिने पूर्णपणें मौन धारण केलें होतें आणि त्या मौनाचा परिणाम अद्यापहि नाहींसा झाला नाहीं. हल्लीं मी दररोज संध्याकाळीं प्रार्थनेच्या वेळीं मौन धारण करतों आणि दुपारीं २ वाजतां भेटीस येणारांसाठीं तें मौन सोडतों. मौन ही माझी शरीराप्रमाणें आत्म्याचीहि गरज झाली आहे. मनावरचें दडपण कमी करण्याचा एक मार्ग म्हणून मी मौनास आरंभ केला. नंतर लिहिण्यास वेळ मिळावा म्हणून मी मौन धारण करूं लागलों. परंतु कांहीं काळ मौनाचा प्रयोग केल्यावर मला त्याचें आध्यात्मिक मूल्य समजलें. मला एकदम अशी जाणीव झाली कीं, मौनाच्या कालांतच मला परमेश्वराच्या जवळ जातां येतें. आतां मला वाटतें मौनास अनुकूल असेंच माझें जीवन निर्माण झालें आहे."

आपल्या अंतःस्फूर्तीचें अनुकरण करण्याचें गांधीजींनीं स्वतःस वळण लावलें आहे. त्या अंतःस्फूर्तीचें ज्ञान त्यांना दक्षिण आफ्रिकेंत ट्रॅपिस्ट मठांत झालें. त्या मठांतील रहिवासी मौन हें व्रत मानीत असत. जर अंतःकरणांतील शांत, सूक्ष्म आणि नेहमीं होत राहणारा आवाज आपणांस ऐकावयाचा असेल तर, आपण नेहमी बोलत राहिल्यास तो आवाज आपणांस ऐकूं येणार नाहीं, असें त्या मठवासी लोकांचें मत होतें. यावरून गांधीजींनीं असा सिद्धांत बांधला कीं, सत्याच्या संशोधकानें मौन धारण केलें पाहिजे. तो मूल्यवान् मंत्र गांधीजींना कळला आणि मौनाचें रहस्य त्यांना समजलें.

मौन, उपवास आणि ब्रह्मचर्य हे सत्याग्रह तंत्राचे भौतिक घटक आहेत आणि तरी आध्यात्मिक दृष्ट्या त्यांचा अतिशय मोठा परिणाम होतो.

गांधीजी म्हणतातः

"अहिंसावादी माणसाच्या शब्दकोशांत बाह्य शत्रु असा शब्दच नाहीं. परंतु काल्पनिक शत्रूच्या बाबतींतसुद्धां त्याच्या अंतःकरणांत केवळ दया एवढी एकच भावना असते. त्याची अशी श्रद्धा असते कीं, कोणीहि मनुष्य मनानें दुष्ट नसतो. सत्य आणि असत्य यांच्यांतील भेद करण्याची उपजत बुद्धि ज्याला नाहीं असा मनुष्यच असूं शकत नाही. आणि जर ती बुद्धि पूर्णपणें विकास पावली तर अहिंसा रूपानेंच तिचें विकसित रूप प्रगट होईल. म्हणून तो परमेश्वराची प्रार्थना करीत राहील कीं, "देवा, माझ्या काल्पनिक शत्रूला सत्याची जाणीव दे आणि त्याचें कल्याण कर." स्वतःसंबंधीं तो प्रार्थना करतांना परमेश्वरास सांगेल कीं, "शत्रूविषयीं माझ्या मनांत दयेचा झरा अखंड वाहत राहो. माझें नैतिक बल इतकें वृद्धिंगत होवो कीं, मला निर्भयपणें मृत्यूसमोर उभें राहतां आलें पाहिजे."

दुसऱ्या एका ठिकाणीं गांधीजी म्हणतातः

"क्षमा हा बलवंतांचा गुण आहे."

## उपवास ६

सत्याग्रहाचें तंत्र, आणि सत्यग्रहीचें जीवित आणि कार्य यांत उपोषणाचा जो दृढ संबंध आहे तो दिसावयास कांहींसा विचित्र आहे. आंग्लविद्याविभूषितांना तें जवळ जवळ खूळच वाटतें; परंतु जेवणावळी आणि समारंभ यांतूनहि हिंदूंस उपोषणाची स्फूर्ति मिळते. हिंदूंच्या बाबतींत समारंभ आणि धार्मिक विधि यांचें पर्यवसान जेवणावळींत होतें. हिंदु, मुसलमान, ख्रिश्चन यांच्यांत धार्मिक सोहोळ्यास जें मानाचें आणि भक्तीचें स्थान आहे त्याचें बरेंचसें कारण या उपोषणांत आहे.

बहुजनसमाजास उपोषणाचा आदेश गांधीजींनीं प्रथम १९१९ च्या सत्याग्रहांत दिला. तो सत्याग्रह रौलॅट बिलाच्या प्रक्षोभासंबंधीं होता. त्यांची उपोषणाविषयींची श्रद्धा खालील उताऱ्यांत व्यक्त झालेली आहे:—

" १ उपोषणाचा पंथ ' आदम'इतका पुरातन आहे. चांगल्या किंवा वाईट हेतूसाठीं किंवा आत्मशुद्धीसाठीं उपोषणाचा अवलंब करण्याची प्रथा आहे. साक्षात्कारासाठीं बुद्ध, येशू आणि महंमद यांनीं उपोषण केलें. समुद्रानें वानरसेनेस वाट द्यावी म्हणून रामचंद्रानें उपोषण केलें होतें. महादेवाची, पति आणि परमेश्वर म्हणून प्राप्ति व्हावी म्हणून पार्वतीनें उपोषण केलें होतें. माझ्या उपोषणांत मी या महान् आदर्शांचेंच अनुकरण करीत आहें.

अर्थात् माझे हेतु वरील आदर्शाच्या हेतूच्या मानानें बरेंच सामान्य दर्जाचे आहेत.

२ सत्याग्रह आणि अहिंसा यांच्या बरोबरच सत्याग्रहीनें परमेश्वरा-विषयींहि अशी श्रद्धा बाळगावी कीं, तो आपणास पुरेसें सामर्थ्य देईल. उपोषणांत यत्किंचित्हि अमंगलत्व आलें तरी उपोषण तात्काल बंद करण्यास डळमळूं नये. अमर्याद सहनशीलता, अचल निश्चय, ध्येयैकदृष्टि, पूर्ण शांति आणि क्रोधाचा पूर्ण अभाव हीं उपोषणांत असलीं पाहिजेत. हे सर्व गुण एकदम वृद्धिंगत करणें माणसास अशक्य असल्यानें, ज्यानें अहिंसेचें एकनिष्ठ-पणें आचरण केलें नाहीं त्यानें सत्याग्रहात्मक उपोषण अंगीकारूं नये.

३ अगदीं लहानपणींच आत्मशुद्धीसाठीं म्हणून मीं उपोषणास आरंभ केला आणि नंतर माझ्या मुलांच्या हातून घडलेल्या प्रमादासाठीं मीं दीर्घ उपोषण केलें. त्यानंतर एका मित्राच्या मुलीच्या गैरवर्तनासाठीं मीं पूर्वी-पेक्षांहि दीर्घकाल उपोषण केलें. या दोन्ही प्रसंगीं उपोषण हें फलदायी ठरून समर्थनीय ठरलें. मीं पहिलें जाहीर उपोषण दक्षिण आफ्रिकेंत असतांना कांहीं सत्याग्रहींच्या अपराधासाठीं केलें. उपोषणाचा मार्ग फसल्याचा एकहि प्रसंग आला नाहीं. उपोषण निष्फल झाल्याचें मला आठवत नाहीं. इतकेंच नव्हे तर अमूल्य चित्तशांति आणि अमर्याद आनंद यांचाच अनुभव या उपोषणप्रसंगीं मी घेत आलों आहें. मात्र माझें असें निश्चित अनुमान आहे कीं, परमेश्वराच्या आदेशावांचून उपोषण करणें ही निरर्थक उपासमार असते हें खास !"

## उपवास ही अंतःस्फूर्ति आहे

युद्धकालांत ( ऑगस्ट ते डिसें. १९४० ) गांधीजींनीं जें उपोषण केलें त्यासंबंधींचें पत्रक आपण पाहूं या ( नोव्हें. ७, १९४० ).

" वर्किंग कमिटीच्या सभासदांना मीं कळविलें आहे कीं, माझ्या आयु-ष्यांत मला आणखी एक उपोषण करावें लागणार आहे आणि तो उपवास कदाचित् माझ्या अंदाजापेक्षांहि लवकरच करावा लागेल. परंतु वस्तुस्थिति अशी आहे कीं, सार्वजनिक जीवनांत स्वतः पूर्वचिंतन करून असा एकहि उपवास केल्याचें मला आठवत नाहीं. माझे सर्व उपवास हे तत्क्षणीं होणाऱ्या

अंतःसंवेदनेनें ठरविण्यांत आले आहेत. ते परमेश्वराच्या प्रसादासारखेच मी मानीत आलों आहें. त्याचे परिणाम निरपवादपणें चांगले झाले आहेत. कोणत्याहि प्रसंगीं मला त्याबद्दल पश्चात्ताप झालेला नाहीं. आणखी एक उपवास माझ्यासाठीं परमेश्वरानें नियोजित केला असेल तर तो नक्की घडून येईल आणि तो कल्याणप्रदच ठरेल. सर्व बाबतींत प्रभूची इच्छाच प्रमाण आहे."

गांधीजींनीं केलेल्या उपवासांपैकीं, अहमदाबादच्या गिरणी-मजुरांच्या संघाच्या बाबतींत १९१८ ऑक्टो. रोजीं केलेला उपवास, हा त्यांनीं हिंदुस्थानांत केलेला पहिला उपवास होय.

त्या प्रसंगीं कोणत्याहि तडजोडी झालेल्या असल्या आणि कसेंहि कमजास्त यश प्राप्त झालें असलें तरी गांधीजींची कामगारांविषयींची कल्पना कामगार पुढाऱ्यांच्या कल्पनेपेक्षां निराळी आहे ही गोष्ट सत्य आहे. अहमदाबादच्या गिरणीकामगारांना त्यांनीं ४ डिसें. १९४० रोजीं दिलेला संदेश पहाः

"तुमचा माझा परिचय झाला तेव्हांपासून मी तुम्हांस सांगत आलों आहें कीं, तुमची मुक्तता तुमच्याच हातीं आहे. श्रमाचें मोल पैशानें मोजलें जातें त्यापेक्षां कितीतरी जास्त आहे. तुमच्या इच्छेप्रमाणें तुम्हांला आपलें मोल कमजास्त करतां येईल. परंतु जर श्रमाच्या 'नगद' किंमतीवरच तुम्ही संतुष्ट असाल तर तुम्हीच आपल्या हातानें आपल्या लायकीला मर्यादा घालीत आहांत असा त्याचा अर्थ होईल."

## कांहीं प्रसिद्ध उपवास

गांधीजींनीं गेल्या २० वर्षांत किती तरी उपवास केले. त्यांपैकीं ६ एप्रिल १९१९ रोजीं काळ्या कायद्या–रौलेट ॲक्टविरुद्ध सर्व देशबांधवांसह केलेला उपवास हा पहिला सार्वत्रिक उपवास होय.

त्यानंतर चौरी-चुरा प्रकरणीं १९२२ फेब्रु. त त्यांनीं प्रायश्चित्त म्हणून अंतःशुद्धीसाठीं पांच दिवस उपवास केला. त्या वेळीं त्यांनीं लिहिलें:

"माझ्या भोंवतालच्या वातावरणांतील अगदीं सूक्ष्म असेंहि नैतिक आंदोलन कळण्यासाठीं मीं माझी योग्यता वाढविली पाहिजे. त्यासाठीं मला वैयक्तिक शुद्धीकरण केलें पाहिजे. माझ्या प्रार्थना याहीपेक्षां जास्त सत्यपूर्ण

आणि नम्रतामय झाल्या पाहिजेत. मनाचें जरूर तें साहाय्य घेऊन केलेल्या उपवासाइतका शुद्धिकारक आणि साहाय्यक असा दुसरा मार्गच मला माहीत नाहीं. पूर्ण आत्माविष्कारासाठीं, शरीरावर आत्म्याचा पूर्ण विजय प्रस्थापित करण्यासाठीं केलेला उपवास हें आत्मोन्नतीचें अत्यंत प्रभावी साधन आहे. म्हणून मीं पूर्ण विचारांतीं पांच दिवस उपवास करण्याचें ठरविलें आहे.

"कोणताहि उपवास आणि तपश्चर्या हीं शक्य तों गुप्तपणेंच केलीं पाहिजेत, परंतु माझा उपवास ही तपश्चर्या आहे; आणि तीच शिक्षाहि आहे. म्हणून ती जाहीर व्हावयास पाहिजे. हा उपवास माझ्या बाबतींत तपश्चर्या आहे आणि ज्यांची सेवा करण्याचा मी प्रयत्न करतों, ज्यांच्यासाठीं मला जगावेंसें वाटतें आणि तितक्याच कळकळीनें ज्यांच्यासाठीं मी मरणहि पत्करीन, त्यांना हा उपवास हें शासन आहे. त्यांनीं काँग्रेसच्या नियमांविरुद्ध, अहेतुकपणें कां होईना, पण गुन्हा केला आहे. त्या गुन्ह्याशीं त्यांचा प्रत्यक्ष संबंध नसला तरी त्याविषयीं त्यांना सहानुभूति वाटत होती, हें खास. शासनाचा एकच मार्ग प्रेमास ठाऊक आहे तो म्हणजे आत्मक्लेश आणि त्या लोकांनीं काँग्रेसचा जो शिस्तभंग केला आहे त्यांच्या प्रेमासाठींच मी क्लेश सोशीत आहें हें मी त्यांना पटवून देईन."

हिंदुमुसलमानांतील तीव्र तेढीमुळें देशांत अनेक दंगे झाले. त्यासाठीं १९२४ सालीं गांधीजींनीं सगळ्यांत मोठा असा २१ दिवसांचा उपवास हिंदु-मुसलमान-ऐक्यासाठीं केला. त्या वेळीं—१८ सप्टें. १९२४ रोजीं—दिल्लीहून काढलेल्या पत्रकांत ते म्हणतातः

" माझा धर्म मला असें सांगतो कीं, ज्या वेळीं स्वतःस अनिवार्य असें दुःख ( संकट ) उत्पन्न होईल त्या वेळीं आपण स्वतः उपवास करावा आणि प्रार्थना करावी. माझ्या अत्यंत प्रिय व्यक्तींच्या बाबतींत मीं हें केलें आहे. माझ्या केवळ वाणीनें किंवा लेखणीनें या दोन जमातींत ऐक्य होऊं शकत नाहीं, असें स्पष्ट दिसतें. म्हणून आजपासून मीं २१ दिवसांचा उपवास करण्याचें ठरविलें आहे. हा उपवास ही तपश्चर्याहि आहे आणि उपासनाहि आहे. तपश्चर्या या दृष्टीनें ही गोष्ट लोकांत जाहीर करण्याची आवश्यकता नव्हती. परंतु हा उपवास म्हणजे हिंदु व मुसलमान या दोघांनाहि परिणाम-कारक प्रार्थना आहे. म्हणूनच मी माझा उपवास जाहीर करीत आहें. जे

आजपर्यंत एकोप्यानें वागले, त्यांनीं यापुढें आत्मघात करूं नये. सर्व जातींच्या पुढाऱ्यांना मी आदरपूर्वक आमंत्रण करीत आहें. त्यांत मी इंग्लिशांचाहि समावेश करतों. त्यांनीं एकत्र यावें आणि हें भांडण मिटवावें. हें भांडण हा माणुसकीला आणि धर्मालाहि कलंक आहे. या भांडणानें परमेश्वरास पदभ्रष्ट केल्यासारखें मला वाटत आहे. आपण त्यास आपल्या हृदयसिंहासनावर पुन्हां स्थापन करूं या.

( "परमेश्वरावर ज्याची थोडी तरी श्रद्धा आहे तो कधींहि निराश होत नाहीं. कारण सत्याचा शेवटीं विजय होणार अशी त्याची श्रद्धा असते. ईश्वरप्रवण माणूस कधींहि असत्याची आराधना करीत नाहीं. आणि म्हणूनच तो कधींहि आशा सोडीत नाहीं. उलट भोंवतालीं जमणाऱ्या नैराश्य-घनवल-यांत त्याचा आशातारक जास्तच तळपूं लागतो./ तामीळ भाषेत एक सुंदर म्हण आहेः "असहाय्याचा एकमेव आधार परमेश्वर हाच." या म्हणींतलें सत्य आज मला जितकें उमगलें तितकें यापूर्वी उमगलें नाहीं. मोठमोठ्या समुदायांना हातांशीं धरणें, त्यांच्याशीं व्यवहार करणें, आणि त्यांच्या वतीनें कार्य करणें हें काम, ज्याचें कर्तव्य परमेश्वरानें असें मर्यादित केलें आहे, त्याला अतिशय अवघड आहे. म्हणून त्याला नेहमीं सावध राहावें लागतें. वाचकांनीं खात्री बाळगावी कीं, मी पूर्ण असाहाय्य झाल्यावरच हा अखेरचा निर्णय केला आहे. पांच पतींनीं—'संरक्षकांनीं'—ज्या वेळीं द्रौपदीला सोडून दिलें त्या वेळीं तिनें जितक्या आर्तस्वरानें परमेश्वराचा धांवा केला तितक्याच आर्त स्वरानें मी परमेश्वरास हाक मारीत आहें. द्रौपदीचा धांवा निष्फळ ठरला नाहीं. असा धांवा नुसता वरपांगी असतां कामा नये. तो अगदीं अंतःकरणाच्या गाभ्यांतून आला पाहिजे. आणि असा धांवा फक्त यातनाग्रस्त असतांनाच होऊं शकतो. माझा धांवा उपवासरूपानें व्यक्त होत आहे."

उपोषण सुरू झाल्यावर २६ सप्टें. १९२४ रोजीं दिल्लीस ऐक्यपरिषद भरली. त्या परिषदेस हिंदु, मुसलमान, पार्शी, शीख, ख्रिश्चन आणि इंग्रज गृहस्थहि उपस्थित होते. डॉ. फॉस वेस्टकॉट हे हिंदुस्थानचे बिशपहि त्या प्रसंगीं तेथें उपस्थित होते. परिषदेचें पर्यवसान फारसें प्रशंसनीय ठरलें नाहीं. तरी परिषदेमुळें ऐक्यास पुष्कळ मदत झाली. डॉ. फॉस म्हणाले, "नवी वृत्ति ( Spirit ) खालपर्यंत रुजली पाहिजे. अर्थात् त्याला कालावधि

लागेल; परंतु ती मूळ धरूं लागली आहे अशी आशा करावयास हरकत नाहीं. ''

## उपवास म्हणजे आत्महत्या नव्हे

गांधीजींचीं उपोषणें मोठमोठ्या व्यक्तींनीं अत्यंत चिंतातुर अंतःकरणानें पाहिलीं आहेत. गांधीजींनीं कांहीं उपवास मर्यादित स्वरूपाचे आणि कांहीं अमर्यादित स्वरूपाचे केले असले तरी १९२४ सालीं ते म्हणाले कीं, " उपवासानें मी मरण्यास तयार नाहीं. '' कारण उच्चतर आणि जास्त पवित्र मार्गानें देशाची आणि ईश्वराची सेवा करण्यासाठीं जगावें हाच त्यांचा उपवासाचा हेतु असतो. पुढें ते म्हणतात, " जेव्हां ' जगावयाचें कीं मरावयाचें ' असा आणीबाणीचा क्षण येईल त्या वेळीं मी खात्रीनें उपवास बंद करीन. '' लोकांमध्यें अंतःकरणमूलक खरें ऐक्य करण्याची स्फूर्ति यावी आणि सत्य दिसेल तसेंच प्रकट करण्याचें सामर्थ्य आपल्याला यावें यासाठींच गांधीजी उपवास करतात.

आतां आपण, जातीय निर्णय किंवा जातीय निवाडा असें ज्याला कधीं कधीं म्हणतात त्या प्रसंगाकडे वळूं. तो निवाडा दुसऱ्या गोलमेज परिषदेनंतर १९३२ सालीं रॅम्से मॅक्डोनाल्ड यांनीं जाहीर केला. १७ ऑगस्ट १९३२ रोजीं निवाडा प्रसिद्ध झाला. दुसऱ्याच दिवशीं गांधीजींनीं निवाड्यास विरोध करण्यासाठीं प्राणांतिक उपोषण करण्याचा निर्णय मुख्य प्रधानांस कळविला. त्यांनीं लिहिलें:

" स्वतंत्र मतदारसंघापासून अस्पृश्यांचें आणि हिंदुसमाजाचें अकल्याणच होईल, हें माझें मत कदाचित् चुकीचेंहि असेल. तसें ठरल्यास मानवी जीवनाच्या इतर बाबतींतीलहि माझीं तत्त्वें चुकीचीं आहेत असें ठरेल. तीं चुकीचीं असतील तर उपवासामुळें येणारा मृत्यु हें माझ्या चुकीचें प्रायश्चित्त ठरेल आणि बालकाप्रमाणें माझ्या शहाणपणावर विश्वास ठेवणाऱ्या स्त्रीपुरुषांच्या मनावरचें एक दडपण दूर होईल. जर माझाच निर्णय बरोबर असेल तर मीं ठरविलेलें कृत्य हें माझ्या जीवितपद्धतीच्या पूर्णत्वासाठीं आवश्यक आहे असें ठरेल. ती जीवनपद्धति मी गेलीं २५ वर्षें अवलंबीत आहें आणि त्यांत मला बरेंचसें यशहि आलें आहे. ''

त्या प्रसंगीं उपवासापासून गांधीजींना परावृत्त करण्याचा अनेकांनीं प्रयत्न केला आणि शेवटीं सर्वांनीं हात टेकले. त्यांना उत्तर देतांना गांधीजींनीं लिहिलें:

" माझ्या आंतल्या आवाजाच्या सत्यत्वाबद्दल मला मुळींच संशय नाहीं. या दुःखांधःकारांतून तुम्हांला प्रकाश दिसेल याविषयींहि मला शंका नाहीं. दोन हजार वर्षांपूर्वी असाच एक कोलाहलाचा प्रसंग उद्भवला होता आणि त्या प्रसंगीं जेरुसलेम येथें आपल्या प्रभूच्या प्रेमाखातर हळहळणाऱ्या लोकांना प्रभूकडून असेंच उत्तर मिळालें होतें. "

शेवटीं सरकारनें येरवडा-करार पत्करला आणि गांधीजींनीं ६ सप्टें. ला संध्याकाळीं उपवास थांबविला. सर्व देशभर अस्पृश्यतानिवारण–सप्ताह पाळण्यांत आला ( २७ सप्टें. ते २ ऑक्टो. ).

या उपवासाखेरीज गांधीजींनीं तपश्चर्या म्हणून आणि प्रायश्चित्त म्हणून आणखी उपवास केले. १९३३ च्या मे मध्यें एकवीस दिवस केलेला उपवास कोणत्याहि विशिष्ट कारणासाठीं नव्हता. ' केवळ आत्मशुद्धीसाठीं, आणि सहकाऱ्यांनीं विशेष दक्षता बाळगावी यासाठीं अंतःकरणापासून केलेली प्रार्थना ' असें त्या उपवासाचें स्वरूप होतें. त्या वेळीं गांधीजी म्हणालेः

" मला मरण्याची इच्छा नाहीं, मला ध्येयासाठीं जगावयाचें आहे. परंतु माझें कल्याण व्हावें, माझ्या सहकाऱ्यांच्या ठिकाणीं पावित्र्याची वृद्धि व्हावी, त्यांच्यांत कार्यनिष्ठा आणि अर्पणपरता वाढावी यासाठीं मी जगत आहें. अभेद्य पावित्र्य अंगीं असलेले जास्त कार्यकर्ते मला हवे आहेत. माझ्या दृष्टीस पडलेल्या अपावित्र्यानें मला धक्काच बसला आहे. अशा लोकांनीं कार्य सोडून बाजूस व्हावें अशी माझी अत्यंत कळकळीची विनंति या उपवासाच्या द्वारें त्यांना कळावी अशी माझी इच्छा आहे."

## एक अविस्मरणीय उपवास

राजकोटचा उपवास हा सर्व उपवासांत महत्त्वाचा आहे. त्या उपवासांत जे गुंतागुंतीचे प्रश्न उपस्थित झाले, आणि उपवासानंतर जे जास्तच गुंतागुंतीचे प्रश्न निर्माण झाले त्यामुळें तो उपवास अविस्मरणीय ठरला आहे. " त्या चार

दिवसांत सत्याग्रहीच्या ठिकाणीं आवश्यक असलेल्या लायकीविषयीं माझ्या मनांत विचार सुरू झाले" असें गांधीजी म्हणाले.

त्यांनीं सत्याग्रहीची लायकी खालील शब्दांत नमूद केली:—

१ सत्याग्रहीची परमेश्वरावर अढळ श्रद्धा पाहिजे. कारण फक्त परमेश्वरच अचल आहे.

२ आपलें ब्रीद म्हणून सत्य आणि अहिंसा यांवर त्यानें विश्वास ठेवला पाहिजे. आत्मक्लेशांतून व्यक्त होणारें सत्य आणि प्रेम यांच्या द्वारां मानवी वृत्तींतील जें सौजन्य जागृत करण्याची सत्याग्रही अपेक्षा करतो त्या सौजन्यावर त्याची श्रद्धा पाहिजे.

३ शुद्ध जीवनाच्या मार्गानें तो जात असला पाहिजे. आपल्या ध्येयासाठीं आपलें वित्त अर्पण करण्यास तो आपखुषीनें सिद्ध असला पाहिजे.

४ त्यानें नेहमीं खादी वापरली पाहिजे आणि सूत कातलें पाहिजे. हिंदुस्थानसाठीं ही गोष्ट अत्यावश्यक आहे.

५ त्यानें चहापान वर्ज्य केलें पाहिजे. आपली विवेकबुद्धि नेहमीं प्रज्वलित राहावी आणि मन स्थिर राहावें यासाठीं सत्याग्रहीनें कोणत्याहि मादक पदार्थाचें सेवन करूं नये.

६ वेळोवेळीं सांगितलेले शिस्तीचे सर्व नियम त्यानें मनापासून पाळावेत.

७ स्वाभिमान दुखविण्यासाठींच मुद्दाम केलेले असे जे तुरुंगाचे नियम असतील त्यांखेरीज इतर नियमांचें त्यानें पालन करावें."

राजकोटच्या लोकांनीं जीं सूत्रें पाळावयास पाहिजे होतीं अशीं कांहीं सूत्रें गांधीजींनीं सांगितलीं आहेत:

१ स्वतःस शिकवीत रहा, मादक पेयापासून अलिप्त रहा, आणि साधे-पणाची वृत्ति वाढवा.

२ विधायक कार्यक्रमावर विश्वास ठेवा.

३ 'माझें बरोबर आहे' असें म्हणूं नका. तर 'जें सत्य आहे तें मी माझें मानतों' असें म्हणा.

४ बडेजाव, मत्सर आणि वाईट संवयी यांचा त्याग करा.

५ आपणास दुसऱ्याच्या हक्काचें अतिक्रमण करावयाचें नाहीं.

६ दुःखिताचें संरक्षण हें आपलें कर्तव्य आहे.

७ क्षमा हा समर्थांचा सद्गुण आहे.

८ ज्याला कांहीं अर्थ आहे असेच शब्द बोला. अविचारानें एकहि शब्द उच्चारूं नका.

९ जर स्वतंत्र व्हावयाचें असेल तर पौरुष संपादन करा.

उपवासाविषयीं गांधीजींनीं ७ नोव्हें. १९४० रोजीं जें पत्रक काढलें त्यांत ते म्हणतातः

" जीविताच्या कोणत्याहि प्रसंगीं—अगदीं राजकीय प्रसंगींसुद्धां—उपवास हें कृत्य सुसंगत आणि समर्थनीय आहे याविषयीं माझी खात्री आहे. आक्षेपांचे हल्ले होत असले तरी माझ्या श्रद्धेंत किंचित्‌हि चलबिचल झालेली नाहीं. उपवास हें एक अभिनव शस्त्र आहे हें मी मान्य करतों. मी हेंहि मान्य करतों कीं, तें शस्त्र वाटेल त्याच्यासाठीं नाहीं, तर तज्ज्ञासाठींच आहे. कायदेभंगसुद्धां वाटेल त्यानें करावा असें नाहीं. सविनय कायदेभंगापेक्षांहि उपवासास जास्त योग्यता, पूर्वतयारी म्हणून संपादन करावी लागते. मीं स्वतः ती लायकी मिळविली आहे, असें मी मानतों. १९०६ किंवा १९०७ सालापासून या कार्यासाठीं हेतुपुरस्सर शिक्षण घेण्याची संधि परमेश्वरानें मला वारंवार दिली आहे. गेलीं ३४ वर्षे मी या दृष्टीनें स्वतःची तयारी करीत आहें. परंतु उपवास ही यंत्रासारखी वाटेल तेव्हां एकदम सुरू करण्यासारखी गोष्ट नव्हे. अदृश्य शक्तीनें ( आंतला आवाज, परमेश्वर—कांहींहि म्हणा ) आदेश दिल्याखेरीज उपवासाचा अवलंब करतां येत नाहीं.

" आत्म्याची कितीहि तयारी असली तरी शरीर पंगु आहे; उपवासांत पुरेसें पाणी पितां येईनासें झालें कीं, ती स्थिति असह्य होते, हें मला माहीत आहे. परंतु शरीर कितीहि दुर्बल असलें तरी ज्या वेळीं ती अदृश्य शक्ति इतर सर्व सामर्थ्यांवर मात करून आपला अधिकार गाजवूं लागते त्या वेळीं शारीरिक दुर्बलतेवरहि विजय मिळवितां येतो."

### उपवास हा जुलूम आहे काय ?

प्रतिपक्षाच्या विचारशक्तीवर, निर्णयशक्तीवर व कृतीवर जास्त प्रबल

सामर्थ्य गाजविण्यासाठीं केलेलें कृत्य याला जुलूम म्हणावयाचें असेल तें कृत्य कोणत्या स्वरूपाचें आहे यावर त्याचा जुलमीपणा अवलंबून राहील. कोणत्या प्रकारचें वरिष्ठत्व प्रस्थापित होत आहे यावर तो जुलूम आहे कीं नाहीं हें ठरवितां येईल. आपल्या शारीरिक वा आधिभौतिक सामर्थ्यानें, जास्त प्रभावी हिंसेनें दुसऱ्यावर अधिकार गाजविणें हा जुलूम याचा अर्थ आहे. जर हा अधिकार बौद्धिक वा नैतिक श्रेष्ठतेनें गाजविला जात असेल तर त्यास जुलूम म्हणतां येत नाहीं.

सत्याग्रहांत आपणच क्लेशांना आमंत्रण देत असतों. ते आत्मक्लेश मर्यादित किंवा अमर्याद असतील. त्यांची मोजदाद करतां येईल किंवा येणारहि नाहीं. उपवास म्हणजे अमर्याद आणि अगणनीय क्लेश होत. म्हणून जर हेतु न्याय्य असेल, काळ योग्य असेल तर सरकार, एखादी जात किंवा भांडवलदार यांविरुद्ध केलेला उपवास हा जुलूम ठरण्याचें कारण नाहीं. परंतु हें मात्र कबूल केलेंच पाहिजे कीं, ते आत्मक्लेश अत्यंत श्रेष्ठ स्वरूपाचे असल्यानें उपवासाचा निर्णय घेण्यापूर्वी सर्व दृष्टीनें विचार केला पाहिजे आणि निर्णय अचूक होईल अशी दक्षता बाळगली पाहिजे. कोणत्याहि स्थितींत उपवासाची गोष्ट सत्याग्रहापेक्षां निराळी आहे. सत्याग्रह हा ज्याप्रमाणें सर्वांना सहज आणि कोणत्याहि कारणासाठीं करतां येतो तसें उपवासाचें नाहीं.

## निरोधन आणि बहिष्कार

सत्याग्रहाची गांधीजींची एक अचूक पद्धति म्हणजे निरोधन ( पिकेटिंग ) ही होय. हा शब्द जुलै १९२१ मध्यें दारूच्या दुकानावर आणि नंतर विलायती कापडावर निरोधन सुरू झालें त्या वेळींच लोकप्रिय झाला. हळूहळू निरोधनाच्या तडाख्यांत अनेक कार्यक्षेत्रें येऊं लागलीं. गांधीजींनीं असें नमूद करून ठेवलें आहे कीं, निरोधन हा कायदेशीर हक्क आहे. तो नैतिक हक्क आहे. जोंपर्यंत कोणतीहि व्यक्ति किंवा स्थल यांवर अत्याचार होत नाहीं आणि जोंपर्यंत विरोधी निदर्शनें किंवा अवमानकारक घोषणा करण्यांत येत नाहींत, तोंपर्यंत निरोधन थांबविण्याचें किंवा नियंत्रित करण्याचें मुळींच कारण नाहीं. निरोधन असो वा संप असो, मालक किंवा मध्यस्ती व्यक्ती यांच्यावर अत्याचार करणें किंवा हिंसा करणें या गोष्टींपासून आपण पूर्णपणें

अलिप्त राहिलें पाहिजे असें गांधीजी नेहमींच निक्षून सांगत आले आहेत. न्याय्य कारण, संपवाल्यांचा आत्मविश्वास, स्वावलंबन आणि संघटना या गोष्टी संपाची पूर्व तयारी म्हणून आवश्यक आहेत हें सांगावयास नकोच.

ब्रिटिश मालावर बहिष्कार आणि विलायती मालावर बहिष्कार या दोहोंत गांधीजींनीं सूक्ष्म भेद व्यक्त केला आहे. विलायती मालावरील बहिष्कार हा स्वावलंबन व स्वयंपूर्णत्वाचें ध्येय गांठण्याचा आर्थिक मार्ग आहे. ब्रिटिश मालावरील बहिष्कारांत द्वेषाची भावना आहे आणि त्यामुळें गांधीजींच्या मतें तो मार्ग गैर आहे. या दृष्टीनेंच, ५ मार्च १९३१ रोजीं गांधी-आर्विन करारावर शिक्कामोर्तब झाल्याबरोबर गांधीजींनीं ब्रिटिश मालावरील बहिष्काराची चळवळ एकदम बंद केली.

# धर्म ७

मित्र आणि शत्रु यांच्याशीं सारखाच सलोखा असावा आणि प्रत्येक प्राणिमात्राशीं एकरूप व्हावें असें जीवन घालविण्याची गांधीजींची महत्त्वाकांक्षा आहे. त्यांची राष्ट्रीयत्वाची कल्पना किंवा देशभक्ति, हा सुसंस्कृत स्वार्थ नाहीं किंवा त्यांत इतरांपासून वेगळें असण्याचीहि भावना नाहीं. अखंड स्वातंत्र्य आणि शांति ज्या ठिकाणीं आहेत त्या स्थलाकडे चाललेल्या प्रवासांतील एक टप्पा म्हणजे राष्ट्रीयत्व किंवा देशभक्ति. तें स्थल या जगाच्या पलीकडे नाहीं किंवा तें मेल्यानंतरच प्राप्त होतें असेंहि नाहीं. तो प्रवास इह लोकींचाच आहे आणि त्या प्रवासाचें मुक्कामाचें ठिकाण याच जगांत आहे. हाच गांधीजींचा धर्म होय. म्हणून ते म्हणतातः

" धर्मविरहित असें राजकारण असूंच शकत नाहीं. राजकारण धर्मांत अंतर्भूत आहे. धर्मविहीन राजकारण म्हणजे मृत्यूचा सांपळा होय. कारण असें राजकारण आत्म्याचा नाश करतें."

मनुष्याचें जीवन हें आत्मा व शरीर यांच्या सुखद आणि सुसंगत मीलनानें झालेलें असतें. शरीर हें आत्म्याचें साधन आहे. शरीर हें वाहन आहे. तेव्हां या दोहोंपैकीं कोणत्याहि एकाविषयींच सर्व आस्था बाळगली आणि दुसऱ्याची पूर्ण उपेक्षा केली तर जीवित हें निरर्थक होईल. म्हणून गांधीजींनीं,

स्वतः जगाचा आणि जागतिक व्यवहाराचा त्याग केला नाहीं; ते दऱ्याखोऱ्यांत जाऊन बसले नाहींत, किंवा शहरांतहि ते गुरफटले नाहींत. त्यांनीं आपलें सर्व लक्ष खेड्यांवर केंद्रित केलें आहे. खेडुतांच्या सेवेंतच आत्म्यास स्वतःची ओळख होते. शरीर आणि आत्मा यांच्या संबंधाप्रमाणेंच गांधीजींच्या मतें राजकारण आणि धर्म यांचे संबंध आहेत. बुद्धादिकांच्या जीवनांत मुख्यतः निवृत्ति आणि तत्त्वप्रसारादि कार्यासाठीं मात्र प्रवृत्ति असे दोन प्रकार आळीपाळीनें आलेले दिसतात. गांधीजींनीं असा मार्ग कधीं अनुसरला नाहीं. गांधीजींनीं राजकारणावर धर्माचा बोजा लादला किंवा राजकारणानें धर्म भ्रष्ट केला असा त्यांच्यावर आरोप करणें म्हणजे जीवन किंवा मानवी समाज यांची घटना आणि कार्यें यांविषयीं अज्ञान दाखविणें होय.

शत्रु आणि मित्र यांना ते सारखेच लेखतात आणि जर आपणास दोघांशींहि झगडावें लागणार असेल तर आपणांस अहिंसावादाच्या मर्यादेंतच तो झगडा करतां येईल.

हिंदुस्थानांत धार्मिकतेचा लोप होत आहे, याविषयीं गांधीजींना अतिशय खेद होतो. ते कोणत्याहि विशिष्ट धर्मपंथाविषयीं खेद करीत नाहींत, तर सर्व धर्मपंथांस मूलभूत अशीं जीं धर्मतत्त्वें आहेत त्यांचा लोप होत असल्याबद्दल त्यांना खेद होतो. आपण परमेश्वरापासून दूर चाललों आहोंत अशी त्यांना भीति वाटते आणि त्या भावनेनें ते व्यथित होतात. सत्य हाच परमेश्वर अशी गांधीजींनीं परमेश्वराची व्याख्या एकदां सांगितली आहे. दुसऱ्या एका प्रसंगीं त्यांनीं सांगितलें:

" अतर्क्य, गूढ अशी जी शक्ति आहे, जी सर्वव्यापी आहे, जी चैतन्यमय आहे, अव्याहतपणें बदलणाऱ्या आणि नाश पावणाऱ्या या विश्वांतील सर्व घडामोडींच्या मुळाशीं जी शक्ति आहे, जी स्वतः निर्विकार आहे, जी शक्ति वस्तुमात्राची निर्मिति, धारणा, नाश आणि पुनर्निर्मिति करते ती शक्ति किंवा तत्त्व म्हणजेच परमेश्वर. "

## गांधीजी–एक सनातनी !

जगांतील धार्मिक माणसांना गांधीजी हें एक मोठें कोडें आहे. ते स्वतःस

अभिमानानें सनातनी म्हणवितात. परंतु "वेदांना सर्वश्रेष्ठत्वाचा मान देण्यास किंवा त्याचप्रमाणें बायबल, कुराण किंवा झेंद-अवेस्ता यांनाहि अनन्यत्वाचा मान देण्यास मी तयार नाहीं, तशी माझी श्रद्धा नाहीं" असें जाहीरपणें सांगण्यास गांधीजी कचरत नाहींत. ते सर्वांना समान लेखतात. अहिंसा, सत्य, ब्रह्मचर्य आणि अपरिग्रह हे सनातन-धर्ममंदिराचे आधारस्तंभ आहेत असें गांधीजी मानतात. केवळ ज्ञानास ते महत्त्व देत नाहींत. पूर्ण ज्ञान आणि पूर्ण पावित्र्य यांचें मीलन झालें पाहिजे असें त्यांचें ध्येय आहे. ते म्हणतातः

"माझ्या मतें वर्णाश्रम हे मानवी स्वभावांतच अंतर्भूत आहेत. हिंदुधर्मानें वर्णाश्रम धर्माचें फक्त शास्त्र बनविलें आहे. चार वर्ण हे मानवाचे चार व्यवसाय आहेत. सामाजिक संबंधांचें नियमन किंवा नियंत्रण करावें असा वर्णविभागाचा मुळींच हेतु नाहीं."

सारख्याच दर्जाची सेवा सर्वांकडून व्हावी याच हेतूनें वर्णव्यवस्था केलेली आहे. गांधीजींनीं आपल्या जीवनांत, चार वर्ण व चार आश्रम यांचें एक नवें समीकरण सिद्ध केलें आहे. त्या समीकरणाप्रमाणें ज्ञानप्रसार करणारे ते ब्राह्मण, संरक्षणाची हमी घेणारे ते क्षत्रिय, धनसंचय करणारे ते वैश्य आणि धनोत्पादक ते शूद्र होत. या जीवनपद्धतीप्रमाणें आश्रम हें वर्णाचें अनुषंगिक स्वरूप होय. वर्णांनीं समाज—सर्व हिंदुसमाज—व्यापला आहे. आश्रमव्यवस्था प्रत्येक हिंदूच्या वैयक्तिक जीवनाचें नियमन करते. ब्रह्मचर्य, विवाह, वानप्रस्थ आणि संन्यास या मानवी जीवनाच्या उत्क्रांतीच्या चार अवस्था आहेत. ही उत्क्रांति ज्ञान, श्रद्धा आणि सेवा या मार्गानें होत होत शेवटीं केवळ त्यागवृत्तींत तिचें पर्यवसान होतें.

गांधीजी मूर्तिपूजेस निषिद्ध मानीत नाहींत. हिंदुधर्म सर्व धर्मांविषयीं सहिष्णु आहे. 'आपलाच मार्ग खरा आहे' असा हिंदुधर्माचा अट्टाहास नाहीं. गांधीजींच्या जीवनांत ख्रिस्तीधर्माशीं इतकें साम्य दिसतें कीं, जगांतील ख्रिस्ती मुत्सद्दी त्यांच्याकडे आकर्षिले जातात. "जो तुमच्यामध्यें श्रेष्ठ होणार असेल तो तुमचा सेवक असावा" असें येशू ख्रिस्त म्हणाला. गांधीजी तसेच आहेत.

हिंदुधर्म हा शरीराचा निरास करणारा धर्म आहे. शरीरबंधांतून सुटल्या-

वर आत्मा मुक्त होतो आणि अशा रीतीनें आत्मसंयमाची अंतिम मर्यादा गांठतां येते, असें गांधीजी मानतात.

### गांधीजी आणि ख्रिश्चनधर्म

" मनुष्यजातीचे जे महान् आचार्य असतात त्यांना जें स्थान प्राप्त होतें तें त्यांना कोणी देत नाहीं. तें त्यांचें हक्काचें स्थान असतें. तें त्यांच्या सेवेनेंच त्यांस प्राप्त होतें. परंतु आपल्यांतील जे नम्रांत नम्र आणि दीनांत दीन आहेत त्यांनीं अशा सेवेविषयीं कांहीं विशिष्ट भावना बाळगणें हें सेवकाचें भाग्य होय." असें गांधीजींचे उद्गार आहेत.

हिंदुस्थानांत संतांच्या आणि धर्मवीरांच्या, आणि जगांतील महात्म्यांच्या मालिकेंत गांधीजींना जें स्थान प्राप्त झालें आहे तें त्यांनीं स्वतःच निर्माण केलें आहे.

समाज हें कुटुंबाचेंच व्यापक रूप होय असें गांधीजी मानतात आणि त्यामुळें सामाजिक प्रश्न सोडवितांना त्यांना कौटुंबिक अनुभव मार्गदर्शनाच्या कामीं अतिशय महत्त्वाचे वाटतात. त्यांच्या मतें, आपले महान् आचार्य आणि आपण यांचें नातें कांहींसें पतिपत्नीसारखें आहे. आपल्या जीवनांत पत्नीच्या स्थानाचा आपण केवळ बौद्धिकदृष्ट्या विचार करूं लागलों तर ती मोठी शोककारक घटना ठरेल.

स्वतः कोणत्याहि पंथाचे असले तरी जे दुसऱ्या धर्मपंथांच्या शिकवणुकींचा आदरपूर्वक अभ्यास करतात त्यांचीं मनें संकुचित न होतां उदार आणि व्यापक होतात असें गांधीजी सांगतात. बौद्धिक शिक्षणांत ( Liberal Education ) सर्व धर्मपंथांच्या अभ्यासाचा समावेश झाला पाहिजे. अंतःकरणाची संस्कृति मनाच्या संस्कृतीपेक्षां श्रेष्ठ ठेवणें हेंच गांधीजींच्या मतें सर्व शिक्षणाचें आधारभूत तत्त्व आहे. ते म्हणतातः

"ईश्वरी नियमांचें पालन हीच धर्माची निर्णायक व्याख्या म्हणून सांगतां येईल. ईश्वर आणि ईश्वरी नियम हे शब्द समानार्थी आहेत. म्हणूनच परमेश्वर या शब्दानें अविकार्य आणि सगुण व्यक्तीचा बोध होतो. वस्तुतः परमेश्वर कोणासहि सांपडला नाहीं. परंतु अवतार आणि धर्मसंस्थापक ( Prophets ) यांनीं आपल्या तपस्येनें मानवजातीस त्या शाश्वत नियमांची कांहींशी ओळख

करून दिली आहे. आपलीं अंतःकरणें स्वच्छ आणि शुद्ध करून सिद्ध ठेवावींत यासाठीं आपणांपैकीं प्रत्येकास नैतिक साफसफाईचें काम नेमून दिलें आहे.''

येशू ख्रिस्त हा एक धर्मवीर आहे. त्यागाचें तो मूर्तिमंत स्वरूप आहे, दैवी उपदेशक आहे असें गांधीजी मानतात. परंतु तो सर्व मानवांपेक्षां पूर्ण आहे असें मानावयास मात्र ते तयार नाहींत. त्यांना असें वाटतें कीं, त्यागाच्या बाबतींत हिंदु लोकांनीं ख्रिस्ती लोकांना कितीतरी मागें टाकलें आहे.

" हिंदु धर्मानें माझ्या मनाचें पूर्ण समाधान होतें. त्यानें माझें सर्व जीवन व्यापलें आहे. पर्वतावरील प्रवचनांतहि ( Sermon on the Mount ) मला जें समाधान लाभत नाहीं तें मला भगवद्‌गीता आणि उपनिषद् यांनीं दिलें आहे.'' गांधीजींनीं सर्व धर्मपंथांचा अभ्यास केला. सर्व ( आपापल्यापरी ? ) बरोबर आहेत असें त्यांना आढळून आलें, परंतु त्याचप्रमाणें सर्व धर्म अपूर्ण आहेत हेंहि त्यांनीं ओळखलें.

## गांधीजींचा धर्म

गांधीजी हे अत्यंत निष्ठावंत धार्मिक आहेत, परंतु कर्मबंधापासून ते मुक्त आहेत हें त्यांच्या बाबतींत विशेष आहे. ते भावना आणि विकार यांना बळी पडत नाहींत. आपलें स्वतःचें सूत कांतण्याचें धर्मकृत्य ते करतात; परंतु आपल्या कोणत्याहि कृत्याचा ते बडेजाव करीत नाहींत. सूत काढणें हें त्यांना कर्तव्य वाटतें. संध्यावंदन, ब्रह्मयज्ञ, पितृतर्पण हीं सनातन्यांस जितकीं पवित्र वाटतात तितकेंच गांधीजींना सूत कातणें हें पवित्र कृत्य वाटतें. बुद्धीचें इच्छाशक्तीशीं हितगुज हीच ध्यानधारणा होय असें गांधीजी म्हणतात. केवळ कल्पनागम्य अशा स्वप्नाळु जगांत ते वावरत नाहींत. आपल्या विद्यालयांनीं ज्या गोष्टींच्या अध्यापनाची सोय केलेली नाहीं त्या भावना व वास्तवता यांच्या संकलनाचे गांधीजी हे महान् आचार्य आहे. ते जीवितांतील वस्तुस्थितींत, वास्तवतेंत आपलें मन घालतात. जग हें एक कुटुंब आहे. त्यांतील प्रत्येक घटक सुदृढ झाला पाहिजे आणि या बाबतींत हिंदी राष्ट्रीय जीवन हें पूर्णत्वास पोहोंचलेल्या समष्टीसारखें झालें पाहिजे. असें परिणत समष्टि-जीवन हें इतर घटकांस नुसतें आदर्शासारखें न ठरतां, त्यामुळें सर्व

पान ९८ २ ८०६२३ राज १५३

घटक संघटित झाले पाहिजेत आणि कलात्मक श्रेष्ठत्व, आर्थिक स्वयंसिद्धत्व आणि अचल नीतिमत्ता हीं पूर्णत्वास जाऊन मानवी जीवितची उंची वाढली पाहिजे.

हाच गांधीजींचा धर्म आहे. तो धर्म प्रत्यक्षांत व्यक्त झाला आहे.

## त्या धर्माचें सामर्थ्य

नम्रता हेंच गांधीजींचें शक्तिसर्वस्व आहे. अहिंसा याचा अर्थ सर्वांविषयीं प्रेम आणि औदार्य असा आहे. या अर्थाप्रमाणें, निर्लोभ किंवा अपरिग्रह यांनीं 'अहं'चा लोप करणें हें अहिंसावादांत सूचित होतें. याचाच नैसर्गिक परिणाम नम्रतारूपानें दिसतो. दुसऱ्याची सेवा करण्यांत वाटणारा आनंद हें नम्रतेचें लक्षण आहे. नम्रता आणि निर्लोभ, नम्रता आणि निरिच्छता, नम्रता आणि ब्रह्मचर्य हीं स्वभावतः परस्परांशीं संबद्ध आहेत. त्यांच्यांत कार्यकारणभाव आहे. प्रेम, दीर्घ क्लेश, हेतुशुद्धि, गर्व आणि साशंकता यांपासून अलिप्तता, निरिच्छता आणि निर्भय हे गुण प्रगट होणें हें त्या कार्यकारणसंबंधाचें पर्यवसान होय. 'जे नम्र आहेत ते भाग्यवान् आहेत. कारण पृथ्वीच्या राज्याचे ते वारस आहेत' असें ख्रिस्त २००० वर्षांपूर्वी म्हणाला. तें आजहि खरें आहे. फक्त नम्रतेवर नम्र माणसांची श्रद्धा मात्र पाहिजे. गांधीजींनीं आपल्या जीवनानें ती श्रद्धा प्रकट केली आहे.

वक्तृत्व, लेखन, संपत्ति, या बाबतींत कितीतरी माणसें गांधीजीं-पेक्षां श्रेष्ठ असतील; परंतु तरी कांहींशी बुटकी आणि अशक्त असलेली आणि सामान्यांपेक्षां थोडेंसें जास्त कर्तृत्व असलेली अशी ही व्यक्ति, राजे व महाराजे यांच्यावर सत्ता गाजवीत आहे. अरेराव आणि लोक-सत्तावादी यांच्यावर तिनें अधिकार गाजविला. विद्वान् आणि निरक्षर, प्रधान आणि इतर राज्यसूत्रधारी, अर्थशास्त्रज्ञ आणि धर्मशास्त्राधिकारी या सर्वांचें तिनें सारखेंच लक्ष वेधलें. हें बुद्धिमत्तेचें बल नव्हे, वक्तृत्वाचा प्रभाव नव्हे, नैतिक सिद्धांतांचें हें दडपण नव्हे किंवा अर्थशास्त्रांतील प्रभुत्वहि नव्हे. या प्रभावाचें गमक एकच आहे. तें म्हणजे गांधीजींनीं आपलीं तत्त्वें आचरणांत आणलीं; जें आचरलें तेंच सांगितलें आणि पवित्र जीवनाचा मार्ग स्वीकारला. वीरश्रीचें त्यांना कांहींहि आकर्षण वाटत नाहीं. कीर्ति

त्यांच्या खिजगणतींत नाहीं. संख्याबलानें त्यांच्या सामर्थ्यांत फरक पडत नाहीं. इतरांनीं सोडून दिलें तरी एकाकीपणामुळें ते गोंधळून जात नाहींत. नैराश्यांधःकारांत एकटे असतांनाच त्यांना आपल्या अंतश्चक्षूचा प्रकाश दिसतो. कोलाहलाच्या परिस्थितींत ते आपल्या आंतल्या आवाजाच्या आदेशास अनुसरतात; कारण गर्वापासून अलिप्त असल्यामुळें, आणि वासना आणि भय यांचें नियमन केल्यामुळें त्यांनीं यौगिक मार्गानें लाभणारी सूक्ष्म दृष्टि संपादन केली आहे व नम्रता ही मूलवृत्ति संवर्धित केली आहे. त्यामुळें नम्रतेपासून होणारा लाभ ते शेंकडो सद्गुणांच्या रूपानें मिळवूं शकतात. मानवी श्रेष्ठत्व बहुविध आहे. त्या श्रेष्ठत्वाचीं बीजें जितकीं खोल रुजलीं असतील त्यावरच त्या श्रेष्ठत्वाचें चिरंतनतत्व अवलंबून असतें. नम्रता हें त्या चिरंतनतत्त्वाचें स्वरूप आहे. नम्रता हें त्याचें गमक आहे.

गांधीजी एकदां आपली हिरवी पालेभाजी आणि कोरडी भाकरी खात होते. त्या वेळीं लेखकानें त्यांना विचारलें, "महात्माजी, तुम्हांला तुमचें जेवण आवडतें का ?" ते म्हणाले, "होय." लेखकानें पुन्हां विचारलें, "अगदीं मनापासून आवडतें ?" गांधीजी म्हणाले, "तें मला सांगतां येणार नाहीं. जो आपले खाद्य पदार्थ निवडून घेतो, ते शिजविण्याची विशिष्ट पद्धति ठरवतो, विशिष्ट चव आणि वास त्या अन्नास यावा अशी ज्याची अपेक्षा असते, आणि तें मनाप्रमाणें झालें म्हणजे ज्याला समाधान वाटतें त्यालाच त्या जेवणाविषयीं विशेष बढाई आणि आवड असते." गांधीजींचा हेतु पाशवी वासनांचें नियमन हा आहे आणि आपल्या जिव्हालौल्यापासूनच ते नियमनास सुरवात करतात.

वासनात्मक उपभोगाच्या आहारीं गेल्यानें निसर्गाविरुद्ध संचय करण्याची प्रवृत्ति यासारखे दुर्गुण न कळत उत्पन्न होतात. सर्व गुणांत श्रेष्ठ आणि जास्त परिणामक्षम असा अपरिग्रह हा गुण आहे. या सद्गुणाप्रमाणें आचरण होऊं लागलें कीं, सेवेची अनेक प्रसंगीं संधि लाभते, मन निरिच्छ आणि निर्भय होतें आणि आयुष्य हें सत्य आणि अहिंसा यांच्या प्रयोगास अत्यंत योग्य असें माध्यम होतें.

प्राचीन ऋषींनीं तपस् म्हणून जें सांगितलें, त्यांत यम, दम, धर्म, दान, शौच आणि क्षमा यांचा समावेश होतो. या तपस्संपन्न जीवनांत शरीरावर

ताबा मिळवितां येतो, इंद्रियांचें नियमन करतां येतें, वासनांचें निर्मूलन होतें. क्रोधाची परतफेड क्षमेनें करतां येते, शुद्धता सर्व आचरणावर अधिकार गाजविते, आणि सर्वांभूतीं प्रेम हा निरपवाद नियम होतो.

## धर्म आणि राजकारण

पाश्चात्यांचीं मनें ज्या वातावरणांत तयार होतात, त्या वातावरणांत जीवनाचे सामाजिक, राजकीय, धार्मिक असे अलग अलग भाग पाडलेले असतात.

अशा पाश्चात्यांना गांधीजी हें एक गूढच वाटतें. अशा कांहीं ख्रिस्ती धर्मप्रसारकांनीं एकदां गांधीजींना विचारलें, " हिंदुस्थानसाठीं तुम्ही जें कार्य करतां त्या कार्याचा मूळ हेतु काय आहे ?"

गांधीजी म्हणाले, " माझा हेतु शुद्ध धार्मिक आहे. सर्व मानव जातीशीं एकरूप झाल्याखेरीज मला धार्मिक जीवन जगतांच आलें नसतें आणि राजकारणांत भाग घेतल्याखेरीज मला हें साधलें नसतें. सामाजिक, राजकीय, आणि धार्मिक कार्यांचे तुम्हांला असे अगदीं अलग अलग कप्पे पाडतां येणार नाहींत. मानवी कार्यापासून अलिप्त असा धर्म मला माहीत नाहीं. धर्मानें इतर सर्व कार्यांस नैतिक आधार प्राप्त होतो. त्या आधारावांचून जीवितांतील हालचाली निरर्थक होतात."

या दृष्टीमुळें गांधीजींचें जीवित अतिशय व्यापक झालें आहे. त्यांना दूरदूरच्या देशांतील आणि विविध धर्मपंथांतील अनुयायी मिळवितां येतात. मूर्तिपूजक, अग्निपूजक आणि सत्यस्वरूपी परमेश्वराचे आराधक या सर्वांचा गांधीजी संग्रह करूं शकतात. ते म्हणतातः

" मी राजकारणांत भाग घेतांना दिसलों तरी त्याचें कारण एवढेंच कीं, आज आपलें जीवितच राजकारणानें व्यापून टाकलें आहे. एखाद्या अजगराच्या विळख्याप्रमाणें राजकारणाचा विळखा जीविताभोंवतीं बसला आहे. कितीहि धडपड केली तरी त्यांतून सुटका होणें कठीण आहे. त्या अजगराशीं झगडावयाचें आहे. राजकारणांत धर्माचा प्रस्ताव करण्याचा मी प्रयत्न करीत आहें.

"मला जीं जीं धार्मिक माणसें भेटलीं त्यांतील बहुतेक अप्रत्यक्षपणें

राजकारणीच होतों. मी मात्र राजकारणाच्या वेषांत वावरणारा पण मनानें धार्मिक असा माणूस आहें."

१९१७ मध्यें मॉटेग्युसाहेबांनीं हिंदुस्तानला भेट दिली. त्या वेळीं त्यांनीं गांधीजींना विचारलें कीं, "वास्तविक समाजसुधारक असलेल्या अशा तुमच्या-सारख्या माणसानें राजकारणांत प्रवेश कां केला ?"

गांधीजींनीं उत्तर दिलें: "मी समाजसुधारक आहें म्हणूनच मला राज-कारणांत प्रवेश करावा लागला."

## हिंदी राजकारणाची व्याप्ति

हिंदुस्तानांत राजकारण हीच जीवितास वळण देणारी मुख्य भावना ठरली आहे. या देशांतील नामवंत लोक राजकारणी आहेत. येथील वृत्तपत्रें राजकार-णाचीच मुख्यतः चर्चा करतात. ज्या गोष्टींचा राजकारणांत साहजिकच समावेश होतो त्या सर्व गोष्टींनाहि अलीकडे राजकारणानें व्यापून टाकलें आहे. परकीय सत्तेविषयींच्या प्रक्षोभाकडून आतां हिंदी राष्ट्रीयत्वाच्या वैशिष्ट्य-पूर्ण पुनर्रचनेपर्यंत राजकारणानें मजल मारली आहे. खादी हें केवळ पुनरुज्जीवनाचें प्रतीक राहिलें नाहीं. तर पुनर्घटित समाजाचा तो मुख्य आधार आहे. दारिद्र्यनिवारणाची ती गुरुकिल्ली ठरली आहे. ज्या ग्रामोद्योगांनीं हिंदी खेडीं हीं पुन्हां एकदां हिंदी राष्ट्रीयत्वाचा पाया होतील त्या ग्रामोद्यो-गांत खादी हा आद्य व्यवसाय ठरला आहे. गांधीजींच्या प्राणांतिक उपो-षणामुळें अस्पृश्यतानिवारण होऊन हरिजनांना सहजपणें राजकीय जीवनांत इभ्रत प्राप्त झाली आहे. आज मान ताठ करून, मुद्रेवर स्वाभिमानाचें तेज प्रकट करीत हरिजन वावरत आहेत.

मद्यरूपी राक्षसाचें निर्मूलन अद्याप व्हावयाचें आहे आणि हिंदु-मुसल-मानांतील तेढहि अद्याप निघावयाची आहे. परंतु प्रांतिक स्वायत्तता मिळवून या गोष्टी व्हावयाच्या होत्या. १९३५ च्या कायद्यानें ज्या निवडणुकी होणार होत्या त्या वेळीं सुधारणा घ्याव्यात, कीं बहिष्कार टाकावा, कायदेमंडळांत आणि प्रधान मंडळांत शिरून त्या कायद्याशीं झगडावें, कीं बाहेर राहून त्यांना विरोध करावा, या प्रश्नांनीं १९३५ सालापासून गांधीजींचें मन व्यग्र झालें आहे.

गांधीजींच्या दृष्टीनें हे प्रश्न स्वातंत्र्याच्या मुख्य प्रश्नापासून अलग करतां येत नाहींत. स्वातंत्र्याच्या मुख्य प्रश्नांतूनच हे प्रश्न निर्माण होतात. हे सर्व प्रश्न गांधीजींनीं राजकारणी माणसाच्या पद्धतीनें सोडविले नाहींत, तर एखादा ईश्वरी संदेशवाहक या प्रश्नाकडे ज्या दृष्टीनें पाहतो तशा दृष्टीनें त्यांनीं हे प्रश्न सोडविले आहेत. या प्रश्नांच्या शुद्ध राजकीय स्वरूपापेक्षां त्यांतील नैतिक आणि आत्मिक भागांस नेहमींच प्राधान्य मिळालें आहे. घटना आणि कार्य या दृष्टीनें जें राष्ट्र, शुद्ध हिंदी स्वरूपाचें होईल त्या राष्ट्राचा पाया तयार करण्याच्या कामीं धर्म आणि राजकारण यांचें संकलन अतिशय साहाय्यक ठरलें आहे. परंतु या संकलनांतूनच धार्मिक आणि व्यावहारिक यांच्यांत तेढ माजली आहे. काँग्रेस आणि आश्रम, राजकीय संघटना आणि नीतिप्रधान संस्था यांच्यांत या संकलनानेंच द्वंद्व उत्पन्न झालें आहे.

नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत

# गांधी-आश्रम ८

आश्रम हीं संशोधनकेंद्रें आहेत. त्या ठिकाणीं नव्या सत्यांना विवेकाची जोड मिळते ( नवीं सत्यें तर्कशुद्ध होतात. ) किंवा जुन्या सत्यांचें पुनराविष्करण होतें. आश्रमांतील कार्य हें केवळ विशदीकरणाचें नाहीं. त्यांत प्रचारकार्यहि होतें. सत्यप्रसारास आवश्यक अशा वाङ्मयाचा प्रसार करणें हेंहि आश्रमाचें कार्य असतें. तेथील अनुयायी आपल्या कल्पना आचरणांत आणतात आणि तत्त्वसंशोधकानें शोधलेल्या उच्चतर समाजजीवनाचे लहान आदर्श उभारण्याचें कार्य करतात. खंडीभर तात्त्विक विवेचनापेक्षां लहानसें उदाहरण जास्त चांगलें, हेंच जुनें तत्त्व आश्रमांत आहे. उदाहरणार्थ, सूतकताईविषयीं तुम्हीं व्याख्यानें झोडाल, परंतु तुम्हीं स्वतः कातलेल्या सुतानें विणलेल्या कापडाचा तुकडा पाहून लोकांच्या मनावर जास्त चिरस्थायी परिणाम होतो. याच पद्धतीनें प्राचीन ऋषींनीं आपली संस्कृति आणि तत्त्वज्ञान यांचा प्रसार केला. गांधी-सेवासंघ ही अशी एक संघटना आहे. त्या संघटनेंत गांधीजींच्या तत्त्वज्ञानाचा स्वीकार करणाऱ्या निष्ठावंत व्यक्तींचा समावेश होतो. अशा संस्थांत प्रवेश मिळविण्यासाठीं प्रवेशकास अतिशय कडक शिस्तीची दीर्घकालीन उमेदवारी करावी लागते. अशा संस्थांचा मुख्य उद्देश

असा असतो कीं, ( अकिंचनत्व ) दारिद्र्य, शिस्त, सेवा आणि त्याग हीं ज्ञानाशीं निगडित झालीं पाहिजेत.

गांधींच्या आश्रमांत कांहीं मूलभूत सिद्धांत असले तरी तेथें ठराविक नियम किंवा कायदे असे नसतात. पुढारी जो दृष्टिकोण स्वीकारील त्यावर ज्यांचें कर्तृत्व अवलंबून असतें अशा व्यक्तींचा संघ आश्रमांत असतो. पुढारी निघून गेला कीं, त्यानें स्थापिलेला पंथहि नाहींसा व्हावा अशीच अशा संघटनांची स्थिति असते. तरी त्यामुळें त्यांची उपयुक्तता कमी ठरत नाहीं.

## गांधी-आश्रमाचें स्वरूप

हें कांहींहि असलें तरी, अहिंसेच्या धोरणानें राष्ट्रीय प्रगतीचा मार्ग निश्चित करण्याच्या कामीं आणि संस्कृति आणि अर्थशास्त्र या बाबतींत जी नवी समाजव्यवस्था स्थापना करावयाची आहे त्याचा पाया खेडेगांव हा आहे. तो पाया तयार करण्याच्या बाबतींत गांधी-आश्रमांनीं पुष्कळ कार्य केलें आहे. मात्र या आश्रमांत सकृत्‌दर्शनीं एक दोष दिसतो. तो म्हणजे तीन तास सूतकताई, आणि इतिहास-भूगोलाच्या अभ्यासापेक्षां जीवितयुद्धाच्या तयारीस जास्त उपयुक्त मानणें. याचा परिणाम असा झाला आहे कीं, या स्फूर्तिशून्य यांत्रिक शिस्तीनें चमत्कारिक आणि अनपेक्षित घटना घडतात. शिक्षणाची सर्व पद्धति येथें निराळी आहे. मूळाक्षरांचें ज्ञान, साक्षरता आणि स्मरण हीं एका ठिकाणीं केंद्रित केलीं आहेत. परंतु हें केंद्र म्हणजे एखादा व्यवसाय (craft) ठरविण्यांत आला आहे. नव्या भारताच्या गरजांस अनुसरून देशांतील तरुण पिढीचें शिक्षण आणि कर्तृत्व असलें पाहिजे. त्यांत शेती, व्यवसाय, आणि मूलभूत संस्कृति यांवर मुख्य भर दिला पाहिजे. या धोरणाप्रमाणें आश्रमांनीं आपल्या कार्यक्रमास जोड दिली आहे आणि खेडेगांवांची सेवा करण्याचा सहज मार्ग म्हणून वैद्यकीय शिक्षणाचाहि समावेश केला आहे. मोठमोठ्या संघटित औद्योगिक केंद्रांच्या आधीं ज्याप्रमाणें ‘ आद्यप्रवर्तक ’ असे प्रायोगिक स्वरूपाचे कारखाने निघतात, तसे हे आश्रम आहेत. ते आपल्या आचरणानें श्रद्धा सिद्ध करतात आणि अशा आचरणासाठीं स्वतःवर शिस्तीचीं बंधनें लादून घेतात.

व्यक्तिशः त्यांचीं कांहीं कर्तव्यें असतात आणि त्यांच्यावर कांहीं जबाबदारी

असते आणि मोठ्या समुदायाचे घटक या दृष्टीनें त्यांचा एक दृष्टिकोन तयार व्हावयाचा असतो. त्या मोठ्या समुदायास सामान्यतः समाज असें आपण म्हणतों. आपलीं तत्त्वें बहुजनसमाजास स्वीकार्य वाटावीत, असा त्यांचा हेतु असतो. कारण सत्य काय किंवा अहिंसा काय ही कांहीं ठराविक व्यक्तींची किंवा ठराविक गटाची मिरासदारी होऊं नये. या आश्रमवासीयांना बहुजनसमाजाचे पुढारी होण्याची महत्त्वाकांक्षा असावी. तें पुढारीपण मानाच्या लोभानें मिळणारें नसून अहिंसात्मक मरण पत्करण्याच्या तयारीनें मिळणारें असावें. अशा रीतानें आपण शांति-सैन्याचा किंवा शांतिदलाचा पाया घालीत असतों आणि त्याच वेळीं सामुदायिक सत्याग्रहाचीहि भूमिका तयार करीत असतों. हें कदाचित् फाजील आशावादीपणासारखें वाटेल; परंतु बहुजनसमाजावर अशा चेतनाशक्तीचा योग्य आणि त्वरित परिणाम झाल्याखेरीज राहत नाहीं हें सत्य आहे.

## आश्रमांतील जीवन

गांधी-आश्रमांत प्रवेशेच्छूस करावी लागणारी आणि आश्रमस्थास आनंद-दायक झालेली अशी शिस्तीची पहिली गोष्ट म्हणजे शारीरिक कष्टाचीं आणि कनिष्ठ प्रकारचीं कामें करावीं लागणें. स्वतःचीं भांडीं घासणें, कपडे धुणें, खोली झाडणें, झोंपडी बांधणें या गोष्टी अगदीं 'भलत्या' आहेत असें नाहीं. अर्थात् आपली तरुण पिढी वसतिगृहांत ज्या तऱ्हेनें राहते त्या दृष्टीनें या गोष्टी खात्रीनें विचित्र वाटतात. हें एक असो, परंतु जेव्हां आश्रमवासीयांना मैला साफ करणें, केराच्या टोपल्या उचलणें अशीं कामें करावीं लागतात त्या वेळीं एखाद्यास सहज वाटतें कीं, हा शिस्तीचा प्रकार नुसता नवाच नाहीं तर जुलमाचाहि आहे. परंतु जेव्हां पदवीधर तरुण-स्त्रीपुरुष दैनंदिन कामाचाच एक भाग म्हणून हीं कामें सहनशीलतेनें, मनःपूर्वक आणि आनंदानें करतात त्या वेळीं तो कामाचा आनंद दूरवरहि पसरतो आणि आश्रमांतील पाहुण्यांवरहि त्याचा परिणाम होतो. कारण त्या कामांतील अलौकिकत्वाचा आनंद ताबड-तोब नाहींसा होत नाहीं. नवीं कर्तव्यें करीत राहिल्यानें त्या कर्तव्याविषयींची श्रद्धा वाढत जाते, आणि लवकरच समाजांतील भंगी वर्गाविषयीं मनांत प्रेम आणि सहानुभूति वाटूं लागते. भंगी तुमचें आयुष्य सुखी करतो आणि

त्याचा मोबदला काय तर तो अस्पृश्य म्हणून बाजूस फेंकला जातो! सेवाकर्माच्या सहवासानें माणुसकी जागृत होते आणि जगाविषयीं आपुलकी वाटूं लागते. कामाच्या आणि अन्नाच्या नियमित वेळा, चमचमीत आणि उत्तेजक पदार्थांपासून अलिप्त परंतु सत्त्वदृष्ट्या संपन्न असें नियमित अन्न, सकाळीं आणि रात्रीं नियमित प्रार्थना, व्यवसाय-शिक्षणाखेरीज धार्मिक व्रतासारखें सूतकताईचें काम, पाहुण्यांचें आदरातिथ्य, गुरुशिष्यांतील संवाद, चर्चा, संभाषणें, स्त्री-पुरुषांचें अनिर्बंध संचलन, बागकाम, मोकळी हवा, शारीरिक श्रम या सर्व गोष्टींनीं आश्रम-जीवनांत पूर्णत्व आणि चैतन्य प्राप्त होतें. याशिवाय, मधून मधून उपवास आणि मौन हीं शरीरास आणि मनास खरोखरच आरोग्यवर्धक ठरतात आणि तीं पुन्हां जास्त कार्यक्षम होतात.

आश्रमांतील कामांमध्यें विधायक कार्यक्रमाचा समावेश होतो. तीं कामें ज्याला लोक कनिष्ठ आणि शारीरिक कष्टाचीं कामें म्हणतात अशीं असतात. शारीरिक श्रमांत मूलतः कनिष्ठ असें कांहीं नाहीं. सूतकताई, विणकाम, पिंजणें आणि पेळू करणें इत्यादि शारीरिक कामें उन्नतिकारक आहेत. गरिबांस शिक्षण देणें, गरजू माणसांस वैद्यकीय मदत करणें, प्रसंगविशेषीं सामुदायिक कार्य करणें, आरोग्य आणि स्वच्छता यांचा अव्याहत प्रचार, ग्रंथालयें चालविणें, लवाद कोर्ट स्थापणें, प्रदर्शनें भरविणें, प्रौढ शिक्षणाचा एक भाग म्हणून सामान्य ज्ञानाचा प्रसार करणें या गोष्टी करतांना ब्रह्मचर्यव्रतपालन आणि असंग्रह यांचें आचरण अशा शिक्षणानें देशसेविका आणि देशसेवक तयार होतात. मातृभूमि स्वतंत्र झाल्यावर समाजोन्मुख अशी जी आर्थिक पुनर्घटना करावयाची आहे त्या पुनर्घटनेच्या अफाट कार्यासाठीं आश्रमांतून कार्यकर्ते स्त्री-पुरुष तयार होत आहेत.

# गांधीवाद आणि सोशॅलिझम् ९

## हिंदुस्तानांतील विकृत प्रगति

एक राष्ट्र ज्या वेळीं दुसऱ्या राष्ट्रावर विजय मिळवितें आणि तो विजय ज्या वेळीं बहुविध होत जातो, त्या वेळीं विजयी राष्ट्राच्या संस्कृतीची आणि सुधारणेची छाप पराभूत राष्ट्रावर बसण्यास फारसा काळ लागत नाहीं. विजयी राष्ट्र आपल्या कला आणि व्यवसाय, राष्ट्रीय जीवनाचें ध्येय आणि हेतु हीं पराभूत राष्ट्रावर हळू हळू लादूं लागतें. हिंदुस्तानांत गेल्या ऐंशी वर्षांत हेंच झालें आहे. १८५७ च्या बंडापासून हिंदी समाजाचें स्वरूप फारच बदलत चाललें आहे. पाश्चिमात्य संघटना-पद्धति, जीवन व वाङ्मय यांचा हिंदी जीवनावर खोल परिणाम झाला आहे. हा परिणाम फक्त विश्वविद्यालयें, न्यायालयें आणि कायदेमंडळें एवढ्यांपुरताच मर्यादित राहिला नसून हिंदी बाजारपेठेवरहि तो परिणाम झाला आहे. लोकांमधील ' फॅशन्स ' हें त्याचें एक गमक आहे. विलायतमधील बड्या कारखानदारांच्या डोक्यांतलें यंत्र-प्रेम येथील लोकांनीं उचललें आहे आणि त्यामुळें एका बाजूस खेड्यांची अधोगति आणि दुसऱ्या बाजूस त्याच प्रमाणांत शहरांची वाढ होत आहे. ती वाढ होण्यासाठीं खेडीं बळी पडत आहेत. हिंदुस्तानांत प्रचंड दारिद्र्य असूनहि एकीकडे भांडवलहि वाढत आहे. खेडुतांना शहरांत पिटाळून तेथें त्यांना

कारखान्यांत गुंतवून अशा रीतीनें त्यांची पिळवणूक करूनच शहरांतील भांडवल वाढत आहे.

अनेक शतकांपासून हिंदी समाजांत संपत्ति आणि सत्ता यांचा समन्वय झालेला होता. त्यामुळें बेकारीचें यशस्वीपणें निर्मूलन झालें होतें. परंतु परसत्तेच्या एक शतकाच्या कालावधींतच पाश्चिमात्यांतील प्रश्नाइतकेच गंभीर प्रश्न या देशांत उत्पन्न झाले आहेत. भांडवलशाहीचें आक्रमण या देशांत पाश्चात्य देशांइतकें भेसूर झालेलें नसलें तरी हिंदी शहरांत त्या भांडवल-शाहीचाच नमुना दिसत आहे. आपल्या देशांतील कामगारांची वा मजुरांची संख्या २ कोटींपेक्षां जास्त झाली नसली तरी त्यांचीं घरें, शिक्षण, शिशु-संगोपन, प्रसूति हे प्रश्न, तसेंच रोजमुरा आणि फायदा यांचें प्रमाण, काम आणि वेतन यांचें प्रमाण, कामाचे तास आणि सुट्या यांचें प्रमाण हे सर्व प्रश्न आज आघाडीवर येऊन पोहोंचले आहेत आणि असंख्य खेडुतांच्या बेकारीचा प्रश्न मजुरांच्या प्रश्नामुळें मागें पडला आहे. हिंदी सुशिक्षित तरुण-सुद्धां पाश्चात्य संस्कृतीचीच परंपरा अनुसरीत आहेत आणि त्या संस्कृतींतील आर्थिक सिद्धांत आणि प्रश्न यांच्या दृष्टिकोनानें पाहूं लागल्यानें पाश्चिमात्यां-प्रमाणें समाजसत्तावादाकडे हिंदी सुशिक्षितांचींहि मतें वळलेलीं दिसतात. समाजवादी दृष्टिकोन हें भांडवलशाही मार्गानें होणाऱ्या प्रगतीचें एक अपरिहार्य पर्यवसान आहे.

### गांधीजींचा समाजवाद

हिंदी राजकारणांत समाजसत्तावादी प्रवृत्तींचा प्रवेश जरी अगदीं अलीकडे झालेला असला तरी या अल्पकालावधींत त्यांनीं बरीच मजल गांठली आहे आणि त्यामुळें कॉंग्रेसमध्यें तीव्र मतभेद माजले आहेत. परंतु गांधीवादांत अंतर्भूत झालेला अहिंसावाद जेव्हां अवतीर्ण झाला आणि त्याचे प्रत्यक्ष परिणाम दिसूं लागले तेव्हांपासून समाजसत्तावाद मागें पडत चालला आहे.

गांधीजींचा ‘ समाजवाद ’ हा केवळ आधिभौतिक सामर्थ्यावर उभारलेला नाहीं. तर ती एक नैतिक शक्ति आहे. दुर्लक्षामुळें ओसाड पडलेली राष्ट्रीय संस्कृतीची भूमि त्यामुळें पुन्हां संपन्न होऊं लागली आहे आणि त्या भूमीची

अंतःशुद्धीहि झाली आहे. तथापि हें सामर्थ्य गांधीजींनीं पूर्णपणें अहिंसेवरच उभारलें आहे. विचार, उच्चार आणि आचार यांत हिंसेला येथें मुळींच अवकाश ठेविलेला नाहीं.

आपले ‘भाई’ जेव्हां सोशालिस्ट राज्यपद्धतीची वारंवार शिफारस करतात त्या वेळीं ती राज्यपद्धती हिंसेनें मिळेल कीं अहिंसेनें मिळेल हें मात्र ते सांगत नाहींत. त्यामुळें ते कधीं अहिंसापंथाकडे वळतात आणि गांधी-पंथांत मिळून जातात किंवा कधीं कम्युनिस्ट तत्त्वाचा उघड आश्रय करून हिंसेचे प्रवर्तक होतात.

वस्तुतः आज जो झगडा चालू आहे तो सर्वाधिकारी सरकार आणि मनुष्याचें व्यक्तित्व यांमध्यें आहे. चढाओढ आणि सहकार्य, संपत्ति आणि सेवा, यंत्र आणि चरखा यांमध्यें खरा झगडा चालू आहे.

## कालाचें वैशिष्ट्य

बदलत्या काळाच्या प्रवृत्तीविरुद्ध कोणतीहि पद्धति किंवा संघटना झगडूं शकत नाहीं. मग ती कितीहि पुरातन असो किंवा उदात्त असो. यामुळेंच हिंदुस्तानपुढें पेंचप्रसंग उत्पन्न झाला आहे. औद्योगिक क्रांतींतून जन्मलेल्या ज्या संकटांनीं पाश्चिमात्य देशांत कहर माजविला आहे त्या संकटांतून सुटण्याचा पाश्चिमात्यांचा पंथ आपण स्वीकारावा कीं समाजाची घटना आणि कर्तव्यें, त्या कर्तव्यांची विभागणी आणि संघटना यांच्यांतून सिद्ध होणारें सामाजिक जीवन यांच्याविषयींच्या आपल्या प्राचीन कल्पनांचें पुनरुज्जीवन करावें असा तो पेंचप्रसंग आहे. वर सांगितलेलें सामाजिक जीवन पांच गोष्टींवर आधारलेलें असतें.

त्या पांच गोष्टी म्हणजे (१) राष्ट्रीयत्व आणि आंतरराष्ट्रीयत्व, (२) समाजसत्तावादास विरोधक अशी वैश्यवर्गाच्या रूपानें व्यक्त होणारी अर्थप्रधान भांडवलशाही हिच्याविरुद्ध श्रमजीवी वर्ग, एकत्र कुटुंब आणि ग्रामीण समाज यांच्याद्वारें सुटणारे कामगारांचे प्रश्न, (३) आधिभौतिकापुरताच विचार करणाऱ्या आधिभौतिक शास्त्रास विरोधी असा जीविताच्या आध्यात्मिक अंशाचा विकास करणारा धर्म, (४) वैयक्तिक हुकुमशाहीस विरोधक अशी

धर्माची हुकुमशाही, (५) सर्वश्रेष्ठ नियंत्रक असा अहिंसावाद परंतु त्याची सेवकासारखी भूमिका.

अशा रीतानें परस्परविरोधी सामर्थ्यांचें समबलत्व प्रस्थापित करून तात्कालिक आणि चिरकालिक अशा तत्त्वांचा आणि ऐहिक आणि पारलौकिक कल्याणाचा समन्वय करतां येतो. हिंदी समाजाची घटना आणि कार्य यांचें नियोजन करणाऱ्या तत्त्वांचा अभ्यास करण्याची आम्ही जी शिफारस करतों ती या समन्वयाच्या हेतूनेंच. त्या प्राचीन तत्त्वामुळें संपत्तीचें केंद्रीकरण होण्याचें संकट येथें उत्पन्न झालें नाहीं. त्या तत्त्वांनीं दारिद्र्य दूर झालें नसलें तरी संपत्तीचें केंद्रीकरण होऊं शकलें नाहीं आणि त्या तत्त्वांनीं जरी अर्धपोटीं राहण्याची परिस्थिति दूर झाली नाहीं तरी बेकारीचें निराकरण केलें आहे.

## दोन पंथांचा संघर्ष

स्थूल मानानें जगांतील सुधारणांचे दोन प्रकार करतां येतातः एक अर्थप्रधान आणि एक संस्कृतिप्रधान किंवा ज्ञानप्रधान. अनादि कालापासून हिंदुस्थानांत लक्ष्मी आणि सरस्वती यांचें द्वंद्व चालू आहे आणि त्या द्वंद्वावर हिंदी संस्कृतीची उभारणी झाली आहे. इतक्या नैसर्गिक स्वरूपाची संस्कृति आज पाश्चात्य संस्कृतीच्या तडाख्यांत सांपडली आहे. पाश्चात्य संस्कृति धनसंचयावर उभारलेली आहे. तिच्यांत ज्ञानास दुय्यम स्थान आहे आणि ज्ञान हें संपत्तीचेंच साधन होऊन बसलें आहे!

दोन पंथ जगावर स्वामित्व मिळविण्यासाठीं झगडत आहेत. समाजाची समाजनिष्ठ आर्थिक उन्नति घडवून आणण्यासाठीं त्यांचा झगडा चालू आहे. ते दोन पंथ म्हणजे व्यक्तिवाद आणि संघवाद ( Collectivism ). पहिल्या पंथांत स्वैर चुरस चालू असते. सर्व कार्यक्षेत्रें व्यापारी वर्गास खुलीं असतात. तेथें कोणासहि परवाने मिळत नाहींत. तेथें खास सवलती, कामगार-संघ इत्यादि गोष्टी नसतात. वस्तूंच्या अनिर्बंध देवघेवीवर कोणचींहि नियंत्रणें नसतात. शासनसंस्था कायदा आणि व्यवस्था राखते. स्वस्तांत खरेदी आणि भारी दरानें विक्री असा तेथें दंडक असतो. नफेबाजींतून औदार्याचे उगम होतात. परंतु नफेबाजी ही तेथें पवित्र मानण्यांत येते.

शासनसंस्थेनें जेथें समाजवादाचा पुरस्कार केलेला असतो असा दुसरा पंथ आहे. तेथें भाडें, कर, जादा सवलती, सट्टेबाजी आणि अनुत्पादित उत्पन्न यांचें निर्मूलन होतें. जमीन, इमारती, साधनसामग्री, निर्यात, हीं सर्व सरकारच्या अधिकारांत समाविष्ट होतात. काम करण्यास तयार असलेल्यांना सरकार काम पुरवतें. आळशी श्रीमंत तेथें आढळत नाहींत. कोणीहि गरीब नसतो किंवा कोणीहि श्रीमंत नसतो. कारखान्यांतील सर्व उत्पादन पुन्हां उत्पादकांकडे परत जातें.

## संघर्षांतील सत्य

सत्य हें वस्तुतः या दोन पंथांच्या मध्यावर आहे. या पंथाचें भिन्नत्व जर कशांत असेल तर व्यक्तीच्या किंवा सर्व राष्ट्राच्या संपत्तीविषयींच्या लोभाच्या प्रमाणांत आहे. भांडवलवाल्यास आपल्या संपत्तींत आणखी भर पडावी असें वाटतें तर साम्राज्यवाद्यास जास्त वसाहतींचा लोभ असतो. त्यामुळें मालमत्ता आणि त्याबरोबरच कुटुंबसंस्था यांचें निर्मूलन करणें हा एक रामबाण उपाय आहे असें कांहींना वाटतें; परंतु रशियानें या बाबतींतल्या प्रयोगाचा भयंकर अनुभव घेतला आहे. मालमत्ता, विवाहसंस्था आणि धर्म यांचें रशियानें आधीं निर्दालन केलें आणि आतां पुन्हां त्यांची प्रतिष्ठापना केली आहे. रशियन राज्यक्रांतीचा विचार करतांना त्या घटनेचा सामुदायिक रीत्या विचार केला पाहिजे. क्रांतीच्या निरनिराळ्या अवस्थांचा अलगपणें विचार करणें बरोबर ठरणार नाहीं. एखाद्या हालचालीचें चित्रपटासाठीं छायाचित्र घेतात त्या वेळीं स्पष्ट कल्पना येण्यासाठीं शेंकडों छायाचित्रांचें संकलन करावें लागतें. तीच गोष्ट रशियन राज्यक्रांतीची आहे. खाजगी हक्काची अंतिम कसोटी, ते हक्क सामुदायिक कल्याणासाठीं वापरले जातात कीं नाहीं यावर असते ही गोष्ट जग अद्याप लक्ष्यांत घेत नाहीं.

मालमत्तेच्या मालकाचा त्याच्या गरजेप्रमाणें त्या मालमत्तेवर हक्क आहेच. परंतु त्याच्या गरजा योग्य प्रमाणांत पूर्ण झाल्यानंतर इतरांच्या गरजा त्यानें भागविल्या पाहिजेत. “ मालमत्तेच्या मालकाचीं मालमत्तेसंबंधीं ‘ कर्तव्यें ’ ठरलेलीं असतात. गरीबांचा तो ‘ हक्क ’ असतो ” या सुभाषितांत पुष्कळच अर्थ आहे.

श्रद्धाप्रधान युगांत लोक असें एकमतानें मानीत कीं, गरजू माणसास मदत देणें ही दया नाहीं; तें एक ( सामाजिक ) न्यायाचें कृत्य आहे. आजहि ख्रिस्ती धर्मगुरु हें स्पष्ट सांगतात कीं, अयोग्यपणें नाकारलेल्या न्यायाची भरपाई दानधर्मानें होत नाहीं. जे न्याय्य नाकारतात त्यांच्या कृत्यास 'दान' म्हणतां येणार नाहीं.

या दृष्टीनेंच गांधीजी वारंवार सांगत आले आहेत कीं, संपत्तीचे मालक हे समाजातर्फे नेमलेले विश्वस्त आहेत. संपत्तीच्या राशीवर राशी चढविण्याचा किंवा स्वतःच्या चैनीसाठीं तिची उधळपट्टी करण्याचा त्यांस अधिकार नाहीं.

सामुदायिक मालकीची अनेक प्रकारें स्तुति होत असते. परंतु त्या मालकीं-तूनच शिक्षण, उद्योगधंदे, त्याचप्रमाणें राज्यकारभार यांतहि हडेलहप्पी आणि हुकुमशाही उत्पन्न होत असते हें आपल्या सहजासहजीं लक्ष्यांत येत नाहीं.

### संपत्ति कीं सेवा ?

शासनसंस्थेच्या ( state ) मान्यतेचें महत्त्व पोलीस, ( सरकारी ) नोकरी, प्रकाशनसंस्था यांत दिसून येतेंच. भांडवलशाही समाजांत अप्रत्यक्षपणें सर्वत्र गुलामगिरी चालूच असते. प्रचंड उत्पादन करणारा उत्पादक निर्यातीसाठीं उत्पादन करतो. आपल्या देशांतल्या लोकांत तो माल खपावा म्हणून तो उत्पादन करीत नाहीं. तीच स्थिति समाजसत्तावादी शासनपद्धतींत असते. फरक एवढाच कीं, पहिल्या प्रकारांत व्यक्तिशः अरेरावी होते, तर दुसऱ्या प्रकारांत सरकारच दडपशाही करीत असतें !

सामाजिक अन्याय दूर करण्याच्या बाबतींत नुसती लोकसत्तासुद्धां अगदीं मोठा रामबाण उपाय आहे असें नाहीं. मुख्य गोष्ट ही पाहिली पाहिजे कीं, उत्पादन हें सेवेसाठीं होत आहे कीं संपत्तीसाठीं होत आहे. समाजसत्तावादी शासनपद्धतींतून शेवटीं हुकुमशाही निर्माण होते आणि लोकसत्तेच्या पांघरुणा-खालीं साम्राज्यवाद फोफावूं लागतो. लोकसत्ता ही साम्राज्यवादास केवळ साहाय्यक असते.

आपलें राष्ट्र मात्र असें आहे कीं, त्यानें सेवेचें ध्येय नेहमीं उच्च भूमिकेवर अधिष्ठित केलें आहे. परंतु तें ध्येय धुळीस मिळविलें जात आहे. समाजांत

अत्यंत विघातक अशी जर कोणती स्थिति असेल तर ती म्हणजे सेवेची जागा संपत्तीनें घेणें ही होय. हिंदुस्तानचा प्राचीन समाज सेवाभिमुख होता. पाश्चिमात्य समाज हा संपत्तीचा सेवक आहे. परंतु निर्यातीचें प्रमाण वाढलें कीं, तितक्या प्रमाणांत तुमच्या निर्यातीस बळी पडलेल्या राष्ट्राचें उत्पादन घसरतें आणि ही परिस्थिति फार काळ टिकूं शकत नाहीं. त्यांतून युद्धें निर्माण होतात. आज राष्ट्रीयत्वाचा पंथ रणभूमीकडे जात आहे. परंतु त्यास शांतिसदनाकडे वळविणें हें अजूनहि शक्य आहे. आपल्या राष्ट्रीय योजनेनें आपली वाढ तर झाली पाहिजे पण दुसऱ्याच्या प्रगतीवर त्यामुळें आघात होतां कामा नये. म्हणून प्रत्येक राष्ट्रानें आपापल्या भवितव्याविषयीं योजना आखावी. रशिया काय, जर्मनी काय किंवा इटली काय आपणास कोणी मार्गदर्शन करूं शकणार नाहीं. आपला मार्ग आपणच शोधला पाहिजे आणि हाच गांधीवादाचा हेतु आणि ध्येय आहे. समाजसत्तावादाचें हिंदीकरण होणें जितकें आवश्यक आहे त्याचप्रमाणें योजनेचेंसुद्धां हिंदीकरण केलें पाहिजे. त्यासाठीं आपल्या समाजाची घटना आणि कार्य यांची आपणांस माहिती असली पाहिजे. आपल्या समाजाची उन्नति आणि परागति आणि ज्या वैभवानें आणि परिवर्तनांनीं आजची स्थिति निर्माण झाली त्यांचा आपण परिचय करून घेतला पाहिजे. केंद्रीकरण ही युद्धास अत्यंत अनुकूल आणि आवश्यक अशी परिस्थिति आहे. म्हणून शांततेच्या काळीं ज्यामुळें निश्चितपणें प्रगति होते अशा विकेंद्रित समाजरचनेकडे आपण परतलें पाहिजे. लोकसत्ता आणि लष्करी सिद्धता या एकत्र नांदत नाहींत. त्या परस्परांस छेदतात; कारण युद्ध सुरू होतांच कोणचीहि लोकशाही कोलमडते. जर लोकशाही कोलमडली नाहीं तर मग युद्धापासून होणारा लाभ कमी होतो. खऱ्या लोकसत्तेंत स्वयंपूर्ण, स्वावलंबी अशा लहांन घटकांचें संघराज्य ( फेडरेशन ) असतें. अशा तऱ्हेचे घटक प्राचीन हिंदुस्तानांत होते.

## समाजसत्तावादाचें हिंदीकरण

आपल्या समाजसत्तावादाच्या ध्येयाचें आपण हिंदीकरण करूं या. समाजसत्तावाद चांगला आहे. समाजसत्तावादाविरुद्ध कोणासहि जातां येणार नाहीं. जमीनदाराचा लोभीपणा किंवा सरंजामशहांची लहरी वृत्ति आपण यापुढें

चालविणें शक्य नाहीं. जन्मसिद्ध उच्चनीचता आपण कायमची सहन करणार नाहीं. लोकसंख्येंतील $\frac{1}{5}$ भागाच्या दडपणाखालीं बाकीच्या $\frac{4}{5}$ भागानें मुकाट्यानें राहावें ही स्थिति यापुढें टिकूं देणें शक्य नाहीं. दारुबाजी आणि अस्पृश्यता या सैतानांना आपण गाडलेंच पाहिजे. परंतु याबरोबर त्या सैतानांना बळी पडलेल्यांना वर्षभर पोटभर अन्न देण्याचीहि जबाबदारी आपण पार पाडली पाहिजे. खेड्यांतील कला आणि व्यवसाय यांना आपण संरक्षण दिलें पाहिजे. आपण समाजसत्तावादाच्या फक्त घोषणा करीत राहिलों आणि पदोपदीं विलायती किंवा गिरणीचें कापड घेत राहिलों तर पददलित बांधवांस त्या घोषणेचा काय फायदा होणार ? सहानुभूति दाखवून आणि घोषवाक्यें त्यांच्या तोंडावर फेकून आपल्या दीन बांधवांची फसवणूक करणें आपण बंद केलें पाहिजे. थोडेसे आणे किंवा निदान पैसे तरी मिळविण्याचें त्यांच्या अंगीं सामर्थ्य उत्पन्न करून त्यांना जगविलें पाहिजे. ज्या कार्यक्रमानें गरीबांचे हाल प्रत्यक्ष कमी झालेले दिसतील असा कार्यक्रम समाजसत्तावादी लोकांजवळ असेल तर त्याच क्षणीं त्यांचा विजय होईल.

'भुकेल्या लोकांचीं दुःखें खूप भडकवा म्हणजे त्यांच्यांत बंडाची प्रवृत्ति उत्पन्न होईल आणि क्रांतीची उभारणी करतां येईल' हा जो सर्वसामान्य कम्युनिस्टांचा आदेश आहे तो हृदयशून्यतेचा निदर्शक तर आहेच, परंतु तो अविवेकाचाहि निदर्शक आहे. म्हणून सोशालिस्टांनीं खादीविरोधी प्रचार करणें, ग्रामोद्योगास विरोध करणें आणि गिरणीचें किंवा विलायती कापड घेण्याचा उपदेश करणें ही मोठी शोचनीय घटना आहे. "जगांतील कामगारांनो, संघटित व्हा. कारण आपल्या शृंखलांखेरीज तुम्हांला कशाचाहि त्याग करावयाचा नाहीं." ही घोषणा चांगली आहे. परंतु जर जगांतील अर्धेच कामगार संघटित झाले आणि तेहि कशासाठीं तर राहिलेल्या कामगारांना औद्योगिक आणि आर्थिक गुलामगिरीच्या अभेद्य शृंखलांनीं बद्ध करण्यासाठीं तर मग अशा स्थितीस काय म्हणावें ? सोशालिस्टांचा हेतु स्तुत्य आहे, परंतु ज्यामुळें श्रीमंतांच्या श्रीमंतींत भर पडेल आणि गरीब जास्तच गरीब होतील असें त्यांनीं कांहींहि करूं नये म्हणजे झालें !

आपलें ध्येय साधण्यासाठीं सोशालिझमला शासनसंस्थेची ( state ) मध्यस्थी मिळवावी लागते. परंतु गांधीवादाचें यश प्रत्येक नागरिकाची

विवेकबुद्धि सुसंस्कृत करून त्याची संस्कृति वृद्धिंगत होण्यावर अवलंबून आहे. सोशालिझमचे परिणाम बाहेरून लादले जातात. ते डोळ्यांत भरण्यासारखे आकर्षकहि असतात तरी ते अनिश्चित आहेत आणि त्यांत धोकाहि आहे. परंतु गांधीवादाचीं फळें दिसावयास लहान असलीं तरी लोकांच्या मनोभूमींत तीं पक्कीं रुजलेलीं असतात. सोशालिझम हा एक दृष्टिकोण आहे. विचाराची ती एक पद्धति असते. गांधीवाद ही एक कठोर वस्तुस्थिति असते. सेवा आणि स्वार्थत्याग यांचा तो एक दैनंदिन कार्यक्रम असतो. सोशालिझममध्यें पुढारी लोकांनीं काय करावें तें सांगण्यांत येतें. गांधीवादांत प्रत्येकाच्या वैयक्तिक कर्तव्याची रूपरेखा दिलेली असते.

## मनुष्य आणि यंत्र

सर्व प्रकारच्या पेंचप्रसंगांच्या मुळाशीं आधुनिक जीवनांतील एकच प्रश्न आहे. तो म्हणजे यंत्र आणि मनुष्य यांचीं जीवितांत आदलाबदल करतां येईल कीं तीं परस्परांस पूरक व्हावयास पाहिजेत. हाच प्रश्न असा मांडतां येईल—यंत्र हें माणसाच्या कर्तृत्वास जोड देण्यासाठीं आणि त्याच्या गरजेच्या नियंत्रणाखालीं आहे कीं, मनुष्याचें कर्तृत्वच शेवटीं नष्ट व्हावें अशा तऱ्हेनें त्याची योजना आणि वाढ करावयास पाहिजे. पाश्चिमात्य लोक शरीर हें एक यंत्रच मानतात; समाज हें एक घटकात्मक यंत्र आणि सरकार हें एक गुंतागुंतीचें यंत्र आहे. त्यांच्या दृष्टीनें माणसास सर्वांत प्रिय अशी गोष्ट म्हणजे यंत्राचा अभ्यास. कारण मनुष्य स्वतःच एक उत्तम यंत्र आहे. यंत्रानें मानवी सुखांत निश्चित भर घातली आहे. परंतु त्या सुखाच्या लाटेबरोबरच अनेक संकटेंहि वाहत आलीं आहेत. वाढती मजुरी, विविध प्रकारचे विमे आणि नफ्यांचे प्रकार हीं त्या संकटांचीच निष्पत्ति आहे. परंतु या कोणत्याहि संकटांनीं संपत्तीचे उत्पादक घाबरले नाहींत. दिवसामागून रात्र यावी त्याप्रमाणें यंत्रामागून दंगे, घातपात, विध्वंस आणि गोळीबार हीं येतात. म्हणून जेव्हां आम्ही यंत्राचा तीव्र निषेध करतों त्या वेळीं आमच्या डोक्यांत कोणचाहि भ्रम नसतो. ज्याचा आम्ही निषेध करतों ती गोष्ट म्हणजे यंत्रयुगाचें अमर्याद स्वामित्व, त्याचा जीवितावरील वाढता हल्ला, खेडेगांवांना त्यामुळें आलेली प्रेतकळा, मनुष्याचें कौशल्य आणि व्यक्तित्व

यांचा नाश, श्रीमंताची श्रीमंती आणि गरीबाची गरीबी वाढविणारा नवा व्यक्तिवाद, घर आणि कुटुंब यांचा सर्रास चाललेला नैतिक अधःपात आणि शेवटीं निर्माण झालेली अखंड युद्धोत्पादक परिस्थिति यांचाच आम्ही निषेध करतों. आज सर्व जगभर यंत्रांमुळें राष्ट्रीय जीवनांत युद्धमय वातावरण झालेलें आहे.

## साम्राज्यवादी विचार-पद्धति

यंत्र आणि उद्योगप्रधान सुधारणा यांविषयीं गांधीजींचीं मतें निश्चित झालेलीं आहेत.

हिंदुस्तानचें प्राचीन वैभव आणि सत्ता यांच्याशीं तुलना केल्यास आजचें दारिद्र्य किती भयंकर आहे हें दिसतें. आजचें हें दारिद्र्य ब्रिटिश राजवटीच्या अमानुष पद्धतीनें निर्माण झालें आहे. या अमानुष परिणामाचें गांधीजींनीं वारंवार विस्तृत विवेचन केलें आहे. आज $\frac{१}{३}$ लोकसंख्या जवळ जवळ उपाशींच राहते आणि बाकीचे लोक अर्धपोटी, जवळ जवळ वस्त्रहीन अशा स्थितींत खुराड्यांसारख्या घरांत आहेत. याचें कारण काय? निसर्ग एकेकाळीं आपल्या वैभवाची खैरात या देशावर करीत होता, तो तशीच आजहि चालू आहे. तेव्हां आजच्या भेसूर दारिद्र्याचें कारण निसर्गात सांपडणार नाहीं. हजारों वर्षांपूर्वी सिद्ध झालेली हिंदी खेड्यांची घटना ही प्राचीन ऋषींनीं वर्णाश्रम धर्मावर उभारलेली आहे. त्या घटनेनें त्या ऋषि-वर्यांनीं सत्ता आणि संपत्ति यांच्यांत समतोलपणा राखला, समाजांत स्वास्थ्य निर्माण केलें आणि खेड्यांच्या रूपानें जीवनाच्या सर्वसाधारण गरजांच्या बाबतींत स्वयंपूर्ण आणि स्वयंसिद्ध असें समाजाचें निवासस्थान निर्माण झालें.

हिंदी राष्ट्रीयत्वाच्या पुनरुज्जीवनासंबंधीं वेळोवेळीं ज्या योजना पुढें येत आहेत त्या पाश्चात्य समाजांतील समाजनिष्ठ अर्थशास्त्रावर उभारलेल्या अशा समाजरचनेचीं अत्यंत निकृष्ट अनुकरणें आहेत. ती रचना भांडवलशाही आणि कारखानदारी यांवर उभारलेली आहे. ती रचना राजकारणानें आणि राजकारणावर पोसलेली आहे. ज्याला साम्राज्यशाही म्हणतात त्यावरच त्या रचनेचीं तत्त्वें ठरविलेलीं आहेत.

हिंदुस्तानांतले अर्थशास्त्रज्ञ, प्राध्यापक आणि मंत्री हे सर्व पाश्चात्य शिक्षण-

पद्धतींत तयार झालेले लोक आहेत. त्यांनीं वर्षानुवर्षे मार्शल आणि फॉसेट यांच्या चरणाशीं बसून अध्ययन केलें आहे आणि हिंदुस्तानांत औद्योगिक क्रांति घडवून आणण्यासाठीं ते सिद्ध झाले आहेत. समाजनिष्ठ अर्थशास्त्र हा एक रामबाण उपाय आहे असें ते सांगत आहेत. या उपाययोजनेंत रोग-लक्षणांची चिकित्सा करण्याच्या भरांत ते रोग्यालाच विसरले आहेत. रोगांनीं जो मनुष्य पछाडलेला आहे त्या माणसाची आणि ज्या तत्त्वानुसार औषधयोजना व्हावयास पाहिजे त्या गोष्टींची हें अर्थशास्त्र हेळसांड करीत आहेत.

औद्योगिक कार्यक्षेत्र आणि शिक्षण याप्रमाणें शेतीच्या कार्यक्षेत्रांतहि हीच विचारपद्धति सुरू आहे. जो येथील शें. ६७ लोकांचा व्यवसाय आहे त्या शेतीचा विचार करतांना सरकारनें रोंपटीं, कीड आणि जनावरें यांच्यावरच सर्व लक्ष केंद्रीभूत करण्याच्या ऐवजीं, जमीन आणि हवा यांच्यावर सर्व विचार खिळविण्याऐवजीं, प्रत्यक्ष शेतकऱ्याच्या दृष्टीनेंच सर्व गोष्टींचा विचार करावयास पाहिजे. त्या व्यवसायांतील कामकऱ्यांची परंपरा आणि आजची परिस्थिति या गोष्टी जास्त महात्त्वाच्या आहेत, असें राममूर्ति यांनीं सांगितलें आहे. ते म्हणतात, " हिंदी शेतीव्यवसायांत शेतकरी हा एक चुकलेला दुवा आहे." हें फक्त शेतीच्याच बाबतींत झालें नाहीं. शिक्षण, कारखानदारी, ग्रामोद्योग, इत्यादि बाबतींत, प्रत्यक्ष सरकारी संस्थांतच ध्येय आणि मूलतत्त्वें यांच्या चर्चेत मनुष्याचा नेमका विसर पडला आहे. माणसास त्यांत योग्य स्थान न देतांच सर्व खटाटोप चालू आहेत.

या सर्व खात्यांत जगांतील व्यापार आणि उद्योगधंदे यांवर सत्ता मिळविण्याच्या धोरणानेंच यशापयशाचा विचार चालू असतो. प्रत्येक राष्ट्रास सोईचें होईल अशा धोरणानें व्यापारी धोरणांत समतोलपणा राखण्याचा खटाटोप चालू आहे. याचा परिणाम असा झाला आहे कीं, जगांतील प्रगतिमान् राष्ट्रें परस्परांशीं सारखीं झगडत आहेत. सर्व राष्ट्रांना सोईचें असें समतोल व्यापारी धोरण जगांत कसें असूं शकेल ? कांहींना जो समतोलपणा सोईचा होईल तोच इतरांना प्रतिकूल ठरणारच ! असें समतोल धोरण कोण आणि कसें ठरविणार ? कच्च्या मालासाठीं चाललेली धरपड आणि नव्या बाजारपेठांचा चाललेला शोध यांमुळें हीं युद्धें अपरिहार्य ठरलीं आहेत आणि

(ता.

प्रत्यक्ष युद्धाचेंच स्वरूप पालटलें आहे. आजचें युद्ध म्हणजे बॉम्बिंग, प्रकाश-बंदी आणि नाकेबंदी अशा घडामोडींनीं व्यापलेलें असतें.

### यंत्र आणि यंत्रयुग

याचा अर्थ असा नाहीं कीं, हिंदी जनतेनें यंत्रयुगाचा फायदा मुळींच घेऊं नये. तसें असतें तर प्रत्यक्ष गांधीजींचेंच जीवन त्यास हरघडी विरोधी ठरेल. ते स्वतः टॉर्च, टाइपरायटर, मोटर ( आणि तीहि ताशीं ४० मैलांपेक्षां जास्त वेगानें धावावी असें त्यांना वाटतें ) यांचा हरघडी उपयोग करतात. रेल्वे, पोस्ट आणि तारखातें या तर त्यांच्या अत्यावश्यक गरजा आहेत. गांधी यंत्राचा निषेध करीत नाहींत. माणसाचेंच यंत्र करून टाकणाऱ्या यंत्र-युगाचा ते तीव्र निषेध करतात.

यंत्रानें मनुष्याची कल्पकता निकामी केली, राष्ट्राच्या जीवनांतील रक्त-संचार बंद पाडला आणि जनतेच्या अंतःकरणास गोंधळांत टाकून दिलें. त्यामुळें राष्ट्राच्या देहांतील मध्यवर्ति चैतन्य आणि भोंवतालच्या रक्तवाहिन्या यांच्यात कोणतीहि सुसंगति राहिली नाहीं. जें राष्ट्र इतकें विस्कळित झालें आहे, तें रोगग्रस्त होण्यास आणि शेवटीं मरणाधीन होण्यास फार वेळ लागणार नाहीं ! हिंदुस्तान अशा मरणाच्या पंथास जवळ जवळ लागलेंच आहे !! देशानें शेवटचा श्वास सोडण्यापूर्वी गांधीजी अवताराप्रमाणें प्रगट झाले ही मोठ्या भाग्याची गोष्ट आहे.

यंत्रप्रधान संस्कृतीचा शेवटीं परिणाम असा झाला आहे कीं, जीं साम्राज्य-वादी राष्ट्रें पूर्वेकडील आणि आफ्रिकेंतील लोकांवर आपला माल लादीत होतीं त्या राष्ट्रांना आतां आपल्या देशांतील साधनसामग्रीवरच गुजराण करण्याची वेळ आली आहे. कारण आजपर्यंत त्यांची गिऱ्हाइकी पत्करलेलीं राष्ट्रें आतां जागृत झालीं आहेत. जपाननें पाश्चिमात्यांतील प्रथम श्रेणींतील राष्ट्रांबरोबर बाजारपेठेंत टक्कर देण्यास सुरुवात केली. चीन आपल्या दीर्घ निद्रेंतून जागा झाला. हिंदुस्थानांत नव्या राष्ट्रीयत्वाची जाणीव प्रगट होत आहे. युरोपमध्यें एक एक राष्ट्र स्वावलंबी होत चाललें आहे. या सर्वांत रशियानें सर्वांच्या पुढें मजल मारली आणि साम्राज्यवादी राष्ट्रांच्या बाजारपेठा खडाखड् बंद झाल्या. युरोपियन राष्ट्रांच्या पूर्वेकडील बाजारपेठा अशा रीतीनें

बंद झाल्या तर निर्यातीसाठीं होणारें प्रचंड उत्पादनहि थांबवावेंच लागेल आणि मग बेकारीवर एकच उपाय राहील. तो म्हणजे उत्पादनाचा नफा सामुदायिकरीत्या वांटून घेणें. एकानें मिळवावें आणि लाखोंनीं राबावें हें यापुढें चालूं शकणार नाहीं. हें सामुदायिक वांटणीचें तत्त्व तरी पत्करावें लागेल किंवा प्राचीन ग्रामोद्योगाकडे तरी वळावें लागेल.

## गांधीवादी समाजरचनेंत यंत्राचें स्थान

गांधीजी हिंदुस्तानांत यंत्राची मालकशाही नाहींशी करून त्यास देशाच्या सेवेस लावूं इच्छितात. पाश्चिमात्यांत यंत्र हें नुसतें मालकच झालें नाहीं तर तें सैतानासारखें अरेराव होऊन बसलें आहे. त्या सैतानाची तहान नि भूक, त्याचें खाद्य आणि उत्पादन हीं सर्वच भयंकर आहेत. प्रचंड उत्पादनानें स्वस्ताईस उत्तेजन मिळालें, त्यामुळें चढाओढ वाढली आणि नंतर बाजार-पेठांचा शोध करणें जरूर होऊन बाजारपेठेचें संशोधन आणि संरक्षण करण्या-साठीं लष्करी सामर्थ्यावर उभारलेलें राजकीय वर्चस्व प्रस्थापित करणें भाग पडलें. यंत्रप्रधान व्यवसाय हे अशा रीतीनें हिंसेचा संचार सुरू करतात. काँग्रेसच्या विधायक कार्यक्रमानें क्रियाप्रधान अहिंसेचा प्रसार होतो. त्या कार्यक्रमांत खादी हा प्रधान ग्रामोद्योग आहे. त्यांत जातींचें ऐक्य, मद्यपान-बंदी, अस्पृश्यतानिवारण या गोष्टींचा समावेश होतो.

गांधीजींनीं आपल्या डोळ्यांसमोर ठेवलेल्या समाजरचनेचें स्वरूप काय आहे ? त्या समाजांत जातां जातां धुळीचे लोट उडविणाऱ्या आणि मागें राहिलेल्यांना प्रत्यक्ष चिरडलें नाहीं तरी निदान त्यांच्या नाकातोंडांत माती कोंबणाऱ्या मोटारी नाहींत. त्याबरोबर तो समाज अगदीं प्राचीन किंवा मध्ययुगीनहि नाहीं. गांधीजींनीं आपलें समाजजीवनाचें ध्येयचित्र १९३१ सालीं लंडनहून अमेरिकेसाठीं केलेल्या व्याख्यानांत सांगितलें आहे.

गांधीजी म्हणाले:

“ गरीब बिचारे साधे शेतकरी वर्षांतून सहा महिने स्तब्ध बसून राहतात आणि त्यांत त्यांचा कांहींहि अपराध नाहीं. ही घटना अत्यंत शोचनीय आहे. पूर्वी अन्न आणि वस्त्र या दोन प्राथमिक गरजांच्या बाबतींत तरी प्रत्येक हिंदी खेडें स्वयंपूर्ण होतें. या परिस्थितीस फार दिवस लोटले नाहींत.

दुर्दैवानें ईस्ट इंडिया कंपनी येथें आली आणि तिनें खेड्यांतील जोड धंदे नाहींसे केले. हें कृत्य कंपनीनें कोणत्या मार्गानें केलें तें बोलूं नये हेंच बरें. आजच्या कोणत्याहि यंत्रावर निघणार नाहीं इतकें तलम सूत खेड्यांतले कोष्टी हातानें काढीत असत. त्यांची त्याबद्दल सर्वत्र प्रसिद्धि होती. या कोष्ट्यांना एक दिवस असें आढळून आलें कीं, आपला धंदा बुडाला. आज कोणी कांहींहि म्हणत असलें तरी त्या दिवसापासून हिंदुस्तान झपाट्यानें दरिद्री होऊं लागला आहे, ही गोष्ट सत्य आहे."

## बेकारीची मीमांसा

हिंदी बेकारांची संख्या जवळ जवळ ४ कोट आहे. शेतकी यंत्रप्रधान झाली तर आणखी लोक बेकार होतील आणि आपलीं खेडीं सोडून भटकूं लागतील. बेकारी ही अपरिहार्य गोष्ट नाहीं. येथील परिस्थितींनेंच बेकारी निर्माण केली आहे आणि ती सारखी वाढत आहे. आपली अर्थव्यवहार-पद्धति, श्रम वांचविणारीं यंत्रें, फक्त बर्मिंगहॅमच्याच कारखानदारास ज्या घडामोडी माहीत आहेत अशा लँकेशायरच्या गिरण्यांतील दैनंदिन घडामोडी, हिंदुस्तानांतील केवळ पुस्तकी शिक्षण, या सर्व गोष्टींनींच बेकारी निर्माण झाली आहे. तिच्याशीं लोकसंख्येच्या वाढीचा कांहीं संबंध नाहीं किंवा कामगारांची बेसुमार वाढ हेंहि बेकारीचें कारण नाहीं. अमेरिकेंत लोक-सत्ताक राज्यपद्धति आहे आणि समष्टिप्रधान ध्येयांना वाव आहे. साम्राज्य-शाहीचे विरोधक अशी तेथें मोठी बढाई मारण्यांत येते, तरी तेथेंहि $\frac{1}{3}$ लोकसंख्या अपुऱ्या अन्नावर आणि मोडक्यातोडक्या घरांत जीवन कंठीत आहे !

यावर उपाय एकच; तो म्हणजे यंत्रांचें नियंत्रण. ज्या ग्रामोद्योगांनीं मुख्यतः अन्न आणि वस्त्र यांची तरतूद होते, अशा ग्रामोद्योगावर यंत्रांचें अतिक्रमण होऊं देतां कामा नये. तें साधलें कीं आणि तें साधलें तरच देशांत शांति आणि समृद्धि होईल, जीवनकलह थांबेल, खेड्यांतून शहरांकडे, मोकळ्या हवेंतून खुराड्यांकडे आणि कोंदट वस्तीकडे, कौटुंबिक जीवना-कडून भटकेगिरीकडे जो माणसांचा ओघ चालला आहे तो थांबेल !

राहणीचा दर्जा वाढविण्याचा खटाटोप वारंवार करण्यांत येतो. हिंदुस्ता-

त्यांत राहणीचा दर्जा वाढविणें हा प्रश्न महत्त्वाचा आहे यांत शंकाच नाहीं. परंतु ती वाढ म्हणजे अन्न-वस्त्र आणि घर एवढ्यापुरतीच करावयास पाहिजे.

## विश्रांति आहे, काम पाहिजे !

पाश्चात्यपंथाचे समाजसत्तावादी, विश्रांतीचा प्रश्न उत्पन्न करून हिंदी प्रश्नांत गोंधळ उत्पन्न करीत आहेत. या देशांत विश्रांतीचा प्रश्न उत्पन्नच झालेला नाहीं. काम आणि विश्रांति हे शब्द पर्यायवाचक आहेत. हिंदुस्तानांत विश्रांतीच्या वेळीं काम काय करावें असा प्रश्न आहे. कामकऱ्यास विश्रांति कशी द्यावी असा प्रश्न आपल्या देशांत नाहीं. सेंट कॅथेराइन म्हणतो: "रिकाम्या पोटीं जास्त चिंतन करीत बसणें ही कांहीं चांगली गोष्ट नाहीं. धार्मिक उन्नतीच्या दृष्टीनेंहि असें चिंतन वाईट आहे. प्रत्येकास अन्न हें पाहिजेच आणि अन्नासाठीं सारखें काम करीत राहिलें पाहिजे." इंग्लंडमध्यें विश्रांतीच्या प्रश्नाचा विचार करण्यासाठीं एक समिति नेमली होती; त्या समितीचे अध्यक्ष सर विंडहॅम डील यांनीं असें मत व्यक्त केलें कीं, मोकळा वेळ याचा अर्थ ज्या वेळीं माणसाला मनाप्रमाणें वागतां येतें आणि कारखान्यांतील निर्जीव यांत्रिक जीवनांतून 'माणसांत' परत येतां येतें असा वेळ. कामाचे तास कमी झाले खरे, परंतु विश्रांति हा केवळ पोरचेष्टा व्हावी अशी लक्षावधि माणसांची स्थिति झाली.

नॅशनल इन्स्टिटयूट ऑफ इंडस्ट्रियल सायकॉलजी या संस्थेचे कॅप्टन जे. एच्. ब्लॅकस्ले म्हणतात, "शें. ९० लोक आपल्या मानसिक सामर्थ्यापेक्षां कमी दर्जाच्या कामांत गुंतलेले असतात !"

या दृष्टीनें आपल्या देशांतील परिस्थिति पाहिली तर वर्षांतून सहा महिने सक्तीची विश्रांति ज्यांना घ्यावी लागते असे असंख्य लोक आहेत. त्यांच्या त्या विश्रांतीच्या वेळांत काम कसें पुरवावयाचें हा आपला प्रश्न आहे !

## पौर्वात्याचें पुनरुज्जीवन

परराज्याचें स्वराज्यांत रूपांतर करणें हें हिंदुस्तानचें ध्येय आहे. पाश्चिमात्य तत्त्वें तशींच ठेवून महत्त्वाच्या संस्थांत फक्त अदलाबदल करून हें कार्य होईल

कीं जें जें पाश्चिमात्य आहे त्या जागीं पौर्वात्य स्वरूपाची स्थापना करून हें कार्य पूर्ण होईल? विद्यमान परिस्थितींत पाश्चिमात्यत्वाचाच सर्वत्र पगडा बसलेला दिसतो. तें कांहींहि असो, हिंदुस्तानचें पुनरुत्थापन करणें हें मुख्य कार्य आहे यांत शंका नाहीं. पदोपदीं, प्रत्येक कार्य, प्रत्येक खातें, समाजाचा प्रत्येक थर हिंदी भूमिकेवर आणण्याचें हें कार्य आहे. यासाठीं अत्यंत महत्त्वाचें आणि आद्य कर्तव्य म्हणजे लोकांच्या मनांत ही नवी जाणीव उत्पन्न केली पाहिजे. जुने सद्गुण, जुनी व्यवस्था, जुने संबंध आणि ध्येय यांची नवी जाणीव आधीं उत्पन्न झाली पाहिजे. दीडशें वर्षांच्या परसत्तेखालीं, नव्या संघटना, नव्या चालीरीती, नव्या गरजा आणि चैनीचे नवे प्रकार लोकांच्या अंगवळणीं पडले आहेत. व्यक्ति समष्टीपेक्षां वरचढ झाली; कर्तव्याची जागा हक्कांनीं घेतली; धोरणाच्या आवरणांत तत्त्वें गुदमरून गेलीं आणि सेवेच्या जागीं संपत्ति तोरा मिरवूं लागली आहे.

'शेतीकडे परत फिरा' असें आपण सांगत फिरतों आणि स्वतः मात्र निर्लज्जपणें शहरी उद्योगांत धरपडत असतों. पंचायतीचें महत्त्व तोंडानें वर्णन करीत आपण विलायती रूढींनीं व्यापलेल्या कोर्टांत खेपा घालतों. मानवतेच्या मोठमोठ्या बढाया सांगत आपण एकीकडे जिचा पति मरणाच्या पंथास लागला आहे अशा स्त्रीच्या डबोल्यावर नजर ठेवून चार दोन रुपड्यांच्या लोभानें तिला लुबाडीत असतों. खालच्या मजल्यावर स्मशान-यात्रेची तयारी चालू असते आणि वरच्या मजल्यावर वरातीची धांवपळ सुरू असते. निर्जीव आणि यांत्रिक शिक्षणपद्धतीच्या शिक्षणसंस्थांत आपण आपलीं मुलें पाठवितों आणि स्वतः ग्रामोद्योगावर व्याख्यानें झोडीत असतों. हिंदी ग्रामीण जीवनाच्या ध्येयाचा जे पुरस्कार करीत आहेत त्यांनीं आपल्या जीवनांतील ही विसंगति ओळखली पाहिजे.

### पुढाऱ्यांना शिकवा!

आपल्या देशाचें वर सांगितलेल्या मार्गानें पुनरुज्जीवन करावयाचें असेल तर या नव्या रूढीविषयीं आपणांस उद्वेग वाटला पाहिजे. आपल्या मुलांना आणि मुलींनासुद्धां जें शिक्षण आपण देत आहोंत त्यावर निर्भयपणें जोराचा आणि उघड उघड हल्ला करण्याची आपली तयारी पाहिजे. परंतु दुर्दैवाची

गोष्ट अशी आहे कीं, आपले मंत्री आणि उपकुलगुरु, प्राध्यापक आणि अध्यापक, वकील आणि वैद्य, कारखानदार आणि व्यापारी यांच्यापासूनच आपण आपला बचाव करण्याची वेळ आली आहे. आपल्या या मान्यवरांपासून आपण आपलीं ध्येयें आणि विचार झांकून ठेवतां कामा नये. सुधारणेचा कांहींसा उलटा मार्ग आपणांस स्वीकारावा लागेल. 'जनतेस शिकवा' या घोषवाक्याऐवजीं 'पुढाऱ्यांनाच शिकवा' असा घोष करावयास पाहिजे.

आपली संस्कृति आणि सुधारणा हीं आंग्ल कल्पनांपासून सोडविलीं पाहिजेत. हें काम भारतवर्षाच्या पुढील पिढ्यांना पुरेल इतकें मोठें आहे. परंतु सध्यां तावडतोब करावयाचें काम म्हणजे या प्रश्नांतील महत्त्वाच्या भागाची जाणीव जनतेमध्यें उत्पन्न करणें ही होय. तें काम एकदां झालें म्हणजे तो प्रश्न सोडविण्याचा मार्ग यथाक्रम अंगीकारतां येईल.

# हिंदी खेडें १०

## खेड्यांचें स्वयंपूर्णत्व

हिंदी खेडें हें एक लहानसें जगच आहे असें म्हणतां येईल. खेडयाच्या मर्यादेंतच त्याच्या सर्व गरजा भागविल्या जातात म्हणून तें एक आपापल्यापरी स्वयंपूर्ण असें छोटेंसें जग आहे. कांहीं काळ खेडें अगदीं एकाकी झालें; बाह्य जगाशीं त्याचा संबंध तुटला तरी खेडुतांचें कांहीं बिघडत नाहीं. अन्न आणि वस्त्र या माणसाच्या ज्या मूलभूत गरजा त्या खेडयांतल्या खेडयांतच भागवितां येतात. इतर गांवांशीं संबंध केवळ सामाजिक बाबतीपुरता असतो. शहरांशीं आलेल्या संबंधामुळें वकील, डॉक्टर, कमिशन एजंट यांच्या द्वारां खेडयांची लूटमार झाली आहे. खेडेगांवांतून शहरांत आलेली संपत्ति लहान शहरांतून मोठ्या शहरांत आणि शेवटीं समुद्रापलीकडे जाते !

प्राचीन काळींहि जगाला आपण आपल्या उत्तमोत्तम उत्पादनाचा लाभ घेऊं दिला, परंतु अन्न किंवा वस्त्र यासाठीं आपल्या खेडयांना बाहेरच्या जगाकडे तोंड वेंगाडण्याची वेळ येत नव्हती. परंतु आज सर्वच जमाना बिघडला आणि बदलला आहे. आपण आपल्या खेडयांत केवळ हमाल झालों आहोंत. धनधान्याचें कोठार असा हा देश इंग्लंडचें गुदाम झाला आहे.

## इंग्रजी राज्याचें देशी स्वरूप

ब्रिटिशांनीं या राष्ट्राचें मन जिंकण्याचा आणि अंतःकरण काबीज करण्याचा जो हळूहळू आणि अदृश्य प्रयत्न केला त्याचेंच हें फळ आहे. १८५७ चें बंड फसल्यावर ब्रिटिशांनीं ओळखलें कीं, हिंदी लोक पुन्हां स्वातंत्र्याचा प्रयत्न केल्याखेरीज राहणार नाहींत. म्हणून लगेच दुसऱ्या वर्षीं त्यांनीं विश्वविद्यालयें ( मुंबई, कलकत्ता, मद्रास ) सुरू केलीं, १८६० मध्यें हायकोर्टें स्थापिलीं आणि १८६१ त कायदेमंडळें उघडलीं. विश्वविद्यालयें, कोर्टें आणि कौन्सिलें यांनीं लोकांचीं मनें आकर्षिलीं आणि हिंदुस्तानवर ब्रिटिश सत्तेचा पाया पक्का होत गेला. इंग्रजींमधून शिक्षणास सुरुवात झाली. कोर्टांत न्यायाचें काम इंग्रजींतूनच सुरू झालें. वकील प्रांतभाषांत बोलतात तरी न्यायाधीश सगळें कांहीं इंग्रजींतच करतो. कोर्टांतील सत्य वचनाची शपथ हा असत्य वचनाचा परवानाच झाला. कोर्टें हीं न्यायाच्या नांवाखालीं जुगारीचे अड्डे झालीं. कोणीहि तेथें खोटें बोलावें आणि सहीसलामत सुटावें! खटला लढविणें हा श्रीमंतांनीं गरीबांचा हळूहळू छळ करण्याचा भयंकर मार्ग ठरला!

हें सर्व वातावरण बदललें पाहिजे. तेथें पंचायती स्थापन झाल्या पाहिजेत. ग्रामपंचायतीस खेड्यांतील आरोग्य, सहकार आणि न्यायदान हीं कामें करतां आलीं पाहिजेत. पंचायतीनें जंगल आणि पाणी-पुरवठा-कालवे हीं कामें पाहिलीं पाहिजेत. तिनें ग्रामोद्योग आणि घरगुती धंदे यांचा जीर्णोद्धार केला पाहिजे. तिनें ग्रंथालय चालविलें पाहिजे. एका पंचायतीस हें कदाचित् जमलें नाहीं तर एकापेक्षां जास्त पंचायती असाव्यात. कांहीं झालें तरी न्यायाच्या बाबतींत सरकारी वकीलाच्या शिफारशीखेरीज कोणालाहि 'अपील' करण्याची परवानगी नसावी!

## ग्रामपंचायत

गांवांत पक्षोपपक्ष असतात हा पंचायतीविरुद्ध एक आक्षेप असतो; तो खरा आहे. परंतु ही पक्षोपपक्षाची स्थिति आजची न्यायपद्धति आणि न्याय-मंदिरें यांनीं निर्माण केली आणि ती वाढीस लाविली आहे. न्याय-व्यवस्था लोकप्रिय होण्यासाठीं न्यायाचें काम त्वरित, कमी खर्चाचें आणि निर्विवाद झालें पाहिजे. न्यायाविषयीं लोकांना खात्री वाटली पाहिजे. गांवांतील

चडोलधारी अशीं माणसें निःसंकोचपणें साक्ष देऊं शकलीं, गांवांतील लोकमत असत्याची नाकेबंदी करण्याइतकें प्रभावी झालें, आणि निर्णयाचें काम गुन्ह्याच्या जागीं असलेल्या ५।६ त्रयस्थांनीं केलें तरच बोललेल्या शब्दाला इभ्रत प्राप्त होईल. आज असत्य भाषणावरच कायदेबाजी पोसत आहे. असत्याचें नियंत्रण झालें कीं, कायदेबाजी थांबेल आणि हें काम ग्रामपंचायतीलाच करतां येईल. मध्यंतरींच्या स्थित्यंतराच्या काळांत आपणांस विपरीतहि अनुभव येतील. तसे सर्वत्र येतच आहेत. परंतु स्थित्यंतराच्या काळांत हें अपरिहार्य आहे.

हिंदुस्तान आपणच पुन्हां एकदां जिंकावयाचा आहे. प्रत्येक खात्याची पुनर्रचना करावयाची आहे. केवळ नोकरशाहीत खांदेपालट झाला किंवा व्यवसायांत बदल झाला, न्यायाधीश आणि अधिकारी बदलले, फार काय प्रधानमंडळें बदललीं तरी अशा बदलानें स्वराज्य मिळणार नाहीं. अंतःकरण बदलणें, हेतु बदलणें, दृष्टिकोन बदलणें हें आवश्यक आहे. त्यानेंच नवें स्वराज्य आपल्या वैभवासह झळकूं लागेल आणि आपलीं खेडीं स्वयंपूर्ण होतील. हेंच गांधीवादाचें ध्येय आहे.

### शहरें आणि खेडीं

कांहीं लोकांचें असें मत आहे कीं, शहरांना खालीं ओढण्याऐवजीं खेड्यांचींच शहरें केलीं पाहिजेत. परंतु आज जीं खेडीं दिसतात तीं परकीय वा अंतर्गत अव्यवस्थेशीं कशीं झगडूं शकतील ? शहरांतील दोष या विरोधकांसहि मान्य आहेत. तरी खेड्यांनीं शहराचें सामर्थ्य मिळविल्याखेरीज चालू धकाधकींत त्यांचा निभाव लागावयाचा नाहीं असें त्यांचें मत आहे. प्राचीन राज्यकर्ते फक्त खेडेगांवाकडेच लक्ष देत होते असें आम्हांस वाटत नाहीं. प्राचीन खेडीं शहरांना अनेक वस्तूंचा पुरवठा करीत असत. हा देश केवळ संन्याशांनीं आणि साधूंनीं व्यापलेला नाहीं. प्राचीन काळीं खेडीं होतीं, जंगलें होतीं, तशींच शहरेंहि होतीं. ग्राम्य हा शब्द नागरिक या शब्दाच्या विरोधी आणि निंदाव्यंजक नाहीं. नागरिक शब्दांत संस्काराचा भाव सूचित असला तरी शहरें खेड्यांपेक्षां नीति किंवा संस्कृतीच्या बाबतींत श्रेष्ठ होतीं असा याचा अर्थ नाहीं. ग्राम हें पूर्वी आणि आजहि शहरांतील

बाह्य सुधारणेच्या बाबतींत मागासलेलें असेल. परंतु आजचीं खेडीं हीं अधोगतीस गेलीं आहेत. आहे त्या स्थितींत एकदम खेड्याकडे चला अशी त्यांची शिफारस आम्ही करूं शकत नाहीं. तसेंच खेडेगांवांसाठीं शहरांचा नाश करण्याचाहि आमचा हेतु नाहीं. कारण तसें करणें म्हणजे डोकें उडवून देऊन पायांवर उभें राहण्याचा प्रयत्न करण्यासारखें होणार आहे.

सर्व दृष्ट्या आरोग्यसंपन्न अशीं खेडीं हीं शहरांचें पोषणच करतात आणि खरीं देशभक्तिप्रवण शहरें खेड्यांच्या कल्याणाची काळजी घेतात. तीं खेड्यांचें रक्तशोषण करीत नाहींत. आजचीं शहरें विलायती मालाची बाजारपेठ म्हणून खेड्यांचा उपयोग करीत आहेत. याच्या उलट त्यांनीं ग्रामोद्योगाच्या वैभवानें आपलें जीवन सुशोभित केलें पाहिजे. खेड्यांतील ग्रामोद्योगाच्या उत्पादनाचा स्वीकार शहरांनीं केला पाहिजे.

सामाजिक प्रश्न नुसते बाजूस टाकून सुटत नसतात. त्यांचा अभ्यास केला पाहिजे आणि विशेषतः सहकार्याच्या तत्त्वावर त्यांच्या निराकरणाच्या योजना आंखल्या पाहिजेत. या दृष्टीनें खेड्यांची पुनर्रचना करतांना शहरी जीवनाचें केवळ अनुकरण करण्याची प्रवृत्ति नाहींशी केली पाहिजे. आज ज्याप्रमाणें खेड्यांपर्यंत राजकारण पोहोंचलें आहे त्याचप्रमाणें न्यायदान, संस्कृति आणि उद्योगधंदे हींहि खेड्यांपर्यंत पोहोंचविलीं पाहिजेत. कोर्टें आणि विश्वविद्यालयें यांनीं शहरें आणि खेडीं यांचे आज जे संबंध प्रस्थापित केले आहेत त्या संबंधांची पुनर्रचना केली पाहिज. नाविन्याच्या वेडांत उद्भवलेल्या कल्पनांच्या तडाख्यांतून खेडीं सोडविलीं पाहिजेत आणि तेथें विचारांचीं आणि कार्यांचीं केंद्रें उत्पन्न केलीं पाहिजेत.

## परावलंबनाची मालिका

स्वयंपूर्णत्वाचें ध्येय समजण्यासाठीं हिंदु-समाज-रचनेंतील कांहीं गोष्टी लक्ष्यांत घेणें जरूर आहे. त्या समाजरचनेनें आणि कार्यपद्धतीनें पूर्वी प्रत्येक घटकास अन्न आणि वस्त्र यांची तरतूद झालेली होती. आज ती व्यवस्था पूर्णपणें उध्वस्त झाली आहे. आज सर्व देशभर प्रांत, सीमा, जाति आणि व्यवसाय यांचे तुकडे पडले आहेत आणि संस्थानें आणि प्रांत, हिंदु आणि मुसलमान, शीख, ख्रिश्चन, शहरें आणि खेडीं, शहरी कामगार आणि ग्रामीण

मजूर यांच्यांत कलह माजले आहेत. पाश्चात्य संस्कृतीनें आपल्या समाजाचा पायाच हादरला आहे. जर्मनीचें उदाहरण देऊन खेड्यांच्या स्वावलंबनाच्या गप्पा झोकणें ही एक फॅशन झाली आहे. परंतु प्रत्यक्ष खेड्यांत काय चाललें आहे? तेथें आज बारीकसारीक दुकानें दिसतात. तीं शहरांतून आणलेला विलायती माल विकीत असतात आणि स्वस्ताईच्या नांवाखालीं भिकार वस्तु तेथील लोकांच्या गळ्यांत बांधल्या जातात. न्हावी जर्मन वस्तरा वापरूं लागले आणि लोहाराच्या पोटावर पाय पडला. लोहार व सोनार, विलायती कपडे घेऊं लागले आणि गांवांतील विणकर बुडाले. विणकर जपानी पायतणें घेऊन चांभारास बेकार करूं लागले. चांभारानें एनॅमलचीं भांडीं पत्करून कुंभाराच्या व्यवसायावर गदा आणली आणि कुंभारानें ब्लीचिंग पावडर वापणाऱ्या परटाकडे धांव घेऊन गांवठी धोब्याची भाकरी तोडली. अशा रीतीनें जो तो आपल्या शेजाऱ्यास बेकार करीत आहे. खेडीं परावलंबी झालीं कीं, सर्व राष्ट्र दुर्बल होतेंच आणि बेकारीचें भूत देशभर थैमान घालूं लागतें. आजच्या सोशालिस्टांना बेकारीच्या प्रश्नांनीं घेरलें आहे. बेकारीच्या प्रश्नानें पाश्चात्य देशांतहि कहर केला आहे.

अशा रीतीनें सामुदायिक कल्याण आणि सहकार हा जो हिंदुस्तानाचा पाया होता तोच ढासळला. तेथें वैयक्तिक झगडा, आपापसांतील स्पर्धा, अव्याहत तेढ, हीं उत्पन्न झालीं आणि त्यामुळें आपलें राष्ट्रीयत्व अधोगतीस पोहोंचलें आहे!

पाश्चात्य समाजसंघटना ही प्रचंड उत्पादन आणि बाजारभावाची स्पर्धा यांवर उभारलेली आहे. यासाठीं जगांतील बाजारपेठा हेंच राष्ट्राराष्ट्रांतील कलहाचें मुख्य कारण होऊन बसलें. याच कारणानें पहिलें महायुद्ध झालें. याच कारणांतून दुसरें महायुद्ध निर्माण झालें. पाश्चात्यांनीं सर्व बाजारपेठा पूर्वेकडे मिळविल्या आहेत. ते पौर्वात्य देश आतां स्वावलंबी होऊं लागले आहेत. अशा स्थितींत दोनच मार्ग आहेत. पाश्चात्य राष्ट्रांनीं आपलें उत्पादन थांबवून अन्न आणि कच्चा माल यांचा आपला सांठा वाढविला पाहिजे आणि पौर्वात्य राष्ट्रांनीं आपल्या गरजा कमी करून आपलें उत्पादन वाढविलें पाहिजे. या बाबतींत पूर्वेनें पश्चिमेस उदाहरण घालून दिलें पाहिजे. पाश्चात्य, अनुभवा-

खेरीज शहाणे होणार नाहींत. आतां कटु अनुभवानंतर त्यांनीं शहाणे होण्यास सुरुवात केली आहे.

एकदां मूल सिद्धांताची खात्री झाली कीं, तपशीलाची अंमलबजावणी लांबणीवर टाकण्यांत अर्थ नाहीं. हिंदुस्थानांत हें प्रचंड कार्य अंगावर घेणारी काँग्रेस ही संस्था आहे. राष्ट्रीय पुनर्घटनेचा आरंभ राष्ट्रीय सभेनें खादीचा पुरस्कार करून केला आहे. खादी विलायती कापड बाजारपेठेंतून हांकून लावील हें फार थोड्यांना संभवनीय वाटतें. परंतु तें जवळ जवळ प्रत्यक्ष घडून आलें आहे. राष्ट्रीय जीवनांत उत्पन्न झालेली जाणीव म्हणजेच जागृत झालेली विवेकबुद्धि होय आणि जागृत विवेकबुद्धीपुढें कायदे, जकाती, घसरलेली चलन-पद्धति इत्यादि गोष्टी दुबळ्या ठरतात. खादी हा ग्रामोद्योगाचा राजा आहे. खादीनें आपलें कार्य पूर्ण केलें आहे. आतां पुनरुज्जीवनाचा प्रवर्तक या दृष्टीनें खादीव्यवसायानें इतर ग्रामोद्योगांनाहि डोकें वर काढण्यास मदत केली पाहिजे. काँग्रेसच्या आदेशाबरोबर गांधीजींनीं ऑल इंडिया व्हिलेज इंडस्ट्रीज असोसिएशनच्या द्वारां हें कार्य हातीं घेतलें आहे.

# आर्थिक उद्धार ११

## ब्रिटिश साम्राज्याचा आधार

एक काळ असा होता कीं, या देशांतील सर्व लोक फक्त हातसुताचें आणि हातविणीचें कापड वापरीत असत. परंतु ही अगदीं साधी गोष्ट सुद्धां लोक आज विसरले आहेत. या देशांत तयार होणारें कापड सांठविण्यासाठींच ईस्ट इंडिया कंपनीनें ' फॅक्टरी ' स्थापन केल्या. त्या फॅक्टरी म्हणजे फक्त गुदाम किंवा डेपो होते. विलायतेंत कापड मोठ्या प्रमाणावर जाऊं लागलें. कंपनीस शें. ३०० नफा होऊं लागला. नंतर मुर्शिदाबादचें रेशीमहि इंग्लंडला पोहोंचलें. या विलायती मालाच्या आयातीचा धोका लवकरच तेथील लोकांच्या लक्ष्यांत आला. मुर्शिदाबादचें कापड घेऊन ऐटींत फिरणाऱ्या इंग्लिश लोकांचा डॅनियल डीफो या लेखकानें उपहास केला आहे।

१७०० सालीं हिंदी रेशीम वापरणाऱ्या इंग्रज माणसास ५ पौंड दंड करण्याचा कायदा झाला. १७३५ सालीं हिंदी रेशीम विकणें हाहि गुन्हा ठरविण्यांत आला. एवढ्यावर न थांबवतां पुढें असाहि कायदा झाला कीं, प्रेताला लोकरीखेरीज इतर कापड गुंडाळणारास ५ पौंड दंड होईल. अशा रीतीनें ३०० वर्षांपूर्वीच इंग्लंडनें हिंदी मालाच्या आयातीपासून आपल्या उत्पादनाचें संरक्षण करण्याची तजवीज केली.

१७८३ त वाफेचें एंजिन सुरू झालें. गिरण्यांचें राक्षसी उत्पादन होऊं लागलें आणि हिंदी बाजारावर हल्ले सुरू झाले. विलायती कापडाची आयात ३ लक्ष रुपयांवरून ७० कोटि रुपयांपर्यंत वाढली. हिंदुस्तानांतील ब्रिटिश साम्राज्य हें कायदा, जमीनवसूल, शिक्षण, कोर्ट, कायदेमंडळें किंवा किताब-बहादूर हिंदी लोक यांच्यावर उभारलें नसून लँकेशायरच्या कापडनिर्मितीवर उभारलेलें आहे असें सिद्ध झालें.

## खादीची व्याख्या

हिंदुस्तानांत वस्त्रस्वावलंबनाकडे लोकांचें लक्ष हळू हळू जाऊं लागणें अपरिहार्यच होतें आणि त्यासंबंधींच्या चर्चेचा आणि कार्याचा परिणाम म्हणजेच काँग्रेसनें केलेला खादीचा पुरस्कार. त्यापूर्वी सरकारनें हातमागांना उत्तेजन देण्यास सुरुवात केली होती. परंतु काँग्रेसनें हातमागास हातसुताची जोड दिली. या व्यवसायाची प्रगति होण्यासाठीं काँग्रेसनें त्यासंबंधीं नियम करून खादीचें श्रेष्ठत्व सिद्ध केलें. खादी म्हणजे केवळ हातसुताचें हातविणीचें कापड नव्हे, तर ‘ ज्या कापडाच्या उत्पादनांत प्रत्येक कामगारास ठराविक वेतन मिळतें असें कापड ’ अशी खादीची व्याख्या काँग्रेसनें ठरविली. हें वेतनाचें प्रमाण ‘ऑल इंडिया स्पिनर्स असोसिएशन’ या काँग्रेसच्या अधिकृत संस्थेनें ठरविलेलें आहे. खादीच्या राजकीय आणि आर्थिक व्याख्या या वरील व्याख्येंत एकरूप झाल्या आहेत. ‘ अधिकृत दुकानांतूनच खादी घ्या ’ असें लोकांस सांगण्यांत येतें याचें कारण वरील व्याख्येंत सांगितलें आहे.

## चरखा हेंहि एक यंत्रच

यांत्रिक युगांत या प्राचीन व्यवसायाचा पुनरुद्धार करणें म्हणजे घड्याळाचे कांटे मागें फिरविणें होय, असें टीकाकार म्हणतात. चरख्याविषयीं हा आक्षेप घेणारांना हें माहीत नाहीं कीं, चरखा हेंहि यंत्रच आहे. तें यंत्र घरोघर पोहोंचलें आहे. आपल्यापुढें असा प्रश्न आहे कीं, आपण उद्योगधंदे खेडुतांकडे न्यावेत कीं, ‘ खेडुतांसच ( त्यांच्या घरांतून बाहेर काढून ) उद्योग-धंद्याकडे न्यावें ? ’ दुसरा मार्ग म्हणजे गिरणीमजूर तयार करणें ! पहिला मार्ग हा चरख्याचा मार्ग आहे. जें धन राष्ट्रास केवळ श्रीमंतच करीत नाहीं, तर

सामर्थ्यवान्‌हि करतें तें धनच देशांतील श्रमजीवी लोकांना काम देतें, शहाणे करतें आणि सुस्थितींत ठेवतें. हेंच गांधीजींच्या शिकवणुकीचें सार आहे.

ते राष्ट्रास वारंवार सांगत आहेत कीं, हक्क हा कोणत्याहि दृष्टीनें वंश किंवा वर्ण यांवर, इतकेंच नव्हे तर सद्गुणावरहि अवलंबून नसतो. लोकांना स्वातंत्र्यास लायक करणें म्हणजे त्यांना स्वतंत्र करणें हाच मुख्य मुद्दा आहे, आणि राजकीय सत्तेचा उपयोग करण्याचें ज्ञान त्यांना देणें म्हणजेच त्यांना ती सत्ता देणें होय. समता आणि स्वातंत्र्य हीं व्यक्तींवर वा राष्ट्रांवर बाहेरून लादतां येत नाहींत. जर ते समर्थ असले तर तो त्यांचा ईश्वरदत्त हक्क आहे. तो त्यांच्या विरोधकांपासून मिळवावा लागत नाहीं.

## गांधींचें अर्थशास्त्र

चरखा आणि हातमाग यांमुळें राहणीच्या खर्चापैकीं १/५ ते १/६ खर्चाची बचत होते. हिंदुस्तानांत १/३ लोक शेतकाम आणि जंगलकाम करणारे आहेत. त्यांना वर्षांतून ४ ते ६ महिने रिकामें बसावें लागतें. 'त्या असंख्य लोकांना निदान एकदोन रोजाचें तरी काम मिळेल असा कांहीं मार्ग शोधा' असें गांधीजींनीं सुधारलेल्या शास्त्रीय आणि यंत्रोपासक जगास आव्हान दिलें आहे! आणि जोंपर्यंत त्यांना तसा मार्ग सांगतां येत नाहीं तोंपर्यंत—निदान तोंपर्यंत तरी 'या युगांतील सर्वश्रेष्ठ अर्थशास्त्रज्ञ' हा गांधीजींचा किताब कोणी हिरावूं शकत नाहीं.

गांधीजी रूढीला बळी पडणारे नाहींत. जुन्याचे ते अंध भक्त नाहींत. पाश्चात्य शास्त्राचा ते अंधपणें द्वेष करीत नाहींत. शास्त्रीय दृष्टीविषयीं ते अट्टाहास बाळगतात. त्यांच्या शास्त्रीय दृष्टीला जें पटत नाहीं असें कोणतेंहि कृत्य ते करीत नाहींत. अशा कृत्याचा ते स्वीकार करीत नाहींत, आणि अशा कृत्यावर विश्वासहि ठेवीत नाहींत. कोणत्याहि गोष्टीचें ते मुळापर्यंत संशोधन करतात आणि आपल्या ज्ञानाशीं जें विसंगत असेल किंवा जें आपल्या संशयांचें निराकरण करीत नसेल तें तत्त्व स्वीकारीत नाहींत. ज्या चरख्याला चालू लोकमतानें अशास्त्रीय ठरविलें आहे त्या चरख्यास त्यांनीं शास्त्रीय दृष्ट्या पूर्णत्व आणलें आहे. त्याच्या रचनेंत गुंतागुंत न वाढवितां, खेडुतास त्याची दुरुस्ती सहज करतां येईल असें त्याचें स्वरूप

ठेवून त्यांनीं चरख्याची उत्पादनशक्ति वाढविण्यासारख्या सुधारणा केल्या आहेत. 'येरवडा चरखा' हें गांधीजींच्या शास्त्रीय वृत्तीचें आणि शास्त्रीय निर्दोषत्व आणि सौकर्य यांविषयींच्या विशेष आग्रहाचें प्रत्यक्ष उदाहरण आहे.

## गिरणीकापड विरुद्ध खादी

'खादींत गिरणींच्या कापडाचा समावेश कां होत नाहीं,' असें वरेच लोक विचारतात. स्वदेशी प्रदर्शनांत स्वदेशी गिरणीच्या कापडास मनाई असावी याचें पुष्कळांस आश्चर्य वाटतें. कॉंग्रेसच्या अधिकार-पदस्थांना गिरणीकापड वापरण्याची मनाई केलेली असते. याचें पहिलें कारण असें आहे कीं, गिरणी-कापडास उत्तेजनाची वाण नाहीं. त्याची जाहिरात करण्याची आवश्यकता नाहीं. खादी गरीबांना अन्न देते आणि खादीनें मिळणारा पैसा शहरांतून खेड्याकडे जातो. या दोन कारणांसाठीं कॉंग्रेस उमेदवारांना आणि प्रतिनिधींना खादी वापरण्याची अट घालण्यांत आली आहे. परंतु गिरणीकापडाची नैतिक आणि आर्थिक बाजू पुष्कळ लोकांच्या लक्ष्यांत येत नाहीं. 'गिरणी कापड स्वदेशी नाहीं का ?' 'होय, आहे.' परंतु जें जें स्वदेशी आहे तें तें गरीबांस साहाय्यक होतेंच असें नाहीं. हिंदुस्तानची पुनर्घटना करण्यांत फक्त ब्रिटिश साम्राज्यशाहीपासून संरक्षण एवढाच हेतु नाहीं. हिंदी भांडवलशाहीपासूनहि देशाची मुक्तता करावयाची आहे. या दृष्टीनें गिरणीवाले आणि गिरणीमजूर यांचा विचार केला पाहिजे.

गिरणी-मजुरांना इंग्रजींत Hands म्हणतात. 'मिलहॅन्ड्स' एवढाच त्यांचा उल्लेख करतात. त्यांचीं Heads कोणी लक्ष्यांत घेत नाहीं. त्यांच्या Hearts बद्दल तर कोणी विचारहि करीत नाहीं. आणि एका दृष्टीनें तें खरेंच आहे. गिरणींत ज्या पद्धतीचें काम असतें त्यांत कामगारांकडून 'निर्मिति' अशी कांहींच होत नाहीं. मजूर फक्त यंत्राच्या तोंडांत घास टाकून त्याला खाद्य पुरवीत असतो. कोणी फक्त आंकडेवारी करतात, कोणी फक्त सूत गुंडाळीत राहतात ! दिवसाच्या शेवटीं ते फक्त रोजमुऱ्याचा विचार करतात. आपण काय काम केलें हा विचार त्यांच्या मनांत येत नाहीं. अशा रीतीनें मजूर हा यंत्रांपैकींच एक यंत्र झाला आहे.

त्याच्या उलट एखादा शिल्पकार किंवा विणकर पाहा. त्याच्या कामाचें स्वरूप ठरविण्यापासून तों तें पूर्ण करीपर्यंत तें सर्व काम ही त्याची स्वतःची निर्मिति असते. आपल्या उत्पादनावर त्याची पूर्ण सत्ता असते; त्यानें केलेल्या मालाचा तो वाटेल तसा विनियोग करूं शकतो. माणसाचें मनुष्यत्व मजुरीनें उत्तेजित होत नाहीं. कामामुळेंच त्यास चैतन्य मिळतें. निर्मितीचा आनंद ही खरी चैतन्यदायी शक्ति आहे. तसा आनंद गिरणी-मजुरास कधींहि मिळत नाहीं.

नैतिक दृष्ट्या पाहिलें तर गिरणी-मजुरांचें जीवन सर्वस्वीं विस्कळित झालेलें असतें. गिरणीमुळें कुटुंबांतील व्यक्तींची वाताहात होते. गिरणींत हडेलहप्पीचें वातावरण असतें. ग्रामोद्योगांत घराचें पावित्र्य कायम राहतें आणि संपत्तीचें स्वामित्व नेहमीं सम प्रमाणांत राहतें.

### स्वस्ताईची किंमत

गिरणी-कापडाच्या फक्त स्वस्ताईचा विचार करणारे लोक त्या स्वस्ताईची किती किंमत अप्रत्यक्षपणें द्यावी लागते याचा विचार करीत नाहींत. गिरणीच्या उत्पादनाचा स्वीकार केल्यानें आपण आपल्याभोंवतालच्या असंख्य गरीब कुटुंबांना धुळीस मिळवतों. कारण शेतीच्या खालोखाल विणकाम हाच व्यापक प्रमाणावर चालणारा व्यवसाय आहे. आणि अन्नाच्या खालोखाल वस्त्र ही अपरिहार्य गरज आहे. म्हणून अन्न आणि वस्त्र यांची आपण परदेशाहून आयात करण्यांत देशांतील दोन मुख्य व्यवसायांवर गदा आणीत असतों. यासाठींच आपण आपल्या देशांत मिळणारेंच अन्न घेतलें पाहिजे आणि हात-विणीचें कापड वापरलें पाहिजे.

गिरणीवाल्यांना तुमच्या मदतीची कोठें जरूरी आहे ? त्यांचें भांडवल, त्यांचें उत्पादन, त्यांची नफेबाजी, त्यांचे बंगले आणि जलविहारस्थानें, त्यांच्या मोटारी आणि त्यांच्या शर्यती, त्यांच्या सफरी आणि त्यांची उधळपट्टी यांत तुमच्या आमच्या मदतीवांचून कांहीं अडलें आहे काय ? तुमची आमची पर्वा न करतां अर्धपोटी आणि विवस्त्र खेडुतांची नागवण करून गिरणीवाले आपल्या वैभवांत दंग आहेत ! या दृष्टीनें स्वदेशी प्रदर्शनाकडे पहिलें पाहिजे.

लखनौ येथील प्रदर्शनाच्या वेळीं गांधीजी म्हणाले:

" हीं प्रदर्शनेंहि आतां चित्रपटासारखीं केवळ आकर्षक राहिलीं नाहींत. तुमच्या डोळ्यांना मोहित करणाऱ्या आणि कानांस आल्हाद देणाऱ्या गोष्टी आतां या प्रदर्शनांत आढळणार नाहींत. ज्याला शैक्षणिक दृष्ट्या कांहींहि किंमत नाहीं अशी एकहि वस्तु आम्हीं या प्रदर्शनांत घेतली नाहीं हें मला मुद्दाम सांगितलें पाहिजे. प्रदर्शन हें एक धर्मक्षेत्र व्हावें, डोळ्यांना आणि कानांना ती एक मेजवानी वाटावी, अर्थात् ती मेजवानी म्हणजे इंद्रियांचें शुद्धीकरण करणाऱ्या आध्यात्मिक भावनांची असावी, अशीच प्रदर्शनाची योजना करण्याचा आम्ही प्रयत्न केला आहे. अशा योजनेचा हेतु काय? ओरिसा सारख्या भुकेल्या आणि दरिद्री माणसांच्या प्रदेशांतूनच हाडावर, शिंगावर आणि चांदीवर अप्रतिम नक्षीकाम करणारे कामगार निर्माण झाले आहेत. त्या वस्तु आपण पाहा. त्या आग्रत्या तयार केलेल्या नाहींत. त्यांची निर्मिति अव्याहत चालू आहे. दारिद्र्यानें पोखरलेल्या शरीरांतसुद्धां आत्म्याचें कर्तृत्व कसें असतें आणि तें कर्तृत्व निर्जीव हाडांत आणि धातूंत कसें चैतन्य निर्माण करूं शकतें तें या ठिकाणीं आपणांस दिसेल. एका गरीब कुंभारानें मातीच्या गोळ्यांतून अजब कलाकृति निर्माण केली आहे. ज्यांची मूळ किंमत चार दोन आण्यांपेक्षां जास्त नाहीं, अशा वस्तु कलेचे सुबक नमुने म्हणून तुमच्यापुढें आल्या आहेत. काल एका भगिनीनें कृष्णाची हस्तिदंती मूर्ति खरेदी केली. ती पूर्वी कृष्णभक्त नव्हती, परंतु तिनें आतांच मला सांगितलें कीं, " त्या सुंदर मूर्तीची आराधना मी करूं लागलें आहें. "

"अशा रीतीनें हें प्रदर्शन भडक देखाव्यासारखें नाहीं तर ती एक अद्भुत सृष्टि आहे. परंतु आपली अभिरुचि इतकी भ्रष्ट झाली आहे कीं, आपल्या डोळ्यांसमोर घडणारे चमत्कार आपणांस केवळ दगडमाती वाटतात आणि दूर देशाहून आलेल्या क्षुद्र वस्तु आपणांस उत्तम कलेचे आदर्श वाटतात. युरोपांतील कोणत्या तरी झऱ्याचें पाणी आपणांस मंतरलेल्या पाण्यासारखें अद्भुत परिणाम करणारें वाटतें; परंतु पवित्र गंगामातेचें पाणी नैसर्गिक रीत्याच शुद्धिकारक आणि जंतुनाशक असलें तरी आपणांस तें एखाद्या घाण डबक्यांतल्या पाण्यासारखें वाटतें. "

## खादी स्वस्त आहे का ?

गिरणीच्या कापडाच्या मानानें खादी आर्थिक दृष्ट्या स्वस्त आहे काय ? या प्रश्नावर कांहीं अर्थशास्त्रज्ञांनीं गांधीजींबरोबर चर्चा केली. त्या चर्चेची विस्तृत हकीकत श्री. प्यारेलाल यांनीं दिली आहे. त्या चर्चेत घरगुती धंद्यांचाहि ( Handicrafts ) विषय आला होता. अर्थशास्त्रज्ञांचें मत असें होतें कीं, हिंदुस्थानच्या आजच्या परिस्थितींत बेकारांना काम पुरविण्यापुरतें खादी आणि घरगुती धंद्यांचें महत्त्व निर्विवाद आहे आणि या दृष्टीनें त्यांना उत्तेजन द्यावयास पाहिजे. परंतु राष्ट्रीय योजनेंत त्यांना मुख्य स्थान देतां येणार नाहीं. अर्थशास्त्रदृष्ट्या फायदेशीर नसणाऱ्या व्यवसायांना ( खादी आणि घरगुती व्यवसाय हे त्यांना तसे वाटतात ) इतकें महत्त्व देणें तात्त्विकदृष्ट्या योग्य नाहीं असें त्यांना वाटत होतें. त्या व्यवसायांना यंत्रसिद्ध मालाच्या बरोबरीस आणणें, त्यापायीं यंत्रसिद्ध मालास मागें टाकणें आणि शेवटीं देशाची उत्पादन-शक्ति खच्ची करणें ही मोठी चूक आहे असें त्या अर्थशास्त्रज्ञांचें मत होतें.

गांधीजींचें म्हणणें असें होतें कीं, " आज कारखान्यांतील मालाच्या प्रसारामुळें लोक घरगुती धंद्यांवर अनेक प्रकारें गदा आणीत आहेत. उदाहरणार्थ, रेल्वेची स्वस्त वाहतूक, स्थानिक स्वराज्याच्या खास सवलती, इतर मूलभूत उद्योग-धंद्यांचें उत्पादन आणि एकीकरण, बँकांचें आणि विमाकंपन्यांचें भरपूर साहाय्य, तज्ज्ञ आणि चलाख कामगार यांचा भरपूर आणि हमखास पुरवठा होण्यासाठीं औद्योगिक स्वरूपाच्या सर्वसाधारण शिक्षणाचा वरिष्ठ दर्जा या सर्व गोष्टींवर कारखानदारीचें यश अवलंबून आहे. या सर्व गोष्टी अतिशय खर्चाच्या आहेत. परंतु समाजानें त्याबद्दल कधीं तक्रार केली नाहीं. कारण या कारखान्यांनीं आजच्या आपल्या सामाजिक गरजा आणि ध्येय यांचें नियंत्रण करणारे असे जे शहरवासी बुद्धिजीवि लोक आहेत त्यांना हजारों प्रकारें सुखास्वाद दिलेला असतो. त्या सुखसोयींना स्टुअर्ट चेस यांनीं "सुधारणेचीं बाहुलीं" असें म्हटलें आहे. जलद प्रवास, मोटारी, सिनेमा, रेडिओ, विद्युत्प्रकाश आणि अशा असंख्य गोष्टी हींच तीं शहरवासीयांना खेळविणारीं सुधारणेचीं बाहुलीं आहेत.

"घरगुती धंद्यांचें यश अगदीं निराळ्या अर्थपद्धतीवर अवलंबून आहे. ग्रामीण जीवनवादी लोकांनीं जर या धंद्यांना आश्रय दिला तर जगांतील

कोणतेंहि ( उत्पादन ) सामर्थ्य त्यांच्याशीं स्पर्धा करूं शकणार नाहीं. परंतु असें होण्यासाठीं ग्रामीण-जीवनवादी लोकांनीं जीवनांतील सौम्य आनंदावर आणि समाधानावर संतुष्ट राहिलें पाहिजे. ग्रामीण वातावरणांत मिळणाऱ्या साध्या जीवनाचा त्यांनीं स्वीकार केला पाहिजे. अद्ययावत् सुखसोयींशीं बरोबरी करणारें खेडें निर्माण करण्याचें वेड त्यांच्या मनांत असतां कामा नये. त्या स्वप्नसृष्टींतून ते बाहेर आले पाहिजेत. घरगुती उद्योगधंद्यांबरोबर ज्याची तुलना करण्यांत येते, असें कारखान्यांतील मालाचें जें आर्थिक स्वरूप आहे तें त्या उत्पादनाचें स्वयंसिद्ध स्वरूप नाहीं, तर तें त्या उत्पादनावर लादलेलें आहे. समाजानें जी मूल्यपद्धति स्वीकारली आहे आणि जी स्वीकारण्याची समाजाची इच्छा आहे, त्या पद्धतीवरच उत्पादनाची आर्थिक बाजू अवलंबून असते. एखादा व्यवसाय आर्थिकदृष्ट्या सोईचा आहे कीं नाहीं हें ठरविण्याची एकच प्रमाणभूत पद्धति आहे. ती म्हणजे त्या व्यवसायानें जीविताच्या मूलभूत गरजा किती प्रमाणांत भागतात, त्या व्यवसायाचा उत्पादकाच्या जीवनाशीं संबंध कसा आहे, हें पाहणें होय. ऑल इंडिया स्पिनर्स असोसिएशननें एका गिरणीच्या भांडवलाच्या शें. ६० टक्के भांडवल गुंतविलें आहे. जर एका गिरणीइतकें भांडवल असोसिएशननें गुंतविलें तर गिरणी जितक्या कामगारांना पोसते त्याच्या ४०० पट कामगारांच्या पोटाची सोय असोसिएशन करूं शकेल !"

'खादी आर्थिकदृष्ट्या परवडेल काय' या प्रश्नाचा सर्व विचार वस्तुतः अगदीं चुकीच्या पद्धतीनें करण्यांत येतो. बाजारपेठेंत सुसंघटित असलेला व्यवसाय, त्या मानानें कमी संघटित अशा व्यवसायाची सहज हकालपट्टी करूं शकतो. पुन्हां त्या व्यवसायास अमर्याद भांडवल मिळत असल्यानें तो माल तात्पुरता तोटा पत्करूनहि विकतां येतो. अशा मार्गानेंच यंत्रसिद्ध अशा व्यवसायाकडून ग्रामोद्योगाची आणि हस्तव्यवसायाची हळूहळू पिछेहाट झाली. ब्रिटिशांनीं शांततेच्या मार्गानें हिंदुस्थान व्यापला याचा अर्थ हाच आहे. त्यामुळें गरीब जास्त गरीब होत गेले आणि धनाढ्यांचे खजिने फुगत गेले. म्हणून गांधीजी धैर्यानें सांगतात कीं, "जोंपर्यंत खेड्यांतील १६ वर्षांवरील प्रत्येक धडधाकट स्त्रीपुरुषास काम आणि पुरेसें वेतन देण्याचा दुसरा आणि खादीपेक्षां चांगला मार्ग सांपडला नाहीं किंवा जोंपर्यंत प्रत्येक खेडुतास आवश्यक त्या सुखसोयी

मिळूं शकतील अशीं शहरें पुरेशीं निर्माण झालीं नाहींत तोंपर्यंत लक्षावधि खेडुतांच्या बाबतींत खादी हो एकच व्यवसाय आर्थिकदृष्ट्या सोइचा आहे. लक्षावधि खेडुतांना कामाचा उत्साह वाटेनासा झाला आहे. त्यांना कशाचा विचारहि करावासा वाटत नाहीं. फार काय, त्यांना जगावेंसेंहि वाटत नाहीं. अशा खेडुतांना काम आणि वेतन कसें पुरवावयाचें हा खरा प्रश्न आहे.''

खादीनें त्यांना काम मिळतें, हत्यारें मिळतात आणि उत्पादनास ताबडतोब बाजारपेठहि मिळते. काल ज्यांच्या जीवनांत नैराश्याचा अंधार माजला होता त्यांच्या जीवनांत आज आशेचा उदय झाला आहे. या बाबतींत खादीनें १२ कोटी लोकांना काम दिलें आहे; हातानें धान्य सडणें, आणि हातानें तेल गाळणें या व्यवसायांमुळें आणखी दोन कोटींची सोय होण्यासारखी आहे.

या दृष्टीनें १४ कोट बेकारांना आणि अर्धपोटी लोकांना अन्न पुरविणारा खादी आणि घरगुती उद्योगधंदे हा एकमेव मार्ग आहे. ती आर्थिकदृष्ट्या परवडतो कीं नाहीं हा प्रश्न येथें उत्पन्नच होत नाहीं. खादीचें अर्थशास्त्र सामान्य अर्थशास्त्रापेक्षां निराळें आहे हें खादीधारी माणसांनीं लक्षांत घ्यावें. रूढ अर्थशास्त्र हें स्पर्धेवर उभारलेलें आहे. त्यांत देशप्रेम, भावना आणि मानवता यांना फारसें स्थान नाहीं. खादीचें अर्थशास्त्र देशभक्ति, भावना आणि मानवता यांवर उभारलें आहे.

खादी हा अहिंसेचा आधार आहे. ती मूर्तिमंत अहिंसाच आहे. खरा खादी-भक्त असत्य भाषण करणार नाहीं. तो हिंसेचा विचार मनांत आणणार नाहीं. त्याच्या हातून फसवणूक होणार नाहीं. अपवित्र असें तो कांहीं करणार नाहीं.

गांधीजी म्हणतात :—

"काँग्रेस प्रदर्शन हें एक तीर्थक्षेत्र आहे. स्वातंत्र्यासाठीं प्रार्थना करण्या-करितां आणि राष्ट्रसेवेंत आपलें जीवन अर्पण करण्याकरितां आपण येथें जमतों. आपण येथें जमतों तें गरीब किसानांवर आपलें वर्चस्व लादण्यासाठीं नाहीं, तर त्यांच्या पाठीवरील आपलें ओझें आपणांस दूर कसें करतां येईल त्याचा विचार करण्यासाठीं. खेडुतांवरील आपला भार कमी करण्याचा मार्ग म्हणजे त्यांच्या दररोजच्या कष्टांत सहभागी होणें, स्वतः साफसफाईचें काम करणें, स्वतःचे कपडे स्वतःच धुणें आणि आपलें धान्य आपणच दळणें. पुढारी हे बहुजनसमाजाचे प्रमुख सेवक असतात म्हणूनच त्यांना पुढारीपण लाभतें.

काँग्रेस हें जर तीर्थक्षेत्र असेल तर तेथें सर्वांनी एकत्र येऊन जगन्नाथाचा प्रसाद ग्रहण केला पाहिजे.''

## ऑल इंडिया व्हिलेज इंडस्ट्रिज असोसिएशन

१९३४ सालीं मुंबईच्या अधिवेशनाच्या वेळीं या संस्थेची योजना झाली. त्या संस्थेनें ग्रामोद्योगाच्या क्षेत्रांत बरीच कामगिरी केली आहे. आणि त्या-बरोबरच खेडेगांवांतील स्वच्छता आणि आरोग्य, अन्नांत सुधारणा आणि बुडालेल्या व बुडत असलेल्या उद्योगधंद्यांचा जीर्णोद्धार या क्षेत्रांतहि त्या संस्थेनें महत्त्वपूर्ण कार्य केलें आहे. स्वच्छतेचा विचार करतांना माणसांची आणि जनावरांची विष्टा ही खत म्हणून अतिशय मोलाची असते ही गोष्ट संस्थेनें लोकांस पटविण्याची पराकाष्ठा केली आहे. स्वच्छतेच्या कामाविषयींचा विशेषतः वरिष्ठ वर्गाचा विकृत दृष्टिकोन दुरुस्त करण्यासाठीं या संघाचे केंद्र-स्थानीं, रस्ते झाडणें, कांटेकुटे काढून टाकणें, घाण नाहींशी करणें हीं कामें संघवासी करीत असतात. त्यांच्या कार्याचा अनुकूल परिणाम होत आहे. पंजाबांतील कांहीं खेड्यांत दर एकादशीस रस्ते झाडण्याचें काम खेड्यांतील लोक करूं लागले आहेत. कांहीं शहरांत वर्षांतून एक दिवस जिल्हाधिकारी आणि इतर वरिष्ठ वर्गांतील लोक स्वतः रस्ते झाडतात आणि स्वच्छता आणि सेवा यांचें प्रात्यक्षिक करतात.

आदर्श ग्रामसेवकासंबंधी गांधीजी म्हणतात:

''आज माणसाची किंमत रुपये-आणे-पैमध्यें मोजण्यांत येते. शिक्षण ही एक बाजारी गोष्ट झाली आहे. जर त्याच अपेक्षेनें तुम्ही येथें ( संघांत ) आलां असाल तर तुमची निराशा होईल. तुमचा अभ्यासक्रम पूर्ण झाला कीं तुम्हांला केवळ १० रुपये मानद्रव्य म्हणून घेऊन कामास आरंभ करावा लागेल आणि त्या प्राप्तींत कधींहि वाढ होणार नाहीं. परंतु त्या प्राप्तीची एखाद्या मॅनेजरच्या किंवा बड्या अधिकाऱ्याच्या पगाराबरोबर तुलना करूं नका. आपणांस प्रचलित मूल्यें बदलावयाचीं आहेत. तुम्हांला तशा तऱ्हेच्या महत्त्वाकांक्षेपासून परावृत्त करणें हाच आमचा हेतु आहे. आपला जेवणखर्च तुम्ही दरमहा ६ रु. त बसविला पाहिजे. एखाद्या सनदी नोकराचा मासिक भोजनखर्च ६० रु. असूं शकेल; परंतु केवळ त्यावरूनच तो तुमच्यापेक्षां शारीरिक, बौद्धिक किंवा

नैतिकदृष्ट्या श्रेष्ठ ठरत नाहीं. त्याच्या राहणीत बडेजाव असूनहि या बाबतींत तो कमी दर्जाचा असूं शकेल. आपली योग्यता तुम्ही नाण्यांत मोजीत नाहीं म्हणूनच तुम्ही या संस्थेंत आलां आहांत असें मी गृहीत धरतों. अगदीं मामुली वेतन घेऊन तुम्ही आपल्या देशाची सेवा करण्यांत आनंद मानीत आहांत. एखादा माणूस शेअर बाजारांत लक्षावधि रुपये मिळविणारा असेल तरी तो आपल्या येथील कार्यास सर्वस्वी नालायक ठरेल. आपल्या येथील साध्या वातावरणांत तो कष्टी होईल. आपणांसहि त्याच्या वातावरणांत सुख लाभणार नाहीं. देशकार्यासाठीं आपणांस आदर्श सेवकांची जरूरी आहे. असे आदर्श सेवक आपणांस कोणतें अन्न मिळतें याची फिकीर करणार नाहींत. किंवा ते ज्या खेडुतांची सेवा करतात ते खेडुत बदला म्हणून कोणत्या सुख-सोई देणार आहेत हा विचार त्यांच्या मनांत येत नाहीं. आपल्या गरजेसाठीं ते परमेश्वरावर हवाला ठेवतात आणि कसोटीचे प्रसंग आले तर त्यांना संतोषच वाटतो. ज्या देशांत ७ लक्ष खेड्यांचा प्रश्न सोडवावयाचा आहे तेथें ही परिस्थिति अपरिहार्य आहे. पगारवाढ, प्रॉव्हिडंट फंड आणि पेन्शन यांवर नजर ठेवून जे काम करतात अशा पगारी कार्यकर्त्यांचा संच आपणांस परवडत नाहीं. खेडुतांची मनापासून सेवा करणें हेच त्या कार्यांतील समाधान आहे. तुमच्यांपैकीं कांहीं लोकांना असें विचारावेंसें वाटेल कीं, खेडुतांचें जीवनहि असेंच असावें काय ? मी असें मुळींच म्हणत नाहीं. खेडुतांचे आपण सेवक आहोंत. सेवकास या जीवनाच्या अटी पाळल्या पाहिजेत. खेडुतांसाठीं हें जीवन नाहीं. आपण आजपर्यंत त्यांच्या मानगुटी बसलों होतों. अ णि आपल्या त्या 'स्वामीं'चें जीवन आज आहे त्यापेक्षां पुष्कळच सुखी व्हावें यासाठीं आपण हें आपत्त्रुषींचें आणि वाढतें दारिद्र्य स्वीकारलें पाहिजे. आज ते मिळ-वितात त्यापेक्षां पुष्कळ जास्त पैसे त्यांना मिळवितां यावेत असें सामर्थ्य त्यांना आपण मिळवून दिलें पाहिजे, हाच व्हिलेज इंडस्ट्रिज असोसिएशनचा हेतु आहे. मी वर सांगितलें त्या प्रकारचे सेवक जास्त जास्त मिळत गेल्या-खेरीज ही संस्था वाढणार नाहीं."

या संस्थेनें असें दाखविलें आहे कीं, विधायक कार्यक्रम म्हणजे अहिंसेचें कृतिरूप प्रत्यक्ष स्वरूप होय.

## विधायक कार्यक्रम आणि अहिंसा

विधायक कार्यक्रम आणि अहिंसा यांचा संबंध काय असें कांहीं लोक विचारतात ! त्या दोन गोष्टींचा इतका दृढ संबंध कां जोडण्यांत येतो ? या प्रश्नाचें उत्तर देतांना महात्माजी म्हणालेः " हिंदु-मुसलमान ऐक्य, दारूबंदी, अस्पृश्यतानिवारण या गोष्टी अहिंसेवांचून अशक्य आहेत हें अगदीं स्पष्ट आहे. उरला काय तो चरखा ! चरखा हें अहिंसेचें प्रतीक कसें होऊं शकतें ? मीं सांगितलेंच आहे कीं, तुम्ही ज्या भावनेनें चरख्याकडे पाहतां, जीं वैशिष्ट्यें चरख्याच्या बाबतींत तुम्ही मनानें कल्पितां त्यांवर हें अवलंबून आहे. चरख्याची गोष्ट क्विनाइनच्या गोळीसारखी नाहीं. क्विनाइनच्या गोळीबद्दल तुमची भावना कांहींहि असो, तिचा ठराविक परिणाम हा व्हावयाचाच, तसें चरख्याचें नाहीं. उदाहरणार्थ, गायत्री मंत्र घ्या. त्या मंत्राचा माझ्यावर जो परिणाम होतो तो अहिंदूंवर होणार नाहीं. तसेंच ' कल्मा ' मुसलमानांवर जो परिणाम करील तो माझ्यावर करूं शकणार नाहीं. त्याचप्रमाणें चरखा आपोआप अहिंसा शिकवील किंवा स्वराज्य देईल असें त्याच्यांत कांहीं नाहीं. परंतु त्याच्या त्या सामर्थ्याविषयीं तुम्हीं श्रद्धा बाळगली पाहिजे म्हणजे चरख्यांत तें सामर्थ्य निर्माण होईल. चरख्याचें अगदीं सहज कळणारें महत्त्व म्हणजे गरीबांची सेवा; परंतु तेवढ्यावरून तें अहिंसेचें प्रतीक ठरतेंच किंवा स्वराज्याची ती एक अपरिहार्य अटच आहे असें सिद्ध होत नाहीं. तरी १९२० सालापासून मी चरख्याचा स्वराज्य आणि अहिंसा यांच्याशीं संबंध जोडला आहे.

"चरख्याचा आत्मशुद्धीच्या कार्याशीं जिव्हाळ्याचा संबंध जोडण्यांत आला आहे. घरीं काढलेलें जाडें भरडें सूत जीविताचा साधेपणा आणि त्यामुळेंच लाभणारें शुद्धत्व यांचें निदर्शक आहे.

## सविनय कायदेभंगाची पूर्वतयारी

"चरखा, हिंदु-मुसलमान ऐक्य आणि अस्पृश्यता-निवारण या तीन गोष्टींखेरीज सविनय कायदेभंग संभवत नाहीं. स्वयंनिर्णित नियमांचें आपण स्वतःच पालन करणें ही सविनय कायदेभंगाची पूर्वतयारी आहे. ती तयारी झाल्याखेरीज सविनय कायदेभंग हा एक भयंकर पोरखेळ ठरतो. राजकोटच्या

प्रयोगशाळेंत माझी याबद्दल पुन्हां एकदां बालंबाल खात्री झाली. या अटी पाळणारा एकच मनुष्य निघाला तरी स्वराज्य संपादनास तो समर्थ ठरेल. मी स्वतः अद्याप आदर्श सत्याग्रही या पदापासून पुष्कळ दूर आहें. मी स्वतः अपूर्ण सत्याग्रही असल्यानें मला तुमचें सहकार्य हवें आहे. माझें आत्मनिरीक्षण अव्याहत चालू असतें, त्यामुळें तुमच्या सहकार्यानें माझीहि प्रगति होत आहे. मी तुमच्यासाठीं म्हणून ज्या वेळीं कांहीं करतों त्या वेळीं तुमच्या-बरोबर माझेंहि त्यांत हित असतें. निदान तुमचें नसलें तरी माझें हित तर त्यांत साधतेंच. मनुष्य कितीहि म्हातारा झाला तरी त्याची वाढ थांबत नाहीं. मी तरी तितका म्हातारा खात्रीनें झालों नाहीं. ट्रान्सव्हालमध्यें सत्याग्रहाचा जन्म झाला. त्या वेळीं कांहीं हजारांनीं सत्याग्रह केला. येथें सत्याग्रहांत लाखावारी लोक सामील आहेत. ६ एप्रिल १९१९ ला मी मद्रास येथें दिलेल्या हांकेला ओ देण्यासाठीं लक्षावधी लोक एकरूप होऊन पुढें येतील अशी कोणाला कल्पना होती? परंतु अंतिम विजयासाठीं विधायक कार्यक्रम अत्यावश्य आहे. अहिंसेचें प्रतीक असा जो चरखा, त्या चरख्याचा कार्यक्रम कितीहि दीर्घकालीन असला तरी तो जर आपण पूर्ण केला नाहीं तर मला असें वाटतें कीं, आपण खरोखरीच देशद्रोही ठरू."

## एक औद्योगिक पाहणी

मध्यप्रांत सरकारनें १५ डिसें. १९३८ रोजीं औद्योगिक पाहणीसाठीं एक समिति नेमली होती. त्या समितीनें आपला अहवाल २० मे १९३९ रोजीं प्रसिद्ध केला. त्या अहवालाबद्दल प्रो. कुमारप्पा म्हणतातः

" ती पाहणी रोग्याच्या जीविताचें रक्षण करण्यासाठीं केलेल्या औषध-योजनेसारखी आहे. ती राष्ट्रीय योजना आहे. आपल्या कार्यक्षेत्रांत जो कच्चा माल उपलब्ध आहे त्या मालाच्या दृष्टीनें राष्ट्रीय दृष्ट्या प्रत्येक व्यक्तीस कोणतें अर्थोत्पादक कार्य करतां येईल त्याची योजना त्या अहवालांत आहे.

व्यक्ति आणि राष्ट्र, खेडें आणि शहर, तात्पुरत्या गरजा आणि सार्व-कालिक गरजा यांच्यांतील विरोध नाहींसा करून, त्यांचा मेळ बसवणें हें सुसंघटित समाजाचें कार्य आहे. जें सरकार स्वस्ताईवरच भर देतें आणि

विलायती मालाची आयात करीत राहतें तें शेवटीं बेकारी माजवीत राहतें. सरकारच्या खर्च करण्याच्या पद्धतीवर बेकारी वा 'नोकरी'ची परिस्थिति अवलंबून असते. लोकांना काम पुरविण्याच्या दृष्टीनें विचार केला कीं, आयात माल कितीहि स्वस्त पडला तरी परिणामतः तो घेणाऱ्या राष्ट्रास आणि समाजास महागांतच पडतो.

## टिकाऊपणाचें गैरलागू समर्थन

आपलें अर्थशास्त्र पाश्चात्यांच्या अर्थशास्त्रापेक्षां पुष्कळसें निराळें आहे. तेथें भांडवल हा मुख्य विचार आहे. भांडवलाची तेथें वाटेल तेवढी बेगमी आहे. येथें कामगारांची संख्या भरपूर आहे. म्हणून येथील आर्थिक योजनांत ही गोष्ट प्रथम लक्ष्यांत ठेवली पाहिजे आणि येथील उपलब्ध वस्तूंचाच जास्तींत जास्त उपयोग करून घेतला पाहिजे. उदा० या देशांत तारेचे खांब उभारतांना देशांत लांकडाचा भरपूर पुरवठा आहे ही गोष्ट लक्ष्यांत घेतली पाहिजे. प्रत्यक्ष वस्तुस्थिति निराळीच आहे. रेल्वे लाइनपासून दूर असलेल्या जंगलांत आणि ग्रामीण भागांत पोलादी खांब उभारले आहेत. पोलादाची आयात परदेशाहून करावी लागते. पोलादी खांबाचें समर्थन एवढेंच सांगण्यांत येतें कीं, ते जास्त टिकतात. राष्ट्रास विघातक अशा खर्चाचें समर्थन करण्याचा असा प्रयत्न कोणत्याहि सरकारनें किंवा सार्वजनिक संस्थेनें करूं नये. तारेच्या खांबासाठीं लांकूड वापरलें तर तें कमी टिकाऊ असलें तरी कमालीचें स्वस्त पडतें. ते वारंवार बसवावे लागले तरी त्यांबद्दलचा पैसा देशांतल्या देशांतच राहील. अनेकांच्या पोटाची सोय होईल. अमेरिका आणि इंग्लंडसारख्या देशांतसुद्धां तारेच्या खांबासाठीं लांकूड वापरतात. मग आपल्या देशासारख्या दरिद्री देशास हें 'टिकाऊपणाचें' समर्थन कसें परवडणार ?

समितीनें सुचविलें आहे कीं, दर वर्षी प्रत्येक खेड्यांत सरकारी जमाखर्चाचा तक्ता गांवांत मुख्य ठिकाणीं लावावा. सरकारला गांवांतून पैसा किती मिळाला आणि त्यांतला त्या गांवासाठीं खर्च किती झाला याचा खुलासा त्या पत्रकांत असावा. समितीला आपल्या निरीक्षणांत जी परिस्थिति दिसून आली तींत सरकारच्या आर्थिक धोरणानें लोकांची लूटमारच चालली आहे असेंच पदोपदीं दिसलें. लोकांना अन्न-वस्त्राची पंचाईत पडलेली आणि

त्यांच्याकडून घेतलेल्या पैशांवर मात्र ' असेंब्ली गेस्ट-हाउस 'ची राजशाही इमारत १ लक्ष ३२ हजार रुपये खर्चून उभारलेली !

## वस्तु हेंहि चलन आहे

समितीनें, आर्थिक व्यवहारांत नाण्यांचें माजलेलें स्तोम कमी करावें असें सुचविलें आहे. नाण्याच्या बरोबर वस्तूंचाहि, क्रयविक्रयाचें माध्यम म्हणून उपयोग व्हावयास पाहिजे. तसें झालें म्हणजे शेतकऱ्यास आपल्या मालाचे पैसे करण्यासाठीं बाजार धुंडावे लागतात ती यातायात थांबेल. शेतकऱ्याला धान्य रूपानें सारा भरतां येईल. वस्तु आणि नाणीं यांची तुलना करणें बरोबर नाहीं. नाशवंत आणि अविनाशी या दोहोंची अशी सांगड घालणें चूक आहे. मालाचे वेळेवर पैसे झाले नाहींत तर कांहीं दिवसांनीं माल निकामी होऊन तो मातीमोल ठरतो. नाण्यांचें तसें होत नाहीं. हें लक्ष्यांत घेऊन केवळ नाण्यांच्या हालचालीवर आधारलेलें अर्थशास्त्र आणि काटकसर दुरुस्त करावयास पाहिजे.

## कच्चा माल, उत्पादन आणि नफा

आज आपल्या देशांत बहुतेक कामगार कच्च्या मालाची पैदास करण्यांतच गुंतलेले आहेत. पक्का माल तयार करणारे सारखे श्रीमंत व्हावे आणि कच्चा माल पुरविणारे दारिद्र्यांत जास्त जास्त रुतत जावेत हें या परिस्थितीचें अपरिहार्य पर्यवसान आहे.

शेतीचा व्यवसाय बहुधा अर्थोत्पादक कच्च्या मालाचा पुरवठा करण्यासाठीं चाललेला आहे. त्यामुळें अन्न आणि वस्त्र यांसारख्या प्राथमिक गरजा पुरविणें हें जें शेतीचें मुख्य कार्य तें मागें पडल्यानें देशांत श्रीमंतीबरोबर दारिद्र्यहि वाढत आहे. कारखान्यांसाठीं कच्चा माल पुरविणारा शेतकरी हा गिरणींतील मजुरासारखाच आहे. आपलें शेतकीखातें शेतीच्या उत्पादनांतील कारखानदारीवर आणि उपयुक्ततेवरच भर देत आहे. उदा० ज्यांच्यापासून घरगुती धंद्यानें साखर काढतां येईल अशा झाडांची लागवड बाजूस टाकून कारखान्यांसाठीं उंसाची लागवड, ती खर्चिक असूनहि करण्यांत येते. ज्यांचें घरच्याघरीं

तेल काढतां येईल आणि दिव्यांना उपयोगी पडेल अशा तेल-बिया परदेशांत जातात आणि आपण हजारों गॅलन केरोसीन परदेशांतून घेतों !

खेडेगांवांतील बाजार हें या स्थितीचें स्पष्ट चित्र आहे. विलायती उत्पादनास भरमसाट वाव मिळाल्यानें आपल्या लोकांची मुस्कटदाबी होत आहे. उत्पादन शक्ति मृतवत् झाली आहे, बेकारी माजली आहे आणि जीवनांतील अगदीं साध्या गरजांसाठीं सुद्धां परक्यांकडे पाहण्याची वेळ आली आहे. स्थानिक मालावर जकात लादण्याऐवजीं बाहेरील मालावर जबर कर बसवून त्यांची आयात नियंत्रित करण्याचें काम स्थानिक-स्वराज्य-संस्थांनीं जर केलें तर खेडुतांची ती फार मोठी सेवा होईल. आज प्राथमिक गरजांच्या वस्तूंची सुद्धां खेड्यांत बाहेरून आयात होते. ग्रामीण आर्थिक व्यवहारास कोणता माल विघातक आहे त्याची नीट चौकशी झाली पाहिजे.

समितीनें आपल्या शिफारशी नमूद करण्यापूर्वी ६०६ खेड्यांचें निरीक्षण केलें आहे. त्यांत असें आढळून आलें कीं, खेडुताचें सरासरी वार्षिक उत्पन्न १२ रु. पेक्षां जास्त नाहीं. परंतु राज्यकर्ते आणि राजकारणी लोकांनीं तर आपणांस असें पढविलें आहे कीं, हिंदी माणसाचें सरासरी उत्पन्न ६५ ते ८० च्या दरम्यान आहे. यांत चूक अशी होते कीं, ६५ ते ८० हें प्रमाण काढतांना देशांतील कोट्याधीश आणि लक्षाधीश यांचेंहि उत्पन्न जमेस धरतात !

औद्योगिक दृष्ट्या आपली अधोगति झाल्यानें आपलें जेवणहि निःसत्व झालें आहे. सडलेला निःसत्त्व तांदुळ आपण घेतों; कारण तांदुळ सडण्याची गिरणी आपल्यावर लादली आहे. तांदुळ सडण्याची एक गिरणी ७००० लोकांचें अन्न तोडते. जिनिंग फॅक्टरी ९० कुटुंबांना अन्नास मुकविते आणि कापडाची गिरणी दररोज ५००० लोकांना उपासमार पत्करावयास लावते ! यंत्र-प्राधान्य, फाजील उत्पादन, सुबकतेचें वेड, पक्क्या मालाची भरमसाट आयात यांमुळें ग्रामोद्योगावर नांगर फिरविला गेला आणि देशांत कारखानदारी, भांडवलशाही आणि त्यापेक्षां कितीतरी पटीनें दारिद्र्य, उपासमार आणि बेकारी यांची वाढ झाली आहे !

नव्या कल्पना खेड्यांपर्यंत पोहोंचत नाहींत. नवीं हत्यारें खेडुतांना मिळत नाहींत. खेड्यांतील स्थानिक पुढारी आणि सरकारी अधिकारी यांचा कोठें

संबंधच येत नाहीं. मॅजिक लँटर्ननें खेडुतांचीं मनें प्रज्वलित होणार नाहींत. प्रत्यक्ष कार्यानेंच ते शहाणे होतील. लहान लहान व्यवसाय आरंभापासून शेवटपर्यंत त्यांच्यासमोर होत राहिले पाहिजेत. सध्यां प्रजेचा पैसा सरकारी कामांतच उधळला जात आहे. मध्यप्रांताचें उत्पन्न ४.७५ कोटी आणि वसुली खर्च आणि इतर शासनकार्य यांचा खर्च ३.६५ कोटी होतो! यांतून विधायक कार्यास कितीसा पैसा उरणार? ज्या खेड्यांत ना रस्ते, ना दवाखाने, ना पोस्ट ना शाळा, ना आरोग्य ना पाणी, तेथें विधायक कार्य काय होणार? ही स्थिति दूर करण्यासाठीं समितीनें ताबडतोब उत्तेजन देऊन सुरू करण्यासारखे असे जवळ जवळ ३२ ग्रामोद्योग सुचविले आहेत."

# शैक्षणिक पुनर्घटना १२

अर्थशास्त्र, नीतिशास्त्र किंवा राजकारण यांसंबंधींच्या गांधीजींच्या कल्पनांत अगदीं नवें असें कांहीं नाहीं. त्याचप्रमाणें त्यांच्या शिक्षणविषयक विचारांचें आहे. त्या विषयाचा त्यांनीं आपल्या पद्धतीनें आविष्कार केला आणि लोक त्यामुळें थक्क झाले.

हिंदुस्तानचा विचार करतांना रोगाचीं लक्षणें आणि मूळ कारण यांतील फरक लक्ष्यांत ठेवला पाहिजे. आपल्या जीवनांत अनेक प्रकारें, अनैतिक, अन्याय्य असे प्रकार घडतात. तीं सर्व रोगाचीं बाह्य लक्षणें आहेत. मूळ रोग आहे तो हिंसेचें अहिंसेवर नियंत्रण हा होय. गांधीवादांत विधायक कार्यक्रमावर मुख्य भर दिला आहे. विधायक कार्यक्रमाचें अगदीं थोडक्यांत बरोबर वर्णन करावयाचें झालें तर अहिंसेचें सक्रिय आविष्करण असें करतां येईल. तें आविष्करण अनेक प्रकारें होत असतें. कधीं बेसिक एज्युकेशन, कधीं खादीच्या द्वारां आर्थिक उन्नति, कोठें अस्पृश्यतानिवारणानें राष्ट्रीय ऐक्य, अशीं त्याचीं विविध रूपें असलीं तरी त्या सर्वांचें अहिंसा हें एकच सूत्र आहे. विलायती मालामुळें गरीब खेडुतांची उपासमार होते, सामाजिक विषमता हरिजनांच्या स्वाभिमानावर प्रहार करते आणि चालू शिक्षणपद्धतीनें माणसाचीं मनें परकीयांशीं एकरूप होतात !

राष्ट्राच्या गरजेप्रमाणें बालकांची वाढ करणें याविषयींचें शास्त्र आणि कला शिक्षणांत समाविष्ट होतात. आपल्या बालकावर आईबापांची ‘ मालकी ’ नसते. तें राष्ट्राच्या उन्नतीचा घटक असतें, म्हणून त्याचें शिक्षण राष्ट्रीय ध्येय आणि गरजा यांच्याशीं संवादी असलें पाहिजे.

हीं राष्ट्रीय ध्येयें पौर्वात्यांचीं आणि पाश्चिमात्यांचीं निरनिराळीं आहेत. पाश्चात्यांना आपला सत्ताविस्तार करावयाचा असतो. त्यासाठीं उद्योगधंदे काढावे लागतात आणि कच्च्या मालाचा पुरवठा करणाऱ्या देशावर स्वामित्व प्रस्थापित करावयाचें असतें. इतर देशांनीं हें त्यांचें जोखड पत्करलें आहे तोंपर्यंत शांतता, पण त्यांनीं तें नाकारलें तर युद्ध हें ठरलेलें असल्यानें शांततेच्या काळांतच युद्धाची तयारी करावी लागते. विजयी राष्ट्रांतील तरुणांना साम्राज्यवादाचें शिक्षण द्यावें लागतें तर पराभूतांना आपल्या परकीय सत्ताधीशांच्या गरजांपुढें मान वांकविण्याचें शिक्षण द्यावें लागतें ! येथेंच झगडा निर्माण होतो आणि हा झगडा राष्ट्रीय जीवनाच्या सर्व क्षेत्रांत होत जातो.

गांधीजींची शिक्षणविषयक दृष्टि प्रथमदर्शनीं विचित्र वाटते. परंतु वस्तुतः स्वाधीन देशांत बेसिक-एज्युकेशन पद्धतीचाच स्वीकार आणि प्रचार झाल्याचें आढळून येतें. इंग्लंडमध्यें ग्रामोद्योगास वाव नाहीं म्हणून तेथें गिरण्या आणि कारखाने हींच तरुणांचीं विश्वविद्यालयें होतात आणि प्रत्यक्ष विश्वविद्यालयांत जाणाऱ्या विद्यार्थ्यांचें प्रमाण फारच थोडें असतें. तेथेंहि साम्राज्यांतील ६२ देशांवर राज्य चालविण्यासाठीं आवश्यक तें शिक्षण देऊन ‘ अधिकारी ’ निर्माण करण्याचें कार्य चालू असतें.

## राष्ट्रीय शिक्षण

आपल्या देशांतील शिक्षणपद्धतींत यंत्रप्रधान संस्कृतीचा पुरस्कार करून शतकानुशतकें चाललेल्या ग्रामोद्योगांचा नाश होत आहे आणि शेंकडा ८० टक्के लोकांच्या पोटावर गदा येत आहे. आपल्या राष्ट्रीय जीवनाचें ज्ञान देणारी शिक्षणपद्धतीच “ आपली राष्ट्रीय शिक्षणपद्धति ” म्हणतां येईल.

गांधीजींचें असें मत आहे कीं, शिक्षणास सामाजिक ध्येय असलें पाहिजे. आजचें शिक्षण वैयक्तिक महत्त्वाकांक्षांकडे लक्ष देतें. विश्वविद्यालयाचें शिक्षण हें भांडवलशाहांच्या अंकित आहे आणि मोठमोठ्या उद्योगधंद्यांसाठीं लागणारे

शास्त्रज्ञ आणि स्थापत्यविशारद निर्माण करण्याचें कार्य त्या संस्था करीत आहेत. ग्रामोद्योगासाठीं या संस्था कांहींहि करीत नाहींत. म्हणून खेड्यास साहाय्य करण्यासाठीं वर्धा-शिक्षणयोजना करावी लागली.

या दृष्टीनें ऑल इं. स्पिनर्स असोसिएशन, किंवा हरिजनसंघाप्रमाणेंच ऑल इं. नॅशनल एज्यु. बोर्ड स्थापन झालें आणि राष्ट्रीय सभेशीं तें संलग्न करण्यांत आलें. या तीन संस्था राष्ट्राचें औद्योगिक, नैतिक आणि समाजाभिमुख आर्थिक पुनरुज्जीवन करणारा विधायक कार्यक्रम पार पाडीत आहेत.

माणसाची खरी कसोटी त्याच्या उद्योगाच्या पर्यवसानावर अवलंबून असतें. त्यानें स्वतःच्या फायद्यासाठीं श्रम केले कीं जनतेच्या सुस्थितीसाठीं तो झटला ? तो आपल्या शिक्षणाकडे कोणत्या अपेक्षेनें पाहतो ? आपल्या बांधवांपेक्षां जास्त फायदा मिळविण्याची वैयक्तिक सोय अशी त्याची शैक्षणिक दृष्टि आहे कीं, त्यांची सेवा करण्याची संधि मिळणें हा तो शिक्षणाचा लाभ समजतो ? या प्रश्नांच्या उत्तरावर शिक्षणाची कसोटी होते.

राष्ट्रीय शिक्षणाचा प्रश्न आर्थिक आणि राष्ट्रीय या दोन्ही दृष्टींनीं सोडविला पाहिजे.

## साक्षरता आणि संस्कृति

राष्ट्रीय सभेचें शैक्षणिक पुनर्घटनेचें कार्य एका विशिष्ट ध्येयानें चाललें आहे. त्या कार्यांत प्रथम एका गैरसमजाचें निराकरण झालें पाहिजे. साक्षर माणूस तोच सुसंस्कृत आणि निरक्षर तो असंस्कृत हा तो गैरसमज होय. हिंदुस्थानांत अशी एक विलक्षण गोष्ट आहे कीं, मोठमोठे पंडित आणि उलेमा निरक्षर आहेत. कारण येथें ज्ञानसंपादन मुखानें होतें. 'चक्षु-अक्षर-संयोग' हेंच ज्ञानाचें एकमेव माध्यम नाहीं. संस्कृतीस साक्षरता आवश्यक नाहीं. या पद्धतीनें हिंदी ज्ञानाचीच नव्हे तर संस्कृतीचीहि परंपरा युगानुयुगें अखंड राहिली आहे. प्रत्येक घर ही शाळा, प्रत्येक पिता हा शिक्षक, प्रत्येक झोंपडी हें वर्कशॉप, दररोजचें काम करणें हीच उमेदवारी आणि कार्याचा प्रत्येक भाग हीच परीक्षा अशी येथील वस्तुस्थिति आहे. प्रत्येक उत्पादन हीच आमची पदवी. प्रत्येक कारागीर या मार्गानें जीविताच्या विश्वविद्यालयाचा पदवीधर

होतो. मनुष्यकृत व्यवसायाच्या वर्गांत आणि निवडक तज्ज्ञांच्या सहवासांत त्याचें शिक्षण पूर्ण होतें.

अशी ज्या देशाची परंपरा आहे त्या देशांत आज अत्यंत रूक्ष पद्धतीचा अभ्यासक्रम सुरू आहे. त्या पद्धतींत विविध वृत्तींच्या, विविध रुचींच्या, विविध बौद्धिक दर्जांच्या, विविध सामाजिक थरांच्या आणि विविध सांस्कृतिक दर्जांच्या व्यक्तींना एकाच यंत्रांत कोंबण्यांत येतें. अशा पद्धतीनें होणारें शिक्षण हें शिक्षण नसून हडेलहप्पी आहे. तेथें संस्कृति नाहीं, घोकंपट्टी आहे. परीक्षा हा तेथें जुगार ठरते आणि पदवी ही पारितोषिक नसून फुकट 'पास' असतो. पुन्हां, या पद्धतीच्या शिक्षणाचें फळ काय? तर सर्वत्र शून्यवत् निराधार, निराकार असें जीवन! गेलीं ऐशीं वर्षें आपण या रीतीनें घालविलीं. आणखीं किती वर्षें आपण याच पद्धतीचा पाठलाग करणार आहोंत?

आपण आपल्या तरुण पिढीस कशासाठीं शिकविणार? चढाओढीनें उत्पादन जेथें चाललें आहे अशा युगासाठीं? छेः! स्वयंपूर्णतेसाठीं. जर असें शिक्षण द्यावयाचें असेल तर देशांतील कानाकोपऱ्यापर्यंत स्वयंपूर्णता प्राप्त करून देणाऱ्या घरगुती धंद्यांविषयींची आवड त्यांच्या ठिकाणीं उत्पन्न केली पाहिजे.

वर्धा-योजनेंत असें शिक्षण योजिलें आहे.

नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत

## शिक्षणाचा नवा सांप्रदाय

अर्थशास्त्राची नवी दिशा खादीनें व्यक्त केली आहे. अर्थशास्त्र आणि शिक्षण हीं परस्परांवर परिणाम करतात. खादी आणि घरगुती उद्योग हीं ज्याअर्थीं कायम राहणार आहेत त्याअर्थी त्या दोन गोष्टींना सुसंगत अशा शिक्षण-पद्धतीचाहि गरज आहे. ज्या जुन्या शिक्षणपद्धतीच्या दोषावर उपाय म्हणून वर्धा-योजना केली आहे ती जुनी शिक्षणपद्धति आधीं नाहींशी केली पाहिजे. त्यासाठींच ब्रिटिशांची अर्थव्यवहारपद्धति बदलली पाहिजे. कारण ब्रिटिशांनीं सुरू केलेली शिक्षणपद्धति अर्थव्यवहाराच्या सरकारी नियंत्रणानें चालू आहे. तेव्हां जुन्या शिक्षणपद्धतीप्रमाणेंच जुनें अर्थशास्त्रहि नाहींसें करून नवें अर्थशास्त्र प्रस्थापित केलें पाहिजे. या बाबतींत आपल्या मनांत किंचित्‌हि संभ्रम असतां कामा नये. सर्वव्यापी असें परिवर्तन घडवून आणण्याचा क्षण खरोखरच

अगदीं नजिक येऊन ठेपला आहे. जीविताच्या प्रत्येक अंगोपांगांत नव्या विचारप्रणालीचा प्रवेश होणें अगदीं अपरिहार्य झालें आहे.

आजची शिक्षणपद्धति ब्रिटिश सत्तेवर अधिष्ठित आहे. म्हणून आपले पुनर्घटनेचे प्रयत्न परकीय सत्ता, परकीय व्यापार आणि परकीय उद्योगधंदे यांचें जूं झुगारून देण्यासाठीं एकाच वेळीं सुरू झाले पाहिजेत. याच हेतूनें आपण आपल्या तरुणांच्या मनांत आपल्या देशास उन्नतिकारक अशी स्वयंसिद्ध संस्कृति, कला आणि व्यवसाय यांविषयीं निश्चित आकांक्षा उत्पन्न केली पाहिजे. हीच राष्ट्रीय शिक्षणाच्या प्रश्नाची गुरुकिल्ली आहे. ब्रिटिशांचें वर्चस्व हें केवळ राजकीय नाहीं. तें व्यापारी, सांस्कृतिक आणि आध्यात्मिक आहे. येथील तरुण ब्रिटिशानुकूल असे नमुने तयार व्हावेत ही सरकारची गरज आहे. त्यामुळें तरुण पिढीच्या मनावर इंग्रजी ज्ञान, पदव्या, किताब, दर्जा इत्यादि गोष्टींचा विलक्षण पगडा बसेल असेंच शिक्षण आजपर्यंत देण्यांत आलें आहे.

विजेत्यांच्या भाषेबद्दलची विलक्षण ओढ खाजगी जीवनापासून तों सार्वजनिक जीवनापर्यंत सर्वत्र दिसते. ती नाहींशी झाली पाहिजे. विश्वविद्यालयें भाषावार असावींत, मातृभाषेप्रमाणें त्यांचीं कार्यक्षेत्रें ठरवावींत, मातृभाषा हें माध्यम असावें. न्यायालयांत पक्षकारांस समजेल अशा भाषेंत काम चालणें हें न्यायदानासहि साहाय्यक आहे, यासाठीं आम्ही झगडत आहोंत.

जें भाषेच्या बाबतींत चाललें आहे तेंच सांस्कृतिक बाबतींतहि होत आहे. आपली शिल्पकला, मूर्तिकला, चित्रकला यांविषयीं आपल्या मनांत हीनगंड माजला आहे. आपल्या कलांचा वैभवसंपन्न इतिहास आपल्या डोळ्यांसमोरून बाजूस करण्यांत आला आहे.

आसेतुहिमाचल, अद्यापहि प्राचीन वैभवाची साक्ष पटविणाऱ्या या कलावैभवाचा उगम कोणत्या ज्ञानांत झाला? त्याचें स्फूर्तिस्थान कोणतें? त्या कलाकृतींची योजना आंखणारे कलावंत आणि त्या कृती प्रत्यक्षांत आणणारे कारागीर कोठें आहेत? या सर्व प्रश्नांचा अभ्यास हाच राष्ट्रीय शिक्षणाच्या कार्यक्रमाचा गाभा आहे.

## पदवीधरांचें कर्तव्य

कलाक्षेत्राप्रमाणेंच काव्य, नाट्य, ज्योतिष, वैद्यक इत्यादि क्षेत्रांतहि आपलें

परमोच्च वैभव पुनरुज्जीवित करावयाचें आहे. राष्ट्रीय विश्वविद्यालयाचे पदवीधर या नात्यानें आपण ज्या व्यवसायांत प्रावीण्य आणि पदवी मिळविली त्या व्यवसायांतच पुढें गुरफटून राहून चालणार नाहीं. तर ज्या ज्ञानशाखांत प्राचीनांनीं सर्वोच्च नैपुण्य संपादिलें आणि ज्या शाखांची पुढील वाढ खुंटली आहे त्या ज्ञानशाखांचें संशोधन करणें हें आपलें शिक्षणोत्तर कर्तव्य आहे.

प्रा. वाल्टर रॅले यांनीं विश्वविद्यालयाची केलेली व्याख्या पहा. ते म्हणतातः "विश्वविद्यालय हा, आपल्या ज्ञानाच्या वडिलोपार्जित संपत्तीचें संरक्षण करणारी संस्था आहे. सर्व मूलभूत कल्पनांचें पुनरुज्जीवन करणें हें त्या संस्थेचें कार्य आहे. ती संस्था आरंभापासूनच आरंभ करते आणि पायापासून पुनर्घटनेस सुरुवात करते. जुन्या भूमीची मशागत करून नवीं पिकें ही संस्था काढते. ज्ञानाच्या सरहद्दीवर विश्वविद्यालयाचा चौफेर पहारा चालू असतो!"

राष्ट्राची सुधारणा हा संस्कृतीचा एक अखंड प्रवाह असतो. तो प्रवाह भूत, वर्तमान आणि भविष्य यांमधून वाहत असतो. प्रत्येक राष्ट्र भूतकालापासून वर्तमानकालाच्या वाटेवरून भविष्याकडे जात असतें. भूतकाल वर्तमानकालांत पुनर्जन्म घेतो आणि वर्तमानकाल भविष्याचें आगमन सुचवीत असतो. आपली सर्व नैतिक विचारसंपदा आणि आचारसूत्रावली विविध युगांतील कल्पनांचें संकलन होय. या दृष्टीनें विचार केला कीं, आपली संस्कृति ही केवळ भूत आणि वर्तमान यांच्या संकलनानें सिद्ध झाली नसून त्या संस्कृतींत पौर्वात्य आणि पाश्चात्य संस्कृतींचा संगमहि झाला आहे. आजच्या युगांत राष्ट्राराष्ट्रांचे संबंध हे केवळ व्यापारी स्वरूपाचे राहिले नाहींत; तर सांस्कृतिक दृष्ट्याहि त्यांचे संबंध आले आहेत. अशा स्थितींत आपली संस्कृतिसुद्धां विविधांगी असली पाहिजे.

# सामाजिक न्याय १३

समाजांतील कांहीं माणसें पतन पावलीं तर त्यांचा उद्धार करणें हें 'सुस्थितींत' असलेल्यांचें कर्तव्य ठरतें. परंतु पतितांचा उद्धार आपण स्वतःच्या उच्च स्थानावरून खालीं वांकल्याखेरीज होणार नाहीं. तुम्ही कांठावर, आपल्या उंच जागींच बसून राहिलांत तर बुडता माणूस वांचवतां येणार नाहीं. त्याची सुटका करण्यासाठीं तुम्हांला बुडी मारलीच पाहिजे.

आपल्या जवळच्या अनुयायांनीं आपणांस सोडलें आहे आणि अतिशय विश्वासू शिष्यांनीं आपला त्याग केला आहे असें वाटण्याचे प्रसंग गांधीजीं-वर पुष्कळ आले. परंतु त्या वेळीं ते कार्यास विटले नाहींत. त्यांनीं आपला धीर सोडला नाहीं. ताबडतोब आपल्या सहकाऱ्यांच्या आणि अनु-यायांच्या भूमिकेवर ते उतरले. अशी ' बुडी ' मारून त्यांनीं त्या व्यक्तींचा पुन्हां ' उद्धार ' केला. हींच पुढाऱ्याची कार्यपद्धति असते. जो ध्येयवादाची वास्तववादाशीं सांगड घालतो तोच खरा पुढारी.

याच पद्धतीनें गांधीजींनीं अस्पृश्यतानिवारणाचें कार्य चालविलें आहे. अस्पृश्यतानिवारण ही कल्पना कांहीं नवी नाहीं. परंतु राजकीय कार्यक्रमाच्या विधायक भागाच्या तीन मुख्य घटकांपैकीं तो एक घटक करणें हें गांधीजींचें कार्य नवें आहे. हातानें सूत कातण्याच्या कार्याचें पुनरुज्जीवन, या कार्या-

खेरीज गांधीजींच्या विधायक सुधारणांत एकहि नवा शोध नाहीं. परंतु त्या कार्यक्रमांत आर्थिक, सामाजिक आणि नैतिक कार्यांचें जें संकलन केलें आहे त्यामुळें तो कार्यक्रम युगप्रवर्तक शोध ठरला आहे. गांधीजी देशभर अव्याहत संचार करतात, त्या वेळीं दुःखनिवारणासाठीं अनेक दुःखितांनीं त्यांच्याकडे धांव घेतली आहे. प्रत्येकाचें दुःख निरनिराळ्या जातीचें असल्याचें त्यांना आढळून आलें. कधीं एखादी पतित भगिनी, कोठें एखादा अस्पृश्य, कोठें दारुबाजाचीं निराश्रित कुटुंबें, कोठें परित्यक्तेचीं अर्धपोटीं मुलेंबाळें. अशी विविध प्रकारचीं दुःखें त्यांच्या भोंवतीं जमा होतात. परंतु त्या दुःखांच्या गराड्यांत त्यांना जीवनाचा उबग येत नाहीं; जंगलांत पळ काढावासा वाटत नाहीं. तर जी माणुसकी त्यांच्या रोमारोमांत भरलेली आहे त्या माणुसकीनें ते दुःखनिवारण्याचे मार्ग शोधतात. त्यांचे विचार आणि अनुभव यांतून अनेक उपाय ते शोधून काढतात आणि या उपायांतून जो एक सिद्धांत उत्क्रांत झाला आहे तोच सिद्धांत, राष्ट्रासाठीं योजिलेला संमिश्र स्वरूपाचा विधायक कार्यक्रम म्हणून स्वीकारण्यांत आला आहे. अस्पृश्यतानिवारणाचें मूलतत्त्व हें आहे.

## अस्पृश्यता-निवारणाची पार्श्वभूमि

अस्पृश्यतानिवारणाच्या कार्यास एक परंपरा आहे. राजा राममोहनराय यांनीं एक शतकापूर्वी या बाबतींत अतिशय कष्टपूर्वक कार्य केलें. ब्राह्मो समाजानें परधर्माकडे निघालेल्या हजारों अस्पृश्यांना स्वधर्मांत थांबवून त्यांचें जीवित सुखी केलें. कोणतीहि मोठी चळवळ एकदम उत्पन्न होत नाहीं. तिच्या पाठीमागें थोडीफार पार्श्वभूमि असतेच. सामाजिक व धार्मिक अशा मिश्र स्वरूपाच्या सुधारणांचा आरंभ प्राचीन काळीं रामानुजांनी केला. या सर्व प्राचीन कार्यांमुळें चालू पिढीचें वडिलार्जित धन समृद्ध झालें आहे आणि गांधीजांसारख्या कार्यकर्त्यांस स्फूर्ति मिळाली आहे. या पार्श्वभूमीवर गांधीजींनीं आपल्या समाजाभिमुख राजकीय कार्यक्रमाची उभारणी केली आहे. त्या कार्यक्रमांत त्यांनीं, ज्यांना लोक अस्पृश्य म्हणतात आणि ज्यांना गांधीजींनीं हरिजन असें नांव दिलें, त्यांच्या सामाजिक आणि आर्थिक उद्धारास प्रमुख स्थान दिलें आहे.

देशभर एक संस्मरणीय चळवळीचीं लाट यामुळें उसळली. प्रत्यक्ष यशस्वी झालेल्या कार्यांच्या नामावलीवर त्या चळवळीचें महत्त्व अवलंबून नाहीं, तर त्या चळवळीनें आसेतुहिमालय अशी जी वृत्ति उत्पन्न केली आहे तीवर तिचें महत्त्व अवलंबून आहे. सवर्णांना अवर्णांविषयींच्या कर्तव्याची जी जाणीव उत्पन्न झाली आहे त्या जाणीवेनें सर्व चळवळीवर संस्कार केला आहे. हरिजनांसाठीं अनेक सवलती मिळूं लागल्या आहेत. अनेक प्रकारें त्यांना साहाय्य लाभत आहे. गांधीजींनीं जी हरिजन संघटना केली त्या संघटनेमुळें हीं दानवृत्तीचीं कार्यें, जीं वस्तुतः कर्तव्येंच आहेत, तीं घडूं लागलीं आहेत. तरी अद्याप हरिजनांवर पुष्कळ जाचक बंधनें आहेत. त्या बंधनाविरुद्ध वरिष्ठ न्यायालयापर्यंत दाद मागून त्यांतील कांहीं दूर झालीं आहेत.

हें सर्व कशामुळें घडलें? सामाजिक सुधारकांच्या तुरळक उदाहरणांनीं हें झालें नाहीं, अर्थशास्त्रज्ञांच्या विवेचनांनीं हें घडलें नाहीं. धर्मोपदेशकांच्या उपदेशानें हा फरक पडला नाहीं; तर युगप्रसिद्ध असें जें उपोषण गांधीजींनीं केलें, त्या उपोषणानें राष्ट्रभर जें चैतन्य निर्माण झालें, त्याचा हा प्रभाव आहे. त्या प्रसंगीं, ज्यांनीं आपलें जीवित कःपदार्थ मानलें आहे, आणि ज्यांनीं ४ कोटी हरिजनांना २२ कोटी हिंदी बांधवांपासून विभक्त करण्याच्या घटनेस विरोध करण्यासाठीं प्राणांतिक उपोषण करण्याचा निर्धार केला त्या गांधीजींचा हा प्रभाव आहे.

## युगप्रसिद्ध उपोषण

जेव्हां आजचें राजकीय कार्यक्षेत्र व्यापणाऱ्या राजकीय कार्यकर्त्यांचें कार्य पूर्ण होईल आणि ते दृष्टिआड होतील, जेव्हां आजचें राजकारण उद्यांच्या इतिहासांत जमा होईल, जेव्हां आजच्या लोकसंख्येच्या ⅕ भागास दलित समजण्यांत येत होतें ही गोष्ट एक नामशेष रूढि होईल, त्या वेळीं सुद्धां २० सप्टेंबर १९३२ रोजीं गांधीजींनीं केलेलें युगप्रसिद्ध उपोषण भावी पिढ्यांच्या स्मरणांत शतकानुशतकें राहिलेलें दिसेल. त्या युगप्रसिद्ध प्रसंगानें हिंदी स्वातंत्र्ययुद्धाचें स्वरूप पूर्णपणें बदललें आहे. ज्यांना परमेश्वरानें एका हिंदु जातींत एकत्र केलें आहे त्यांच्यांत बहुसंख्य आणि अल्पसंख्य या नांवानें एक कायमची भिंत उभी करण्याचा तो एक सरकारी डाव होता. तो डाव आपल्या एका सामाजिक

व्यंगाचा राजकीयदृष्ट्या फायदा करून घेण्यासाठीं रचलेला होता. तो सरकारी डाव हाणून पाडण्यासाठीं गांधीजींचें प्रायोपवेशन होतें. एक राजकीय गट या नांवानें हरिजनांना विभक्त करणें ही 'फोडा आणि झोडा' या तत्त्वावर चाललेल्या राजनीतीची पुढील पायरी होती. त्या राजनीतीनें आधीं मुसलमानांना आणि नंतर शीखांना फोडलेंच आहे. नंतर हरिजनांवर त्या प्रयोगाची पाळी आली. त्या वेळीं गांधीजींनीं दुसऱ्या गोलमेज परिषदेंत सांगितलें : "स्वराज्याच्या मोबदल्यासाठींहि मी हरिजनांच्या मूलभूत हक्कांचा बाजार करणार नाहीं. अस्पृश्यता टिकण्यापेक्षां हिंदुधर्म नष्ट झाला तरी मला चालेल!"

या उपोषणानें हरिजनांसाठीं असंख्य प्रकारें साहाय्याच्या चळवळी सुरू झाल्या. अनेकांनीं स्वयंस्फूर्तीनें आपल्या स्वार्थावर पाणी सोडलें. त्यांत स्फूर्तीनें झालेलें एक अविस्मरणीय कृत्य म्हणजे गांधीजींनीं आपला साबरमती आश्रम हरिजनकार्यास देऊन टाकला. गांधीजींची स्वतःची अशी तेवढी एकच संस्था होती. तीहि त्यांनीं हरिजनकार्यास अर्पण केली.

हरिजनांना केवळ स्पर्श करून आपलें कर्तव्य संपत नाहीं. आपण आणखी एक पाऊल पुढें जाऊन त्यांना आपल्या कुटुंबांत आणलें पाहिजे आणि त्यांची आर्थिक स्थिति सुधारण्याचा प्रयत्न केला पाहिजे. त्यांना मंदिरांत प्रवेश करण्यास परवानगी दिली तरी तेवढ्यानें त्यांची आर्थिक क्षेत्रांत होणारी हेळसांड भरून येणार नाहीं. हरिजनप्रश्न हा एक मिश्र प्रश्न आहे. त्यांत आत्मशुद्धी आहे. तशीच सामाजिकदृष्ट्या आपली उपयुक्तता वाढविण्याचेंहि तें कार्य आहे. तो प्रश्न जितका आर्थिक आहे, तितकाच सामाजिक, तितकाच नैतिक आणि धार्मिकहि आहे. गांधीजी म्हणतात : "अस्पृश्यतानिवारण हा हृदयपालट होण्याचा प्रश्न आहे. दान करणें हें कितीहि सुज्ञपणाचें कृत्य असलें तरी केवळ पैसे खर्च केल्यानें हृदयपालट होत नाहीं. ज्या वेळीं आपल्याला निःस्वार्थी आणि आध्यात्मिक वृत्तीचे असे पुरेसे कार्यकर्ते मिळतील त्या वेळींच हा हृदयपालट घडून येईल."

## हरिजन चळवळ

या चळवळींत कोणताहि राजकीय हेतु नाहीं. ती चळवळ केवळ हरि-

जनांच्या आर्थिक उद्धारासाठीं किंवा सामाजिक मान्यतेसाठींहि चाललेली नाहीं. त्यांतील हेतु अगदीं वेगळा आहे. गांधीजी म्हणतात :

" अस्पृश्यता हा हिंदु धर्मावरील कलंक आहे आणि तो वाटेल ती किंमत देऊन दूर केला पाहिजे. तो परमेश्वराविरुद्ध गुन्हा आहे. तें एक असें विष आहे कीं, तें वेळेवरच काढलें नाहीं तर तें प्रत्यक्ष हिंदु धर्माचाच बळी घेईल."

सवर्ण हिंदु म्हणतात कीं, हरिजनांनीं आपल्या वाईट संवयी टाकल्या कीं, आम्ही त्यांच्याविषयींची अस्पृश्यता काढून टाकूं. परंतु त्यांच्यांत व्यंगें असलीं तरी आपण त्यांना जवळ घेतलें पाहिजे. शुद्धीकरणास सवर्णीयांच्या अंतः-करणापासून आरंभ झाला पाहिजे, हरिजनांच्या शरीरापासून नव्हे. तुम्हांला अस्पृश्यतेपासून मुक्त झालेंच पाहिजे. नाहींतर नाश ठरलेला आहे, असे उद्गार गांधीजींनीं अत्यंत व्याकुल मनःस्थितींत काढले आहेत.

हिंदुधर्म ही एक कलाकृति आहे. ती हजारों वर्षांपूर्वीं निर्माण झाली आहे. परकीयांच्या आक्रमणामुळें तिची जशी पिछेहाट झाली त्याप्रमाणें ज्या गोष्टी एकेकाळीं जातिवंत श्रद्धेच्या निदर्शक होत्या त्या गोष्टी, श्रद्धालोप झाल्यावर केवल बाह्य स्वरूपांत विधि आणि समारंभ रूपानें राहिल्यामुळेंहि हिंदुधर्माची अवनति झाली.

वर्ण आणि जात या हिंदुसंस्कृतीच्या मूलभूत गोष्टींविषयीं गांधीजी म्हणतातः

" जर शास्त्रांनीं अस्पृश्यतेस दुजोरा दिला तर मी स्वतःस हिंदु म्हण-विण्याचें सोडून देईन. माझे हे उद्गार अगदीं मनापासून निघालेले आहेत. तसेंच आज (जातिभेद) ज्या हिडीस स्वरूपांत आहे तें स्वरूप शास्त्रास संमत असेल तर मी हिंदु या नामाभिधानाचा त्याग करीन. कारण अंतर्जातीय भोजन आणि विवाह यांविषयीं मला कांहींहि तिरस्कार वाटत नाहीं."

नगर वाचनालय
ता.
सातारा.

# जातीय ऐक्य १४

## हिंदु-मुसलमान ऐक्य

या प्राचीन देशांत विविध जातींमध्यें असलेल्या वांशिक संबंधाचें ज्यांना बरोबर ज्ञान आहे त्यांना हिंदु-मुसलमान ऐक्याचा प्रश्न, सामान्य लोकांना बहुधा वाटतो तितका गंभीर वाटणें शक्य नाहीं. प्रश्न असा आहे कीं, हिंदुस्तानांत आलेल्या मुसलमानांची संख्या मूळची किती होती ? आज किती आहे ? बहुसंख्य मुसलमान याच देशाचे मूळ रहिवासी आहेत. त्यांनीं या देशांतील प्राचीन धर्मपंथाचा आधीं स्वीकार केला होता आणि नंतर इतरांच्या सहवासानें त्यांनीं आपला धर्म बदलला आहे.

शेजारच्या मुसलमान देशांतून मुसलमानांच्या टोळ्यांमागून टोळ्या या देशांत आल्या हें खरें आहे. परंतु तेवढ्यावरून सुद्धां मुसलमानांनीं आपलें स्वतंत्र राष्ट्र निर्मिण्याच्या भूमिकेवरून या प्रश्नाचा विचार करतां येणार नाहीं. अँग्लो-इंडियनांनीं आपण प्राचीन काळीं येथें भटकत आलेल्या इंग्रजांचे वंशज आहोंत म्हणून निराळें राष्ट्रीयत्व सांगावें हें जितकें अयोग्य तितकेंच मुसलमानांचें वरील म्हणणें अयोग्य ठरेल. विविध धर्मांचें संमीलन आणि विविध हितसंबंधांचें सुसंगत एकीकरण यालाच राष्ट्रीयत्व म्हणतात. हिंदु व मुसलमान या दोघांचे आर्थिक हितसंबंध आणि राजकीय महत्त्वाकांक्षा एकच

आहेत. हिंदुस्तानांतील इतर लोकांपेक्षां आपले हितसंबंध निराळे आहेत असें मुसलमान कोणत्या दृष्टीनें म्हणूं शकतील ?

कांहीं लोक एका टोकाला गेले कीं, खरा मतभेद कितीहि क्षुल्लक असला तरी दुसरे लोक दुसरें टोक गांठतात, हा माणसाचा स्वभावच आहे. हिंदु-मुसलमान प्रश्नासंबंधीं कांहींसें असेंच झालें आहे. यामध्यें जे डावपेंच आपल्या-साठीं टाकले आहेत त्यांच्या जाळ्यांत न सांपडण्याची आपण हिंदूंनीं विशेष दक्षता बाळगली पाहिजे. सत्याग्रहानें सूडबुद्धीचा आवेग कमी झालेला असला तरी अद्याप तो बराच प्रभावी आहे. प्रस्तुताकडे आपण जितकें लक्ष देतों तितकें दूरवरच्या परिणामाकडे देत नाहीं. तत्त्वापेक्षां राजकारणांतील डावपेंच, चिरंतन न्यायापेक्षां तात्कालिक सूड यांकडे आपला जास्त ओढा आहे. त्याच वृत्तीचा पाठलाग केल्यास आपणच आपल्या नाशास कारण होऊं. म्हणून अतिरेकी मार्गाचा विचार आपण सोडून द्यावा. मुसलमानांशीं तर-वारीनें लढण्याची दहशत बसविण्याचें वेड काढून टाकावें. कारण त्यांत दोघांचाहि नाश आहे. आणि ज्या तिसऱ्या पक्षाशीं आपण झगडत आहोंत त्याचें येथील आसन स्थिर होण्याचा धोका आहे. त्या तिसऱ्या पक्षावर आपण आज जवळ जवळ मात केली आहे. तो विजय शस्त्रास्त्रांनीं मिळविलेला नाहीं, तर आपल्या संघटित आणि परिणाकारक क्लेशांनीं मिळविला आहे.

## तेढ शहरांत आहे, खेड्यांत नाहीं

या प्रश्नाचें शेवटचें विवेचन फारच सरळ आहे. मुसलमान बहुजनसमाज या वैरवृत्तीपासून अलिप्त आहे. ते आपल्या हिंदुबांधवांबरोबर सलोख्यानें राहतात. खेडेगांवांत जें समाजाभिमुख आर्थिक जीवन दिसतें त्यावरून असें दिसतें कीं, ही तेढ तेथें मुळींच नाहीं. ही तेढ ही शहरी वातावरणाची निर्मिति आहे. नामधारी सुशिक्षितांचे हे प्रताप आहेत. तरी त्यांच्याकडे दुर्लक्ष करतां येत नाहीं. राष्ट्रीय जागृति ही नेहमीं खालच्या थरांतून करीत राहावी लागते. कॉंग्रेसविषयींची निष्ठासुद्धां जोंपर्यंत सुशिक्षितांतच होती तोंपर्यंत इंग्रज टीकाकारांनीं तिकडे लक्ष दिलें नव्हतें. त्यांना ती निष्ठा स्वार्थप्रेरित वाटत होती. स्वार्थ सर्वत्र आहेच. तो अगदीं शेवटीं विराम पावतो. ती जागृति आतां बहुजन समाजापर्यंत पोहोंचली आहे. तेथें स्वयंप्रेरित पुढाऱ्यांची

स्वार्थी वृत्ति सहन केली जात नाहीं. मुसलमान बहुजनसमाजांत अशीच जागृति झाली पाहिजे.

## फोडा आणि झोडा

आपणांस असें सांगण्यांत येतें कीं, या देशांत लोक २५० भाषा बोलतात. विविध धर्म आहेत, हजारों पंथोपपंथ आहेत. म्हणून या देशास ' राष्ट्र ' म्हणतां येत नाहीं. आपण हें विधान भाविकपणें स्वीकारलें, त्याचा प्रचार केला, इतकेंच नव्हे तर त्या विधानावरून आपण स्वतःच आंतरभेदामुळें हवालदील झालों आहोंत !

वस्तुतः या विविधतेच्या गोष्टींना कायदेमंडळांत निवडणुकीचें तत्त्व येईपर्यंत कांहींहि महत्त्व नव्हतें. १८९३ सालीं हिंदी कायदेमंडळांत निवडणुकीचें तत्त्व शिरलें. १९०८ सालीं लोकप्रतिनिधींचें प्रमाण वाढल्यावर जातीयता उत्पन्न झाली. या जातीयतेमुळेंच १९०५ सालीं बंगालची फाळणी झाली आणि तोंपर्यंत ब्रिटिशांचा हिंदूंना आश्रय होता. हिंदूंत राष्ट्रीयत्व वाढत चालल्याचें पाहून सरकारनें त्यास खीळ घालण्याचें ठरविलें आणि पूर्व बंगालमध्यें मुसलमानांचा सवता सुभा करण्यांत आला. ती खोडसाळ-पणाची गोष्ट १९११ सालीं दुरुस्त झाली तरी त्यांत निर्माण झालेली वृत्ति दूर झाली नाहीं.

परंतु मधून मधून लोक जागे होत होते आणि १९१६ सालीं हा अन्याय दूर करण्याचे प्रयत्न करण्यांत आले. परंतु तरी ते यशस्वी झाले नाहींत. १९२१ सालीं खिलापतच्या निमित्तानें सर्व भेदाभेद तात्पुरते दूर झाले. परंतु ती चळवळ अयशस्वी झाल्याबरोबर दोन जमातींमधील तेढ पुन्हां उफाळून वर आली. १९२४ सालापासून ही तेढ कोणत्या ना कोणत्या प्रक्षोभानें व्यक्त होत आहे. तरी हे प्रक्षोभ आकुंचित दृष्टीच्या सुशिक्षितांनीं निर्माण केले आहेत, हें लोक पहिल्यापासून जाणून आहेत. काँग्रेसनें ही गोष्ट १९३१ सालींच नमूद केली आणि दुसऱ्या गोलमेज परिषदेहून परत आल्यावर गांधीजींनीं वर्किंग कमिटीच्या सभासदांजवळ पहिलें विधान केलें तें हें कीं, " यापुढें हिंदी राजकीय धोरणाचा कोणचाहि विचार हिंदु-मुसलमान ऐक्या-वरच उभारला पाहिजे."

हिंदु-मुसलमानांची तेढ टाळण्यासाठीं गांधीजी किती मर्यादेपर्यंत जाऊं शकतात हें त्यांच्याच उद्गारांवरून दिसतें. " कॉंग्रेसला माझ्याबरोबर नेऊं शकलों तर मुसलमानांना शस्त्राचा उपयोग करण्याची यातायात मी पडूं देणार नाहीं. मी त्यांचीहि सत्ता स्वीकारीन, कारण किती केलें तरी तें हिंदी राज्य असणार. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे कोणताहि प्रश्न किंवा पेंचप्रसंग सोडवितांना कॉंग्रेस नेहमीं अहिंसावादी दृष्टीनेंच विचार करील. "

आपल्या अंतस्थ भांडणामुळें आपण सारख्या यातना भोगीत आलों आहोंत. पृथ्वीराजावर महंमद घोरींनें स्वारी केली त्या वेळीं हिंदी राजे एक कां झाले नाहींत ? १५२६ सालीं उत्तर हिंदुस्थानांतील पठाण आणि हिंदी राजांनीं बाबरला आक्रमणाचें आमंत्रण दिलें आणि इब्राहिम लोदीला गादीवरून उतरविण्यासाठीं विनंति केली. १७५६ सालों बंगालमधील मुस्लीम आणि हिंदी जमीनदारांनीं सिराज उद्दौलावर स्वारी करण्यासाठीं इंग्रजांना आमंत्रण दिलें. हे प्रसंग माहित असूनहि आज आपण आपल्या कम्युनिस्ट भाईकडून रशियाला आमंत्रण करावें काय ?

एकी हेंच आपलें बळ आहे. एकीनेंच आपणांस मुक्तता लाभेल.

# नैतिक उद्धार १५

## पापाचा पैसा : दारु !

हिंदुस्थानसरकारच्या आणि प्रांताच्या उत्पन्नांपैकीं दारूपासून प्रांतांना १७ कोटी रुपये मिळतात आणि मध्यवर्ति सरकारला ६ कोट रुपये मिठापासून आणि १ कोट अफूपासून मिळतात. अशी ही २४ कोटी रुपयांची प्राप्ति आहे. गांधीजींनीं मिठाच्या सत्याग्रहाच्या वेळीं जे ११ मुद्दे जाहीर केले होते त्यांत दारु, अफू आणि मीठ यांपासून पापमार्गानें मिळणारा पैसा रद्द करणें हा एक मुद्दा होता. हा पैसा बंद झाल्यानें येणारी तूट भरून काढण्यासाठीं ४८ कोटींचा लष्करी खर्च निम्मा करावा असें गांधीजींनीं सुचविलें होतें.

मद्यपान प्राचीन काळीं नव्हतें असें नाहीं. परंतु सर्व धर्मग्रंथांनीं तें निषिद्ध मानलें आहे. मद्यपाननिषेधहि असणें आणि तें राजरोसपणें निःसंकोचपणें चालू राहणें या दोन गोष्टी मात्र निराळ्या आहेत. ब्रिटिश राजवटीमुळें हा दुर्गुण आतां जाहीरपणें प्रगट होत आहे आणि या वस्तूंचा व्यापार सरकारी परवाना घेऊन राजरोसपणें चालला आहे. कित्येक दिवसपर्यंत दारु हें सरकारी उत्पन्नाचें मुख्य साधन होतें. दारूसारखें पापाचरण प्रचलित करण्यासाठीं परवाना देणें हें, चोरी आणि जुगार या गुन्ह्यांइतकेंच भयंकर गुन्हेगारीचें

कृत्य आहे. ही अत्यंत लज्जास्पद आणि दुःखकारक गोष्ट आहे. वाटमारी किंवा गुप्तपणें चाललेले कुंटिणखाने चालविणें आणि दारूच्या व्यापाऱ्यास परवानगी देणें या दोन्ही गोष्टी सारख्याच भेसूर आहेत. परंतु आपल्या देशांत प्राचीन रिवाजाप्रमाणें दारू, जुगार या गोष्टी जितक्या हीन मानल्या जातात तितक्या त्या सरकारला वाटत नाहींत.

हिंदूंप्रमाणेंच मुसलमानांतील धर्मसंस्थापक आणि धर्मोपदेशक यांनीं सारख्याच तीव्रपणें दारूचा निषेध केला आहे. परंतु आज हिंदु समाजाप्रमाणें मुसलमान समाजांतहि मद्यपानाचा प्रसार होत आहे ही अत्यंत शोचनीय गोष्ट आहे. म्हणून या व्यसनाचें निर्मूलन करणें हें प्रत्येक समाजहितचिंतकाचें कर्तव्य आहे. केवळ धार्मिकदृष्ट्या लोकांना नैतिक उपदेश करून न थांबतां कॉंग्रेसच्या आज्ञा अंमलांत आणणें हेंहि या कार्यासाठीं आवश्यक आहे.

### ज्ञानासाठीं मद्यपान

या राक्षसी मार्गानें १७ कोट रुपये मिळविणारें सरकार कसें आहे पहा ! या देशांत दारूनें गरीब रसातळास जावे आणि याच उत्पन्नांतून गरीबांच्या रक्तामांसाचा बळी देऊन मिळणाऱ्या पैशांतून आपल्या पोराबाळांचें शिक्षण होत आहे म्हणून श्रीमंतांनीं आनंदित व्हावें, हा दैवदुर्विलास नाहीं का ? सोम्याच्या गरजेसाठीं गोम्यास लुबाडावें त्यांतलाच हा प्रकार नाहीं का ? गिधाडांना पोसण्यासाठीं चिमण्या, कावळे बळी द्यावेत असेंच हें नाहीं का ? ही स्थिति याहूनहि भयंकर आहे. एखाद्या बापास सांगावें कीं, तुझ्या पहिल्या मुलाला औषधपाणी पाहिजे असेल, आणि दुसऱ्याला शिक्षण द्यावयाचें असेल, तर तुझ्या तिसऱ्या आणि चौथ्या मुलानें दारू घेतली पाहिजे. असें झालें म्हणजे दारूबाजीच्या ४ कोटी रु. उत्पन्नांतून २ कोटी विश्वविद्यालयास आणि २ कोटी रुग्णालयास खर्च करतां येतात. समाजांतील आईबापांना असा उपदेश करणें ही मागें उल्लेखिलेल्या कृत्यांपेक्षांहि जास्त भयंकर गोष्ट आहे.

गेलीं १७ वर्षें गांधीजी मद्यपानबंदीची चळवळ करीत आहेत. कॉंग्रेस

प्रधानमंडळें अधिकारारूढ झाल्यावर त्यांनीं कित्येक प्रांतांत दारुबंदीचा कार्यक्रम सुरू केला. हें लक्ष्यांत ठेविलें पाहिजे कीं, या कार्यपंथावरचें हें पहिलें पाऊल आहे. हा प्रयोग नाहीं. त्या कार्याचा राहिलेला भाग येत्या काळांत पूर्ण केला पाहिजे. त्यासाठीं अंदाजपत्रकाचा मेळ घालण्याची अडचण नाहींशी करण्यासाठीं इतर बाबतींत शक्य तेथें कपात आणि काटकसर केली पाहिजे आणि उत्पन्नाच्या बाबी वाढविल्या पाहिजेत.

## शहराचें हीन सौंदर्य !

मुंबईस मद्यपानबंदीच्या कार्यक्रमाचा प्रस्ताव होत असतां दिल्ली येथून गांधीजी लिहितात ( २६-३-३९ ):—

" मुंबई हें अतिशय चांगलें बंदर आहे, किंवा येथें अनेक सौंदर्यस्थळें आहेत, म्हणून लोक मुंबई शहर अतिशय सुंदर आहे असें म्हणतात; परंतु जोंपर्यंत येथें गलिच्छ चाळी आहेत, बेसुमार माणसांनीं भरलेल्या गल्ल्या आहेत आणि हरिजनांना जेथें राहावें लागतें अशीं खुराडीं आहेत तोंपर्यंत मुंबईस सुंदर म्हणणें अगदीं चूक आहे. परंतु जेव्हां मुंबईंतलें मद्यपान बंद होईल—तें आतां लवकरच होत आहे—तेव्हां वर सांगितलेलीं व्यंगें असूनहि एवढ्या एका कृत्यानेंहि मुंबई सुंदर ठरेल. कारण जेव्हां येथील मजुरांची मद्यपानाच्या मोहापासून मुक्तता होईल आणि त्याच्यानंतर अनुषंगानेंच होणारी गोष्ट म्हणजे त्यांची परिस्थिति सुधारेल त्या वेळीं मुंबई म्युनिसिपालिटीस गरीबांना चांगलीं वसति-स्थानें पुरवितां येतील. मुंबई सरकार आणि विशेषतः डॉ. गिल्डर यांनीं ज्या धैर्यानें हा प्रश्न हातीं घेतला त्याबद्दल ते मुंबईकराच्या आभारास पात्र आहेत. सर्व प्रांतच त्यांचा आभारी आहे. ज्यांची उपजीविका दारूच्या व्यापारावर चालते असे कित्येक पार्शी आहेत. त्यांच्यावर या चळवळीचा परिणाम होईल हें मला माहीत आहे. मुंबई हा पार्शी लोकांचा बालेकिल्ला आहे. याशिवाय दारु ही पाण्याइतकीच ज्यांना आवश्यक वाटते असेहि कांहीं हौशी नागरिक येथें आहेत. मला अशी आशा आहे कीं, ते सर्व या प्रसंगाचें महत्त्व ओळखतील. त्यांना स्वतः मद्यपाननिवृत्ति मान्य नसली तरी आपल्या गरीब बांधवांसाठीं तरी ते या कार्यास मदत करतील आणि सर्व

देशास ' आदर्श ' दाखवतील. मग मुंबई हें हिंदुस्तानांतलें नुसतें सुंदरच नव्हे तर पहिल्या प्रतीचें शहर ठरेल.

"मद्यपानबंदीमुळें येणारी तूट भरून काढण्यासाठीं अर्थमंत्र्यांना नवे कर बसवावे लागतील. तें ओझें ज्यांच्यावर पडेल त्यांनीं तक्रार करूं नये. कर कितीहि योग्य असले तरी त्यांबद्दल तक्रार करणें ही एक झाली रूढि आहे. परंतु ज्यांना या कार्यासाठीं कराचें ओझें वाहावें लागेल त्यांनीं या महान् प्रयोगास सहकार्य करण्याचें भाग्य लाभल्याबद्दल अभिमान कां बाळगूं नये ?"

# जेव्हां स्वराज्य येईल ! १६

एक दिवस असा नक्की उगवेल कीं, ज्या दिवशीं स्वराज्य स्थापन झालें असें आपणांस स्पष्ट म्हणतां येईल आणि स्वराज्याचा परिणाम दिसूं लागल्याचा आणि स्वराज्यांतर्गत संस्था सुरू झाल्याचा क्षण निश्चित नमूद करतां येईल. वयांत आलेला माणूस आणि नुकताच वयांत येऊं लागलेला माणूस यांच्या मानसिक वा शारीरिक स्थितींतला फरक ओळखणें कठीण आहे. तसेंच स्वराज्यास आरंभ झालेली देशस्थिति आणि त्यापूर्वींची स्थिति यांतील बरोबर अंतर ओळखणें कठीण आहे खरें. तरी आपण स्वराज्य-विषयक आशा मनांत बाळगतों आणि स्वराज्यांतर्गत कल्याणाचीं चित्रें रंगवितों. म्हणून स्वराज्यानें परिस्थितींत कोणता फरक पडणार आहे किंवा ज्या संस्थांवर व कार्यविभागांवर स्वराज्याचा परिणाम होण्याची अपेक्षा आहे त्यांविषयीं निश्चित कल्पना असणें हें आपलें कर्तव्य आहे.

## शहरांनीं लुटलेलें खेडें

देशांतला जो पहिला घटक स्वराज्योत्पन्न परिवर्तनांत येईल तो म्हणजे खेडें हा होय. आज देशाच्या जीवनांत खेड्यांना कांहींहि स्थान नाहीं. आज शहरी जीवनानें खेडीं पूर्णपणें व्यापिलीं आहेत. शहरांतल्या फॅशन्स्

आणि कल्पना खेडयांवर परिणाम करीत आहेत. सुखाचा किंवा व्यवसायाचा शोध करीत खेडयांतून लक्षावधी स्त्री-पुरुष शहराकडे धांवत आहेत. जे लोक खेडयांचे पुढारी होते तेच शहरांना आपली जन्मभूमि मानूं लागले आहेत आणि खेडयांतील आपल्या घरादारांचा उपहास आणि तिरस्कार करूं लागले आहेत. अशा रीतीनें त्यांच्यामध्यें जरी नागरिकत्वाच्या कांहीं कल्पना असल्या तरी त्या कल्पना आणि आपलें सामर्थ्य ते शहरावरच खर्च करीत आहेत. त्यामुळें खेडीं हीं शिक्षण, आरोग्य आणि सहकार्य या बाबतींत मागासलेलीं राहिलीं.

येथें एके काळीं प्रत्येक खेड्यांत एक शाळा होती. नुसत्या बंगालमध्यें ८ हजार शाळा होत्या. त्याच देशांत आज साक्षरतेचें प्रमाण जेमतेम शें. ७ पर्यंत आलेलें आहे. म्हणजे शंभरांतले ९३ निरक्षर राहिले आहेत. नैसर्गिक मार्गानें उपलब्ध अशी औषधयोजना करणारीं आयुर्वेद आणि युनानी हीं शास्त्रें बाजूस पडलीं; कारण लहानमोठ्या आजारासाठीं माणसें शहराकडे धांवूं लागलीं. कालव्यांमुळें पाणीपुरवठा झाला खरा, पण तेच कालवे रोगाचीं माहेरघरें झाले आहेत.

शिक्षण आणि आरोग्य या बाबतींत अधोगति झाली. त्याचप्रमाणें देशांतील कोर्टांनीं खेड्यांतील सहकार्यवृत्तीचाहि उच्छेद केला. कारण कोर्टांमुळें न्याय-दानाच्या नांवाखालीं जुगारीची वृत्ति उत्पन्न केली आहे. फिर्यादी लढविणें ही करमणूक झाली आहे. आणि लोकांना जर थोडा पैसा आणि स्वास्थ्य लाभलें तर तीं वारंवार होणाऱ्या निवडणुकींत खर्च करण्याची संवय लागली आहे. पाश्चात्य लोकशाहीचे दोष आणि अधःपात या देशाच्या नागरिक जीवनांत किती लवकर दिसूं लागले आहेत ही मोठी शोचनीय वस्तुस्थिति आहे. लोक-सत्ता अशी आपणांस फारच थोडी लाभली. परंतु प्रातिनिधिक राज्यपद्धतीचे दुष्परिणाम मात्र आपल्या रक्तांत भिनले आहेत.

लोकांचें सहकारी जीवन अशा रीतीनें उध्वस्त झालें असतां लोकांच्या शारीरिक गरजा आणि वैयक्तिक व शारीरिक वाढ यांच्याकडे आधुनिक सुधार-णेच्या कृत्रिम परिस्थितींत पूर्ण दुर्लक्ष झालें आहे.

या देशांतील जमिनीची उत्पादनशक्ति इंग्लंड, जर्मनी, फ्रान्स, जपान, बेल्जम,

हॉलंड इत्यादि देशांपेक्षां बरीच कमी आहे; त्यामुळें विशेषतः २० व्या शतकांत एकामागून एक दुष्काळ आले, हजारों मैल प्रदेश ओसाड झाले, लक्षावधि माणसें मरण पावलीं, आणि दुष्काळ हे साथीच्या रोगांसारखे अपरिहार्य होऊन बसले; रोगांचीं आणि संकटांचीं कारणें प्रत्यक्ष संचार करीत असतां सरकार मात्र सर्व घडामोडी असहायपणें पाहत बसतें. देशांतील जनता एक वेळ जेवून जगत आहे हें सर चार्लस ईलियट आणि सर विल्यम विल्सन हंटर यांच्या-सारख्यांनीं मान्य केलें असतां एम्पायर मार्केटिंग बोर्ड आणि हिंदुस्थानचे हाय कमिशनर सर अतुल चतर्जी हे सुद्धां १९२९ सालीं आवेशानें सांगत होते कीं, हिंदुस्थानाजवळ तांदुळाचा जादा सांठा आहे ! जर तसा असलाच तर कापडाच्या रूपानें त्याचा भरपूर मोबदला द्यावा लागत आहेच !

जर आपण आपलें कापड उत्पादन करूं शकलों तर देशांत पैसा राहील आणि लोकांना तांदूळ घेतां येईल, ही अगदीं सहज समजण्यासारखी योजना आहे.

आपल्या देशांत नदीच्या कांठीं वसलेलीं अशीं शहरें आहेत कीं जेथें नदी नेहमीं वाहत असते आणि गांवांत पिण्याच्या पाण्याचा थेंबहि नाहीं ! यांत चूक कोठें आहे ? कशांत बिघाड झाला आहे ? कांहीं म्हणतात 'म्युनिसि-पालिट्यांत बिघाड झाला आहे.' तसें आहे खरें. लक्षावधि लोक उपाशी मरत आहेत आणि कोट्यवधि रुपयांचा तांदूळ परदेशीं जाण्यासाठीं तयार ठेवला आहे ! अर्थात् सरकारच याला जबाबदार आहे. लोक भुकेनें तडफडत असतां जें सरकार अन्न परदेशांत जाऊं देतें तें सरकारच या चुका करीत आहे.

अन्न आणि वस्त्र या आवश्यक गरजा आहेत. देशांत तुम्ही कोणत्याहि चैनीची आयात करा, परंतु जो देश आपलें अन्न आणि वस्त्र हींसुद्धां परदेशांतून आणण्यास संमति देतो तो देश एक दिवस नाश पावणार हें ठरलेलें आहे. मग तो देश इंग्लंड असो वा हिंदुस्थान असो ! अन्नवस्त्रासाठीं आयात करावी लागणें हें नाशाचें लक्षण आहे.

## जेव्हां स्वराज्य येईल—

जेव्हां स्वराज्य येईल तेव्हां सरकारला खालील गोष्टी प्रथम कराव्या लागतील. अन्नाची भरमसाट निर्यात आणि वस्त्राची बेसुमार आयात थांबविणें, हातमागाची पुन्हां स्थापना करणें आणि चरख्यांना स्वयंसिद्ध महत्त्व आणून

देणें, विणकर आणि कोष्टी यांची बेकारी दूर करणें आणि अन्न विकत घेण्या-इतका पैसा त्यांना मिळवून देणें, खेड्यांची स्वायत्तता पुनरुज्जीवित करून खेडयाच्या हद्दींतच खेडयांतील भांडणांचा निर्णय होण्याची व्यवस्था करणें या त्या गोष्टी होत. यामुळें ग्रामोद्योगांना स्वयंसिद्ध कौशल्य आणि इभ्रत हीं प्राप्त होतील.

आज देशांत जी ४७ टक्के जमीन लागवडीस योग्य असून ओसाड पडली आहे, ती प्राचीन तलाव आणि कालवे यांचा जीर्णोद्धार करून पुन्हां लागवडीस योग्य होईल. पाणीपुरवठ्याचे प्राचीन मार्ग ब्रिटिश राजवटींत निकामी होऊन पडले आहेत.

शक्य तर परीक्षा बंद करण्यांत येतील आणि शहरी शिक्षणांत खेडुतांचा पैसा आणि आरोग्य यांचा होणारा अपव्यय थांबविण्यांत येईल. त्या वांच-लेल्या संपत्तीनें लोकांचे उत्पादनमार्ग आणि राहणी वाढविण्यांत येतील.

प्रत्येक खेडयांत एक शाळा, एक सहकारी संस्था, एक सहकारी भांडार यांची सोय होईल. त्यामुळें जमीन-गहाण-व्यवहार सुलभ होऊन सावकाराच्या मगरमिठींतून खेडुतांची सुटका होईल.

केवळ पुस्तकी शिक्षण आणि भौतिकवादी विचारपद्धति हीं नाहींशीं करून भावना आणि कल्पनाशक्तीची वाढ करण्याचे प्रयत्न सुरू होतील.

लोकांच्या जीवनाचा राष्ट्राची परंपरा, तत्त्वज्ञान, धर्मपंथ यांच्याशीं जिव्हा-ळ्याचा संबंध प्रस्थापित होईल. जेथें जातीय कलह वाढण्याचा संभव दिसेल तेथें लवाद स्थापन करून आंतरजातीय स्नेहसंबंधाची शाश्वति निर्माण होईल.

आरोग्य आणि सुस्थिति असतांना लोकांनीं सुसंघटितपणें पैसा जमवावा आणि संकटाच्या वेळीं त्या पैशांतून सर्वांना साहाय्य व्हावें. अशा रीतीनें परस्परांमध्यें सहकार्यवृत्तीचे स्नेहबंध निर्माण होतील आणि सर्व समाज, सर्व देश, ही एक प्रचंड ' सहकारी संस्था ' होईल. कर्ज देण्याचें काम फक्त सहकारी संस्थांकडून होईल आणि सावकारांना परवाने काढावे लागतील. म्हणजे सावकार आणि कर्जदार या दोघांच्याहि इभ्रतीस कमीपणा येण्याचें कारण उरणार नाहीं.

कला आणि व्यवसाय यांवर सार्वजनिक संस्थांचें नियंत्रण राहील. त्या

संस्था, परंपरा आणि त्या त्या कलेचे विशिष्ट नियम लक्षांत घेऊन कामाचे तास, स्पर्धा आणि कार्यकौशल्य यांविषयीं कायदे करतील.

हिंदी कला आणि सौंदर्य हीं पूर्ववैभवपदापर्यंत पोहोंचतील. हिंदी प्रांतिक भाषा हीं राज्यकारभाराचें आणि शिक्षणाचें माध्यम होईल आणि हिंदी-हिंदुस्थानी—ही राष्ट्रभाषा होईल. कायद्याच्या फटकाऱ्यासरसा अस्पृश्यतेला शेवटचा तडाखा मारण्यांत येईल आणि मंदिर-प्रवेश हा सर्व जातींचा आणि धर्मांचा हक्क व्हावा यासाठीं एकसारखा प्रचार आणि शिक्षणाची वाढ करण्यांत येईल. अहिंसाप्रधान राज्य स्थापन करण्यासाठीं हिंसात्मक सैन्यास रजा देऊन त्या जागीं शांतिदलाची स्थापना करण्यांत येईल. मूलगामी उद्योगधंद्यांचें राष्ट्रीयकरण करून बेकारीच्या प्रश्नाचा खेड्यांत आणि शहरांत पाठलाग करण्यांत येईल. त्यासाठीं हस्तव्यवसायाचें आणि मोठ्या उद्योगधंद्यांचें पुनरुज्जीवन करण्यांत येईल. प्रत्येकास किमान मजुरी देण्यांत येईल आणि ज्यांच्या जमिनी गेल्या आहेत त्यांना त्या परत देण्यांत येतील. आंतरराष्ट्रीय व्यापार आणि संस्कृति यांचे फायदे लोकांना पटविण्यांत येतील आणि सुधारलेल्या देशांत प्राध्यापक आणि विद्वान् यांची सतत देवघेव चालू होईल.

इंग्रजांस असें पटविण्यांत येईल कीं, आमचे एक बंधु म्हणून तुम्हांला या देशांत राहतां येईल. प्रजेचा मालक म्हणून यापुढें या देशांत तुम्हांला राहतां येणार नाहीं.

## नवें युग म्हणजे नवी समाजपद्धति

अशा रीतीनें एका नव्या युगास, प्रचलित भाषेंत सांगावयाचें म्हणजे नव्या समाजपद्धतीस, आरंभ होईल. त्या पद्धतींत संपत्तीची राजवट नाहींशी होईल. मूठभर सरदार घराण्यांनीं किंवा परकीय गटांनीं सत्ता गाजविणें हा ज्या लोकसत्तेला अर्थ आला आहे ती नष्ट होईल. राज्य ही प्राचीन वंशांची मालमत्ता राहणार नाहीं. शिपाईगिरीची संवय चालू राहावी किंवा राजाचा लौकिक वाढावा यासाठीं युद्धं जाहीर करण्याचा प्रघात बंद पडेल. कायदा आणि सुव्यवस्था हीं टिकविण्याचें एक साधन एवढाच हल्लीं शासनसंस्थेस अर्थ राहिला आहे. अन्नाचा तुटवडा किंवा अन्न विकत घेण्यासाठीं लागणाऱ्या पैशाचा

अभाव यांमुळें कामगार आणि अन्न यांची तटातूट होत आहे. शासनसंस्था म्हणजे कामगार आणि अन्न यांचें संयोजन करणारी एक मध्यस्थी संस्था होय असें शासनसंस्थेचें स्वरूप नव्या युगांत होईल. सरकारी किंवा खाजगी वृत्तपत्रें हीं श्रीमंतांच्या किंवा धाडसी लोकांच्या हातांतलीं बाहुलीं न राहतां चारी दिशांस सत्य घोषित करणारीं अशीं तीं राष्ट्राचीं मुखपत्रें ठरतील. दुःखाचें निराकरण, अरेरावीचें निर्मूलन, घरोघरीं आरोग्य आणि स्वास्थ्य यांचा प्रसार, सर्वांसाठीं अन्नवस्त्र आणि घर यांसाठीं उपाययोजना करणें याचा पुरस्कार करणें हें त्या मुखपत्रांचें कार्य होईल.

# समारोप १७

जीवितव्यवहार अमर्याद आहे. जीविताच्या मर्यादा चर्मचक्षूस नेहमीं दिसत नाहींत. दृष्टीच्या कामाचें नियंत्रण करण्यासाठीं डोळ्यांतील बाहुलीचें सारखें आकुंचन आणि प्रसरण चालू असतें हें शारीरशास्त्रज्ञास माहीत आहे. यामुळें प्रकाश आणि अंतर यांच्याशीं दृष्टीस अनुसंधान बांधतां येतें. सूक्ष्मदर्शक यंत्रानें निरीक्षण करणारा विद्यार्थी दृष्टीचें केंद्रीकरण करणाऱ्या चक्रावर आपलीं बोटें ठेवून निरीक्षण करतो. प्रत्येक क्षणास त्या चाकाचें अनुसंधान राखावें लागतें. मोटार हांकणारास दिशा-नियंत्रक चक्रावर हात ठेवावा लागतो.

गांधीजी याच पद्धतीनें आकाशापर्यंत भरारी मारतात आणि अगदीं चरख्यापर्यंत भूतलावर उतरतात. जागतिक प्रश्नांचा उलगडा ते करूं शकतात आणि त्याच वेळीं 'धनुष्य-चरख्यां'तील दोष दूर करण्याचाहि विचार करूं लागतात.

विरोधकांशीं त्यांचें वैर नाहीं. विरोधकाच्या दृष्टिकोनाचा ते सहानुभूतीनें विचार करूं शकतात. त्यांच्या तत्त्वास आणि पंथास विरोध करणारे असे जे हिंदी राजकीय पुढारी आहेत त्यांच्याविषयीं गांधीजी उदारबुद्धि बाळगतात. त्यांचें औदार्य, हिंदी राष्ट्राचा प्रत्यक्ष शत्रु असा जो 'इंग्रज' त्याचाहि

स्वीकार करण्याइतकें व्यापक आहे. ते केवळ पुढील पिढ्यांचेच मार्गदर्शक नाहींत तर ते धर्मप्रवर्तक आहेत. गांधीजींचें व्यक्तित्व स्थानिक किंवा राष्ट्रीय मर्यादेनें मर्यादित होणारें नाहीं. तें विश्वव्यापक आहे.

## गांधीवाद--एक जीवनपंथ

तत्त्वज्ञानी हा पक्षाभिनिवेशी असतां कामा नये. तो पक्षोपपक्षांच्या कलहाच्या पलीकडे असला पाहिजे. गांधीजी आपल्या विरोधकांच्याविषयीं जी आत्मीयता दाखवितात तीमुळें तो हतबल होतो.

१९३४ ऑक्टोबरपासून गांधीजींनीं काँग्रेसचें 'पावली' सभासदत्व सोडलें आहे. परंतु तरी काँग्रेसविषयींची त्यांची आस्था कमी झाली नाहीं. ते काँग्रेसचे अनधिकृत सल्लागार आहेतच. गेलीं सहा वर्षे ( आतां १२ ) ते काँग्रेसच्या कार्याचा निर्णय करीत आहेत. वर्ध्यास जून १९४० मध्यें आणि दिल्लीस जुलै १९४० मध्यें, स्वराज्यांत अहिंसात्मक संरक्षणव्यवस्था करण्यासंबंधीं मतभेद झाले. जुलै १९४० मध्यें पुणें येथें झालेल्या अधिवेशनाच्या वेळीं, गांधीजींना बाजूस ठेवून वर्धा आणि दिल्ली येथील वर्किंग कमिटीचे निर्णय कायम करण्यांत आले. हिंसेवर आधारलेलें पुढारीपण—फार काय स्वराज्यसुद्धां—गांधीजी मानीत नाहींत. जगाचा उपदेशक, नव्या धर्माचा संस्थापक या दृष्टीनेंच ते एखाद्या संस्थेकडे पाहतात. ती संस्था किंवा संघटना, त्यांचीं तत्त्वें आणि तत्त्वज्ञान यांच्याशीं जोंपर्यंत सहकार्य करीत असेल तोंपर्यंत त्या संस्थेच्या प्रसाराचें माध्यम म्हणून ते स्वीकार करतात. संस्थेच्या चौकटींत आणि मर्यादेंत ते स्वतःस नियंत्रित करूं शकत नाहींत. ते त्या संस्थेच्या मर्यादा ओलांडीत पुढें निघून जातात.

आपल्या मालकीचें असें या जगांत गांधीजींनीं कांहींहि मानलें नाहीं. साबरमती आश्रम ही एकच गोष्ट अशी होती. तीहि त्यांनीं १९३३ सालीं हरिजन कार्यास अर्पण करून टाकली. यंग इंडिया छापखाना १९३० सालीं सरकारनें जप्त केला. गांधीजींनीं त्याची परत मागणी केली नाहीं.

गांधीजींचें तत्त्वज्ञान हें स्थानिक प्रश्न सोडविण्यासाठीं जन्मलेलें नाहीं. जागतिक दुःखाच्या निवारणासाठीं तें तत्त्वज्ञान अवतीर्ण झालें आहे. कोणत्याहि कारणासाठीं त्यांना आपलीं तत्त्वें सोडावीं लागलीं नाहींत. त्यांनीं

कधींच समेट केला नाहीं, असा याचा अर्थ नाहीं. तडजोड हें सत्याग्रहाचें सार आहे. परंतु गांधीजींचें तत्त्वज्ञान नैतिक भूमिकेवर कोणतेंहि तत्त्व बाद करूं शकत नाहीं. होम्स यांच्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे "ज्या गोष्टी इतरांनीं वैयक्तिक शिस्तीसाठीं उपदेशिल्या त्या गोष्टींचें गांधीजींनीं जागतिक कल्याणासाठीं एका सामाजिक कार्यक्रमांत रूपांतर केलें आहे" अशा प्रचंड आणि प्रभावी कार्यांत सामान्य माणसांना विसंगत आणि अव्यवहार्य वाटण्यासारखा कांहीं भाग असणारच. परंतु "गांधीजी बुद्धि आणि हृदय यांच्यांत तडजोड करण्यास कधींहि तयार नसतात. आपल्या विवेकबुद्धीच्या विरुद्ध जाण्यास ते कधींहि तयार नसतात. ते कोणच्याहि गोष्टींकडे ऐहिक दृष्टीनें न पाहतां स्वतःच्या आत्मज्ञानाचें आणि 'इतरांच्या आत्म्यांची सेवा करण्याचें कार्यक्षेत्र या दृष्टीनें पाहतात," हे सोफिया वाडिया यांचे उद्गार लक्षांत ठेवले म्हणजे वरील विसंगतीचें आणि अव्यवहार्यतेचें निराकरण होतें.

योग्य वेळीं तडजोड करण्याची तयारी आणि ध्येयाचा अविरत पुरस्कार यांमुळें गांधीजींनीं राष्ट्राचा विकास केला आहे. राष्ट्रीय मुक्ततेच्या मार्गांत येणारे संकुचित वृत्तीचे हितसंबंध यामुळें दूर झाले आहेत. समतोल जीविताचीं तत्त्वें पूर्णपणें आत्मसात् करणें हेंच गांधीजींच्या यशाचें रहस्य आहे.

कांहीं वेळां माणसाचे सद्गुणच दुर्गुण ठरतात. विचारांत तर्कशुद्धता (Radical) असणें हा सद्गुण आहे. परंतु आपण आणि आपला विरोधक यांच्यांत समेट करण्यास असमर्थ ठरणें हा दुर्गुण आहे. जो तो आपल्या मतांचा आग्रह धरतो, हें ठीक आहे. अंतिम मूल्याच्या दृष्टीनें त्याचें मत अगदीं १०० टक्के बरोबरहि असेल. परंतु समाजांत तो एकटाच घटक नाहीं. व्यक्ति किंवा वस्तु किंवा व्यक्ति आणि वस्तु यांच्या संबंधाविषयींचे जे सिद्धांत असतात त्यांनाच मतें म्हणतात. मत असणें याचा अर्थ तडजोड, समेट, आणि देवघेव यांचा समावेश ज्या जीवितांत होतो असें जीवित. जीवितप्रवाहांत विचित्र विसंगतीचे प्रसंग येतातच आणि आपल्या जीवितांतील या विसंगतीस सुसूत्र करणें हें समतोल वृत्तीचें लक्षण आहे.

एका शक्तीचें संवर्धन हें दुसऱ्या एखाद्या शक्तीच्या प्रगतीस मारक होतें हें आपणांस अनुभवानें माहीत आहे. एक हात जायबंदी झाला, तुटला, तर त्याच्या कार्यशक्तीची भरपाई दुसऱ्या हाताकडून होत असते. गांधीजींनीं

आपल्या जीवितांत शरीर आणि आत्मा यांच्या प्रगतींत प्रमाणबद्धता टिकविली आहे. अतिशय कडक शारीरिक संयम करीत असतां त्यांनीं आत्म्याची उपासमार केली नाहीं. आपल्या भावनांवर ते बुद्धीचें नियंत्रण ठेवतात आणि त्यांची बुद्धि भावनांनीं संयमित होत असते. भावना आणि बुद्धि एकमेकांवर परिणाम करून परस्परांस साहाय्य करीत जीवितांत प्रमाणबद्धता राखून त्यास पूर्णत्वहि आणतात. त्यामुळें गांधीजींच्या जीवनांत धार्मिकता जितकी उत्कट, उदात्त आणि गंभीर स्वरूपांत आढळते तितकीच उत्कट मानवताहि आढळते. सत्याच्या द्वारें ते आपल्या जीवनाचें अगदीं निष्ठुरपणें नियमन करतात. आपल्या बांधवांशीं आणि विरोधकांशीं वागतांना सत्याच्या तीक्ष्ण धारेवर अहिंसेच्या मार्गानें सहृदयत्वाचें सिंचन करीत असतात. सत्य हें निष्ठुर असावयाचेंच आणि अहिंसा ही मृदु आणि सांत्वनपर असावयाचीच. सत्यप्रिय म्हणून गांधीजी दुष्ट नाहींत आणि अहिंसक म्हणून ते भावडेहि नाहींत. या दोन्ही गोष्टींच्या हितावह संयोगानें सत्याग्रह पंथास पूर्णत्व आलें आहे आणि गांधीजी हे पहिले सत्याग्रही झाले आहेत. सत्याग्रही या भूमिकेवर ते पूर्ण पुरुषाच्या अवस्थेच्या जवळ गेले आहेत. सखोल धार्मिकता आणि उदात्त मानवी भावना हें पूर्ण पुरुषाचें लक्षण आहे.

## गांधीवाद कशांत आहे ?

गांधीवाद म्हणजे काय ? गांधीवाद कशांत आहे ? गांधीवाद भाषेंत नाहीं, कपड्यांत नाहीं, सुसंस्कृत सामाजिक व्यवहारांत नाहीं किंवा असंस्कृत मानवी जीवनांतहि नाहीं. आश्रमानेंच गांधीवादाचा मक्ता घेतला आहे असें नाहीं. कॉंग्रेसच्या भव्य मंडपांतहि गांधीवाद नाहीं. गांधीवाद गहन अरण्यांत नाहीं. गांधीवाद निर्झराच्या कांठीं नाहीं. हृदय हेंच गांधीवादाचें वसतिस्थान आहे. गांधीवाद एका मुखांतून परंतु अनेक भाषांतून व्यक्त होतो. गांधीवाद एकाच ध्येयाचे शेंकडों मार्ग दाखवितो. एकाच ध्येयाची एकनिष्ठपणें सेवा करण्याचे विविध मार्ग गांधीवाद दाखवितो. गांधीवाद हिंदुस्थानच्या खेड्यांत आहे. आपण जिला आपली सुधारणा म्हणतों त्या दृष्टीनें 'सुधारलेल्या' लोकवस्तींत गांधीवाद नाहीं. हिंदी राष्ट्रवाद खेड्यांमध्यें आहे म्हणूनच ग्रामीण जीवनांतील उदात्त तत्त्वांचें पुनरुज्जीवन करणें हें गांधीवादाचें ध्येय आहे.

अशा विभूतींच्या नेतृत्वाखालीं काँग्रेसनें राजकारणावर सेवेची मुद्रा उठविली आहे, व्यापक संस्कृतीचा आग्रह धरला आहे, वरिष्ठ वर्गात उच्च देशभक्ति निर्माण केली आहे आणि खेडुतांचें पुढारीपण प्रस्थापित करण्यासाठीं काँग्रेस झटत आहे. आपल्या ध्येयाशीं जर आपण प्रामाणिक असलों तर मानवी जीवनांतील कोणताहि प्रश्न हा धर्माच्या कक्षेबाहेर आहे असें आपणांस म्हणतां येणार नाहीं. कारण धर्म हा कोणत्याहि एका पंथासाठीं वा उपासनापद्धतीसाठीं नाहीं, धर्माचें उद्दिष्ट उच्चतर जीवन हें आहे. आत्मार्पणाची वृत्ति संपादन करणें हें धर्माचें ध्येय आहे. जेव्हां आम्ही " राजकारणाचा धर्म " असा शब्दप्रयोग करतों, तेव्हां प्रचलित राजकारणाचें पवित्रीकरण करणें, अनेक प्रकारें विभागलेलें संकुचित राजकारण व्यापक करणें, आणि स्पर्धेवर चाललेलें राजकारण सहकार्यांत संघटित करणें असाच त्याचा अर्थ असतो.

काँग्रेसच्या विधायक कार्यक्रमांत हीच दृष्टि आहे. देशांतील शहरवासीयांना, विलायती कपडे वापरणाऱ्यांना, विलायती भाषा बोलणाऱ्यांना आणि परकी धन्याची सेवा करणाऱ्यांना, त्या कार्यक्रमाविषयीं पुरेसा जिव्हाळा वाटत नाहीं हें आम्हांला कबूल केलें पाहिजे. शहरी जीवनांत ही विकृति उत्पन्न होण्याचा कारणांचा शोध केला तर यांत अज्ञानच जास्त प्रभावी असल्याचें आढळून येईल. आपले मालक कोण आहेत हें आपणांसच माहीत नाहीं. खेड्यांत काय किंवा शहरांत काय अज्ञानाप्रमाणें परसत्तेच्या अधिकाऱ्यांच्या भीतीचा पगडा सर्वत्र दिसतो.

हिंसा प्रमाण मानल्यामुळें ही भीति उत्पन्न झाली आहे. ही भीति नाहींशी करून त्या ठिकाणीं अहिंसेविषयींच्या मौलिक प्रेमामुळें उत्पन्न होणारा आशावाद आणि धैर्य निर्माण करणें हें अत्यंत महत्त्वाचें कार्य आहे. विधायक कार्यक्रमानें हें कार्य होत आहे. खादीविषयीं आम्हीं बोलतों त्याच वेळीं, गरीबांना मदत, किंवा निदान पोटापुरतें वेतन देण्याचा एक मार्ग ही तर त्यांत दृष्टि आहेच, परंतु त्याबरोबरच त्यांच्या अंगाखांद्यावर असलेलीं दास्याचीं चिन्हें फेकून देऊन स्वाभिमानाची वाढ करणें हाहि त्यांत हेतु आहे.

आर्थिक भूमिकेवर जें कार्य खादीनें साधण्याचा आम्ही प्रयत्न करतों तेंच कार्य नैतिक भूमिकेवर अस्पृश्यता निवारणानें चालू आहे.

नवीन जीवितमूल्यें निर्माण करून जीविताचें राष्ट्रीयकरण करावयाचें आहे. खेडुतांमध्यें राष्ट्रीयत्वाची जाणीव उत्पन्न करून आणि व्याख्यानबाजीनें नव्हे तर सेवेच्या दैनंदिन कार्यक्रमानें त्यांच्यांत आत्मविश्वास जागृत केला पाहिजे. एकदां हा आत्मविश्वास संपादन केला कीं, कॉंग्रेसचा देशविमोचनासाठीं आंखलेला विधायक कार्यक्रम तत्काळ अंमलांत येईल. या मार्गानें, पिकलेलें फळ हातांत पडावें, तसें स्वराज्य आयतें मिळणार नाहीं. परंतु स्वराज्य-मंदिराचा पाया या मार्गानेंच घालतां येईल. लोकसेवेचें प्रत्येक कृत्य हा या मंदिराच्या उभारणींतला एक दगड आहे. समाजाभिमुख- अर्थप्रधान सामाजिक घटनेंतील एकेक उणीव, एकेक व्यंग दूर करणें म्हणजे त्या भव्य मंदिराचा एक एक मजला उभारणें होय. हें कार्य सावकाश होणारें आहे; परंतु त्याचे परिणाम निश्चित आणि चिरस्थायी आहेत. हाच संदेश कॉंग्रेसनें खेड्यांपर्यंत पोहोंचविला आहे. गांधीजींच्या नेतृत्वाखालीं आणि त्यांच्या स्फूर्तीनें आम्ही ज्याला 'खेड्यांचें नेतृत्व' म्हणतों तें स्थापन केलें आहे.

गांधीयुगांत जे जगत आहेत ते धन्य होत. त्यांचीं तत्त्वें ज्यांनीं आत्मसात् केलीं आहेत ते त्याहूनहि धन्य आहेत आणि त्या तत्त्वज्ञानाचा जे पुरस्कार करतात त्यांच्या धन्यत्वास तोडच नाहीं.

गांधी मर्त्य असले तरी गांधीवाद अमर आहे ! गांधीवाद पुढें मागें लोपला तरी गांधी अमर झाले आहेत ! !

# प्रार्थना

( गांधीजी )

" प्रार्थनेनें माझ्या जीविताचें संरक्षण केलें आहे. प्रार्थनेवांचून मी कधींच वेडा झालों असतों. सार्वजनिक आणि वैयक्तिक जीवनांत माझ्या वाटेला अत्यंत कटु अनुभवहि आले आहेत. त्यामुळें मला कांहीं वेळां तीव्र निराशाहि वाटलेली आहे. परंतु त्या निराशेपासून जर कशामुळें मला मुक्त होतां आलें असेल तर तें केवळ प्रार्थनेमुळें! सत्य हा माझ्या जीविताचा एक भागच झाला आहे तसें प्रार्थनेचें झालें नाहीं. केवळ गरज म्हणूनच माझ्या जीवनांत प्रार्थनेस स्थान मिळालें. मी स्वत: अशा कांहीं पेंचांत सांपडलेला असें कीं, त्या वेळीं प्रार्थने-खेरीज मला समाधान वाटणेंच अशक्य होतें. परमेश्वराविषयींची माझी श्रद्धा जसजशी वाढते तसतशी प्रार्थनेची तळमळ दुर्दमनीय होत गेली. प्रार्थनेवांचून मला जीवित निष्क्रिय आणि शून्यवत् वाटूं लागलें.

"आयुष्याच्या आरंभीं मी परमेश्वरावर विश्वास न ठेवतां आणि प्रार्थना बाजूस ठेवूनच वागूं लागलों. त्यामुळें जीवितांत आलेली उणीव, शून्यत्व मला कितीतरी वर्षें कळलेंच नाहीं आणि बऱ्याच काळानंतर

मला जेव्हां त्याची जाणीव झाली, त्या वेळीं मला असें कळून चुकलें कीं, अन्न जसें शरीरास अपरिहार्य आहे त्याचप्रमाणें आत्म्यास प्रार्थना अपरिहार्य आहे. वस्तुतः आत्म्यास प्रार्थनेची जितकी जरूर आहे तितकी अन्नाची शरीरास नाहीं. कारण शरीराच्या सुस्थितीसाठीं निराहारहि पुष्कळ वेळां आवश्यक असतो. परंतु प्रार्थनेच्या बाबतींत अशी गोष्ट संभवतच नाहीं. प्रार्थनेचें अजीर्ण होणें शक्यच नाहीं.

"प्रार्थनेमुळेंच जीवनांत प्रकाश प्राप्त होतो आणि प्रार्थनेवांचून जगणें जवळ जवळ अशक्यच आहे. या गोष्टीस बुद्ध, येशू आणि महंमद या सर्वश्रेष्ठ जगद्गुरूंचें जीवन हीच साक्ष आहे. ज्यांना प्रार्थना हें एकमेव समाधान आहे असे लक्षावधी ख्रिश्चन, हिंदु आणि मुसलमान तुम्हांला आढळतील. तुम्ही त्यांना भोंदू म्हणतां किंवा आत्मवंचक म्हणतां. ज्या 'भोंदूपणा'नेंच मला जीवितांत मुख्य आधार सांपडला आहे, ज्यावांचून मला क्षणभरहि जगणें शक्य झालें नसतें असा जर तो भोंदूपणा असेल तर मी असें म्हणेन कीं, सत्याचा शोधक म्हणून मला तो भोंदूपणाहि प्रिय आहे. राजकीय क्षितिजावर दारुण निराशेचे ढग दिसत असतांहि माझी चित्तशांति भंग पावली नाहीं. खरें म्हणजे माझ्या चित्तशांतीबद्दल मत्सर वाटणारे लोक मला आढळले आहेत! ती चित्तशांति प्रार्थनेनेंच प्राप्त होते.

"मी ज्ञानसंपन्न नाहीं परंतु मी प्रार्थनासंपन्न मात्र आहें. प्रार्थनेच्या पद्धतीची मला रुखरुख वाटत नाहीं. प्रार्थनेच्या बाबतींत प्रत्येकाची पद्धति स्वयंसिद्ध आहे. परंतु त्यांतहि कांहीं सुपंथ आहेत आणि प्राचीन ऋषिवर्यांनीं अनुसरलेल्या प्रार्थनेच्या प्रस्थापित मार्गानें निर्धास्तपणें जातां येतें.

"तुमच्या मनांत आस्तिक्य बुद्धि उत्पन्न करण्याचें सामर्थ्य माझ्यांत नाहीं. कांहीं गोष्टी स्वयंसिद्ध असतात आणि कांहीं गोष्टी असिद्धच

राहतात. परमेश्वराचें अस्तित्व ही गोष्ट भूमितींतील मूलभूत तत्त्वासारखी आहे. ती आपल्या अंतःकरणाच्या आटोक्यांत नसेलही. मी बुद्धीच्या पलुयाविषयीं बोलत नाहीं. बुद्धिगम्य गोष्टी या थोडयाबहुत आभासमय असतात. बुद्धिवादी विवेचनानें परमेश्वराविषयींची श्रद्धा निर्माण करणें शक्य नाहीं. कारण ती गोष्ट तर्कातीत आहे. तर्कबुद्धि तेथें पोहोचूं शकत नाहीं.

"परमेश्वराचें अस्तित्व तर्कानेंहि पटावें अशा पुष्कळ घटना आहेत. परंतु तशा तऱ्हेचें तर्कशुद्ध स्पष्टीकरण करून मी तुमच्या बुद्धिमत्तेचा अपमान करणार नाहीं. मी तुम्हांला असें सांगेन कीं, तीं सगळीं तर्कशुद्ध विवेचनें एकदम बाजूस करा आणि अगदीं 'बाह्य' वृत्तीनें परमेश्वरावर विश्वास ठेवण्यापासून आरंभ करा. मी आहें त्याअर्थी परमेश्वरहि आहे! माझें अस्तित्व हीं जशी माझी गरज आहे त्याचप्रमाणें परमेश्वराचें अस्तित्व हीहि लक्षावधि लोकांची गरज आहे. त्यांना ती गरज शब्दांत व्यक्त करतां येत नसेल; परंतु त्यांच्या जीवनावरून असें स्पष्ट दिसतें कीं, ती त्यांच्या आयुष्याचाच एक भाग आहे."

## आमचीं प्रकाशनें

१ वर्धा-शिक्षण-योजना ४।

संपादक–आचार्य भागवत

२ गांधी-दर्शन ४

आचार्य कृपलानी

३ मंगलधाम ३॥

गोपीनाथ तळवलकर

४ सामाजिक प्रश्न २

काकासाहेब कालेलकर

देशमुख आणि कंपनी
१९१ शनवार,
पुणें २

किंमत
४ रुपये

पुढील प्रकाशन
वटपत्रें
वि. स. खांडेकर